मराठी साहित्याचे उत्तरंग



REFBK-0026510

प्रा. चंद्रकुमार नलगे

संदर्भ
निबंध
३४५५
२६५१०
७४७१६२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

12 FEB 1992

12 FEB 1992

27 MAY 1992

18 JUL 1992

22 SEP 1993

(क्र. मा. पहा)
२०००-१२-८८

मराठी साहित्याचे उदयरंग

प्रा. चंद्रकुमार नलगे

REFBK-0026510

सुरेश एजन्सी

प्रकाशक
गुलाबराव मारुतीराव कारले
सुरेश एजन्सी
२०५ शुक्रवार पेठ
पुणे २

© चंद्रकुमार नलगे

मुखपृष्ठ
बुवा शेटे

पहिली आवृत्ती
नोव्हेंबर, १९९१

किंमत पस्तीस रुपये

मुद्रक
संगम प्रेस प्रा. लि.
१७ ब, कोथरुड, पुणे २९

टाईपसेटिंग
शैलेन्द्र कारले
फिनिक्स ग्राफिक्स
२०५ शुक्रवार पेठ
पुणे २

● या ग्रंथास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

उदयरंगाच्या पूर्वछटा

'मराठी साहित्याचे उदयरंग' या पुस्तकाच्या नावावरून यातील लेख सर्वंकष वाटण्यासारखे आहेत. परंतु तसे नसून ते स्फुट स्वरूपाचे शोध लेख आहेत. यातील लेख निरनिराळ्या वाङ्मयीन नियतकालिकांतून प्रसिद्ध झाले असून काही वाङ्मयप्रकारांच्या प्रारंभरूपाचा विचार करणारे आहेत. निबंध, कथा, नाटक, लोकनाट्य, तमाशा प्रेमपत्रात्मक वाङ्मय यांच्या उद्गम आणि विकासाचा विचार या लेखातून मांडलेला आहे. वैचारिक साहित्य, ग्रामीण साहित्य, दलित साहित्य यासंबंधीच्या उपेक्षा आणि अपेक्षा यासंबंधीही विवेचन आहे. एखाद्या वाङ्मयप्रकाराचे अध्यापन करीत असता कोणती मूळ बैठक आवश्यक आहे याचाही विचार 'कथेचे अध्यापन' या लेखाच्या अनुषंगाने चित्रित केला आहे. ' ग्रामीण साहित्य : अपेक्षा आणि उपेक्षा' व 'निमित्त : महाराष्ट्रातील पहिले डोंगरी साहित्य संमेलन' हे दोन लेख म्हणजे माझी अध्यक्षीय भाषणे असून त्यामध्ये ग्रामीण साहित्याच्या स्थितिगतीचा विचार मांडलेला आहे.

सातआठ वर्षांपूर्वी मी प्रेमपत्रे जमविण्याचा छंद जडवून घेतला आणि महाराष्ट्राच्या विविध भागातील अनेकांची

अस्सल प्रेमपत्रे जवळ जवळ अडीच हजारपर्यंत जमा केली. या अस्सल प्रेमपत्रांतून प्रकट झालेले भावसौंदर्य, विचारसौंदर्य, भाषासौंदर्य आणि मनोरम लालित्य काल्पनिक वाङ्मयापेक्षा किती सरस आहे त्याचे दर्शन 'प्रेमपत्र संशोधन' या लेखात घडविले आहे. त्यासाठी 'काही अक्षर प्रेमपत्रे' मुद्दाम येथे समाविष्ट केली आहेत. त्यातून वाङ्मयीन गुणांचा झालेला आविष्कार प्रत्ययास येईल.

' साहित्यशास्त्राची माहिती नसणारा थोर साहित्यिक या मागनि गेला ? ' हा तर अण्णा भाऊ साठे यांच्यावरील मृत्युलेख आहे. त्यातून पहिले दलित साहित्य अण्णाभाऊंच्या समर्थ लेखणीतून कसे अवतरले होते हे स्पष्ट होते. 'चंद्र चांदण्यांच्या साक्षी' हा लेख तर थोरामोठ्यांच्या आत्मचरित्रातील रेखाटलेले बालपण नेमके कसे होते, त्यांच्या जडणीघडणीत त्याचा कितपत वाटा आहे हे दाखवितो. मराठीतील पहिली विद्रोही कविता संत तुकारामांच्या अभंगांच्या द्वारे कशी व्यक्त झाली हे 'तुकाराम : गुंडवाटा शुद्ध करी' या लेखातून स्पष्ट केले आहे. 'मराठी नाट्याचे पूर्वरंग' या लेखात मराठीतील नाट्यवाङ्मय मूळ रूपात कसे होते, त्याचा मराठी वाण कसा, त्याचा उद्‌गम कसा झाला व त्याचे आजचे स्वरूप कसे आहे ते सोदाहरण दाखविले आहे.

महाराष्ट्राला दिवाळी अंकांचे वेडच आहे. या दिवाळी अंकांचे व त्यातील विविध साहित्याचे स्वरूप स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळी कसकसे वैविध्यपूर्ण बनत गेले याचे दिग्दर्शनही केले आहे. या शोधलेखांचे स्वरूप पाहिले तर मराठी साहित्यरूपांचा विचार या ना त्या निमित्ताने झाला आहे हे निश्चितच.

प्रा. चंद्रकुमार नलगे

अनुक्रम

१. मराठीतील निबंधवाङ्मय आणि महाराष्ट्रातील सामाजिक विचार / ७
२. मराठी नाट्याचे पूर्वरंग / ३८
३. कथेचे अध्यापन / ५१
४. तुकाराम : गुंडवाटा शुद्ध करी / ६७
५. ग्रामीण साहित्य : अपेक्षा आणि उपेक्षा / ७४
६. तमाशा : अस्सल मराठी वाण / ८६
७. निमित्त : महाराष्ट्रातील पहिले डोंगरी साहित्य संमेलन / १०१
८. प्रेमपत्रे संशोधन / ११०
९. काही अक्षर प्रेमपत्रे / ११८
१०. साहित्यशास्त्राची माहिती नसणारा
थोर साहित्यिक याचा मार्गानं गेला ! / १३५
११. चंद्र-चांदण्यांच्या साक्षी (आत्मचरित्रातील थोरांचे बालपण) / १४३
१२. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दिवाळी अंक / १५१

अस्सल प्रेमपत्रे जवळ जवळ अडीच हजारपर्यंत जमा केली. या अस्सल प्रेमपत्रांतून प्रकट झालेले भावसौंदर्य, विचारसौंदर्य, भाषासौंदर्य आणि मनोरम लालित्य काल्पनिक वाङ्मयापेक्षा किती सरस आहे त्याचे दर्शन 'प्रेमपत्र संशोधन' या लेखात घडविले आहे. त्यासाठी 'काही अक्षर प्रेमपत्रे' मुद्दाम येथे समाविष्ट केली आहेत. त्यातून वाङ्मयीन गुणांचा झालेला आविष्कार प्रत्ययास येईल.


' साहित्यशास्त्राची माहिती नसणारा थोर साहित्यिक या मार्गाने गेला ? ' हा तर अण्णा भाऊ साठे यांच्यावरील मृत्युलेख आहे. त्यातून पहिले दलित साहित्य अण्णाभाऊंच्या समर्थ लेखणीतून कसे अवतरले होते हे स्पष्ट होते. 'चंद्र चांदण्यांच्या साक्षी' हा लेख तर थोरामोठ्यांच्या आत्मचरित्रातील रेखाटलेले बालपण नेमके कसे होते, त्यांच्या जडणीघडणीत त्याचा कितपत वाटा आहे हे दाखवितो. मराठीतील पहिली विद्रोही कविता संत तुकारामांच्या अभंगांच्या द्वारे कशी व्यक्त झाली हे 'तुकाराम : गुंडवाटा शुद्ध करी' या लेखातून स्पष्ट केले आहे. 'मराठी नाट्याचे पूर्वरंग' या लेखात मराठीतील नाट्यवाङ्मय मूळ रूपात कसे होते, त्याचा मराठी बाणा कसा, त्याचा उद्‌गम कसा झाला व त्याचे आजचे स्वरूप कसे आहे ते सोदाहरण दाखविले आहे.

महाराष्ट्राला दिवाळी अंकांचे वेडच आहे. या दिवाळी अंकांचे व त्यातील विविध साहित्याचे स्वरूप स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळी कसकसे वैविध्यपूर्ण बनत गेले याचे दिग्दर्शनही केले आहे. या शोधलेखांचे स्वरूप पाहिले तर मराठी साहित्यरूपांचा विचार या ना त्या निमित्ताने झाला आहे हे निश्चितच.

प्रा. चंद्रकुमार नलगे

अनुक्रम

१. मराठीतील निबंधवाङ्मय आणि महाराष्ट्रातील सामाजिक विचार / ७
२. मराठी नाट्याचे पूर्वरंग / ३८
३. कथेचे अध्यापन / ५१
४. तुकाराम : गुंडवाटा शुद्ध करी / ६७
५. ग्रामीण साहित्य : अपेक्षा आणि उपेक्षा / ७४
६. तमाशा : अस्सल मराठी वाण / ८६
७. निमित्त : महाराष्ट्रातील पहिले डोंगरी साहित्य संमेलन / १०१
८. प्रेमपत्रे संशोधन / ११०
९. काही अक्षर प्रेमपत्रे / ११८
१०. साहित्यशास्त्राची माहिती नसणारा
थोर साहित्यिक याचा मार्गानं गेला ! / १३५
११. चंद्र-चांदण्यांच्या साक्षी (आत्मचरित्रातील थोरांचे बालपण) / १४३
१२. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दिवाळी अंक / १५१



१

मराठीतील निबंधवाङ्मय आणि महाराष्ट्रातील सामाजिक विचार

इंग्रजांच्या राज्यशकटाचे चक्र गतिमान झाले आणि नवे वारे वाहू लागले. आपल्या राज्याच्या स्थिरतेसाठी त्यांनी आपल्या भौतिक प्रगतीची ' कळ ' आणली. ' इंग्रजांनी केला कावा । आगीनगाडी घेते धावा ' अशा प्रकारचा वाक्संप्रदाय रूढ झाला होता. या धावणाऱ्या यंत्राबरोबर संदेश पोचवणारे तारायंत्र आले. अक्षरं मुद्रित करणारे छपाई यंत्र सुरू केले आणि समाजाला भांबावून टाकणारी किमया सातासमुद्रापलीकडून या भूमीत अवतरली. सारी जादू ' आकाशाच्या बापा ' घरून आल्याची भाबडी भावना निर्माण झाली. पण तरीही पुढे अद्भुताच्या कल्पनेचा पारा उडून गेला. हतबुद्ध झालेले समाजमन लाक्षागृहातून बाहेर पडायला चाचपडू लागले. म्हणूनच आगरकरांनी ' रेल्वेच्या चक्राबरोबर समाजचक्र नव्या अर्थाने परिवर्तित झाले ' असे म्हटले आहे. या उद्गारातही तेवढेच भरीव तथ्य आहे. पेशवाईच्या अखेरच्या आणि उत्तर कालातही समाजाचं मन स्वत्वहीन, दुर्बल बनले होते. पारख उरली नव्हती. मानसिक दास्यत्वाने लोकजीवन लुळेपांगळे बनले होते.

तेजहीन झाले होते. पौरुषाच्या बलशक्तीला पारखे झाले होते. आत्मबलावर वर्धित झालेली संस्कृती याच भूमीचे ' सुवर्ण युग ' पाहती झाली होती का इतपत संशय येण्याइतकी परिस्थिती समोर पसरली होती. युगामहायुगांना जन्माला घालणारे महापुरुष ' संभवामि युगे युगे ' म्हणत अवतार धारण करते झाले होते की नाही याचीही शंका मनात 'संमोह' निर्माण करणारी वाटत होती. आत्मविस्मृतीचे भयानक सावट इथे वावरत होते. इंग्रजांच्या राजवटीतील अनोख्या गोष्टींच्या चमत्कारामुळे सामान्यजन भुलले होते. नवशिक्षितही दिपून गेले होते. गोरी मंडळी म्हणजे देवाने पाठवलेली असे म्हणण्याइतपत मजल गेली होती. मात्र कालगती मोठी विलक्षण असते. ती बद्ध नसते. तिला बदलाची स्वप्ने पडत असतात. जागृती, साधना, सिद्धी, आवर्तन, परावर्तन अशी विकासशील मुद्रा त्या स्वप्नांना लाभत असते. त्या स्वप्नांची पेरणी ही प्रबळ धारणा असते आणि नवनिर्माणाची आस ही जीवित प्रेरणा असते.

इंग्रजांनी आपल्या राज्याचा पाया घट्ट करण्यासाठी अनेक गोष्टी केल्या. पाठशाळा काढल्या. शिक्षणाचा प्रसार केला. इंग्रजी विद्येचा खास करून परिचय व्हावा अशी धारणा ठेवली. नवनव्या भौतिक सुधारणांचा अंमल चालू केला. विद्यापीठांची स्थापना केली. विविध ज्ञानविस्तार पृ. ४७ मध्ये एल्फिन्स्टनचा खलिता - "युरोपियन शास्त्रे आणि उच्च प्रतीच्या विद्येत ज्या सुधारणा आहेत त्या शिकविण्याकरिता शाळा स्थापाव्या .... नीतिशास्त्र आणि पदार्थ- विज्ञानशास्त्र - यांवर देशभाषांत पुस्तके तयार व्हावी आणि ती छापून प्रसिद्ध व्हावी अशी तजवीज करावी..... इंग्रजी ही अभियुक्त भाषा (classical language) म्हणून आणि युरोपमध्ये जे नवे नवे शोध लागतात त्यांचे ज्ञान संपादन करण्यास त्यांना शिकविण्यास शाळा स्थापाव्या" असा प्रसिद्ध केलेला आहे. यावरून सत्ताधाऱ्यांनी कशा प्रकारांनी पावले उचलली होती हे स्पष्ट होते.

याच काळात मिशनरी मंडळींना अवसर मिळाला. गरीब, अज्ञ लोकांचा कैवार हा जरी वरपांगी दिखावा असला, तरी आतील मर्म हे ख्रिस्ती धर्मप्रसाराचेच होते. पाश्चात्त्य संस्कृती कशी प्रगत आहे हेही दाखविण्याची व ती रुजविण्याची या मिशनरी लोकांची वृत्ती हातात हात घालून नांदत होती. भोळा, अडाणी समाज या त्यांच्या फसव्या कैवाराला फसत होता. बळी पडत

होता. परंपरागत संस्कृतीने आचवलेल्या समाजाला त्यातील वर्म कळण्याइतकी जागृती नव्हती. इथल्या साचून स्थितिबद्ध बनलेल्या समाजाच्या या वास्तविकाचा फायदा मिशनऱ्यांनी घेतला. अशिक्षितांना अडचणीच्या वेळी मदत करायची. खालच्या सर्वसामान्य समाजाला सेवाभावाने आपलेसे करायचे. इथल्या संस्कृती, धर्माचे तुम्ही बळी आहात असे भासवायचे आणि त्यांना जिंकायचे. वरच्या वर्गाला पाश्चात्त्य युक्तिवादाने संभ्रमित करायचे. मग कोळी जसा माशीला आपल्या जाळ्यात अडकवतो, तिला भूल पाडतो तसे करायचे. याच काळात मुद्रणकला आलीच होती. तिचा फायदा घेऊन पुस्तके मराठीत आणली, लिहिली. खेडोपाडी पोहोचवली. इथल्या रूढी, परंपरा, कल्पना आणि संकेत कसे बुरसटलेले आहेत, व्यक्तिविकासाला कसे मारक आहेत, वातावरणच कसे रोगट आणि पोचट आहे हे लोकांच्यासमोर मांडले. टीका केली. मिशनऱ्यांच्या या विचारांचा प्रचार व प्रसार पुढे सर्वार्थाने चिंतनीय व चिंताजन्य ठरला. अनहितकारक ठरणाऱ्या दुष्ट प्रथांनी आधीच श्वास कोंडलेल्या समाजावर मिशनऱ्यांच्या या कामगिरीचा दुहेरी प्रभाव पडला. आत्मखेद आणि त्यातून आत्मशोध या पद्धतीने पाश्चात्त्य व आपल्या संस्कृतीत खूप फरक होता. आपली आधिभौतिकवादी, तर इंग्रजांची भौतिकवादी. आपल्या संस्कृतीत व्यक्तित्ववादाला स्थान नव्हते. आपली संस्कृती ही पराभूतांची संस्कृती होती.

अनेक बंधनांनी जखडून टाकलेली आपली संस्कृती कालबाह्य झाली होती. मिशनऱ्यांच्या तीव्र टीकेमुळे तिची कालबाह्यताही जाणवू लागली होती. दोष दिसू लागले होते. सर्वसामान्य समाजाची अवस्था मोठी विलक्षण झाली होती. एकीकडे मिशनरी हाकारत होते. दुसरीकडे नवे सुधारक नवा विचार मांडत होते. तिसरीकडे कर्मठांची चिकाटी सुटत नव्हती. या साऱ्यातूनच नवे वारे सुटू लागले. नव्याजुन्याचा अर्थही कळू नये अशी अवस्थाही निर्माण झाली.

शाळांतून शिक्षण सुरू झाले. शिक्षणातून इंग्रजी विद्या दिली जाऊ लागली. पुस्तकांची भाषांतरे झाली. पुढे विद्यापीठांचा जन्म झाला. सरकारच्या प्रेरणेने आणि बक्षिसांच्या प्रलोभनाने पुस्तके लिहिली जाऊ लागली. उच्च विद्यांचा अभ्यास सुरू झाला. इंग्रजांनी आपली संस्कृती, आपला इतिहास, आपली भौतिक प्रगती करणारी शास्त्रे यांचा अभ्यास इथल्या नवशिक्षित

पिढीने करावा अशी आखणी केली होती. त्यांच्या या अभ्यासाच्या प्रभावाने इथली पिढी मानसिक गुलामगिरीत राहावी, कारभारासाठी कारकून केवळ पैदा व्हावे हीच रास्त अपेक्षा त्यांनी ठेवली होती. आपल्या विद्येच्या, संस्कृतीच्या, सुधारणेच्या प्रबळ प्रभावाखाली दडपून जाऊन इथली जनता कोकराप्रमाणे राहावी म्हणजे या भूमीत आपले सिंहासन सुखेनैव नांदते राहील. आपल्याच राज्यावर सूर्यने खुशाल तळपत राहावे, चंद्राने उगवत राहावे. 'युनियन जॅक'-च्या सावलीत सातासमुद्रापलीकडच्या वाऱ्याशी हितगुज करीत राहावे यासाठीच तर इंग्रजांनी राजवटीचा नवा चमत्कार जागोजागी पेरला होता.

पण त्यांचा डाव त्यांच्या अंगावर उलटला. मांत्रिकाचा मंत्र त्याच्यावरच उलटावा तशी गत झाली. शाळांतील इंग्रजी शिक्षणाने नव्या पिढीला नवी दृष्टी आली. पाश्चात्त्य संस्कृतीची ओळख झाली. त्यांच्या प्रगत ज्ञानाने त्यांची एवढी प्रगती झाली, तर आपली का होऊ नये ? आपण भौतिक शास्त्रांचा अवलंब करून प्रगती करून घ्यावी अशी जाग आली. विचारशक्ती वाढली. आपले दोष दिसू लागले. बुद्धिप्रामाण्यवादाकडे कल झुकू लागला. चौकसबुद्धी वाढली. आत्मविश्वास येऊ लागला. पाश्चात्त्यांप्रमाणे आपली संस्कृती, इतिहास, वाङ्मय प्रगत झाले पाहिजे अशी धारणा बनली. त्यांचे जे जे चांगले ते तपासू लागली. आपल्यातील हीण दूर करू लागली. म्हणूनच इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे करण्यात आली. जमेल तसे हे घडू लागले.

अत्यंत चांगली गोष्ट म्हणजे आत्मशोध सुरू झाला. आपल्या जीवनाला आलेली अवकळा दूर करण्याचा प्रयत्न सुरू झाला. सामाजिक मनाला वळण लावण्यासाठी काही मंडळी पुढे आली. वाङ्मयाच्या बाबतीत आंग्लविद्याविभूषित नव्या पिढीने जे मनावर घेतले ते त्या काळात महत्त्वाचे होते. "शहाण्या लोकांच्यावर राज्य करणे हितावह" असे समजून एल्फिन्स्टननी जो विद्याप्रसाराचा हेतू धरला त्याने इथल्या लोकांचाच फायदा झाला. लोक शहाणे झाले. सुषुप्तीच्या काळाला चूड लागली. आपलेच लोक आपल्या लोकांना जागे करू लागले. त्यांना ज्ञानाचे महत्त्व पटवू लागले. स्वाभिमानाने जगण्यास शिकवू लागले. आपल्या प्राचीन संस्कृतीची प्रसादरूपे दाखवू लागले. हळूहळू अस्मितेला आवाहन सुरू झाले. जाणीवपूर्वक एक जागरण चालू झाले. मिशनरी लोक आपल्या संस्कृतीवर, धर्मावर टीका करीत. स्वधर्मप्रीती बाळगणारे प्रतिटीका करून त्यांच्या विचारावर हल्ले करीत. वाणी लेखणीला धार चढली.

ही शुद्ध धर्माभिमानी मंडळी, आंग्लविद्या घेतलेली नवी पिढी, नवा विचार लोकांत पसरून लोकांना सुबुद्ध करणारी सुधारक प्रवृत्तीची मंडळी या सर्वांच्या प्रयत्नांमुळे मराठी गद्याचा नवा कालखंड सुरू झाला. लोकांना सुबुद्ध व शहाणे करण्यासाठी, त्यांना ज्ञान देण्यासाठी, विचारजागृतीसाठी, मतप्रदर्शनासाठी, जीवनाचा प्रकाश दाखविण्यासाठी, नचविचारधारा पेरण्यासाठी, नियतकालिकांचा जन्म झाला. महाराष्ट्रात एका प्रबोधनाचा प्रारंभ झाला. नियतकालिकांची निर्मिती आपल्या समाजाला नवप्रेरणा देणारी ठरली. तशीच मराठी गद्याला वेगळ्या अर्थाने, नव्या संदर्भात प्रारंभ करती झाली. पुढे पुढे तर या गद्याला विशिष्ट स्वरूपाने विकासगती प्राप्त झाली. नवे वाङ्मयप्रकार आले.

इंग्रजांच्या आगमनामुळे आणि इथल्या त्यांच्या एकूण कृतीमुळे नवे आचारविचार आले. भौतिक ज्ञानाचा अवलंब झाला. नियतकालिके निघाली. नियतकालिकांनी पद्याची पूर्व परंपरा न स्वीकारता " गद्य "-मयता स्वीकारली आणि इथूनच मराठी (आधुनिक) गद्याला प्रारंभ झाला. नियतकालिकांतील गद्यलेखनातूनच निबंध आकाराला आला. निबंध म्हणजे गद्यलेखन असे स्वरूप ठरून गेले.

इ. स. १८१८ नंतर मराठी वाङ्मयाने लेख/निबंधाच्या रूपाने नियतकालिकांतून गद्याचा अवलंब केला. पाठ्यक्रमाची पुस्तके गद्यातून झाली. भाषांतरेही गद्यात झाली.

आपले १८१८ च्या पूर्वीचे साहित्य पद्यात होते. त्याची कारणेही तशीच होती. राष्ट्राच्या वैचारिक, आत्मिक विकासाचे दर्शन साहित्यात, भाषेत घडते. मानवी जीवनाचे त्या त्या काळाचे प्रतिबिंब साहित्यात उमटते. भाषाही मानसिक आंदोलनानुसार व सामाजिक स्पंदनानुसार रूप धारण करते. आपला पूर्वीचा काल हा आध्यात्मिक स्वरूपाचा होता. भावनिक होता. भावनिक अंश हा मृदू, कोमल, हळुवार असतो. पद्याला तो जवळचा असतो. भावनिक तरंग मुग्धमधुर शब्दात, ताललयीत व्यक्त होत असतात. जगातील पुरातन काळातील आद्यग्रंथ पद्यमयच आहेत. शिवाय पूर्वी मुद्रणकला नव्हती त्यामुळे स्मरणात राहण्यासाठी तालललयीची भाषाच पोषक ठरत असे. आपली पूर्वीची साहित्यरचना ही आध्यात्मिकातून झालेली आहे. माणसापेक्षा ' परमात्मा '-विषयक जाणिवाच तीव्र होत्या.

पण इंग्रजी राजवटीने या आध्यात्मिक कालात प्रवेश केला. आध्यात्मिक व भौतिक यावर आधारलेल्या या दोन भिन्न संस्कृतींचा संघर्ष झाला. जेत्यांच्या संस्कृतीने माथा उन्नत केला. त्यांचे अनुकरण झाले. आंधळेपणाने, काही वेळा डोळसपणेही. प्राप्त परिस्थितीची प्रतिक्रिया एकूण इथल्या मानवी जीवनावर झाली. नवी विचार करायला लागणारी प्रेरणा ही बुद्धिवादी, कर्मवादी होती. ज्ञानवादी होती. विश्वातल्या देवापेक्षा माणसातल्या पौरुषावर भिस्त ठेवणारी ही विचारधारा उन्नयनाला सामोरी झाली. भावनेपेक्षा विचाराला प्राधान्य आले. विचार हा गद्याला अनुकूल असतो. मानवी मनातील भावनिक व बौद्धिक तीव्र, अनावर उचंबळ ही स्वतःचा घाट घेऊनच आकारत असते. शिवाय नियतकालिके ही इंग्रजी राजवटीची ' देन ' आहे. इंग्रजीतील नियतकालिकांची, त्यातील वैचारिक लेखांची भाषा ही गद्यच होती. नियतकालिकांनी मराठीत जन्माला घातलेला निबंध हाही इंग्रजीप्रमाणे गद्य भाषेतच अवतरला. गद्य हे इंग्रजी राजवटीतूनच आपल्याकडे आले.

शिवाय आपल्या भाषेला गद्याची सलग अशी पूर्वपरंपरा नव्हती. पूर्वी काव्य म्हणजे सर्व साहित्य असे मानत. पूर्वकालिकांचे आदर्श गिरवले गेले. खासगी व्यवहार हा गद्यात व साहित्य हे काव्यात अशी प्रथाच होती. १८१८ पूर्वीचे बखर, ऐतिहासिक पत्रे असे गद्यवाङ्मय मानले जाते. परंतु बखर, पत्रे ही कोणीतरी कोणासाठी तरी ती लिहिलेली खासगीतली बाब होती. त्याला सामाजिक, सामुदायिक स्वरूप नव्हते. तसेच वाङ्मयीन निर्मितीच्या हेतूने झालेली निर्मितीही ती नव्हती. शिवाय गद्याला परंपरेचे सातत्य नव्हते. बखरी, ऐतिहासिक पत्रे, राजेराजवाड्यांच्या अखत्यारीची ' गुफ्तगु ' होती. महानुभावियांच्या वाङ्मयाने तर सकला, सुंदरा अशा अनाकलनीय लिप्यांचे गुप्त वेष धारण केले होते. ते पंथीयच ठरले. त्यातून पुढील गद्याला प्रेरणा मिळाली नाही. पेशवाईतल्या रातांधळ्या परिस्थितीने कुचंबून गेलेल्या व इंग्रजांच्या झगझगाटीने दिपून गेलेल्या तत्कालिनांना अनुकरणच सोयीचे वाटेल तर त्यात नवल कसले? मराठी गद्याला इंग्रजी वाङ्मयावरच अवलंबून राहावे लागेल. ' प्राचीन परंपरेचा आधार न मिळाल्यामुळे अर्वाचीन मराठी गद्याची अवस्था बेवारशी मुलाप्रमाणे झाली होती. आईचे दूध त्याला मिळाले नाही. दाईच्या भाडोत्री दुधावरच त्याची वाढ झाली ? असे ' अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिकाकारांनी म्हटले आहे ते वस्तुस्थितिनिदर्शक आहे. पुढे तर संघर्षाला,

विचाराला, ज्ञानाला, बुद्धिनिष्ठेला आणि वादविवादाला, युक्तिवादाला गद्यच सहज सोपे ठरले. आणि आधुनिक गद्याची मांडणी झाली. मानसिक, भौतिक, वैचारिक प्रकटीकरणाचे माध्यम गद्य ठरले. नव्या कालात नव्या गद्याचे वैशिष्ट्य आले. पद्याची सर्वथैव असणारी परिभाषा संपली. राजकीय, सामाजिक स्थित्यंतरामुळे साहित्यात, भाषेत, आविष्कारस्वरूपात फरक झाला. वाङ्मय म्हणजे गद्यात्मक असा पायंडा पडला. हा नवा गद्यबंध वृत्तपत्रांमुळे आला. वृत्तपत्रांनी निबंधाला आकारास घातले. गद्य समृद्ध केले. सामाजिक परिवर्तनवादी गरजेतून वाङ्मयाचे रूप बदलत असते तसेच हे घडले.

आधुनिक काळात निबंधाचा विकास झाला. याचे कारण बुद्धिवादाचा प्रभाव. पूर्वी बंदिस्त वातावरण होते. नव्या वातावरणात स्वतंत्रता होती. अनिर्बंध वृत्ती आली होती. मोकळिकतेचे बंध अधिकच सैल झाले होते. विचारांची परिवर्तने, सामाजिक प्रबोधन, लोकजागृतीची परखड भूमिका यामुळे ठोस बैठक प्राप्त होऊ लागली होती.

' ऐहिकतेला प्राधान्य देणारे राष्ट्र पुढे जाते ' या तत्त्वाचा मिल व स्पेन्सर यांनी इंग्लंडमध्ये पुरस्कार केला होता. हा विचार थोड्याफार गतीने इथल्या लोकांच्या मनात डोके वर काढीत राहिला. ज्यांनी आंग्लविद्या समजून घेतली, त्यांनी आपल्या अवदशेचा शांतपणे विचार केला. इंग्रजांच्या वृद्धीचा व प्रगतीचा शोध घेऊन त्याची कारणं समजून घेतली. आपणही इंग्रजांप्रमाणे नव्या प्रज्ञाप्रबोधनाचा अवलंब केला पाहिजे, आपल्या लोकांची अवनती थांबविली पाहिजे, अधःपतनाच्या मुळाचा शोध घेऊन त्यावर उपाय योजिले पाहिजेत, अज्ञान, अंधःश्रद्धा, आळस, अलौकिकाचा वेडा भ्रम यातून त्याची सुटका केली पाहिजे. अशा बुद्धिनिष्ठेने लेख लिहिले. जमेल तसे निबंध लिहिले. त्यातून त्यांची देशबांधवांच्याविषयीची खरीखुरी तळमळ दिसून येते, या तळमळीपोटी स्वजनहिताच्या कार्यासाठी, स्वमतप्रसारासाठी, स्वत्वाच्या जागेपणासाठी कार्हींनी वृत्तपत्रे सुरू केली.

" इंग्रज लोकातील साधारण मनुष्य जरी असला तरी हिंदू लोकांपेक्षा तो सहस्र गुणांनी श्रेष्ठ आहे " असे काढलेले त्या काळातील उद्‌गार आपल्या समाजाची स्थितिगती स्पष्ट करणारे आहेत. पण अशी मानसिक गुलामगिरी व न्यूनगंड पत्करून प्राप्त जिणे तसेच जगू लागलो तर आपल्या समाजाची अधोगती थांबणार नाही. म्हणून लोकांमध्ये ज्ञानप्रसार केला पाहिजे,

चालीरीती, धार्मिक समजुतींत बदल घडवून आणला पाहिजे. दबलेल्या, गांगरलेल्या, गारठलेल्या, निःसत्त्व बनलेल्या आपल्या आत्म्याची उन्नती साधली पाहिजे, सामाजिक स्वत्वशील धारणा झाली पाहिजे यासाठी वृत्तपत्रांचा उदय झाला. त्यात आधुनिक, कालोचित अशा विविध ज्ञानपर विषयांच्या निबंधांचाच अंतर्भाव झाला.

आधुनिक मराठी वाङ्मयाचा उदय नियतकालिकांच्या माध्यमातून झाला असे म्हटले तर वावगे ठरू नये. त्यातही निबंध हा मानाने पहिला ठरतो. पण याचाही पहिला मान बाळशास्त्री जांभेकरांकडे जातो. डॉ. केरी, पंडित वैजनाथ यांनी अर्वाचीन मराठी गद्य वाङ्मयाचा पाया घातला असला, त्याचे खरे जनक छत्रे असले, कँडीने इथल्या शास्त्रज्ञांना हाताशी धरून मराठीचे कोश केले असले, मिसेस फरार व रे. विल्सन यांनी स्फुट निबंध लिहिले असले, तरी बाळशास्त्री जांभेकर यांनी समाजसुधारणेसाठी हेतुपूर्वक 'दर्पण' नियतकालिक १८३२ साली सुरू केले आणि तिथूनच मराठी निबंधाची गंगोत्री सुरू झाली.

१८५० साली प्रसिद्ध झालेल्या ज्ञानप्रसारक मासिकाच्या पहिल्या पुस्तकात स. दि. मनोहर यांच्या " राज्य गेले, प्रतिष्ठा गेली, व्यापार बुडाला, प्राचीन विद्येचा ऱ्हास झाला, नूतन विद्या शिकण्यास उत्तेजन नाहीसे झाले. अज्ञान वाढत चालले, आकाशातून पडलो आणि धरणीने सावरले अशी अवस्था झाली. जी शहरे पूर्वी केवळ इंद्रभुवनासारखी शोभायमान व लंकेसारखी कनकमय होती, ती रसातळास पोचून केवळ पिशाचपुरी दिसू लागली .... इतके अनर्थ धडधडीत होत असून माझे स्वदेशी लोक अज्ञानरूप गाढ निद्रेतून जागृत होऊन ज्ञानप्रभेमध्ये अद्याप येत नाहीत. " या लेखातून तत्कालीन लोकस्थितीचे यथार्थ दर्शन घडते. " बुडता हे जन न देखवे डोळा " याच सद्हेतूने नियतकालिकांनी भूमिका स्वीकारली. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या तळमळीपोटी अनेक वृत्तपत्रांनी भरीव कार्य केले. त्यातील दर्पण-बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, १८३२, प्रभाकर-भाऊ महाजन, मुंबई, १८४०, ज्ञानोदय, मुंबई, १८४२, ज्ञानप्रकाश, पुणे, १८४९, विचारलहरी-कृष्णशास्त्री चिपळूणकर, पुणे, १८५२, धूमकेतु-भाऊ महाजन, मुंबई, १८५३, वर्तमानदीपिका, मुंबई, १८५४, सद्धर्मदीपिका, मुंबई, १८५५, वर्तमानसंग्रह, कोल्हापूर १८५५, शूभसूचक, सातारा, १८५८, (ग्रां कॅ.),

वृत्तवैभव, अहमदनगर १८६१ (ग्रां. कँ.), इंदुप्रकाश, मुंबई १८६२, वृत्तप्रकाश, पुणे, १८६२ (ग्रा. कँ), नेटिव्ह ओपिनियन, मुंबई, १८६३, बेळगांव समाचार, बेळगांव, १८६४ (ग्रां.कॅ), जगद्धितेच्छु, पुणे, १८७०, ज्ञानचक्षु, पुणे, १८७२, कथारत्नावली, मुंबई, १८७४, सुबोधपत्रिका, मुंबई, १८७४, ही वृत्तपत्रे व दिग्दर्शन बाळशास्त्री जांभेकर, मुंबई, १८४०, ज्ञानचंद्रोदय - पांडुरंग बापू जोशी पावसकर, मुंबई, १८४०, उपदेशचंद्रिका- मोरभट दांडेकर, मुंबई, १८४४, मराठी ज्ञानप्रसारक, मुंबई, १८५०, चंद्रिका, मुंबई, १८५४, त्रैमासिक ज्ञानदर्शन - भाऊ महाजन, मुंबई, १८५४, सुमित्र- (स्त्रियांसाठी), मुंबई, १८५५, सर्वसंग्रह, मुंबई, १८६०, विचारदर्पण (क्षत्रियांसाठी), मुंबई, १८६०, पुणे पाठशालापत्रक, पुणे, १८६१, आनंदलहरी - (लहान मुलांसाठी), मुंबई, १८६१, कथाकल्पद्रुम, मुंबई, १८६१, ज्ञानदर्पण, मुंबई, १८६१, ज्ञानाकार, धारवाड, १८६२, स्त्रीभूषण, मुंबई, १८६४, विविधज्ञानविस्तार- रामचंद्र भिकाजी गुंजीकर, मुंबई, १८६७, विद्याकल्पतरू- सांबारे, ठाणे, १८६८, ईस्ट इंडिया असोसिएशन सभेचे मराठी मासिक पुस्तक- मुंबई, १८६९, स्त्रीज्ञानप्रदीप, मुंबई, १८६९, काव्यार्थदीपिका, मुंबई, १८७०, गायनाब्धिसेतू, बडोदे, १८७०, वऱ्हाड रिपोर्टर, अकोले, १८७०, न्यायदीपिका, ठाणे, १८७०, दंभहारक, मुंबई, १८७१, ज्ञानसंग्रह, अकोले, १८७२, बालबोधमेवा, मुंबई, १८७३, सत्यदीपिका, पुणे, १८७३, बृहत्संहिता, रत्नागिरी, १८७३, श्रीवाल्मीकिरामकथामहोदय, मुंबई, १८७४, सुज्ञानामृत, कोल्हापूर,१८७४, निबंधमाला- विष्णुशास्त्री चिपळूणकर, पुणे, १८७४, ही मासिके यांनी मराठी गद्य वाङ्मयाची निर्मिती व विकास केला.

१८७४ पूर्व काळात या नियतकालिकांनी सामाजिक सुधारणा, धर्मसुधारणा यासंबंधी महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. या नियतकालिकांतून पत्रे येत. ती पत्रे निबंधरूप असत. त्यातून विविध विषयांवर चर्चा होई. सर्वसामान्यांमध्ये ज्ञानाचा प्रसार झाला. चौकसबुद्धी वाढली. जिज्ञासा जागृत झाली. पूर्व रूढींचे वैचारिकतेने विश्लेषण होऊ लागले. विचारप्रवर्तन सुरू झाले. स्वमत प्रतिपादन व दुर्मतखंडन होऊ लागले. प्रचाराच्या पातळीवरही लेखन झाले. सामाजिक मनाचे चित्रण होऊ लागले. अवलोकन आले. तर्कनिष्ठा प्राप्त झाली. " असत्य, लबाड गोष्टी छापणार नाही " अशी प्रतिज्ञा ज्ञानप्रकाशच्या पहिल्या अंकात दिलेली आहे. नियतकालिकांच्या नावात

असलेल्या 'दर्पण', 'ज्ञान', 'विद्या', 'प्रदीप', 'दीपिका' 'कल्पतरू', ज्ञानविस्तार- प्रसारक-चक्षु-उदय-संग्रह, इ. नावांवरून त्यांची भूमिका कशी व कोणती होती हे दिग्दर्शित होते. हेही परिस्थितीच्या निकडीतून निर्माण झाले होते. या साऱ्यातून राजकीय विषयांकडे वळण्याइतकी त्या वेळची सामाजिक स्थिती नव्हती. समाजजागृती हीच महत्त्वाची होती. या काळातील नियतकालिकांतून बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, बाबा पदमनजी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, गुंजीकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, महात्मा फुले, लोकहितवादी, माडगावकर, इ. अग्रणी विचारवंत लेखकांनी निबंध लिहिले. हे सुधारक होते. यांच्या गद्यलेखनानेच नियतकालिकाच्या माध्यमातून निबंध वाङ्मयाची बैठक घातली. पुढील विकसित निबंधाची पूर्वतयारी या काळात झाली. एक प्रबोधन चेतत निघाले होते. कळसासाठी पायाची कामगिरी आधीची व महत्त्वाची असते.

त्यांच्या या कार्याचे श्रेय " इंग्रजी राज्य व इंग्रजी शिक्षण महाराष्ट्रात सुप्रतिष्ठित झाल्यानंतर मराठी गद्याच्या विकासाला प्रारंभ झाला. इ.स. १८१८ ते १८७४ पर्यंत छत्रे, महाजन, गुंजीकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, लोकहितवादी इ. कितीतरी पंडितांनी पोटतिडकीने भाषेविषयीच्या निस्सीम प्रेमाने आणि समाजाची सर्वांगीण सुधारणा व्हावी ह्या तळमळीने या अर्धशतकात विविध व विपुल गद्यलेखन केले. त्या काळात त्या त्यांच्या लेखांनी " निबंध " या वाङ्मयप्रकाराची पायाभरणी केली असे स्थूल मानाने म्हणता येईल " असे वि. स. खांडेकर यांनी काढलेल्या उद्‌गारातून व्यक्त होते. या लेखकांनी केलेल्या श्रेयसाचे मूल्यमापनही ते करतात, " निबंध लेखकाचे जे एक मुख्य कार्य समाजाला निद्रेतून जागे करणे, जीवनातल्या मूल्यांचा निर्भय आणि प्रामाणिक दृष्टीने विचार करायला त्याला शिकविणे, जे असत् - जे अमंगल आहे, त्याच्यावर तर्कशुद्ध प्रहार करणे, जे सत्य आणि मंगल आहे त्याचा सावेश पुरस्कार करणे - ते त्यांची वाणीही मधून मधून केल्याशिवाय राहात नसे ".

मराठी निबंधाचे जनिते म्हणून बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन यांच्याकडे बोट दाखवावे लागेल. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जीवनाचा दृष्टिकोण सामाजिक होता. त्या काळातील सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक गोष्टींत मनापासून लक्ष घालून नवीनता, कालसापेक्षता आणण्याचा प्रयत्न

करीत. 'दर्पण' नियतकालिक, 'दिग्दर्शन' मासिक यातून आधुनिक विद्या, शास्त्रे, यांचा परिचय करून देणारे लेखन प्रसिद्ध करीत. भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' वृत्तपत्र आणि 'ज्ञानदर्शन' त्रैमासिकातून निबंध वाङ्मयाच्या प्रारंभीच्या जडणघडणीला रूप दिले. गो. ना. माडगावकर यांनी व्यवहारोपयोगी व शास्त्रीय विषयांवर मराठी भाषेत ग्रंथ लिहिले. त्यांची गोवेकर असूनही भाषा शुद्ध, सरळ व गोड होती. आपला विषय उदाहरणानिशी रंगवीत, रोचक करीत.

बाबा पदमनजी या ख्रिस्ती लेखकाने मराठीत ख्रिस्ती धर्मासंबंधी लिहिले. 'हिंदू लोकांच्या सणाविषयी निबंध', 'कुटुंब सुधारणा' 'बौद्धधर्म', 'स्वदेशप्रीती' इ. निबंध सुबोध भाषेत लिहिले.

कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी शालापत्रकात लेखन करून निबंधाला एक भारदस्त भाषेचा डौल प्राप्त करून दिला. त्यांची भाषा प्रसन्न शैलीचा त्या काळातला एक मननीय नमुना होता. त्यांचा ठसा मराठी निबंधावर जरूर उमटलेला आहे.

विष्णुबुवा ब्रह्मचारी हे 'वेदांचे आपण उद्‌गाते आहोत' असे सार्थ अभिमानाने सांगत. "वेदोक्त धर्मप्रकाश" हा ग्रंथ त्यांनी लिहिला. मिशनऱ्यांच्यावर युक्तिवादाने हल्ले करीत. अव्वल इंग्रजीत अव्वल विचार मांडणारे अशी त्यांची ख्याती होती. भूमिका आक्रमक होती. हिंदुधर्मातील काही गोष्टी निषिद्ध मानीत. गुणावरून वर्ण मानावे, उद्योगाची कास धरावी, धर्मातील चमत्कार चुकीचे आहेत, न्याय सर्वांना सारखा असावा, मजुरांच्या स्थितीत सुधारणा झाली पाहिजे इ. सारखे विचार मांडीत. त्यांनी आधुनिक समाजवादाची विचारसरणी मांडली. विचारामध्ये सर्वंकषता आहे. वाणी लेखणी द्वारा लोकस्थितीवर त्यांनी भाष्य केले. नवी दृष्टी दिली.

निबंधमालापूर्वकाळातील एक थोर निबंधकार म्हणजे लोकहितवादी. महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचे आद्यप्रवर्तक असे संबोधण्याइतके त्यांचे कार्य मनस्वी होते. आपल्या लोकांतील दोष नाहीसे व्हावे म्हणून त्यांनी तळमळीने लेखन केले. प्रहारही केले. त्यासाठी त्यांनी 'प्रभाकर' साप्ताहिकातून शतपत्रे लिहिली. इंग्रजी राज्याच्या दोन्ही बाजू त्यांनी जनतेसमोर मांडल्या. त्यांच्यातील चांगल्या गोष्टींची प्रशंसा केली. तसे त्या राज्यातील किळसवाण्या वशिलेबाजीवर कडक टीका केली. पुरोगामी विचारसरणी त्यांच्या सर्वच लेखनातून दृग्गोचर होते.

मराठी निबंधाला त्यांच्यामुळे वाङ्मयीन रूप आले. प्रगल्भता दिली. मूलभूतपणा, निर्भीडपणा, मोकळेपणा हा त्यांच्या लेखनाचा विशेष. आधुनिकतेचा आत्मा निबंधाला दिला. त्यांच्या भाषेत ओबडधोबडपणा असला तरी एक आर्षपणा निबंधाला लाभला. विचारनिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, वक्तृत्वातील गुणविशेष, समाजसुधाराची कळकळ, सडेतोडपणा यांनी त्यांचे निबंध सजले आहेत. त्या काळात लोकहितवादींनी वैविध्यपूर्ण, विचारगर्भ निबंध लिहिले. डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी " बाळशास्त्री जांभेकर व भाऊ महाजन यांची नावे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची म्हणून सोडली तर लोकहितवादीच आद्यनिबंधकार ठरतात " अशी प्रशस्ती दिली आहे. तीमध्ये वास्तवाचे दर्शन आहे.

१८७४ साली निबंधमाला सुरू झाली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांसारख्या युयुत्सुवृत्तीच्या स्वाभिमानी लेखकाच्या स्वदेश व स्वभाषाप्रीतीने उजळून निघालेल्या निबंधांनी मराठी निबंधाला आत्मतेज दिले. इंग्रजीतील ॲडिसन, मेकॉले, जॉन्सन या त्यांच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वामुळे आवडलेल्या लेखकांच्या निबंधाचा मार्मिक, विवेचक, शानदार बाज आपल्या निबंधांपुढे ठेवून मराठी निबंध नीटनेटका तसेच चित्ताकर्षक व मनोरम केला. उपरोधिकता, मर्मज्ञता, निंदाव्यंजकता, वक्तृत्वपूर्णता, बहुश्रुतता, रसानुकूलता, ओजस्विता हा त्यांच्या लेखनशैलीच्या गुणसौंदर्याचा अविभाज्य भाग होय. त्यांनी मराठी निबंध विविध रूपांनी, विविधांगांनी खुलविला. आशय आणि आविष्कारशैली यांच्या तेजदार नावीन्याने निबंधाला मंत्रशक्ती दिली. म्हणूनच १८७४ पासून मराठी निबंधाचे नवे युग सुरू झाले. आतापर्यंत समाजसुधारणा, धर्मसुधारणा यातच घुटमळलेला निबंध पूर्वीच्या नीतिशास्त्राला पालाण घालीत, नव्या युगशास्त्रात अवगाहन करीत, सर्व विषयांच्या विश्वात्मकतेला दुसण्या देत, राष्ट्रोन्नतीसाठी शक्तिशाली प्रवाहाने चालला. त्यांच्या या कर्तृत्वामुळे प्रबोधनाची क्रिया बाणेदार बनली. राष्ट्रीय अस्मिता जागी झाली. प्राचीन इतिहास, जीवनमूल्ये, संस्कृती, साहित्य यांचा त्यांना जाज्वल्य अभिमान होता. त्यांचा राष्ट्रवाद अभ्युदयवादी तसेच आक्रमक होता. हेच तेजस्वी चैतन्य त्यांच्या निबंधाचा प्राणगर्भ होता. म्हणूनच अखिल भारतात प्रथम महाराष्ट्रातच अभ्युदयी राष्ट्रवाद आला. त्यांची ही आंदोलित करणारी प्रखर वैचारिकता मराठी समाजजीवनाला आणि साहित्याला प्रचलितापेक्षा अधिक नव्या तजेलदार सामर्थ्यनि ' प्रचलित ' करती झाली. यानंतर १८७४ ते १९२०

पर्यंतचा निबंधाचा कालखंड अपूर्व वैभवाने समृद्ध झालेला दिसतो. या कालखंडात टिळक, आगरकर, परांजपे, केळकर, कोल्हटकर, सावरकर हे निबंधकार प्रामुख्याने चमकताना दिसतात.

लोकमान्य टिळकांनी केसरी-मराठा या वृत्तपत्रांतून परखड लेखन केले. सरकारच्या अन्यायी वृत्तीविरुद्ध जोरदार टीका केली. लोकजागृतीसाठी सातत्याने लेखन केले. राजकीय स्वातंत्र्य हेच सर्वोन्नतीचे साधन असते. अशी त्यांची वैचारिक बैठक होती. त्यासाठी प्रखर लढा दिला. देशभक्तीचा अंगभूत गुण त्यांच्या साहित्यातून प्रकट होत राहिला. व्यासंग, तर्कशुद्धता, जळजळीत परखडपणा, ओजस्विता, झुंझार निर्भयता, सिद्धान्तांचे प्रतिपादन, प्रतिपादनाला भारतीय जाणिवांचा आधार ही त्यांच्या निबंधांची वैशिष्ट्ये. समाजसुधारणा आधी करण्याऐवजी स्वातंत्र्य मिळविणे निकडीचे हे त्यांचे निश्चयी मत होते व त्याचा उच्चार व आविष्कार त्यांच्या लेखनातून होत असे.

चिपळूणकर काळातील टिळकांचे कार्य महत्त्वाचे तसेच त्यांचे समकालीन आगरकर यांचे समाजसुधारणेचे असिधारा व्रत तितकेच प्रखर होते. समाजधारणेच्या ध्येयाने अविरत अथकपणे त्यांनी लेखणी उचलली. ' केसरी ' त काही काळ काम केल्यानंतर ' सुधारक ' नावाचे पत्र काढले. त्यातून सुधारणावादाचा कट्टर पुरस्कार केला. आपल्या लेखनातून सनातनी, परंपरावादी यांच्या आंधळेपणावर मर्मभेदक प्रहार केले. टीका केली. बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, पाश्चिमात्य संस्कृतीचे आवश्यक तेवढे उचित, विवेकी अनुकरण, स्वधर्मातील दोषांवर ओजस्वी भाषेत टीका, समाजहितैषी तळमळ यांचे अधिष्ठान त्यांच्या लेखनाला लाभले आहे. विचारसौंदर्य, भाषासौंदर्य, रसगुणसौंदर्य, शैलीची सुंदरता यांनी त्यांचे निबंध मोहित करतात. ते अज्ञेयवादी आहेत. त्यांच्या बुद्धिवादी विचारसरणीचा संस्कार महाराष्ट्रावर झाला आहे. स्त्रीजीवनावरील त्यांची भाष्ये ही न्याय्यभूमिकेने केली आहेत.

चिपळूणकर, टिळक यांच्यापासून प्रेरणा घेतलेले, स्वदेशप्रीतीने ध्येयवेडे झालेले " काळ " कर्ते शि. म. परांजपे यांच्या ज्वलज्जहाल भाषेने दीर्घकाळ स्मरणात राहणारे निबंध ही मराठी निबंध वाङ्मयाला एक वैशिष्ट्यपूर्ण देणगी लाभलेली आहे. त्यांचे निबंध म्हणजे गद्यकाव्य. काव्यमयता, पांडित्यपूर्णता, कल्पनाविलास, सहजसुंदर शैली, भव्योदात्त

आकांक्षा, क्रांतदर्शी भाषा, उपरोध, व्याजोक्ती, वक्रोक्ती, अलंकारप्राचुर्य हे त्यांच्या लेखनाचे महनीय विशेष होत. पौराणिक ग्रंथाच्या दाखल्यातून सद्यःस्थितीचे दिग्दर्शन करायचे आणि लोकांची मने परकीयांच्या जुलमी सत्तेविरुद्ध चेतवायची हे त्यांचे अपूर्व लेखनचातुर्य होते. त्यांच्या निबंधांनी मराठी निबंधाची रससुंदर गुणात्मकता वाढविली आहे निश्चितच.

न. चिं. केळकरांनी ' केसरी ' व ' सह्याद्री ' तून लेखन केले. त्यांना साहित्यक्षेत्रातील ज्ञानयोगी, कर्मयोगी, भक्तियोगी म्हणतात. त्यांच्या 'सम्राट'-पणाला शोभेल अशीच निबंध वाङ्मयातील त्यांची भरीव कामगिरी आहे. त्यांच्या लेखनातील चतुरस्रता, रंजकता, आशयघनता, सहृदयता, सहानुभूती, आत्मनिष्ठता, भावात्मकता, मार्मिक विनोदचातुर्य यांनी मराठी निबंधाला समतोल आकर्षक व्यक्तिमत्त्व लाभले आहे. आजच्या निबंधाची बीजे केळकरांच्या लेखनात बरीचशी उद्‌भुत झालेली दिसतील.

अ. ब. कोल्हटकर हे विनोदकार निबंधलेखक म्हणून सर्व परिचित आहेत. ' संदेश ' या वृत्तपत्राचे ते जनक आणि संपादकही. त्यांनी दैनिके, साप्ताहिके, मासिके काढली. त्यांच्या लेखनात धर्मप्रेम, स्वदेशप्रेम, स्वातंत्र्यप्रेम हे आवर्जून व्यक्त होते. तोच त्यांच्या लेखनाचा मूलस्रोत. त्यांची लेखणी जशी भावोत्कट तशीच तिखटही होती. विषय खमंग, शैली खुमासदार, वृत्ती विनोदी, सूत्र राजकारणाचे, रंगदार वेधकतेची झालर यांनी त्यांचा निबंध पूर्वीच्या गंभीर प्रौढ निबंधाचा तोंडवळाच बदलून टाकताना दिसतो. त्यांच्या निबंधाच्या खुसखुशीतपणाने मराठी निबंध वाङ्मयाला रोचक रंजकता आणली. पांढरपेशापुरता मर्यादित असलेला गंभीर निबंध सर्वसामान्यांच्या जीवनाशी निगडित केला. आंतर व बाह्यरूपात क्रांतिकारक बदल घडून आला.

याशिवाय म. गो. रानडे, इतिहास संशोधक राजवाडे, स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य काका कालेलकर, श्री. म. माटे, वा. म. जोशी, पु. ग. सहस्त्रबुद्धे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबा, साने गुरुजी, इ. नी निबंध वाङ्मयाचा परिपोष केलेला आहे.

या निबंधकारांनी आपापल्या अंगभूत पांडित्य, विद्वत्ता, प्रतिभेच्या सामर्थ्यनि व अंगीकृत कार्याच्या पूर्तीसाठी, लोककल्याणाची हितैषी दृष्टी ठेवून व्यासंगपूर्ण व चिंतनशीलतेने निबंधलेखन केले आहे. या प्रभावळीतील कित्येक निबंधकार कार्यकर्ते होते. लोकोद्धारासाठी झटणारे लोकाग्रणी होते. त्यांच्या

जाणीवपूर्वक स्वीकारलेल्या प्रकाशदानाच्या कार्याने लोकजीवन प्रबोधित झाले. हे खरे तर प्रकाशयात्रीच होते. त्यांना लेखणी-वाणीतून प्रकाशाचा गाव निर्माण करावयाचा होता. कित्येक निबंधकारांनी तर आपल्या विचारप्रकटीकरणासाठी वृत्तपत्रे काढली. कित्येक तर संपादक होते. या साऱ्या समाजधुरिणांचे लेखन वर्तमानपत्राच्या माध्यमातूनच आकाराला आले. १८१८ ते १८७४ पर्यंतचा निबंध त्रुटित लेखासारखा, कधी पत्रांचे स्वरूप घेऊन आला असला, तरी लोकोद्धार ही तीव्र तळमळ त्यापाठीमागे होती. त्या निबंधाने पुढील निबंधाचा कच्चा खर्डा तयार केला. पाया घातला. या बैठकीतूनच पुढे भारदस्त इमारतीचा बंध उभा राहिला. या पार्श्वभूमीतूनच पुढची भूमिका निश्चित झाली. निबिड अंधारात वाटेचा पुसट का होईना मार्ग दाखविण्याची कामगिरी या निबंधकारांनी केली आहे.

चिपळूणकरांनंतर निबंध बहुअंगाने संपन्न होत गेला. गंभीरतेपासून ते खेळकरतेपर्यंत, बुद्धिजीवीपासून ते सामान्य जनतेपर्यंत जाऊन पोचला. धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वाङ्मयीन किंबहुना जीवनाच्या सर्व क्षेत्रांना आपल्या कक्षेत घेऊन भरघोस बनला. नियतकालिकांत जन्मलेला निबंध नियतकालिकांच्या बहुरंगाप्रमाणे, लोकजीवनाच्या संदर्भातून विकसत होत गेला. नियतकालिकांच्या भूमीतूनच त्याच्या प्रकांश पावलांचे ठसे उमटत गेले. ही ' जीवलग ' कधीच सुटली नाही.

मराठी निबंध इंग्रजी वाङ्मयातूनच आपल्याकडे आला. इंग्रजी वाङ्मयातील निबंध जसा नियतकालिकांच्या माध्यमातून लिहिला गेला, तोच प्रकार आपल्याकडील निबंधाचा. १९२५ नंतर यापूर्वीच्या ध्येयनिष्ठ, गंभीर विचारसरणीच्या निबंधाला वेगळे वळण लागले. हे जे वेगळे स्वरूप प्राप्त झाले तेही इंग्रजी वाङ्मयातील निबंधाच्या अभ्यासातून. इंग्रजीतील चार्लस् लँब, चेस्टर्टन, ल्युकास, लिंड व गार्डिनर या प्रथितयश लेखकांनी इंग्रजीत आत्मनिष्ठ स्वरूपाचा लघुनिबंध प्रकार लिहिला. त्यांनी तो फ्रेंच भाषेतील माँटेन या निबंधकाराच्या लघुनिबंधाच्या धाटणीवर इंग्रजीत आणलेला होता. प्रा. ना. सी. फडके यांनी ' गुजगोष्टी ' या नावाने इंग्रजीतून मराठीत आणला. ' रत्नाकर ' या मासिकातूनच तो प्रा. फडके यांनी रुजविला. पूर्वीच्या परनिष्ठ, गंभीर, बंदिस्त निबंधाऐवजी हा हलक्याफुलक्या विषयावर जीवनानुभव म्हणून आत्मपर भावनेने खेळकरपणे रंगवलेला हा ' गुजगोष्टी ' चा प्रकार पुढे

लघुनिबंध ललित निबंध या नावाने लिहिला जाऊ लागला. या लघुनिबंधासंबंधी प्रा. फडके यांनी " या निबंधाला काव्यमय उद्‌गाराची उपमा साजण्यासारखी आहे, व ज्याप्रमाणे काव्योद्‌गार जितका सुंदर, त्याप्रमाणे निबंधही जितका विस्कळीत व सहज असेल तितकी त्याची मनोज्ञता वाढेल. ताजेपणा आणि मुग्धपणा हे ललित निबंधाचे प्राणभूत गुण आहेत, आणि रचनेच्या खटाटोपाने त्याला शोभा येण्याऐवजी त्याचा मुग्धपणा व टवटवी मात्र नष्ट होईल " असे स्वरूपदर्शन घडविले आहे.

या लघुनिबंधकारांच्या पंक्तीतील वि. स. खांडेकर, अनंत काणेकर, वि. पां. दांडेकर, वि. ल. बर्वे, ना. मा. संत, गो. रा. दोडके इ. समर्थ लेखकांनी लघुनिबंध १९४० पर्यंत समृद्ध केला. पुढच्या काळात शांताराम, म. ना. अदवंत, शिरवाडकर, मंगेश पाडगावकर या लेखकांनी त्याला संपन्न केले.

सामाजिक जीवनात १९४०-५० नंतर विलक्षण बदल झाले. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक जीवन व्यामिश्र बनले. अनेक नियतकालिकांचा जन्म झाला. लोकजीवनाच्या सर्वांगांनी प्रादेशिक जागृती झाली. सारेच जीवन संमिश्र परिणामांनी व्यस्त होऊन ध्येयदिशा शोधण्याच्या प्रयत्नात गुंतून गेले.

पूर्वीचा जीवनानुभव या काळात अधिक व्यापक नी जटिल झाला. जीवन चिंतनशीलतेने खेळकर, प्रसन्न टवटवीचा लघुनिबंध हा जीवनाचा स्तर जागृतीचा विशालपट तोलायला अपुरा पडू लागला. लघुनिबंध वेगळे रूप घेऊन ललित निबंध या नावाने आविष्कृत होऊ लागला. आरामखुर्चीतला गुजगोष्टींचा कल्पनाविलास या नव्या गुंतागुंतीच्या व्यामिश्र जीवनाला मानवणारा नव्हता. केवळ आत्मनिष्ठ न राहता त्या त्या काळातील परिस्थितीनुसार बनलेल्या समाजजीवनाला त्या त्या अतीव गरजेनुसार वाङ्मयालाही आपले रूप धारण करावे लागते. हे सर्जन आपोआपच जीवनातून संभवत असते. लघुनिबंधातूनच या नव्या ललित निबंधाचा ' संभव ' झालेला आहे. त्याचे आंतरिक नाते अगदीच नाळ तुटल्यासारखे नाही.

' या ललित निबंधामध्ये उत्स्फूर्तपणा (अतिशय) जाणवतो. किंबहुना, यापुढे इतर कुठल्याही कलात्मक वाङ्मयकृतीप्रमाणे ललित निबंधालाही उत्स्फूर्तपणाची कसोटी लावावी लागेल. ही निपज अर्थातच थोडी असेल. पण ती थोडी असणेच हितावह आहे. कारण त्यातूनच क्षितिजापलीकडच्या

असीमतेचा प्रत्यय यायचा असतो. विस्मयाच्या विश्वविराट भावनेची झळाळी इथेच उमटायची असते. व्यक्ती व विश्व यातले समस्पंदन इथेच व्हायचे असते, अनुभवाची उत्कट लय इथेच लागलेली असते. थोडक्यात सांगायचे तर कवीचेच नव्हे तर महाकवीचे, श्रेष्ठ सर्जनशील कलावंताचे बळ इथेच बीजरूपात सापडणेही अशक्य खचित नाही ' एवढे सामर्थ्य असल्याचे मालवण येथे १९५८ साली भरलेल्या ४० व्या मराठी साहित्य संमेलनात ललित वाङ्मयशाखेच्या अध्यक्षपदावरून दुर्गा भागवत यांनी बोलताना सांगितले आहे. हा ललित निबंधाचा प्रांत दुर्गा भागवत, इरावती कर्वे, करंदीकर, आचवल, केचे, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, श्रीनिवास कुलकर्णी, सुभाष भेंडे, शांता शेळके, चंद्रकुमार नलगे, आनंद यादव, रवींद्र पिंगे या जाणत्या लेखकांनी अधिकच वैविध्यपूर्ण जीवनानुभावांच्या सखोल चित्रणांनी सकस बनविलेला आहे.

आता तर परत सामाजिक विचारांच्या संदर्भात वैचारिक लेखांची दर्शने आजच्या नियतकालिकांतून विशेषतः रंगीत पुरवण्यांतूनही प्रामुख्याने घडत असताना दिसतात.

असा हा निबंध कधी निबंध, कधी गद्यबंध, कधी ललित गद्य, कधी गुजगोष्टी, कधी आत्मनिबंध, कधी ललित निबंध अशी नावे धारण करून मराठी वाङ्मयाची कूस सतेज, उजळ, समृद्ध करीत आहे. ही साठा उत्तराची कहाणी राहिलेली नाही. त्यामुळे तिला ' संपूर्ण ' होण्याची भलतीच दिवास्वप्ने पडणार नाहीत. मात्र ती उत्तरोत्तर ' सुफलित ' होत राहील यात शंकाच नाही.

विद्यावंचित समाज दुर्गतीस पोचतो तेव्हा, त्या समाजाला सावरण्यासाठी, त्याला जे जे सत्, उन्नत, सद्गत, निर्विकल्प धारणा यांची गरज असते, ती दिग्दर्शित करण्यासाठी कर्त्या सुधारकांची, परिणतप्रज्ञ समाजधुरिणांची आवश्यकता असते. ते समाजाच्या अभ्युदयासाठी जागृत असावे लागतात. कर्तव्यदक्षतेने त्यांनी त्या समाजाला डोळस बनविण्याची निकड असते. समाज एकांगी, आत्मविस्मृत, हेतुशून्य, विचारहीन बनला तर त्याची अधोगती अटळ असते. ज्या ज्या वेळी अशा अधःपतनाची सामाजिक स्थिती अनावर होते, तेव्हा ती सामाजिक मनाचीच भयंकर कीड बनते. त्याच वेळी पुरोगामी विचारवंतांना ही कोसळ थांबविण्यासाठी वाणी-लेखणीचा शस्त्रे

चालवावी लागतात. सामाजिक नीतीच्या प्रस्थापनेसाठी भविष्याचा वेध घेऊन सुधारकांना नवे विचार द्यावे लागतात. नव्या तत्त्वांचा उदय घडवून आणावा लागतो. त्यासाठी व्यापक उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून भूतकालीन संकुचितावर प्रहार करावे लागतात. तेवढा निर्भय झुंझारपणा समाज सुधारणेसाठी तळमळणाऱ्यांच्या अंगी जात्याच बाणवत असतो आणि स्वाभाविकपणेच मूल्यधारणेकरिता त्यांच्या लेखनातून तो उतरत असतो. ' जसा रोग, तसे जालीम औषध ' या न्यायाने या सुधारकी वृत्तीच्या लेखकांच्या अंतःस्थलातून जो विचार स्फुरतो, तो त्या भाषेच्या ज्वलज्जहाल, जळजळीत, परखड, सडेतोड, तर कधी सौम्य, शांत स्वरूपाला घेऊनच येतो. सामाजिक स्थितिगती ही समाजनिष्ठ लेखकाच्या व्यक्तित्वावर खोलवर परिणाम करीत असते. अस्वस्थ करणारी वैचारिकता ही त्या व्यक्तीचा आवश्यक व अटळ असा भाग ठरते. ही त्या व्यक्तीतील वैचारिक प्रेरणा दुर्बल समाजाला मिळते. त्या समाजाला प्रबल आत्मभान लाभते. या आत्मभानातूनच आत्मसामर्थ्य वर्धित होते. आणि झापडलेला, बहकलेला, रुतलेला, फसलेला, फसविला गेलेला, निष्प्रभ, परंपराधीन, रूढिग्रस्त झालेला समाज क्रियमाण बनतो. त्याच्या धमन्या नव्या चैतन्याने सळसळू लागतात, आणि त्या समाजात आत्मतेज जीवंत अस्मितेच्या रूपाने नव्या युगाला साद घालते. जगात जिथे जिथे प्रबोधन झाले तिथे तिथे हेच घडत गेले. आपल्या महाराष्ट्रातही अशा नवमत परिवर्तनाची प्रचिती येते. आपण जो नियतकालिकांच्या जन्माचा हेतू पाहिला, त्यातून झालेले लेखन तपासले, सम्यक् जागृतीसाठी तळमळणाऱ्या सुधारणावादींची ध्येयनिष्ठा आणि निबंधकारांच्या निबंधाचा आशय समजून घेतला, निबंधामधे व महाराष्ट्रीय लोकजीवनामध्ये घडत गेलेले प्रभंजन आणि यातून जन्माला आलेले मन्वंतर पाहिले तर हा किती काळ लोकजागर चालला होता हे समजून येते. त्यासाठी अनेक जाणत्या विचारवंत निबंधकारांनी जाणीवपूर्वक वैचारिक लेखन केले आहे. वैचारिक आंदोलनांनी एकसंध समाजनिर्मिती होते. ते त्या समाजाचे सामर्थ्य असते. हे बलजागृतीचे कार्य या वैचारिक लेखनाने केले आहे. धार्मिक प्रारब्धवादी अंधश्रद्धांनी खचलेला, राजकीय दास्याखाली दडपलेला गेलेला, आर्थिक कोंडीत पिचलेला, असा सर्वाथनि ' परतंत्र ' झालेला, त्या ओझ्याखाली पेंगुळलेला आपला दुबळा, गतप्रभ, दिशाहीन, विस्कळीत, निराश्रितासारखा झालेला समाज ' जगणं नशिबी आलंय ' म्हणूनच जगत होता. त्याच्या या

थंड शरीरात ऊब आणली गेली, त्याच्या काळजात पौरुषाची धग फुलविली, त्याच्या मेंदूत स्वाभिमानाच्या ठिणग्या पेटविल्या गेल्या आणि त्यांच्या चेतलेल्या नजरांचीच शस्त्रे झाली ती त्या त्या काळी पेटलेल्या विजांच्या अक्षरांनीच ! आणि एका अर्थाने समाजाला अनेकार्थांनी काचणाऱ्या भिन्नक्षेत्रीय पारतंत्र्याला चूड लागत गेली. नवजीवनवादी समाजाची नवरचना झाली. त्याची भावनिक, बौद्धिक, सांस्कृतिक प्रगल्भता वाढली. समाजाची प्रारब्धवादातून सुटका होऊन, नव्या ज्ञाननिष्ठ स्वसामर्थ्यावरचा विश्वास वाढला. महाराष्ट्रामध्ये हे जे सामाजिक, सांस्कृतिक नवनिर्माणक्षम प्रबोधन घडले, त्याची मशागत या परिवर्तनवादी, पुरोगामी, विचारवंत समाजनिष्ठ लेखकांच्या वैचारिक लेखनाने केलेली आहे. जुना पूर्वकाल आणि नव्या प्राप्तकालाच्या चिंतनातून, अनुभवातून जो नवा विचार आला त्याने महाराष्ट्रातील सामाजिक मनाची जडण-घडण केली आहे. या केलेल्या मशागतीतून पिढ्यापिढ्यांचा सर्वंकष विचार लोकमानसाला नवी झळाळी देता झाला आहे. ज्या ज्या वेळी समाज निर्मळ नीती, सुशील मूल्ये, पोषक श्रद्धा, पौष्टिक विचार यांना पारखा झाला, अविवेक, अविचार, अधमपणा, अकर्तृत्व, अधःपात यांच्या आहारी गेला, भौतिक, आध्यात्मिक, सांस्कृतिक अपकर्ष हेच ज्या वेळी कर्मकांडग्रस्त जीवन बनले, त्या वेळी नियतकालिकांच्या माध्यमातून, निबंधाच्या पोषक गद्य लेखनातून विचारवंतांनी वैचारिक मंथन केले आहे. प्रबोधन घडविले आहे. महाराष्ट्रीय जीवनात चैतन्यशाली प्रवाह निर्माण केले आहेत. समजापुरुषाला ज्ञाननिष्ठ विशुद्ध दृष्टी दिलेली आहे. महाराष्ट्रामध्ये अशा समाजसुधारणावादी विचारवंत लोकशिक्षकांची प्रभावळच दिसते.

' मराठी निबंधकारांचा पिंड केवळ ललित वाङ्मय निर्माण करणाऱ्या कलावंतांचा नसून रचनाबद्ध, वस्तुनिष्ठ व कसलेल्या शैलीने आपले विचार व्यक्त करणाऱ्या साहित्याचार्यांचा आहे. खुद्द निबंध ह्या शब्दाची मूळपीठिका हीच गोष्ट सिद्ध राहील. हा शब्द मूळ संस्कृतातील. त्याचा धात्वर्थ ' निबध्यते अस्मिन् इति, (नि + बन्ध् + ल्युट, अधिकरणे) निबन्धम् म्हणजे जीत विषय गोवला जातो अशी रचना ' असा आहे. ' अशी स्पष्ट नोंद डॉ भा. गो. देशमुख यांनी ' मराठी निबंधाची पूर्वपीठिका ' या पुस्तकात केली आहे.

अशा या लोकशिक्षकांच्या लेखनातील उतारे मुद्दाम या पुस्तकात निवडले आहेत. यातील काही पत्ररूप आहेत, काही लेखरूप आहेत, तर काही

विचारवंतांच्या लिखित स्वरूपातील भाषणांचा समावेश केला आहे. स्वैर विचारात्मक आत्मप्रकटीकरण अथवा विचारप्रवर्तक अथवा पांडित्यपूर्ण विवेचन ही अंगे निबंधात असतात. ती व्याख्यानात्मक निबंधातही आढळतात. हे नैबंधिक स्वरूप केवळ अक्षर (लिपी) बद्ध निबंधांनाच असते असे नाही; तर वाणीबद्ध शैलीदार विवेचकतेलाही असते. अलीकडच्या काळात लेखात्म स्वरूपाने लिहून काढलेली भाषणेच श्रोत्यांसमोर सावेश वाचून दाखविली जातात. प्रत्यक्ष श्रोत्यांसमोर आपल्या भाषणाचे सर्वंकष सखोल दर्शन घडविणे तितके सोपे नसते. त्याला औचित्यपूर्णता, बहुश्रुतता, सखोलता, व्यासंगपूर्णता, सहानुभूती हे गुण प्रकर्षाने त्यामध्ये असावेच लागतात. संपन्न व्यक्तिमत्त्वाच्या स्वतंत्र चिंतनाचा तो आविष्कार असतो. मूल्यमापन, तत्त्वनिष्ठा, वैचारिकता, खंडनमंडनाचा विवेक, विषयासंबंधी जिव्हाळा, निश्चित वैचारिक बैठक, अचुकता, चातुर्य, अनेक मतप्रणालीच्या प्रेषकमनाची पकड घेण्याचे कौशल्य, वाणीचा अखंड रुचिरस्त्रोत, मोजक्या वेळात मोजके विचार ठामपणे मांडण्याची कलात्मक चातुरी, व्यक्तव्यावर घट्ट पकड, आलेखात्मक नीट बांधणी, सुरेख अभिव्यक्ती, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे अष्टावधानी वक्तृत्व आणि भाषेवरचे प्रभुत्व यातून समष्टी मनावर साधणारा प्रभावी परिणाम हे फारच संयमाने यामध्ये घडत असते. म्हणून निबंधाचे जे विविध प्रकार मानले जातात, त्यामध्ये व्याख्यानात्मक स्वरूपाचा निबंधही महत्त्वाचा मानावा लागतो. तसे उतारे आवर्जून घेतले आहेत.

खांडेकरांनी निबंधाचे गुणविशेष सांगत असताना म्हटले आहे - 'निबंधामध्ये कलात्मक स्वरूपात भावसौंदर्य, कल्पनासौंदर्य, विचारसौंदर्य असते. निबंधातील विचार खुलविण्याचे अनेक मार्ग आहेत. कधी तर्ककठोर चिकित्सेने, कधी उपरोधाने, कधी तपशिलाने, कधी अनेक संदर्भांनी, कधी कल्पनेच्या साहाय्याने तर कधी भावभावनांच्या मदतीने निबंधातील विचार परिपुष्ट होत राहतो.

स्वातंत्र्य सर्वसमावेशकबुद्धी, विशुद्ध, व्यापक दृष्टी, समाजाचे सखोल मूलगामी अवलोकन, जीवनप्रणालीचे सूक्ष्म, भेदक विश्लेषण, उत्कर्षापकर्षकारक प्रवृत्तीचे अचूक, समतोल मूल्यमापन, प्रखर प्रगमनशील तत्त्वचिंतन, उन्नत पंथाचे दूरदर्शी धीट दिग्दर्शन, स्वमताचे साधार, सप्रमाण विवेचन, समर्पक साक्षेपी लेखन या सगळ्यांतून, या सगळ्यांच्या समन्वयातून

सशक्त सुंदर निबंध सिद्ध होतो. '

पुढे निबंधाची व्याख्या करताना निबंधाचे सारसर्वस्व प्रगट करतात.

'.... प्रौढ, प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचा सखोल, सकस विचारांच्या रूपाने समुचित, समर्थ शैलीच्या माध्यमातून झालेला अर्थगर्भ, आवाहनक्षम आविष्कार म्हणजे निबंध. '

अशा रीतीनेही मराठीतील गद्य वाङ्मय समृद्ध आहे, त्याचे प्रत्यंतर इथे निवडलेल्या उताऱ्यांतून आल्याशिवाय राहात नाही. शिवाय या गद्यलेखकांच्या विचारमंथनाने महाराष्ट्रीय समाजजीवनाला पुरोगामी आधारमूल्ये लाभलेली आहेत.

' एखाद्या समाजाचे हृदय त्याच्या काव्यावरून समजत असले, तरी त्याच्या विचारांची व्यवस्थिती आणि उंची, त्यांच्या गद्यशैलीच्या विकासावरून कळते. इंग्लंडमधील सर्वसामान्य वृत्तपत्रातील शैलीही इतकी संपन्न आणि आकर्षक असते, की त्यावरून सर्व राष्ट्रच्या राष्ट्र एका सुव्यवस्थित वैचारिक पातळीवर जगत असले पाहिजे, असे वाटल्यावाचून राहात नाही. लोकहितवादींपासून ते आजच्या प्रतिष्ठित गद्यलेखकांपर्यंत, मराठी लेखकांच्या गद्यातही अभिमानास्पद विचारव्यवस्थितीचा पुरावा आढळत असे ' श्री. के. क्षीरसागरांनी प्रकट केलेल्या विचारांची संगती त्या त्या विचारवंताच्या विचारधनाच्या अनुषंगाने लावता येण्यासारखी आहे.

स्वार्थी, स्वहितदक्ष, समाजात कर्मकांडाचे स्तोम माजविणाऱ्या, जुन्या रूढी, परंपरांच्या टाकाऊ मंत्रतंत्रात समाजाला भूल पाडणाऱ्या व अवघा समाजच देव-दैववादी बनवून त्याच्या नशिबी करंटेपण बांधणाऱ्या अहंमन्य दंभाचा स्फोट करण्याचे अपूर्व धारिष्ट दाखविणाऱ्या लोकहितवादींनीच समाजाला तेजोमय प्रगमनशीलतेच्या वैचारिकतेचा धगधगता वारसा दिला. प्राचीन परंपरेचा अतिरेक करून समाजाला नाडणाऱ्या व जीवनाचेच मर्म विसरायला लावणाऱ्या पुराणमतवाद्यांच्यावर त्यांनी तीव्र, कटू व कठोर टीका केली. पुस्तकी पांडित्यावर न विसंबता जगाच्या इतिहासाचे मार्मिक अध्ययन व देशाच्या परिस्थितीतील कर्मदुबळेपणाचे चिकित्सक निरीक्षण करून लोकहिवादींनी पायाशुद्ध विचारसरणीचा निर्भयपणे स्वीकार केला होता. महाराष्ट्रातील राष्ट्रवादाच्या या आद्यप्रवर्तकाने एकूण सामाजिक व्यवस्थेची पुनर्घटना करण्यासाठी इतिहासाचे व्यासंगपूर्ण लेखन केले. त्यांना राजकीय

पारतंत्र्याचे शल्य बोचत होते आणि आपल्या हिंदुस्थानचा इतिहास लिहिला गेला नाही याची खंत त्यांना वाटत होती. इतिहास जाणण्यापासून ज्ञान व आपले सद्‌गुण वृद्धिंगत होतात अशी त्यांची धारणा होती. आपल्या लोकांना इतिहासाबद्दल वाटलेल्या औदासीन्याबद्दल ते दोष देतात. इतिहास लिहून ठेवणे आणि त्याची मीमांसा करणे राष्ट्रीय उत्कर्षाच्या दृष्टीने आवश्यक असते असे त्यांचे मत होते. याच कळकळीपोटी त्यांनी इतिहास न लिहिला गेल्याची कारणे तर्कशुद्धपणे मांडली आहेत. त्यांच्या विचारातील मार्मिकता, तेजस्विता व ' बुद्धिरेव बलीयसी ' या तत्त्वाचा प्रत्यय येतो.

महाराष्ट्राच्या अभिनव पुनर्रचनेसाठी अनासक्त, समर्पित, त्यागीवृत्तीने, विरोधी शक्तींना प्रखर झुंज देऊन निस्सीम समाजसेवेचे कंकण बांधणाऱ्या, क्रांतिहोम धगधगता ठेवून निर्भयपणे ज्यांनी उभे आयुष्य झोकून दिले अशा युगप्रवर्तक म. फुल्यांची अदम्य विचारशक्ती नव, ' विश्वनिर्मिक ' ठरली आहे. सामाजिक क्रांतीचा महाराष्ट्रामध्ये जो नवोदय झाला त्यातील जनजागृतीचे अग्रदूत म्हणून म. फुले यांचे समग्र वाङ्मय म्हणजे नवजीवनमूल्यांचा उद्‌घोष असे म्हटले तर वावगे ठरू नये. अज्ञानी सामान्य जन, दासीभोग भोगणाऱ्या स्त्रिया, खुरटलेले अस्पृश्य यांच्या जखडलेल्या आणि जोखडलेल्या रुद्ध मनाला मोकळा श्वास देण्याचे त्या काळातील त्यांचे ते महाकठीण काम बंडखोरीचे होते. त्यांचे ते ' धर्मयुद्ध ' त्यांच्या लेखनातून अवतरले आहे. परंपरागत गुलामगिरी तोडण्यासाठी सार्वजनिक सत्यधर्माचा केलेला अंगीकार हा दीन-पददलितांच्या मुक्ततेसाठी परजलेले शस्त्र होते. धर्म, समाजरचना, शिक्षण, अस्पृश्यता, शेतकऱ्यांची स्थिती याविषयी त्यांनी विचारप्रवर्तक लेखन केले. दुर्गतीबद्दल चीड व्यक्त केली, तर प्रगतीच्या भविष्याचा प्रकाशमार्ग दाखविला. ' शेतकऱ्यांची दशा ' या उताऱ्यात ज्ञानहीन शेतकऱ्यांची हलाखी, सर्वत्रच भरलेले दारिद्र्य, अन्नवस्त्राची दुःस्थिती, स्वजनांकडून होणारी उपेक्षा, इंग्रजी अंमलदाराकडून होणारी पिळवणूक, सरकारने घातलेल्या अन्याय्य बाबीने केलेली भणंग स्थिती या साऱ्यांनी शेतकऱ्यांची केलेली दुर्दशा उपरोधाने आणि उद्वेगाने चित्रित केलेली आहे. ' जो सर्व देशातील लोकांचे सुखाचा पाया, त्याचे असे बुरे हाल !' या भेदक शब्दात कटू सत्य त्यांनी समाजापुढे ठेवले आहे आणि आत्मोद्धाराशिवाय पर्याय नाही असे खोलवरच्या उमाळ्याने सांगितले आहे.

सामाजिक सुधारणेतूनच व्यक्तिविकास व राष्ट्रीय स्वातंत्र्याची बीजे आहेत असे मानणाऱ्या आणि ' कालोह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ' असा उद्‌घोष करणाऱ्या, ज्यांच्या लेखणीने महाराष्ट्रात शुचिता, सुजनता, सद्‌भाव, त्यागी, तपस्वी, जीवन तत्त्वनिष्ठा निर्माण केली त्या 'देव न मानणारे देवमाणूस' आगरकरांनी उभे आयुष्य मानवतेच्या प्रबोधनासाठी व्यतीत केले. ' ज्या तत्त्वाचे अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रे अधिकाधिक सुधारत चालली, त्या तत्त्वांचा स्वीकार करावयास आम्ही आनंदाने तयार असले पाहिजे ' अशा आत्मप्रबुद्ध जाणिवेने त्यांनी समाजाला तात्त्विकता, बुद्धिनिष्ठा यांनी स्वतेजयुक्त होण्यास प्रवृत्त केले. ज्या वेदप्रामाण्य, शब्दप्रामाण्य, शास्त्रप्रामाण्य यांनी समाजाची प्रज्ञा व नवनिर्मितीच्या शक्ती खच्ची केल्या, त्यांची सनातन कालबाह्यता पाहून त्यांनी प्रखर विरोध केला. तर्काची कुऱ्हाड उचलली. लोकविद्वेषाला न जुमानता निर्भीडपणे जुन्या पोथ्यांतून उत्क्रांत झालेल्या बुरसट वृत्तीशी निर्णायक झुंज देण्याचे धारिष्ट बाळगले. नव्या युगाच्या नव्या साम्यवादी शक्ती समाजाला दिल्या. ते त्यागपूर्वक समाजसेवेच्या असिधाराव्रतापासून जरासुद्धा विचल झाले नाहीत. ' विश्वासावलंबी कल्पनास व आचारास विवेकाची आच देऊन झाळून पाहणे ' हे त्यांचे जीवनसूत्र व लेखनसूत्र होते. प्रगतिवादी विचाराचा अभिनिवेशाने ठामपणे पुरस्कार केला. ' आमचे दोष आम्हांस कधी दिसू लागतील ' या लेखामध्ये आपल्या देशात जे समाजविचार, धर्मविचार, राज्यविचार केव्हा एकेकाळी करून ठेवले त्यात कालानुसार बदल केलेच नाहीत. गतानुगतिकता निर्माण झाली. स्थितिबद्धतेने समाजाची अधोगती झाली. गतवैभवाची स्तुतिस्तोत्रे गाण्यांनी स्वत्व हरवले याचे भान समाजाला आलेच नाही. निःसत्त्व, निष्क्रिय, निर्भान समाजाची अधोगती अटळ होती असे स्पष्ट विचार मांडले आहेत. अनेक दोषांवर प्रकाश टाकलेला आहे. चंद्रगुप्तापूर्वीच आमचा राष्ट्रचंद्र मावळला होता असे प्रखर वास्तवाचे दर्शन त्यांनी घडविले आहे. गुलामीवृत्तीचा धिक्कारही त्यांनी कठोर शब्दांत केलेला आहे.

चिपळूणकरांच्या मालेनंतरचा काळ हा खरा चतुरस्र आंदोलनाचा काळ मानला जातो. एकीकडे राजकीय स्वातंत्र्याच्या, स्वदेशप्रीतीच्या चळवळीचा, तर दुसरीकडे सामाजिक चालीरीती, रूढी, परंपरा विरुद्ध प्रबोधनाचा काळ, तिसरीकडे साहित्याच्या नव्या नव्या मानवी भावनांच्या आविष्कार स्वातंत्र्याची

तुतारी फुंकणाऱ्या नव्या मनूचा विजिगीषू काळ तर चौथीकडे देशभक्तांच्या बंडांचा उठावांचा धगधगता काळ की, ज्याआधी स्वातंत्र्य सौदामिनी झाशीच्या राणीने परसत्तेच्या तोफांची आग विझवून टाकली होती. त्या अशा प्रबोधनकाळात ताराबाई शिंदे यांनी आपले बंडखोर क्रांतिकारक विचार ' स्त्री-पुरुष तुलना ' या लेखात मांडले होते. त्यांनी आंतरिक पोटतिडकीने स्वजनांच्या स्वार्थी, मक्तेदारीची शेखी मिरवणाऱ्या, आत्मप्रौढीवर घणाघात केला आहे. पुरुष जातीचा किळसवाणा मतलबीपणा कसा आहे त्याचे मर्मभेदी प्रहाराने झणझणीत अंजन पुरुषसत्ताप्रधान समाजाच्या डोळ्यात घातले आहे. सनातनी वृत्तपत्राच्या स्त्रीजातीवरील टीकेला त्यांनी निर्भयपणे गोषाबाहेर येऊन त्या पत्राचे आणि पुरुषजातीचे बुरखे फाडून टाकले. त्यांचा अन्यायाविरुद्ध उठलेला आंतरिक आवेश त्यांच्या शब्दाशब्दांतून ठिणगीसारखा पेटताना दिसतो.

' अस्पृश्यता निवारण हा तर माझ्या धर्मकार्याचा भाग आहे. ' असे जीवनब्रीद मानून ज्यांनी अस्पृश्यांच्या व स्त्रियांच्याही सर्वांगीण विकासासाठी अथकपणे जीवनान्तापर्यंत काम केले त्या वि. रा. शिंदे या आधुनिक महर्षींच्या लेखनाची दिशाच समष्टिप्रधान होती. त्यांच्या काळी समाजातील अंतःकरण सुन्न करून टाकणाऱ्या परंपरा, वर्णव्यवस्थेच्या जाचक बंधनाने हीनदीन केलेल्या अस्पृश्यांचा उद्धार करण्यासाठी कोणा विभूतीची, महापुरुषाची वाट पाहण्यास वेळ नव्हता. अशा वेळी ' श्रद्धेने पर्वत हलतात ' या प्रबळ आत्मनिर्भर विश्वासाने त्यांनी ते कार्य केले. त्या वेळच्या शिक्षणाचा मूलभूत विचार करून काल व समाजसापेक्ष बदल घडविला पाहिजे असा विचार त्यांनी मांडला. ते ज्या वेळी परदेशाला गेले त्या वेळी मुद्दाम खेड्यांत जाऊन तेथील प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा, शिक्षणपद्धती, शिक्षणविषयक सुविधा, शिक्षक-विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नाते, तिथली प्रार्थना, खेळ, प्रात्यक्षिके, तिथली एकूण शैक्षणिक शिस्त व शिक्षा पाहून त्यांच्या मनात आपोआपच आपल्या देशातील शिक्षणाची अवस्था भिनत जाते. त्यांच्या डोक्यातील विचारांचे काहूर त्यांनी लिहिलेल्या पत्राच्या शेवटी उतरते. ' ही शाळा नव्हे तर सुधारलेल्या देशाचा, राष्ट्राचा आणि समाजाचा अगदी खालच्या दर्जाचा घटकावयव बनविण्याची ही गिरणीच होय. इतका पैसा व अक्कल इकडे खर्च होत असूनही राष्ट्रीय शिक्षणाची हेळसांड होत आहे अशी ओरड पत्रांतून, सभांतून ऐकू येते तर

आमच्याकडे १०० त ७ ला लिहिण्या-वाचण्यास येते तर नोकऱ्या मिळत नाहीत, म्हणून शिक्षण फार सवंगले असे कधी कधी उद्‌गार ऐकू येतात ! '

कर्मवीरांनी शेवटी केलेले तिखट भाष्य हे आपल्या शैक्षणिक समाजाचे मतलबी दृश्य स्पष्ट करते. दुसऱ्या पत्रात तर ' ह्या देशातील उद्धारक चळवळीत (व) आमच्या उद्धारक चळवळीत काय फरक आहे ते ज्याने त्यानेच पाहावे.'

महर्षी शिंदे यांचे परदेश-अवलोकन चालले असता साहजिकच त्यांचे जिज्ञासू मन आपल्या देशातील वास्तवाशी तुलना करते. आपल्या व त्या देशात एकाच काळी कशी परिस्थिती होती याचे ज्ञान आपल्यालाही नकळत या पत्रावरून होते. म्हणून त्यांनी परदेशातून लिहिलेल्या पत्रांचा समावेश हेतुपूर्वक व मुद्दाम या महाराष्ट्र सामाजिक विचारांच्या संदर्भात निवडलेल्या गद्य उताऱ्यांच्या मालिकेत केला आहे.

' क्रांतीचे चाक अर्धेच फिरले, आसासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही ते चक्र आम्हीच फिरवू' अशा बलदंड आत्मविश्वासाने संपूर्ण समाजाच्या सर्वांगीण क्रांतीची खड्‌गधारी, तेजस्वी भाषा बोलणाऱ्या व ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी दिक्कालांच्याही भिंतींना सुरुंग लावणाऱ्या आत्मतेजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन, त्यांचे साहित्य हा एक संघर्षच होता. त्यांनी शतकानुशतकांची सांप्रदायिक, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक वर्णव्यवस्थेची लाजिरवाणी गुलामगिरी तोडून टाकण्यासाठी, अस्पृश्यांची अस्मिता जागृत करून स्वाभिमानाच्या नव्या गावाची स्वतःच्या युगदक्ष हातांनी उभारणी करण्यासाठी लेखणी, वाणी, कृतीतून क्रांतिकारी लढा उभा केला. त्यासाठी त्यांनी स्वतःची वर्तमानपत्रे सुरू करून दलितांच्या उत्थानासाठी तर्कशुद्ध, जळजळीत विचारांनी ओतप्रोत भरलेले लेख लिहिले. सर्वस्व वंचित दलितांवर अमानुष अन्याय करणाऱ्या अमानवी वृत्तीवर प्रहार केले. दुष्ट दास्याचे भंजन केले. त्याचबरोबर दलित समाजालाही आत्मशोध करायला प्रवृत्त केले. त्यांच्यातल्या न्यूनगंडावर शस्त्र उचलले. भंजन, प्रभंजन व नवनिर्माण या तत्त्वत्रयीची धार त्यांच्या लेखनाला असल्याचे जाणवते. त्यांच्या ' आरसा ' उताऱ्यात ' आपणच आपला उद्धार केला पाहिजे. कठोरपणे आत्मपरीक्षण करून अस्पृश्यांनी आपला जीवनमार्ग आपणच उजळला पाहिजे. शिक्षणाचा अवलंब करून उन्नती साधली पाहिजे. शिक्षण, संस्कार आणि शील, यांनी काया, वाचा, मन अशी त्रिशुद्धी केली पाहिजे.

ज्ञान हे तलवारीसारखे आहे ' इ. स्वोद्धारक विचार परखडपणे मांडले आहेत. समाज जसा आपल्या दास्याला कारणीभूत आहे तसेच दलितही याला जबाबदार आहेत अशी दुधारी भूमिका घेतलेली आहे.

वि. दा. सावरकर यांच्या लेखनाचा विशेष म्हणजे विज्ञाननिष्ठा, प्रचारकी बाणा, स्वातंत्र्याबद्दल अतीव प्रेम, भाषाशुद्धीचे व्रत इ. विशेष प्रत्ययाला येतात. एक प्रकारची ओजस्विता आणि आवेशी उत्कटता त्यांच्या साहित्याला लाभली आहे. त्यांनी आपल्या साहित्यातून हिंदुत्ववादाची प्राणभूत निष्ठा बाळगली असली तरी ते कट्टर सुधारक होते. राष्ट्रवाद हा त्यांच्या लेखनाचा अंगभूत गुण आहे. ' मनुष्याचा देव व विश्वाचा देव ' या लेखात परमार्थाचा अधिक्षेप करून विज्ञाननिष्ठ प्रपंचदृष्टीचा गौरव केलेला आहे. यामध्ये बुद्धिनिष्ठेचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. परंपरावादी शास्त्रप्रामाण्यवादाला, पोथीनिष्ठेला त्यांचा बुद्धिनिष्ठ विरोध होता. या अनंत विश्वाच्या तळाशी जी आदिशक्ती आहे, तिलाच माणसाने देव असे नाव दिले आहे. या देवाचा आणि माणसाचा खरा संबंध कोणता, त्याचे या विराट पसाऱ्यात खरे स्थान कोणते याची समर्पक, सडेतोड उत्तरे स्वा. सावरकरांनी बुद्धिवादाच्या कसोटीवर घासून दिलेली आहेत. माणसाच्या लांबीरुंदीचा गज घेऊन विश्वाची उपयुक्तता मोजणे हे तर्कशुद्ध नाही आणि अनादि-अनंत कालाच्या असंख्य उलाढालीतील मनुष्य एक तुच्छ परिमाण होय. विश्वदेवाला त्याची दादही नाही हे आपले परखड मत त्यांनी मांडले आहे. आद्यशक्तीचे सृष्टिनियम जाणून विश्वातील प्रतिकूल शक्तीवर मात करून जीवन सुसह्य करणे हीच विश्वदेवाची खरी पूजा हे आपले प्रतिपाद्य त्यांनी सिद्धान्तपूर्ण वैचारिकतेने मांडले आहे. अंधश्रद्धाशील भक्तीवर आघात करून विज्ञाननिष्ठ प्रयत्नवादाचा विचार त्यांनी समाजासमोर ठेवलेला आहे. त्यांचे आवडते तत्त्वज्ञान म्हणजे त्यांचा हा लेख होय.

श्री. म. माटे हे समाजशिक्षक म्हणूनच अधिक परिचित झाले आहेत. समाजनिष्ठ निबंधकार, कर्ते समाजसुधारक, सहृदयी कथालेखक, समाजातील उपेक्षित स्तरांबद्दल आत्मीयतेने कार्य करताना त्यांचे जीवन उन्नत करण्याचा, मानवतेची पातळी वर आणण्याचा कणवपूर्ण प्रयत्न आयुष्यभर केला. सुजाण समाजचिंतन, आंतरिक जिव्हाळा आणि उपकारक विज्ञाननिष्ठा यांनी त्यांच्या साहित्याला अस्सल मराठमोळ्या लोकाविष्काराचे मौलिकत्व लाभले आहे,

त्यांच्या ' विचारगुंफा ', ' विवेकमंडन ', ' विचारमंडन ', ' विचारशलाका ', ' माणुसकीचा गहिवर ', ' विज्ञानबोधाची प्रस्तावना ' या ग्रंथांच्या नावांतच त्यांचे साहित्याचे विशेष अंतर्भूत आहेत. वैचारिकतेतील अनुस्यूत आंतरिक जिव्हाळा त्यांच्या ' भांबावलेला समाज ' या लेखातही प्रत्ययाला येतो.

समाजधारणेसाठी अखंडपणे सेवाभावी आत्मीयतेने काम करणाऱ्या बलुतेदारांच्यावर व त्यांच्या भवितव्यावर आलेल्या आपत्तीचे दर्शन समाजहितैषी भावनेनेच घडवितात. यंत्रयुगाने औद्योगिक क्षेत्रात होणारे बदल स्वागतार्ह असले तरी त्यांच्या आगमनाने उद्ध्वस्त होणाऱ्या समाजाला पर्यायी आर्थिक सुविधा उपलब्ध झाल्या पाहिजेत याची जाणीव ते कळकळीने करून देतात. भांबावलेल्या, अगतिक, भयभूत समाजाचे तीव्रतर जीवनचित्र आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. आपल्याला अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य त्यांच्या विचारमांडणीत व शैलीत आहे. त्यांचा माणुसकीचा गहिवर शबल नाही, तर सबल आहे.

कर्मयोग आचरिलेला ज्ञानयोगी निबंधकार म्हणजे विनोबाजी. ' सर्वोदय ' ही त्यांच्या विचारांची बैठक होती. धर्मविषयक चिंतनातूनच विशुद्ध तत्त्वचिंतकाची प्रणाली आत्मसात केलेली. भूदान या अभिनव चळवळीचे प्रवर्तक. ' विनोबांचे निबंध हे जणू काही विसाव्या शतकातल्या एखाद्या संताचे गद्य अभंगच आहेत... त्यांची जी निबंधवजा प्रवचने नित्य होत असतात त्यांचा उगम साहित्यप्रेमात नाही तो समाजप्रेमात आहे. ज्योतिराव किंवा लोकहितवादी यांच्यासारखीच त्यांच्या मनाची बैठक आहे. पण त्यांच्यापुढचे प्रश्न विशाल, त्यांचे तत्त्वज्ञान व्यापक व त्यांची वाणी उपनिषदे आणि ज्ञानदेवी यांच्या संस्कारांनी प्रभावित झालेली आहे. ' सृष्टी आपल्याला सतत काही ना काही देत असते. उपनिषदांनी गायिले आहे की सृष्टी आनंदातून निर्माण होते व आनंदात लय पावते. पण आज जे चालले आहे ते कृत्रिम व सृष्टीशी विपरीत आहे. आपण आनंदप्राप्तीसाठी नव्हे तर आनंदाच्या शुद्धीसाठी प्रयत्न केला पाहिजे, युग आम्हाला आकार देत नाही, तर युगाला आकार देणारे आम्ही काळपुरुष आहोत. युग मातीसारखे आपल्या हातात असते. ' इच्छाल तसा आकार देऊ शकता. ' असे विशुद्ध विचारप्रवर्तक चिंतन सश्रद्धपणे व सप्रमाण त्यांनी ' आम्ही युग बनविणारे आहोत ' या लेखात प्रकट केले आहे.

समाजशास्त्र व मानवंशशास्त्राच्या अभ्यासिका इरावती कर्वे यांच्या

ललित निबंधांनी मराठी गद्याला आशय आणि आविष्कार याबाबतीत विलोभनीय रूप लाभले आहे. मानवी जीवनातील अनेक गुंतागुंतीच्या समस्यांची उकल सहृदयतेने त्यांनी केली आहे. त्यांच्या लेखातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व्यक्त झालेले प्रसन्नपण मोठे हृद्य असते. त्यांच्या विषयाशी एकरूप झालेल्या मनाचे संमिश्र रंग खूपच मोहक वाटतात. घटना आणि त्यांचे विविधांगी चिंतन ' वाटचाल ' या ललित निबंधात अनुभवायला मिळते. सारा महाराष्ट्र पंढरीच्या वाटेवर भेटतो, रमतो, रंगतो, दंग होतो. या त्यांच्या घडविलेल्या वाटचालीचे रंगचित्र वेधक तर आहेच. शिवाय लेखिकेच्या मनातील उमटलेले विविध तरंग रम्य वाटतात. वाटचालीत चिकित्सक बनलेले, संस्कृतीच्या परंपरेचे स्मरण करणारे, तार्किकता नि वास्तवता यांनी चकित झालेले, हरिनामाच्या गजरात सारेच विरघळत जाऊन प्रसन्न बनवणारे मन, परमेश्वराच्या अस्तित्वावरचाच विश्वास उडवू पाहणारे मन ' धर्म ही वास्तवता विसरण्याची अफू आहे ' या उद्‌गाराच्या रिंगणात येऊन मिसळते. ' अखेर श्रमल्या पायांनी, भरलेल्या अंतःकरणाने नि वाहत्या डोळ्यांनी पंढरीच्या वेशीत पावले पडली ! ' असे या दिंडीतल्या संस्कृतीचे अद्‌भुतरम्य भावपूर्ण चित्र अंतःकरणात हळुवारपणे पारदर्शी बनत जाते. विश्वात्म बनलेली हुरहूर डोळ्यांच्या कडांवर उभी असते. हा हृदयंगम काव्यमयतेचा सहज सुंदर आविष्कार आपल्या अंतश्चक्षूंपुढे अवघी वाटचाल उभी करतो.

अलीकडील मराठी वैचारिक साहित्याचा मानबिंदू म्हणजे डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे. ऐहिक उत्कर्षासाठी प्रवृत्तिमार्गाचा निखळ नि निर्भरपणे अवलंब केला पाहिजे हे त्यांच्या विचारधारेचे बलधारी सूत्र आहे. ' नरोटी उपासना ' या लेखात समाजाच्या जडवादी स्वरूपावर टीका केली आहे. फोल, निरर्थक बाह्यरूपाची उपासना म्हणजे नरोटीची उपासना आणि अशा उपासनेच्या आहारी जो समाज जातो त्याचा नाश हा अटळ असतो असा रोकडा निष्कर्ष लेखकाने काढलेला आहे. सोदाहरण विलक्षण आणि मूर्तिभंजन यातील आवेशाने मात्र निबंधाला तर्कदुष्टता मुळीच स्पर्श करू शकत नाही. गंभीरतेलाही एक शैलीची मोहकता प्राप्त झाली आहे.

महाराष्ट्रातील अव्वल दर्जाचे विचारवंत व तत्त्वज्ञ यांची तेजस्वी परंपरा श्रद्धापूर्वक जीवननिष्ठेने चालविणारे प्रा. गं. बा. सरदार हे अलीकडच्या काळातील बड्या परिवर्तनाचे अग्रणी सरदार ठरतात. त्यांनी आपल्या

साहित्यातून नव्या विचारांचे व विधायक कार्याचे प्रवक्तेपण करून समाजमन सर्व पातळीवर संयमी व समतोल बनविले. आतापर्यंत दडपल्या गेलेल्या खालच्या स्तरातील लोकजीवनाबद्दल त्यांना विशेष आस्था होती. त्यांच्यातील पराधीनतेची, न्यूनगंडाची भावना झटकून टाकण्यासाठी आपला वाग्यज्ञ खेड्यापाड्यापर्यंत, जंगला-आदिवासीपर्यंत नेऊन पोचविला. त्यांच्यातील अस्मितेला जागे केले. प्रवाही, प्रभावी, प्रत्ययकारी वाणीने लोकशिक्षणाचा लोकजागर घडविला. त्यासाठी विचारप्रवर्तक निखाणावरच त्यांचा भर होता. लोकशिक्षण म्हणजे लोकानुनय नव्हे हे ते जाणून होते. विराटशक्तीला आवाहन करून प्रबोधन घडविणे त्यांच्या लेखनाचे कार्य होते. याचा अनुभव ' उद्याचा इतिहास आम्ही निर्माण करणार ' या लेखातही येतो. सामाजिक समतेची पथ्ये पाळून व्रतस्थ वृत्तीने सामाजिक उत्थान घडविले पाहिजे, हा विचार त्यांनी स्पष्ट ठोस शब्दात व्यक्त केलेला आहे. समाजाच्या वेगवेगळ्या थरांतील लोक जागृत होऊ लागले आहेत, तेच उद्याच्या इतिहासाचे शिल्पकार ठरतील असा विश्वास त्यांना वाटतो. पण महापुरुषवादाचे स्तोम अवास्तव माजवू नये असा धोक्याचा सावध इशाराही त्यांनी दिलेला आहे.

राजकारणात संतुलित व नवप्रेरक बांधणीच्या सहजतेने रमलेले, समाजधारणेच्या चिंतनात सतत मग्न असणारे, नवजीवनात जागरूक, कृतिशील, वृद्धी निर्माण करण्यात व्यग्र असणारे राजधुरंधर, पुरोगामी विचारवंत साहित्यिक यशवंतरावजी चव्हाण सर्वांचे ' दुरित ' जावे यासाठी सतत विचार पेरत राहिले. राजकारणी, समाजकारणी, सर्जनशील लेखक या नात्याने सामाजिक विधायक वृत्तीचे पोषण करीत गेले. समंजस, सुजाण, सुसंस्कारित, तरीही समाजाच्या अभ्युदयासाठी चिंतनरत असलेल्या या संपन्न व्यक्तिमत्त्वाचा उद्‌गार हा नव्या पिढीसंबंधीच्या थोड्याफार चिंतेचाच होता.

' अमृताचे कुंभ ' यातील त्यांचे लक्ष्यवेधी सूचन कोणते होते हे चटकन ध्यानात येते. विद्यापीठातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या नव्या पिढीला नव्या संघर्षाचे स्वरूप समजून घ्यायला तळमळीने सांगतात. तसेच कर्तव्यातील ऋजुताही बोलून दाखवितात. ' ज्या समाजाने आपल्या कल्याणासाठी या ज्ञानगंगा उघडल्या त्या समाजाचेही थोडेफार ऋण फेडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने निर्माण झाली पाहिजे '.

युवकांना विज्ञाननिष्ठ बनण्याला सांगतात. पण त्यांच्या व्यासंगाने

' विज्ञानाच्या प्रगतीतून निर्माण झालेल्या संकटांच्या सावल्याही ' ओळखण्याची क्षमता वाढविली पाहिजे असा विचार अनुभवसिद्ध उत्कट जाणिवेने देतात. ' नवे अमृतकुंभ शोधून काढा, जे शोधून सापडणार नाहीत, ते निर्माण करा. अशा निर्माणक्षम संसूचनांची प्रेरणा बीजभूत करतात. सामाजिक पुनरुत्थानाचा हा मंगलकलश नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचा ध्यास त्यांच्या अंतिम श्वासापर्यंत त्यांना लागून होता.

अभिजात वाङ्मयाचे अभ्यासक, म. गांधीजींच्या विचारप्रवाहाचे प्रणेते, महाराष्ट्र संस्कृतीचे प्रवक्ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वैचारिक समग्र परिवर्तनासाठी सामाजिक मनाची भूमी ' शुभदा ' व ' शुचिर्भूत ' करण्यासाठी लेखणी-वाणीचे अग्निहोत्र अविश्रांतपणे चालविलेले आहे. ' शुभं करोति कल्याणम् ' चे कालानुरूप भाष्य करीत, लोककल्याणी समाजपरिवर्तनामध्ये अग्रणी राहून ज्ञानसत्राचे मुक्तांगण सर्वांच्या वेदीपर्यंत पोचवण्याचे कार्य त्यांनी निर्मम मनस्वीपणाने केले आहे. तळागाळातल्या लोक-जागराने ते तुष्ट होतात. आधुनिक संस्कृती, साहित्याचे हे उद्‌गाते ' परिवर्तन ' या भाषणामध्ये दलित- उपेक्षितांच्या भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथनपर साहित्याचा गौरव करतात. भारतीय जातिसंस्थेसारखी समाजरचना जगात कोठेही नाही. ती उद्‌ध्वस्त होईल असा आशावादी विश्वास व्यक्त केला आहे. समाजपरिवर्तनाची प्रेरणा मराठी साहित्यामध्ये वारंवार उत्कटरूपाने आणि भव्यरूपाने आविष्कृत झाली आहे. काही जमातींतील जात पंचायती मोडण्यासाठी नवे आंदोलन उभारले पाहिजे. त्या आंदोलनाची प्रेरणा त्या नव्या साहित्यातून मिळू शकेल असे आल्हाददायक व उत्साहवर्धक सामाजिक चित्र त्यांनी उभे केले आहे. तर्कतीर्थांनी प्रकाशपूजेची अखंड साधना केलेली आहे. त्याचे हे जणू पसायदानी चित्रच आहे. अशा रीतीने महाराष्ट्रातील विचारवंतांच्या गद्यवाङ्मयाचा महाराष्ट्रातील सामाजिक विचारमंथन या अनुषंगानेही विचार केला. जीवनाच्या सर्वांगांना स्पर्श करणाऱ्या सर्वच लेखांतून सामाजिक परिवर्तन, संस्कृतिवर्धन, ज्ञानवर्धन आणि सत्त्वशील अभ्युदय हेच अपेक्षित आहे.

आज समाजाच्या घरोघरी ज्ञानाचे दिवे लागले आहेत. घराघरांत विज्ञान पाणी भरीत आहे. हवासुद्धा माणसाच्या मर्जीप्रमाणे श्वास घेत आहे. परस्परांच्या अवयवांची आरोपणे होत आहेत. काळजाचे कलम तर किमयेच्या

पलीकडे गेले आहे. शास्त्रज्ञांनी तर मानवी मनाला वाटेल तसा आकार देऊ असे आव्हानही दिले आहे. माणसाचे हात आकाशातल्या सूर्यचंद्राला खुडून घेण्यासाठी पोचले आहेत. आता स्वर्ग तीन बोटांवर उरला असून अल्सेशियन कुत्र्याच्या जोडीला घरातच डांबून टाकलेला आहे. अशीही शास्त्रप्रगती अद्‌भुत, विस्मयजनक, क्रान्तिकारक रूप घेऊन अवतरली आहे. पण माणूस सुखी आहे का असा कूटप्रश्न भयकारी रूपाने छळू लागला आहे. उलट एक भयानक भयसंस्कृती पिशाच्चासारखी आपल्या मानगुटीवर बसली आहे. संहारास्त्रे हातात घेऊन जगातील पुढारलेले देश निराळ्या पवित्र्यात उभे आहेत.

शिक्षणाने भावनांचा विकास, बुद्धीचा विकास, प्रज्ञापरिपोष, आणि आत्मिक गुणांची वृद्धी करावयाची असते. पण आज दिसणारे चित्र आहे ते खेदकारक आहे. शास्त्राची प्रगती झाली पण मानवाची झाली का हा भेडसावणारा प्रश्न आहे. सारी किमयागारी करणाऱ्या माणसाच्या ओल्या पावलाखालच्या ओल्या मातीचा जिव्हाळा तो केव्हाच विसरला आहे. पाय मातीपासून सुटले आहेत. जग जिंकण्यासाठी सूर्य बुडायच्या आधी नजरेपलीकडच्या क्षितिजाला हात टेकवण्याचा भ्रम त्याच्या मेंदूत रिवरिवतो आहे. अतिरेकी अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार हेच त्याच्या आत्मकेंद्रित संकुचित स्वार्थी अनीतीचे फलित आहे. अशांत, बेचैन, अस्वस्थ समाजाला ' भ्रष्ट्रोच्छिष्टं जगत् सर्वम् ' सर्वत्र भासते आहे.

या काळात समाजभंजनासाठी, प्रभंजनासाठी व अंजनासाठी वैचारिक साहित्याची नितांत गरज आहे. भौतिकतेचे प्रमत्तपण लाभले असले तरी समाजातील आत्मिक गुणांचे, विचारांचे, मुद्द्यांचे दारिद्र्य शेवटी समाजाच्या पदरात दैन्याचे दानच टाकत असते. म्हणून आज निरोगी जीवनाचे दिग्दर्शन करणाऱ्या अशा वैचारिक लेखनाचे वाङ्मय नव्या पिढीपुढे येणे अगत्याचे वाटते.

□ □ □

२

मराठी नाट्याचे पूर्वरंग

१८१८ साल आपल्या हातात साखळदंड घेऊनच उजाडले. डागाळलेली मराठेशाही पूर्ण अस्ताला गेली. इंग्रजी निशाण उभारले गेले आणि साऱ्या भारतभर यक्षिणीची कांडी फिरली गेली. आंग्लपूर्व सुसंस्कृत भारतीय जीवन आंग्लकाळात इंग्लिश मुलाम्याने सोन्याहून पिवळे झाले. सगळे समाजजीवन अनेक गोष्टींनी बदलू लागले. शिक्षण, वाङ्मय इंग्रजी वेषात आपल्यापुढे ठाकले. आचारविचार इंग्लिशमय बनू लागले. इंग्रजी विचारसरणीचा पगडा भारतीय सुशिक्षितांवर बसला. चांगले काही असेल तर इंग्रजी अशी छाप भारतीयांवर पडली. त्यांच्या अनेक गोष्टी आपल्या भारतात आल्या. चांगल्या तसेच वाईट. सुष्टाबरोबरच दुष्ट. नवसुशिक्षित तरुणच स्वतः इंग्रज बनण्याची फसवी इर्षा बाळगू लागला. अभावितपणे त्यांच्या गोष्टी उचलू लागला. अंगिकारू लागला. आपल्या समाजजीवनात अनेक गोष्टी सामावल्या गेल्या. त्यांच्यातील खोटा वाणसुद्धा आपल्याकडे खपू लागला. त्याचबरोबर चांगलाही हाताशी लागला. सर्व क्षेत्रांत इंग्रजी संस्कृती, शिक्षण, आचार, विचार याचा शिरकाव झाला. तशी वाङ्मयातही स्थित्यंतरे झाली. त्याचबरोबर नाट्यकला ही मूळची मराठीतीलच आहे. आंग्लपूर्वकालातच तिचा उद्गम

झाला असून अव्वल इंग्रजी अमदानीतही ती आपला टिकाव धरून होती. वाढत होती. इंग्रजी नाट्यकलेतील अनेक गुण आत्मसात करून परिपूर्ण होत होती.

नाटके करण्याची प्रथा महाराष्ट्रात सहाशे वर्षांपूर्वीपासूनची असावी, असा अंदाज करता येत आहे. कारण संतशिरोमणी ज्ञानेश्वर, तुकाराम इ. संतांच्या साहित्यात अभंगवाणीत यासंबंधीचे उल्लेख सापडतात. 'काव्यनाटकाचा' उल्लेख ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानदेवीत आदरपूर्वक केला आहे. तुकारामाने आपल्या अभंगवाणीत ' स्त्रीचे सोंग घेणाऱ्या नटाचे तोंड पाहू नये, ' असे तिरस्कारयुक्त बोल काढले आहेत. रामदासांनीही 'कर्नाटक'ची व्युत्पत्ती लावताना नाटकाचा संबंध जोडला आहे. काव्यालंकृत कवी मोरोपंत यानेही नटाचे तोंड पाहणे यावर अशिष्टतेचा आरोप केला आहे. जगन्मान्य व उच्चतम असे संस्कृतातले नाट्यवाङ्मय आपल्यासमोर असतानाही या भक्तश्रेष्ठांनी नाट्यवाङ्मय उपेक्षिले. त्यामुळे नाट्यवाङ्मयाकडे दुर्लक्ष झाल्याने मराठी साहित्यात त्याची वाढ व विकास झाला नाही. किंबहुना प्राचीन मराठी वाङ्मय नाट्यकलेपासून पूर्णतः अलिप्त राहिले.

नाट्याचा उगम हा पूर्वापार मनुष्यस्वभावात असल्याचे दिसून येते. आणि नाट्यकला ही मानवाने आपल्या मनोरंजनाकरिता किंवा जीवितसाफल्याकरिता जे अनेकविध विधी निर्माण केले आहेत, त्यामध्ये अंशतः तरी समाविष्ट झालेली आहे.

लळिते, तमाशे, गोंधळ, भारूड, बहुरूप्याची सोंगे, गोपाळकाला, दशावतारी खेळ इ. प्रकारात नाट्यकला गौणत्वाने का होईना पण अंतर्भूत झालेली दिसून येते. यांना स्वतंत्र नाट्यप्रकार मानण्याइतके स्थान जरी नाट्यकलेत नसले तरी पण यातूनच नाट्यकलेचे विकसन होत गेलेले प्रत्ययास येते. त्या दृष्टीने यांना नाट्यकलेची पूर्वरूपे मानायला कोणतीच हरकत येईल, असे वाटत नाही. ज्ञानेश्वरांच्या काळापासून पेशवाईच्या अखेरीपर्यंत आणि नंतरही या प्रकारांनी लोकांचे रंजन केले. विष्णुदास भाव्यांपासून जी पौराणिक नाटकांची चाल प्रचलित झाली, त्याचा पाया या पूर्वरूपांनी अर्थात विशेषतः लळितांनीच घातला.

देवाच्या स्तवनाने सुरू होणारी आणि रावणवधाने बंद होणारी लळिते व कलाधिपती गणपतीच्या स्तवनाने आरंभ होणारी व रावणवधानेच इतिश्री

पावणारी पुढील कालातील पौराणिक नाटके यांच्यातील हे साम्य पाहिले म्हणजे आपल्या लक्षात येते.

आपल्याला उपलब्ध असलेल्या मराठी नाटकात अगदी आद्य नाटक म्हणून ' लक्ष्मीनारायण ' या नाटकास प्रथमस्थान आहे. इतिहाससंशोधक कै. वि. का. राजवाडे यांना तंजावर येथील रामदासी मठात इ. स. १६९० च्या सुमारास लिहिल्या गेलेल्या ' लक्ष्मीनारायण कल्याण ' या नाटकाची पोथी सापडली. ' महाराष्ट्र सारस्वतकार ' वि. ल. भावे यांनी आपल्या या ग्रंथात तंजावर येथील सरस्वती महालात तेथील राजांनी रचलेली नाटके आहेत, असा स्पष्ट उल्लेख केला आहे. छ. शिवरायांचा सावत्रभाऊ व्यंकोजी याने तंजावर येथे आपली गादी स्थापन केली आणि परंपरेने ती चालविली गेली. या परंपरेतील राजाच्या काळात इतर सर्व कलांबरोबर साहित्यकलेचा उत्कर्ष झाला हे सर्वमान्य आहे. राजेच विद्वान व कलावान असल्याने साहजिकच नाट्यकलेला उत्तेजन मिळाले. त्यांच्या ठिकाणी असलेली कलाप्रीती नाट्यरचनेच्या रूपाने प्रगट झाली. आधीच विद्वान, त्यात रसिकता जोडीला मिळाल्याने व दक्षिणेतील तत्कालिन नाट्यकलेच्या प्रेरणेमुळे त्यांनी आपल्या मातृभाषेत नाट्यरचना केली. राज्यसंस्थापक व्यंकोजीचा मुलगा शहाजी हा मराठी नाटके लिहिणारा पहिला राजा होय. त्यांनी सुमारे चोवीस नाटके लिहिली असावीत, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

' लक्ष्मीनारायण कल्याण ' नाटकातील शब्द, वाक्ये पाहिली तर त्यावर कानडी व तेलगू भाषेचा परिणाम झालेला दिसून येतो. तिकडे चाललेल्या नाटकांना ' यक्षगान ' किंवा ' भागवतमेल ' या नावाने संबोधित असत. त्यापासून त्यांना प्रेरणा मिळून नाट्यरचनेस ते प्रवृत्त झाले. ' लक्ष्मीनारायण कल्याण ' नाटकात अप्सरांचे नृत्य व जेठ्यांचा तमाशा यांचा उपयोग केला आहे. तंजावरकडे पूर्वीपासूनच नृत्यकलेला उत्तेजन असल्याने वरील गोष्टींचा केलेला समावेश औचित्यपूर्ण असाच आहे. परंतु ' भागवतमेल ' अथवा ' यक्षगान ' ही नाटके डोळ्यांपुढे ठेवून जरी या तंजावरीय लेखकांनी नाटके लिहिली असली, तरी त्यांचे हुबेहूब अनुकरण न करता संस्कृत नाटकांच्या अनुकरणाने त्यांत यथोचित असे फरक घडवून आणले. यक्षगानातील ' भागवत ' ला भोसले राजे ' सूत्रधार ' असे नामाभिधान करतात. ' कंचुकी ' हे संस्कृत नाटकातून घेतलेले नाव याची साक्ष देते. नाटकाची

कथानकेही स्वतःच्या कल्पनेने स्वतंत्र अशी लिहिली. ' यक्षगानातील ' नृत्यप्रधानता कमी करून त्याऐवजी कलात्मता वाढविली व नाट्यरचना संस्कृत नाटकांच्या धर्तीवर नेली. कल्पनारम्य कथानके, सहजरम्य भाषा, नयनरम्य नृत्यात्मकता, काव्यरम्य पदे या सर्वांचा विकास या आद्य मराठी नाटकांत आपणास आढळून येतो.

पण दुर्दैव असे की, इतकी कलात्मकता या नाटकातून असूनसुद्धा या मराठी नाट्यप्रयोगांचे अंकुर रुजले गेले नाहीत. मराठी नाट्य हे जनता नाट्य म्हणून न जन्मता दरबारी नाट्य म्हणून जन्मले यातच त्याच्या प्रसाराला आळा बसला. मराठी मुलूख दूर, मराठी भाषिक जनता कमी आणि मराठी भाषेचा परिचय अल्पसा त्यामुळे या नाटकांचा प्रसार तसा झाला नाही.

कालदृष्ट्या ' लक्ष्मीनारायण कल्याण ' हे जुने नाटक असले तर आद्य नाटककाराचा मान कै. विष्णु अमृत भावे यांच्याकडे जातो. सांगली दरबारी असलेल्या या गृहस्थांनी इ. स. १८४३ ला ' सीता स्वयंवर ' नावाचे नाटक कर्नाटकी दशावतारी ' भागवतमेल ' खेळाच्या पद्धतीवर लिहिले. १८४२ साली उत्तर कानडा प्रांतातील ' भागवत ' नावाची दशावतारी खेळ करणारी मंडळी सांगलीस आली व तिने आपले काही खेळ तेथे केले. ते सांगली संस्थानाधिपती श्रीमंत चिंतामणराव आप्पासाहेब पटवर्धन व त्यांचे आश्रित वि. अ. भावे यांना फार आवडले. हे ' भागवत ' जो नाट्यप्रयोग करीत त्यायोगे पौराणिक आख्यानांचे या पात्रांच्या साहाय्याने नृत्यात्मक दर्शन घडवीत. प्रथम भागवत रंगमंचावर साथीदारांसह येऊन गणपती, सरस्वतीचे स्तवन करी. नंतर त्यांचे आख्यानाची रचलेली गाणी म्हणत राहावयाचे. त्यानुसार प्रत्येक पात्र नाचत नाचत येई व भावप्रकटनाचे कार्य विशेषतः नृत्याने करी.

हा नाट्यप्रकार संस्थानिकांना आवडल्यावर दरबारात अशी मराठी नाटके करावीत या हेतूने इष्ट तो फरक करून, उचित अशी सुधारणा करून या प्रकारचे नाटक मराठीत लिहून प्रयोग करण्यास कै. भाव्यांना सांगितले.

विष्णुपंत भाव्यांच्या मनाने अशी नाटक मंडळी काढण्याचा ध्यास आधीच घेतलेला. संस्थानाधिपतींचा पाठिंबा व सहकार्य लाभल्यावर कलाकुशल कै. विष्णुपंतांनी ' सीता स्वयंवर ' आख्यानाचा पहिला प्रयोग १८४३ साली सांगली दरबारात करून दाखविला, नाट्यकला कानडीच्या उदाहरणाने विष्णुदासाने सुरू केली आणि पहिले ' सीता स्वयंवर ' हे पौराणिक नाटक

लिहून नाट्याचा पाया घातला.

या प्रारंभीच्या नाटकाकडे थोडे निरखून पाहिले तर अनेक प्रथमावस्थेतील गोष्टी आढळून येतात. मराठीत पहिली नाटके अवतरली ती ग्रंथरूपाने न अवतरता, लळिते, तमाशा यांच्याप्रमाणेच प्रयोगरूपाने संपूर्ण नाटक लिहिण्याची त्या काळी कुणाला आवश्यकताच भासली नसावी. कारण पौराणिक आख्याने सर्वांच्या परिचयाची असल्याने लिहिण्याची गरज उरत नसे. विष्णुदासांची जी नाटके होती त्यांची फक्त पदेच तयार असत. विष्णुपंतांची व त्यांच्या समकालीन नाटकांची घडण पुढीलप्रमाणे होती.

नाटकाच्या आरंभी सूत्रधार मंगलाचरणाचे ' स्वां सृष्टिः स्रष्टुराधा वहति विधिहुतं या हविर्याच होत्री ' यासारखे एकदोन श्लोक म्हणत असे. नंतर गणपती किंवा शंकर यांच्या आगमनासंबंधी पदे म्हटली जात. पद संपते आहे न संपते आहे तोच गणपतिरायाचे आगमन होई. नंतर सरस्वतीला आवाहन केले जाई. सरस्वती मोरावर बसून प्रगट होई. नंतर गंधर्वांची गाणी होत. मग मुख्य नाटकाला आरंभ. सूत्रधाराचे एकेक पद ऐकून बाकीच्या पात्रांनी त्यानुसार कृती, अभिनय करावयाचा. देवांची कचेरी वेगळी, राक्षसांचा ताफा वेगळा. याप्रमाणे विष्णुदासी नाटकांची जडणघडण असे.

कर्नाटकी नाट्यावरून भावेप्रणित नाट्यप्रकार आकाराला आला. त्याने ' भागवत ' खेळाचे जसे अनुकरण केले तसेच त्यामध्ये महाराष्ट्रीय समाजाला रुचेल, आवडेल असा यथोचित फरक करून मराठी नाट्य जन्मास घातले. त्या दृष्टीने कर्नाटक नाटक व विष्णुदासी नाटक यांमधील साम्य व विरोध पाहणे उपयुक्त ठरेल. प्रथम विष्णुदासी नाट्य अनुकरणातून जन्माला आल्याने त्यामध्ये बहुतांशी पूर्वकालीन कृतीतील साम्यता आढळून येणे आवश्यक आहे.

मंगलाचरण जसे कानडी आख्यानपर नाटकात होते, तसेच विष्णुदासी मराठी नाटकातही होते. कानडी भागवत नाटकांत ज्याप्रमाणे मुख्य पात्र ' भागवतार ' तसाच विष्णुदासी नाटकात ' सूत्रधार. ' भागवत आख्यान नाटकात सर्व आख्यान पद्याच्या रूपाने ' भागवतार ' निवेदन करी, त्याचप्रमाणे मराठी नाटकात सूत्रधार आपल्या साथीदारांच्या ताफ्यासह रंगमंचावर हजर राहून कथाभाग गाण्याच्या रूपाने सादर करीत असे. कानडी नाटकांत शेवटी आरती होऊन खेळ संपे. तीच पद्धत मराठी नाटकांची. रामायण, महाभारत,

भागवत इ. पुराणग्रंथांतील एखादे आख्यान निवडून नाट्याची सारी उभारणी होई. या सर्व गोष्टी पाहिल्या तर कानडी नाट्याच्या अनुकरणावरून विष्णुदासी पौराणिक नाटक जन्माला आले या म्हणण्याला अधिकच पुष्टी मिळते. पण केवळ सही सही अस्सल नक्कल न करता कलात्मकदृष्ट्या त्यात फेरफाराचा हात फिरवून मराठी समाजानुसार नवीन काही आणण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आढळतो.

कानडी नाटकांत गणपती, सरस्वतीचे प्रत्यक्ष आगमन रंगपीठावर होत असल्याच्या सूचना नाहीत. परंतु सांगलीच्या परिसराचे आराध्यदैवत गणपती त्याला प्रत्यक्ष रंगपीठावर आणण्याची नवीनता मराठी नाटकांत विष्णुदासांनी केली.

विष्णुदासांनी आणखी एक महत्त्वाच्या गोष्टीसंबंधी नाट्यतंत्र चांगले हाताळल्याचा अनुभव येतो. कानडी नाटक हे एक प्रवेशी असे, परंतु भाव्यांनी यात सुधारणा केली व नाटकाची रचना अनेक प्रवेशी केली. नाटक प्रवेशामध्ये सुटसुटीतपणा आणला. नाट्याची परिणामकारकता साधली गेली. पात्राचे येणे-जाणे यथोचित व सुसंबद्ध असे केले. दाक्षिणात्य प्रदेशांत नृत्याला फारच महत्त्व आहे. अर्थातच भावप्रकटीकरण करतानासुद्धा नाटकात नृत्याला प्राधान्य दिले गेले होते. सर्व आख्यानच्या आख्यान नृत्यद्वारा प्रकट केले जाई. परंतु ही नृत्यात्मकता महाराष्ट्र संस्कृतीला, परंपरेला व अभिरुचीला मानवणारी नव्हती. म्हणून नृत्यप्रधान नाट्य मराठीमध्ये शब्दप्रधान केले गेले.

विष्णुदासांनी रचलेल्या केलेल्या आख्यानाचे स्वरूप पाहिले तर ते काव्य-पद्यप्रधान होते हे निःसंशय सत्य आहे. त्यांच्या नंतरच्या काही नाटककारांनीही आपली सर्व नाट्यरचना गानानुकूल पद्यप्रधान अशी केलेली आढळते. कारण गद्यापेक्षा पद्यातून भावदर्शन अधिकच परिणामकारक होते. याशिवाय या नाटककारांच्या समोर काव्यप्रधान संस्कृत नाटकांचा आदर्श होता. परंतु या संगीतमय नाटकांचा डोळ्यात भरणारा मोठा दोष म्हणजे नाटकातील पदे गायचा सर्व मक्ता एकट्यादुकट्या सूत्रधाराकडे असे. सूत्रधार पदे म्हणत असता ती ती पात्रे अभिनयांनी भावप्रकटीकरण करीत असत. सूत्रधाराचे गायन बहुतांशी हरिदास व कीर्तनकार यांच्या धर्तीचे होते. देवादिकांसंबंधी जी गाणी असत त्यांच्या चाली साक्या, दिंड्या, कामदा अशा गानानुकूल वृत्तांच्या चाली, यांचा वापर आधिक्याने केला जात असे. काही

काही वेळा रागदारीचाही अवलंब केला जाई. गायनाला साथ देण्यासाठी प्रचलित अशी वीणा, मृदंग, टाळ अशी वाद्ये वापरली जात असत.

अशा तऱ्हेचा हा होता विष्णुदास पद्धतीचा नाट्यावतार व नाट्यसंसार. विष्णुदासाने आपल्या नाटकांसाठी पौराणिक कथाभाग निवडून तत्कालीन रसिकमनाची चांगलीच पकड घेतली होती. संस्कृत सारस्वतामध्ये संपूर्णतः रामायण, महाभारत इ. पौराणिक ग्रंथांतील कथाभागावर व व्यक्तिवैचित्र्यावर सारी गुंफण केली होती. तसेच कानडी नाट्याचाही तोच आदर्श पत्करून व त्या वेळी पौराणिक आख्याने लोकांना प्रिय होती हे जाणून विष्णुदासांनी आपल्याही नाट्यासाठी पौराणिक कथाभाग निवडला. मराठी नाट्यवाङ्मय अगदीच बाल्यावस्थेत असल्याकारणाने स्वाभाविकच अद्‌भुतरम्यतेला विशेष प्राधान्य दिलेले होते. आजचे मराठी नाट्य अनेक स्थित्यंतरांतून विकसित झाल्याने त्यात वास्तवता, सहजता, मानवता यांचे दिग्दर्शन होत असलेले आढळते. परंतु या त्रिमूल्यांचा अवास्तव असा वापर होत गेल्याने व जाणीवपूर्वक त्याचे निबंधन न केल्याने नाट्यतंत्रात प्रथमपासूनच ओबडधोबडपणा व विसंगती याचे प्राबल्य वाढू लागले. अद्‌भुत सामर्थ्याचे देव, विराट पराक्रमी राजे, आकांडतांडव करणारे चित्रविचित्र राक्षस हे सर्व अतिमानवकोटीतले परंतु यांच्या जोडीला विदूषक हा मानव प्राणी मानवी पातळीवरून हास्याची खसखस पिकविण्याचा खटाटोप करीत असे. पौराणिक नाट्याला येथेच विसंगतीचे गालबोट लागले होते. त्यामुळे नाट्यातील अतिमहत्त्वाचे मूल्य जे एकात्मता त्याला फाटा दिला गेला होता. अस्वाभाविकता वाढीस लागली होती.

प्रारंभीच्या या नाटकांमधून खऱ्या नाट्यतंत्राचे विकसित स्वरूप नसले तरी पण १५० वर्षे अजिबात बंद पडलेल्या नाट्यकलेला पुनर्जीवन देऊन तिचा प्रसार प्रयोगप्रधान नाटकांद्वारा अखिल महाराष्ट्रात झाला. सर्वत्र आत्मविश्वासाने सर्व महाराष्ट्रभर नाट्याभिरुची वाढवून विष्णुदासाने नाट्यवाङ्मयाच्या जनकत्वाचा मान पटकावला. वाङ्मयाच्या दृष्टीने वरच्या दर्जाचे नाटक त्यांच्या लेखणीतून उतरले नसले तरी त्यांची ही पूर्वसेवा पुढील नाट्य उधाणाला निःसंशय कारणीभूत झाली. दुर्लक्षित झालेल्या नाट्याला मानबिंदू प्राप्त करून दिल्यामुळे तोच कित्ता गिरवून अनेक पौराणिक नाटक मंडळ्या कार्यतत्पर झाल्या. रंगभूमीचा त्याचबरोबर संगीत वाङ्मयाचा पाया

मजबूत घालण्याचे सर्व श्रेय या पूर्वकलारूपांना व नाट्यमंडळी यांनाच देणे आवश्यक आहे.

उत्तमोत्तम नटाद्वारा उच्च दर्जाची नाटके रंगभूमीवर आणण्याचे त्यांना आत्मकेंद्रित्वामुळे जमले नसेल, प्रगत नाट्यतंत्र हाताळून श्रेष्ठ प्रतीची नाटके निर्मित करणे त्यांना शक्य झाले नसेल, तरीपण महाराष्ट्रात पूर्णपणे बंद झालेल्या व अचेतन रूप प्राप्त झालेल्या नाट्यकलेला नवचैतन्य देऊन जिच्याकडे तात्कालीन लोक अवहेलनेच्या दृष्टीने टवकारून पाहात त्या कलेला विष्णुदासांसारख्या एका नटाने उद्धरून उत्कर्षाप्रत नेण्याचा मजबूत पाया घातला.

कै. विष्णुदासाचेच नाट्यतंत्र पत्करून हरिश्चंद्र-आख्यान, बभ्रुवाहन आख्यान, कच देवयानी, इंद्रजितवध, रावणवध, वामन अवतार, शकुंतला, कीचकवध यासारख्या पौराणिक आख्यानांवर नाटकाची अलिखित संविधानके उभारून अनेक नाटक मंडळ्या नाटके करत्या झाल्या. फक्त पद्य भागातच सविधानक गुंफून नाट्याची उभारणी होत असे. १८४३ पासून जवळजवळ १८९६ पर्यंत या पौराणिक नाटक मंडळ्या आपापल्या परी रंगभूमीच्या व मराठी नाटकाच्या निर्माणक्षमतेला व विकासाला हातभार लावीत होत्या. परंतु नाट्य-मूल्यांच्या दृष्टीने ती सारी अजाणता होणारी नाट्यसेवा अविकसित होती, तशीच अलिखित होती. ग्रांथिकरूप तिला दिले गेले नव्हते. नाट्यवाङ्मयाच्या बाल्यावस्थेच्या दृष्टिकोणातून पाहिले, तर सुसंबद्ध संविधानक, स्वभावरेखाटन, पात्रवैशिष्ट्यांनुसार यशोचित संवाद यांचा अभाव दिसून येणारच.

कोणत्याही गोष्टीचा एक वेळ उगम झाला की, स्वाभाविकच तिची हळूहळू वाढ, अनुरूप विकास, औचित्यपूर्ण उत्कर्ष होत राहणे व स्थित्यंतरे घडणे हे नैसर्गिक आहे. अपवादभूत गोष्टी सोडून दिल्यास ज्ञानविज्ञान, कला यांचे ते आंगिक तत्त्वच होऊन बसलेले प्रत्ययास येते. विष्णुदासाची व त्याच्या पुढील परंपरेतील नाटके काही काळ ग्रंथनिविष्ट नव्हती, परंतु पुढे त्यांना ग्रांथिक स्वरूप आले. सुमारे १८६० ते १८८० या दरम्यान बरीचशी पौराणिक नाटके ग्रंथाकार झाली. ' श्रीकृष्णलीला ' (१८६०), गोपीचंद नाटक (१८७०), पार्थप्रतिज्ञा (१८७०), सैरंध्री (१८७२), गोळेकृत ' मदालसा ' (१८७९), ' उदार दामोदर ' (१८८०) ही नाटके ग्रंथरूप स्थित्यंतराची साक्ष देतात.

ही नाटके जरी ग्रंथरूपाचे नवे बाळलेणे घेऊन प्रकट झाली तरी त्यांच्यामध्ये म्हणावे असे विकसन झालेले आढळून येत नाही. पूर्वीच्या नाटकांतील संविधानके, भाषा, अतिमानवी व मानवी अतिरेकी पात्रे ही वैशिष्ट्ये जशीच्या तशीच मूळ धरून होती. प्रथमपासूनच्या ईशस्तवनापासून तो आरतीपावेतो काही एक फरक केला गेला नाही. उलट ग्राम्य-विनोदी विदूषक, अतिरंजित देवपार्टी, अलुलडूरच्या डरकाळ्या फोडून रंगभूमी दणाणून सोडणारे विक्राळ राक्षस, सूत्रधारांचा रंगमंचावरच बाजू धरून असलेला ताफा, सूत्रधारांची गायकी अगदी हे सारे काही जसेच्या तसेच होते.

१८५७ साली मुंबई विद्यापीठाची स्थापना झाली. मुंबई-पुण्याच्या महाविद्यालयांतून अनेक महाराष्ट्रीय आंग्लशिक्षित इंग्रजी भाषा व वाङ्मय यांचा सखोल अभ्यास करून बाहेर पडू लागले, आणि नाट्यकलेच्या नव्या स्थित्यंतराला सुरुवात झाली. संस्कृत व इंग्रजी या भाषांतील वाङ्मयाचा व्यासंग वाढला. या दोन्ही भाषांतील वाङ्मय म्हणजे उत्तमोत्तम नाटकांची आगरे. इंग्रजी भाषेतील प्रथितयश जगद्विख्यात नाटककार शेकस्पीअर व संस्कृतातील थोर नाटककार कालिदास इ. नाटककारांच्या सुंदर व उच्चकोटीच्या नाट्यकलाकृतींचे दर्शन या नवसुशिक्षितांना घडले. त्यांचे त्यांनी वाचन केले. त्याचबरोबर या गुणसंपन्न व वैभवसंपन्न कृतीचे अध्ययन केले. मुंबईसारख्या ठिकाणी तेथे वास्तव्य करून राहिलेल्या इंग्रजांनी बसविलेली नाटके केव्हा केव्हा होत. तसेच विलायतेतील नाटक मंडळ्यांचे सरस नाट्यप्रयोग महाराष्ट्रीय तरुणांना कधीकधी पाहावयास मिळत. उचित गुणांद्वारा प्रेरणा मिळून आपले कॉलेज विद्यार्थीही इंग्लिश व संस्कृतमधील नाटके प्रयोगरूपाने बसवू लागले. नव्या उमेदीने व नव्या दिशेने स्फूर्ती पावून निर्माण झालेले हे चैतन्य मराठी नाट्यवाङ्मयाला उत्तेजक व उपकारक ठरले.

उच्च वाङ्मयीन गुणांनी आदर्शवत असलेली नाटके लाभल्यावर नाट्याभिरुचीत बदल झाला व आमची पूर्वापार चालत आलेली भावेप्रणित पौराणिक नाटके आवडेनाशी झाली. पौराणिक नाटके विसंवादी/अस्वाभाविक व अतिमानवतेने परिपुष्ट झालेली होती. परंतु नवसुशिक्षितांनी अभ्यासलेली, प्रयोगरूपाने हाताळलेली, ज्यांचे नाट्यतत्त्व आत्मसात केलेली अशी इंग्रजी नाटके मानवतेच्या व वास्तवतेच्या प्रगत नाट्यगुणांच्या पायावर आधारभूत असल्याने पौराणिक नाट्यासंबंधी काही वेळा उणेपणा जाणवू लागला.

त्यामुळे पौराणिक नाटकांसंबंधी आंग्लशिक्षित वर्गाची निषेधक वृत्ती बनली. केवळ निषेधासाठी हा निषेध नव्हता, तर पूर्ण वैचारिक परिवर्तनासाठी निषेध केला गेला. त्यामुळे त्याच्यामध्ये आवश्यक अशी विधायक प्रतिक्रिया निर्माण झाली. जी त्याज्य पौराणिक पद्धती तिचा त्याग केला व प्रगल्भ इंग्लिश, संस्कृत नाट्य त्यांचे प्रयोगरूपाने मराठी भाषिक जनतेस दर्शन घडविले.

या नाट्यप्रयोगासाठी वास्तवतेच्या व मानवतेच्या पातळीवरील नाटकांची आत्यंतिक जरुरी होती. यासाठी नवीन सुशिक्षित पुढे आले. इंग्लिश, संस्कृतमधल्या सरस नाटकांचे मराठीकरण करण्यात आले. अनेक परिणत नाट्यगुणसंपन्न नाटकांची निर्मिती मराठी वाङ्मयात झाली. मराठी नाट्यवाङ्मय समृद्ध होऊ लागले. शेक्सपीयरच्या अनेक नाटकांची भाषांतरे करण्यात आली. हॅम्लेट, अथेल्लो, ज्युलियस सिझर, रोमिओ अँड ज्युलियट, कॉमेडी ऑफ एरर्स इ. नाटके अनुवादित झाली. त्याचप्रमाणे संस्कृत साहित्यातील उत्कृष्ट नाटकेही आपापल्यापरी मराठी भाषेत स्थान पटकावून बसली. शाकुंतल, नागानंद, मृच्छकटिक, मालतीमाधव, मुद्राराक्षस, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र, रत्नावली, वेणीसंहार ही नाटके अप्रतिम अशीच होती.

यापूर्वीची नाटके छापली जात नसत परंतु वरील सर्व नाटके ग्रंथरूपाने छापून प्रसिद्ध करण्यात आली होती. म्हणून या प्रथमच्या प्रसिद्ध पावलेल्या वाङ्मयातील नाटकांना ' बुकिश ' म्हणण्याची प्रथा त्या वेळी पडली.

ही सर्व नाटके इंग्रजी व संस्कृत भाषेतून भाषांतर केलेली होती. नाटकाचा आदर्श ठेवून स्वतंत्र नाटके लिहिण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. त्यांतील वैशिष्ट्यपूर्ण सुफलित प्रयत्न वि. ज. कीर्तने यांचा होय. त्यांनी थोरले माधवराव पेशवे (१८६१) हे ऐतिहासिक नाटक लिहून मराठी नाट्यसृष्टीचा स्वतंत्र नाट्यसंसार सुरू केला.

आतापर्यंतची नाटके विशेषतः संस्कृत नाट्यशास्त्र प्रमाण मानून आनंदपर्यवसायी केली गेली होती. परंतु हे मराठी सारस्वतातील पहिलेच स्वतंत्र नाटक संस्कृत साहित्यशास्त्राच्या मूलभूत प्रणालीविरुद्ध शोकपर्यवसायी करून नाट्यवाङ्मयातील क्रांतदर्शित्व प्रकट केले. यापूर्वीचे नाटक सूत्रधार व विदूषक या व्यक्तिप्राधान्यतेने रंगलेले नाटक सर्वत्र आपला प्रभाव पाडून होते.

परंतु ही जोडगोळी कीर्तन्यांच्या या नाटकातील पहिल्या प्रवेशापुरतेच आगमन करून त्या प्रवेशाच्या अखेरीबरोबरच निर्गमन करून कायमची अदृश्य होते. या छोटेखानी नाटकात माधवराव, रमाबाई, रघुनाथराव, रामशास्त्री यांची व्यक्तिचित्रे कौशल्यपूर्णतेने रेखाटलेली आहेत. स्वभाववैशिष्ट्यानुसार व प्रसंगानुरूप भाषेचा वापर करून करुणरसाला उठाव आणणारी शैली एकूण नाट्यपोषकतेस (परिणामी) परिपूर्ण झाली आहे. अपूर्वाईने नटलेली आहे. नाटक चिमकुले असले तरी चटकदार व रसाळ झालेले आहे. मानवी स्वभावगुणांचे दिग्दर्शन घडविणारे कीर्तन्यांनी दुसरे स्वतंत्र नाटक जयपाल हे लिहून स्वतंत्र नाट्यरचनेस भरीवपणा आणला आहे.

भाषांतरित नाटकानंतर स्वतंत्र नाटकांचा ओघ निर्माण झाला. विष्णुदासाच्या पद्धतीप्रमाणे नाट्यरचना करणे बंद झाले तरी महाराष्ट्रीयाचे मन स्वधर्मविषयक श्रद्धाळू होते. साहजिकच स्वाभाविकपणे पुराणप्रियता नष्ट झालेली नव्हती. आपल्या पुराणांतील थोर व्यक्तींच्या उदात्त कथा श्रवण करण्यात त्यांच्या भाविकतेचे पोषण होत असे. पौराणिक नाट्यपद्धती पसंत नसली तरी पौराणिक कथाभागाच्या प्रियतेमध्ये उणेपणा नव्हता. म्हणून नाटककर्त्यांनी स्वतंत्ररीत्या पुराणातील कथा नव्या नाट्यरचना पद्धतीने लोकांसमोर आणल्या. गोपीचंद (१८७०), मदालसा (१८७९), बकासुरवध (१८७९), उदार दामोदर (१८८०) ही नाटके त्यांचे प्रत्यंतर आहे.

मात्र १८७० पासून महाराष्ट्रात वैचारिक परिवर्तनास सुरुवात झाली. जुनी नवी मूल्ये यांचा संघर्ष सुरू झाला. नव्या जुन्यांचा अर्थातच सनातनी लोकांचा व सुधारकांचा झगडा चालू झाला. महाराष्ट्रात अशा दोन प्रणाली एकमेकाविरुद्ध एकमेकाशी प्रतिरोध करून आपल्या पक्षाची बाजू मांडण्यास सरावत होत्या. जुन्या प्रचलित चालीवर नव्या सुधारकांनी हल्ले चढवल्यावर जुनी मंडळी बिचकून जागी झाली आणि त्यांनीही तितक्याच जोराने प्रतिकारार्थ तयारी चालविली. स्त्रीशिक्षण, विधवाविवाह इ. सामाजिक विषयांवर दोन्ही पक्षांचे भाषणे व लेखाद्वारे चांगलेच विचारमंथन झाले. तत्कालीन लेखकांनी या वेळच्या सामाजिक समस्या नाटकांतून मांडण्याचा प्रयत्न केला. तद्यःस्थितीचे खरेखुरे दर्शन घडविणारे पहिले सामाजिक ' मनोरमा ' (चितळेकृत) हे उत्तम नाटक आकारास आले. तसेच स्वैरसकेशा, संगीत सौभाग्य रमा इ. नाटके याची साक्ष देतात. याशिवाय झाशीच्या राणीचे नाटक (१८७०), सवाई

माधवरावाचे नाटक (१८७१) यासारखी ऐतिहासिक व अधिकारदानविवेचन याप्रमाणे राजकीय नाटकेही मराठी वाङ्मयात विषयवैचित्र्याने जन्मास आली. मराठी नाट्यवाङ्मयाची कूस उजविली गेली. निरनिराळ्या पात्रांच्या तोंडी पदे घालण्याचा पायंडा पाडला गेला. त्रिलोकेकरासारख्या विद्वान नाटककाराने आपल्या नाटकातून रागदारी पदांचाही वापर केला. कलात्मक अभिव्यक्तीला प्राधान्य मिळाले गेले.

आंग्लविद्याविभूषित वर्ग होता त्यांना इंग्रजी वाङ्मय व नाट्यप्रयोग यांच्या अध्ययनाने व अवलोकनाने पूर्वीचे पौराणिक नाट्य तिरस्करणीय वाटले. त्यांतील सूत्रधाराचे एकपात्री कंटाळवाणे गायन, विदूषकाचा विसंगत असा ग्राम्यविनोद, पात्रांची अवास्तव भाषणबाजी व कृत्रिम अभिनय यामुळे सुशिक्षित नाट्यरसिक उबगून गेला, त्याला नव्या चाकोरीचे, वास्तवतेशी जवळीक करणारे मानवी पातळीवरचे नाट्य हवे होते. नव्हे, त्याचीच त्याला आता भूक लागली होती. नव्याच्या शोधात व प्रतीक्षेत असतानाच मुंबईला इंग्रजी कलावंतांचे इंग्रजी नाट्यप्रयोग होऊ लागले होते. इंग्लंडमध्ये त्या वेळेस हास्यप्रधान प्रहसनवजा नाटकांचीच प्रथा होती. त्या धर्तीचे प्रहसनवजा नाट्यप्रयोग येथेही इंग्रजी नाटक मंडळ्यांकडून दाखविण्यात आले.

आमच्या मराठी नाट्यमंडळींचे या इंग्रजी हास्यकारक प्रहसनांच्याप्रमाणे ' फार्स ' या मानवी पातळीवरच्या नाट्याचे अवलंबन करून मुख्य पौराणिक नाट्याला जोडले. फार्स म्हणजे सामाजिकतेवर अधिष्ठित झालेला व लोकस्थितीचे ग्रथन केलेला विनोदी-हास्यकारक नाट्यप्रकार होय. फार्साची जोड पौराणिक नाटकाला दिल्यावर अपेक्षेपेक्षा लवकर हा प्रकार लोकप्रिय झाला, कारण फार्समध्ये रेखाटलेल्या व्यक्ती वा प्रसंग अतिमानवी किंवा अद्‌भुत नसून समाजजीवनातीलच चित्रित केल्या होत्या. पौराणिक नाट्याप्रमाणे यात गोंधळ, ओबडधोबडपणा नव्हता तर सुसंघटित कथानक, कलात्मकता यांची उत्तम साधना झाली होती. त्यामुळे लोकांचे मन या फार्सकडे अधिकच ओढले गेले. परंतु पौराणिक व फार्स यांची सरभेसळ होती. दोन्ही वेगळे प्रकार एकामेकाला पूरकच होत होते.


पौराणिक नाटकाची आरती होऊन लोकांनी सुस्कारे टाकले की, मग विनोदाची साधनसामग्री घेऊन फार्स प्रेक्षकांच्यामध्ये हास्याची खसखस पिकवी. एका बाळा कोटिभास्कराने मुंबईला इंग्रजी नाटकाच्या अखेरीस अशा प्रकारचा

केलेला फार्स पाहिला. तोच नमुना लक्षात ठेवून त्याने आपल्या ' सीताहरण ' या नाट्यप्रयोगाच्या समाप्तीनंतर जरठकुमारीविवाहाचे दुष्परिणाम दाखविणारा एक सुंदर आणि उत्तम फार्स करून प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतली. हाच मराठीतला पहिला फार्स होय.

बासुंदीपुरीचा फार्स, खापऱ्या चोराचे प्रहसन, अनर्शाचा फार्स, ढेरपोट्याचा फार्स हे जसे बाष्कळ विनोदावर आधारलेले फार्स असत, तसेच नारायणरावाचा मृत्यू, झाशीची राणी यासारखे गंभीर व करुण आशयाचेही फार्स होते. गर्हित स्त्रीशिक्षण प्रहसन, सासूरवास परिणाम दर्शन, ढोंगी बैराग्याचा फार्स यासारखे तत्कालीन सामाजिक सुधारणेच्या टिंगलीसाठी किंवा पाठिंबा देऊन तयार केलेले एकात्मक असेही फार्स असत.

फार्समध्ये मानवी पातळी, संघटित कथानक झाले, अंशतः तरी एकात्मता साधली. जीवनाचे चित्रण झाले तरी एकूण नाट्य मात्र प्रगत झाले नाही. समाजाच्या भावानुभावाचे यथार्थ दर्शन झाले नाही. उच्च जीवनाचे उदात्त चित्रण घडले नाही. स्वभावरेखाचा आविष्कार परिपूर्णतेने झाला नाही. अभिनव कलात्मकतेची उणीव भासली. १८७० ते १८९० पर्यंत फार्स गाजले. पुढे ते अल्पजीवी ठरले. प्रभावी नाट्यतंत्र अभिनवतेने हाताळणारा थोर नाटककार जन्माला येता फार्साची सूर्यापुढे काजव्यांची जशी स्थिती तशी गत झाली. फार्साचा नाट्यप्रकार बंद पडला तरी पुढे निर्माण झालेल्या सामाजिक नाटकांची मुहूर्तमेढ यांनीच घातली होती असे म्हणणे सयुक्तिक होईल.

□ □ □



३
कथेचे अध्यापन

कथा हा एका दृष्टीने सर्वांत सोपा, सहज आकलनीय म्हणून अध्यापनाच्या वा शिकविण्याच्याही दृष्टीने सर्वांत सुलभ असा वाङ्मय रचनाबंध मानला जातो. कथेला स्वतःचे असे एक नैसर्गिक आकर्षण असते व त्यामुळे अगदी बालपणापासून मुलाची ती आवडती बाब ठरते. ' गोष्ट ऐक ' म्हटल्यावर हट्ट करणारे, रडणारे मूलही थांबते, व ती ऐकण्यास उत्सुक होते. पुढे निरनिराळ्या अवस्थांतील विद्यार्थीदशेतही ते आकर्षण कमी होत नाही, कायम राहते. महाविद्यालयीन अवस्थेतही ते शिल्लक असते. फरक एवढाच की, विद्यालयीन व महाविद्यालयीन अवस्थांत कथेची म्हणजे गोष्टीची पद्धतशीर लघुकथा झालेली असते, आणि म्हणून ती तिच्या लिखित स्वरूपाच्या आधारे काटेकोरपणे वाचावी, अभ्यासावी लागते. म्हणून कथा शिकवणे सर्वांत सोपे वाटते. ते फार थोडे खरे आहे.

याचा अर्थ कथा या निरनिराळ्या अवस्थांत एकाच कारणाकरता आवडत असते असे नाही. अगदी लहानपणी मूल लहान असले तरी ते माणसाचे बालक असल्याने त्याला कल्पनेच्या विश्वात वावरणे आवडते. कथा ही त्या विश्वात त्याला चटकन नेते. त्या अवस्थेत वास्तव व कल्पित यांच्यातल्या

सीमारेषा मनात अस्तित्वातच नसतात. त्यामुळे अद्‌भुत, वास्तव यांतला फरक जाणवत नाही. प्राथमिक शाळेच्या अभ्यासक्रमात हीच अवस्था असते. हे अवधान ठेवूनच तेथे कथांची निवड केलेली असते. इसाप, पंचतंत्र, अरेबियन नाईटस् .. इ. उदाहरणे पुरेत.

माध्यमिक अवस्थेत मनोविश्व आखीव रेखीव होऊ लागते. पूर्वकालीन कथांतले विविध प्राणी हे त्या अवस्थेत जाणिवांच्या कक्षेत आलेल्या विविध वृत्तीचे प्रतीक ठरतात. कोल्हा लबाड, धूर्त, लांडगा दुष्ट .... इ...इ.. पण या अवस्थेत त्या वृत्तीची माणसे व त्यांचे जग, आजूबाजूची परिस्थिती, वातावरण, प्रसंग यांनी काल्पनिकता कमी होऊन वास्तवतेची जाणीव येते. आणि त्यातून मानवी जीवन, त्यातील विविध प्रसंग, घटना इत्यादींनी जीवनाविषयीचे औत्सुक्य वाढविले जाते. पुढच्या अवस्थेत, परोपकार, प्रेम, देशभक्ती, लोकसेवा इ. नी युक्त अशी ध्येयसृष्टी मूल्यसृष्टी कथेत येते व कथेच्या आकर्षणाचे रंगच बदलतात. त्यात मनाच्या प्रगल्भत्वामुळे वाङ्मयीनत्वाचीही जाण टोकदार झालेली असते. म्हणजे कथा हा जेवढा जीवन, त्याची विविध अंगे, रूपे इ. समजून घेण्याचा मार्ग आहे, तेवढाच तो वाङ्मयात्मकही आहे, याची जाणीव प्रभावी झालेली असते. अशा अवस्थेत विद्यार्थी उच्च माध्यमिक शिक्षणाच्या टप्प्यात प्रवेश करतात. तेव्हा प्रगल्भ मनोविश्व, जीवन, त्यांची विविध अंगे, भावभावना यांबरोबर वाङ्मयात्मक विशिष्ट जाण ही बरोबर घेऊन विद्यार्थी कथावाचनासाठी आलेले असतात. त्यांच्या मनोविश्वात या तीन बाबींतली ही झालेली उत्क्रांती मनाने समजून घेऊन या अवस्थेतले कथेचे अध्यापन करावे लागते. म्हणजे कथा ही आजूबाजूचे जीवन समजून घेण्याचा भाग. त्यातील विविध संघर्ष, भावभावना, संवेदना, अनुभव, यांनी निर्माण झालेली मानसिक व वैचारिकही गुंतागुंत व या सर्वांना वाङ्मयस्वरूपात्मक अधिष्ठान आहे, याची तेवढीच तीव्र जाणीव ही तीन अंगे लक्षात ठेवून उच्च माध्यमिक अवस्थेच्या पहिल्या अवस्थेत कथेचे अध्यापन करावे लागते. त्या दृष्टीने अध्यापकाने काळजीपूर्वक तयारी करावी लागते.

कथा या वाङ्मयप्रकाराचे एक अनन्य वैशिष्ट्य असे की, त्याच्या विशिष्ट प्रवृत्तीमुळे कथा वाचकाच्या अंतरंगाचा ठाव लवकर व सहजगत्या घेते, कल्पित व जीवन यांमधील सीमारेषा इतर वाङ्मयप्रकारात इतक्या लवकर कोसळत नाहीत. प्रा. माट्यांची बन्सीधरची कथा संपते व शेवटचे वाक्य

' माझ्या लाडक्या, बाळ बन्सीधर, आता तू कोठे रे जाशील ? " हे वाचून डोळे न पालवणारे विद्यार्थी व गुरुजी क्वचित. म्हणजे बन्सीधर हे कल्पित पात्र आहे, हे दोघेही विसरतात. त्यामुळे कथा ही शिकवायला सोपी वाटते. पण चांगल्या अध्यापकाने सोपेपणाच्या आहारी न जाता लेखकाने जो प्रभावी परिणाम साधला आहे, त्याची मांडणी कशी कौशल्यपूर्वक केली आहे, त्या दृष्टीने विविध घटना, प्रसंग यांची योजना कशी सप्रयोजक केली आहे हे स्पष्ट करावे लागते. विद्यार्थी प्रगल्भ असले तर त्यांच्यापुढे या कथेने समाजरचनेतील खाचाखळगे, व्यक्तिजीवनात एखाद्याच्या वाट्याला येणारी असहायता, खरी आई व बाप यांच्या वागण्यातील फरक इ., स्पष्ट करून एकंदर जीवन आणि त्याचबरोबर कथा हा वाङ्मयप्रकार यासंबंधी अधिक तीव्र जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण करावी लागते. हे अवघड आहे, सोपे नाही.

त्यासाठी समाजजीवनाचे, त्याच्या विविध स्तरांवरील जीवन, समस्या, व्यक्तिस्वभाव आदींचे डोळस अवलोकन व चिंतन लागते, त्याच्या आधारे ही सजगता निर्माण करावी लागते. म्हणजे प्रगल्भ अवस्थेत कथेत जीवनाचे विशिष्ट धोरणाने केलेले चित्रण, त्यामागील भावभावना, संवेदना, संघर्ष इत्यादींनी सधन बनविलेला जीवनानुभव, व्यक्ती, वर्तन व ही सारी अंगे समूर्त करताना लेखकाने कथा या वाङ्मयप्रकाराच्या वैशिष्ट्यांची तंत्रदृष्ट्या बुद्ध्या वा सहजगत्या ठेवलेली जाण, या गोष्टी कथेची एकात्मता भंग होऊ न देता विश्लेषणात्मकतेचा अवलंब करून विद्यार्थ्यांच्यापुढे कथेचे वेगळेच बहुपरिमाणयुक्त रूप उभे करावे लागते. हे जमवणे म्हणजेच अध्यापनकौशल्य. अलीकडे दलित जीवनावरील तसेच ग्रामीण जीवनावरील अनुभवविश्वावर आधारलेल्या कथांना प्राधान्य दिले जाते. त्याचे शैक्षणिक मूल्य लक्षात घ्यावे. समोरचे विद्यार्थी त्यांपैकी असतील तर ते लवकर समरस होतील, बारकावे लक्षात घेतील, पण ते तसे नसतील तरी त्यांचे अनुभव व अवलोकनविश्व व्यापक करण्याचे काम कौशल्यपूर्ण रीतीने करणे अवश्य असते. त्यांचे अनुभवविश्व व्यापक होणे या ठिकाणी अपेक्षित असते, व ते कसे होईल हे लक्षपूर्वक पाहावे लागते. संकलनात दोन तीन विभिन्न प्रकारच्या कथा असतील तर तुलनात्मक दृष्टीचा अवलंब करून निरनिराळे पैलू, निरनिराळे स्तर, निरनिराळी अंगे, लक्षात घ्यावी व ती विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावी. या योगे जे तुलनात्मक अवलोकनाचे संस्करण करता येईल ते बौद्धिक दृष्ट्या

विद्यार्थ्यांना इतर क्षेत्रांतही उपयुक्त पडेल याची जाणीव ठेवून चर्चा करावी.

कथाविश्व एवढे व्यापक आणि विस्तृत आहे की, अध्यापन करताना त्याचे निरनिराळ्या प्रकारे प्रवर्गीकरण करता येते, करावे लागते. म्हणून प्रमुख प्रवर्गाची जाणीव आवश्यक असते. अगदी महत्त्वाचे व सर्वांना सहज ओळखण्यासारखे दोन वर्ग म्हणजे ऐतिहासिक व अर्वाचीन वा समकालीन हे होत. ऐतिहासिकतेमध्ये पौराणिक प्रवर्ग समाविष्ट होतो. या प्रकारच्या कथा शिकविताना लेखकाने विविध प्रकारे ते वातावरण कसे परिणामकारक करून ऐतिहासिक साक्षेप कसा बाळगला आहे, त्यायोगे कथा सर्व दृष्टींनी ऐतिहासिक वातावरणाशी मिळतीजुळती कशी झाली आहे, हे लक्षात आणून देणे अवश्य ठरते. विविध रीतिरिवाज, संकेत, प्रथा, पोषाख, वागण्याचे विशिष्ट धोरण, पद्धती ही सारी लेखकाने कटाक्षाने पाळली आहेत, हे दाखवून द्यावे लागते. नंतरचा प्रकार म्हणजे अर्वाचीन कथांचा, यांतही कालदृष्ट्या फरक लक्षात घ्यावा लागतो. म्हणजे ज्या काळासंबंधी कथा आहे त्या काळात विद्यार्थ्याला मनाने न्यावे लागते. हरिभाऊ आपटे, गुर्जर अगर फडके, खांडेकर आदी हे लेखक तसे आधुनिक असले तरी त्यांचा काल हा आता इतिहासजमा झालेला. त्यामुळे त्या कालीन विविध प्रवृत्ती, प्रथा, संकेत, परिस्थितिजन्य विशेष ... ह्यांचा वेगळेपणा विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावा लागतो, विद्यार्थ्यांचे मनोविश्व व अनुभवविश्व व्यापक होण्याच्या दृष्टीने हे सारे आवश्यक असते.

तोपर्यंतच्या अभ्यास पुस्तकांत कथा निवडताना सामान्यतः जीवनातील नाट्य, कारुण्य, वात्सल्य याबरोबर विविध प्रकारची सहज ध्यानात येणारी संघर्षशीलता, जीवनाच्या विशिष्ट अंगांचा किंवा सामाजिक स्तरांचा परिचय होणे, या गोष्टी महत्त्वाच्या मानल्या जातात, ह्या साऱ्यांच्या योगाने आलेली कथाविश्वाची विविधता विद्यार्थ्यांच्या आकलनदृष्टीला पुरेशी होते व संस्करणशीलतेच्या दृष्टीने ते अवश्य असते. म्हणून या कथांत तंत्रदृष्ट्या प्रारंभ, मध्य, शेवट यांची समतोल मांडणी असते व शेवट परिणामकारक व्हावा यासाठी विविध क्लृप्त्या लेखकाला अवलंबाव्या लागतात. कारण तंत्रदृष्ट्या कथेचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे ' परिमाणाची एकता ' हे पुढे ठेवून कथांची निवड केलेली असते. आणि विद्यार्थ्यांची जीवनविषयक जाण, भावभावना, विविध जाणिवा, अनुभव आदींच्या संस्कारविषयक परिणामकारकतेच्या दृष्टीने तेवढे पुरे असते. सामान्यतः उच्च माध्यमिक अवस्थेच्या पहिल्या वर्षापर्यंत हे

धोरण अवलंबणे मानसशास्त्रदृष्ट्या व वाङ्मयीन आकलन व रसग्रहणदृष्ट्या अवश्य ठरते.

शैक्षणिक दृष्ट्या उच्च माध्यमिक अवस्थेच्या पहिल्या वर्षापर्यंतच्या कथा ह्या प्रामुख्याने कृतिप्रधान घटना-प्रसंगावर आधारलेल्या असणे इष्ट ठरते. पुढील आयुष्यात आवश्यक अशा शौर्य, वीर्य, धाडस, सहनशीलता, धैर्य या गुणांचे बीजारोपण करण्याच्या दृष्टीने शौर्यकथा, धैर्यकथा, धाडस, शिकारकथा, आदींचा समावेश त्यासाठी समर्पक ठरेल. त्याचबरोबर त्यांतून वात्सल्य, मातृपितृप्रेम यांचे संस्कार महत्त्वाचे ठरतील. तंत्रदृष्ट्या ह्या साऱ्या कथा प्रामुख्याने घटनाप्रधान वा कथानकप्रधान, नाट्यप्रधान वर्गात बसणाऱ्या असणे संभाव्य. व्यक्तिचित्रण, स्वभावातील बारकावा, संघर्ष यांचा समावेश पुढील अवस्थेत करणे योग्य होईल. अशा रीतीने अकरावीपर्यंतच्या कथांचा शैक्षणिक व वाङ्मयीन तंत्रदृष्ट्या वेगळेपणा मान्य करता येईल. या अवस्थेत विद्यार्थी अधिक संस्कारप्रवण असतात. ते वाङ्मयाद्वारे जीवन परिचित करून घेत असतात. त्यांचे त्याद्वारे मनोविश्व तयार होत असते. त्यात वर आल्याप्रमाणे कथेचा भाग मोठा व सक्रिय असतो. कथानकप्रधान व संघर्षयुक्त तंत्रधारणेमुळेच कथा आकर्षक वाटते व ती संस्कारयुक्त होते. हे सारे लक्षात घेऊन शिक्षकाने कथातंत्राच्या त्यांच्या आकलनात पडणारा भाग व वरील जीवनाची धारणा ठरविणारे संस्कार यांची सांगड घालणे अवश्य आहे. वाङ्मयीनत्वापेक्षा जीवनोन्मुखता, त्यातील विविधता, हर्षविमर्शादी प्रसंगाद्वारे त्याच्या अनाकलनीयतेचा स्थूल परिचय .. हे सारे मनात ठेवून त्या दृष्टीने अध्यापनतंत्र बसवावे. ते बरेचसे सापेक्षतः व परिस्थिती पर्यावरण आदीवर अवलंबून आहे. कथाविशेषांची व त्यांची सांगड शिक्षकाने प्रयत्नपूर्वक घालावी. त्याचे नियम सूत्रे स्वतःच्या अवलोकन चिंतनातूनच ठरवावीत. त्यातच शिक्षकाचे शिक्षकत्व.

पण कथेच्या अध्यापनात विशेषतः प्रगल्भ अवस्थेत फार मोठ्या प्रमाणावर तांत्रिकदृष्ट्या वेगळेपणा स्पष्ट करण्यावर भर द्यावा लागतो. उच्च माध्यमिक अवस्थेच्या दुसऱ्या वर्षापासून त्याला सुरुवात होते, असे म्हणायला हरकत नाही.

उच्च माध्यमिक अवस्थेच्या पहिल्या व दुसऱ्या वर्षात विद्यार्थ्यांच्या ठिकाणी एक सुप्त क्रांती होत असते. ती केवळ शारीरिक नसते तर त्यापेक्षा

अधिक बौद्धिक आणि मानसिक अशी असते. या अवस्थेत "उच्च शिक्षणाची" सुरुवात होते. कथेच्या बाबतीत तिची विविध तंत्रांगे, त्यांच्या आकलनकक्षेत आणून द्यावी लागतात. त्यामुळे कथेच्या आस्वादाची प्रत व सघनता वाढण्यास मदत होते. महत्त्वाची अशी काही तंत्र-सूत्रे पुढे येथे उद्धृत करीत आहे.

तंत्रदृष्ट्याही कथेचे विविधत्व लक्षणीय आहे. ' परिणामाची एकता ' या दृष्टीने मागे उल्लेखिली आहे. कथेचा शेवट हा मनावर कोणता तरी एक लक्षणीय असा सखोल संस्कार करणारा असावा, असे ह्या तंत्रविशेषात गृहीत धरले आहे. पण हे उद्दिष्ट प्रायः कथानकप्रधान कथांच्या बाबतीत उपयुक्त ठरते. या दृष्टीने लेखकाने प्रथमपासून काळजी घेतलेली असते. या संदर्भात कथेचा प्रारंभ व शेवट यांचा अनुबंध कशा प्रकारचा आहे हे महत्त्वाचे ठरते. आनंद व दुःख, आशा व निराशा, अपेक्षापूर्ती व अपेक्षाभंग, प्रेम व निष्ठुरपणा, न्याय-अन्याय, संकुचितपणा-व्यापकपणा, व्यापकपणा-सखोलपणा ही काही द्वंद्वे या संदर्भात उद्धृत करता येण्यासारखी आहेत. प्रारंभ एकाने करणे व शेवट दुसऱ्यात होणे, हे सूत्र प्रमाण मानून लेखकाने विविध अंगोपांगे, घटक, यांचे सूत्रण कशा रीतीने केले आहे, हे विस्तृतपणाने दाखवून देता येते. बहुसंख्य कथा ह्या सूत्राच्या दृष्टीने अवलंबनीय वा विचारणीय ठरतात.

यापेक्षा बहुसंख्य कथांच्या बाबतीत व्यापकपणे अवलंबिता येण्यासारखे सूत्र म्हणजे संघर्षाचे सूत्र होय. मानवी जीवन हे संघर्षमय आहे. पण खरे म्हणजे या संघर्षमयतेच्या जाणिवेचे मूळ केंद्र मानवी मन हे आहे. ते द्विकेंद्रित असल्याने हा संघर्ष सनातन आहे. रामायण महाभारत यांतून सत् असत् यांचा संघर्ष चित्रित झाला आहे. मनुष्याची जीवनविषयक जाण जसजशी वाढते तसतसे या संघर्षाचे विविधत्व प्रतिभावंताच्या लक्षात येते व त्यांच्या दृष्टीला त्याची अनंत रूपे प्रतीत होतात. कौटुंबिक जीवनातील स्वभावजन्य व वातावरणजन्य संघर्षापासून तो सामाजिक व वैचारिक, तसेच ध्येयात्मकतेपोटी स्वतःशीच होणारे जीवनातील विविध प्रकारचे संघर्ष लेखकाच्या नजरेस येतात व त्यांची मांडणी त्याच्याकडून कथांच्या द्वारा अनेकशः होत असते. ती अनेक दृष्टींनी अनेक बाबतींत लक्षणीय अशी असते, ती सहजरीतीने लक्षात येत नाही. अध्यापकाने बारकाईने ती हेरून टिपून विद्यार्थ्यांच्या मनात साकार करावी लागते. त्या संघर्षामुळे कथा व विशिष्ट कथाविश्व कसे वैशिष्ट्यपूर्ण बनले आहे हे दाखवून द्यावे लागते.

त्यासाठी संघर्षाचे अनेक प्रकार, पातळ्या, प्रवर्ग, दिशा, इ. बारकाव्याने विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणे अवश्य असते. त्यासाठी व्यापक सामाजिक व मानसिक जाण आत्मसात करावी लागते. आज पुढे आलेल्या ग्रामीण व दलित जीवनातील चित्रण त्या कथांत येते. हा संघर्ष गुप्त सुप्त स्वरूपात कसा दडून बसला आहे, हे तेथे उलगडून दाखविल्याने त्या कथांचे असाधारणत्व प्रतीत होते. अशा रीतीने तंत्रदृष्ट्या संघर्षसूत्र हे कसे महत्त्वाचे आहे व सामान्यतः कोणत्याही कथेला ते लागू पडणारे आहे, हे लक्षात येईल. मनोविश्लेषण वा वातावरणप्रधान कथांत या संघर्षाचे स्वरूप अधिक व्यामिश्र व मनोज्ञ असे असते.

कथेच्या अध्यापनतंत्रात, संघर्ष सूत्राइतकेच व्यापक व महत्त्वाचे सूत्र म्हणजे उत्कंठावर्धनाचे होय. वस्तुतः कथालेखनाचे हे मध्यवर्ती सूत्र होय. कारण औत्सुक्यनिर्मिती झाल्याविना कथा वाचली जाणे तसे अशक्य. पण ह्या औत्सुक्याचे स्वरूप कथेकथेप्रमाणे बदलत असते. त्यांचे सिद्धान्तसूत्रण (फॉर्म्युला) सांगता येत नाही. तथापि कित्येकदा या अंगास एवढे महत्त्व प्राप्त झालेले असते की, त्याला मध्यवर्ती स्थान देणारा रहस्यकथा हा प्रकार उत्क्रांत झाला आहे. गुप्तपोलिसांच्या कथा ह्या तर प्रामुख्याने रहस्यकथाच असतात. तंत्रदृष्ट्या त्यांची मांडणी उलट्या मनोऱ्यासारखी असते. अगोदर शेवट, नंतर त्याचे मूळ अशी, पण वाचकास खिळवून ठेवणारी असते.

पण सामान्यकथेच्या बाबतीत रहस्याचे काम उत्कंठावर्धनाने केलेले असते. हे उत्कंठावर्धन लेखकाने प्रयत्नपूर्वक कथेत आणलेले असते. म्हणून शिकविताना त्याचे स्वरूप विद्यार्थ्यांस उलगडून दाखविणे हे शिक्षकाचे काम ठरते. त्यासाठी ते रसिकतेने जाणून घ्यावे लागते. वर आलेल्या कथानकप्रधान कथांत हे अनुस्यूत असते. उत्कंठा ही विविध प्रकारची, विविध पातळीवरची व विविध मनःशक्तींशी संबद्ध असते. रहस्यमय कथांत प्रामुख्याने ती बौद्धिक पातळीवर वावरते. पण इतर कथांत ती भावनिक, संवेदनात्मक व सूचकात्म पातळीवर वावरते, ते बारकाईने हेरून विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे लागते. समस्याप्रधान कथांत उत्कंठेचे सूत्र वैचारिक पातळीवर अवलंबिलेले असते.

अलीकडच्या मनोविश्लेषण, वातावरणप्रधान कथांच्या बाबतीत वेगळे धोरण स्वीकारावे लागते. वातावरणप्रधान कथांतून विविध प्रकारची सूचकता असते. ती उलगडून दाखवावी लागते तर, मनोविश्लेषणप्रधान कथेत मानवी

स्वभाव, भावभावना, अनुभव, चिंतन, ' मूड ' यांचे सूक्ष्मलक्षी पिंजण असते. ते अतिशय हलक्या हाताने उलगडून जीवन व मन यांचा स्वरूपतः व्यामिश्रतेकडे लक्ष वेधावे लागते. अर्थात अशा कथा ह्या प्रगल्भता प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या ठरतात. पण त्यांचे अध्यापन या सूत्राचे व्यापक भान ठेवूनच करावे लागते. विशेषतः जेव्हा एखाद्या परिणतप्रज्ञ लेखकाचा कथासंग्रह एम. ए. सारख्या विद्यार्थ्यांना शिकवावा लागतो तेव्हा ह्या तंत्राचे बारकावे लक्षात घेऊन दुवे जुळवून दाखवावे लागतात.

यावरून वरपांगी सोपा दिसणारा कथा हा वाङ्मयप्रकार बारकाईने पाहिले असता किती विविध प्रकारची अवधाने बाळगून शिकवावा लागतो, हे स्पष्ट होईल. ही प्रमुख सूत्रे उदाहरणादाखल आहेत, त्याचप्रमाणे ती परस्परभिन्न नसून परस्परसंबद्ध आहेत. त्याची परस्परसंबद्धता लक्षात घ्यावी लागते व विद्यार्थ्यांच्याही लक्षात आणून द्यावी लागते.

कथाध्यापनात या अवस्थेत महत्त्वाच्या असणाऱ्या तंत्रसूत्रांचे हे सारे अवधान मनात जागृत ठेवून कथेच्या अध्यापकाने कथा कशी शिकवायची हे ठरविणे अवश्य असते. तंत्रदृष्ट्या त्या दृष्टीने कथांचे आणखी कथानकप्रधान, वातावरणप्रधान, व्यक्तिप्रधान, जीवनसमस्याप्रधान, मानसिक आंदोलनप्रधान, असे काही वर्ग सांगून वा लक्षात ठेवून कथेच्या अभ्यासाला एक वेगळेच परिमाण देता येईल. जे त्यांच्या आकलनकक्षेला न्याय देईल व कथावाङ्मयाचे विविधत्व त्यांच्या मनःकोषापर्यंत पोचेल अशा रीतीने उच्च माध्यमिक अवस्थेत कथा ही वाङ्मयदृष्ट्या व जीवनदर्शन, आविष्करण, मनोदर्शन आदीदृष्ट्या महत्त्वाची ठरते. त्यामुळे पूर्वी अभ्यासलेली एखादी कथा ह्या दृष्टिकोणातून वेगळ्याच दृष्टीने अधिक अर्थपूर्ण करून दाखविता येते, यावयास हवी. तसा प्रयत्न कथा शिकविताना अध्यापकाने अवश्य करावा, त्यामुळे विद्यार्थ्यांची जाण अधिक टोकदार होईल.

पदवी अवस्थेत विद्यार्थी हा अभ्यासविषय व ज्ञानविषय म्हणून वाङ्मयाकडे आलेला असतो. त्या दृष्टीने त्याची बौद्धिक व मानसिक तयारी झालेली असते. त्यासाठी त्याने थोडेफार वाचन केलेले असते. प्रगल्भ अवस्थेची जाण झाल्याने अध्यापकाविषयीची भावना खासगी समवयस्कांत ' हा, ही, तो, ती ' करण्याइतपत प्रगत झालेली असते. त्या दृष्टीने हा एकेरीपणा कसा घालवायचा हे अध्यापकापुढे एक अलिखित आव्हानच असते. ही सारी जाणीव

ठेवून या अवस्थेतील अध्यापनाची तयारी करावी लागते. विद्यार्थ्याला कोणत्याही प्रकारचा दुरावा जाणवू नये व या अभ्यासविषयात (वाङ्मयात) ते पुढे येणार आहेत, अशा रीतीने एकंदर तयारीचे स्वरूप ठरवावे लागते.

अभ्यासक्रमाच्या बाबतीतही त्यामुळे ते अधिकाधिक विषयतंत्र वा सिद्धान्तगामी झालेले असतात. प्रत्येक विषयाचा इतिहास, निर्माण होणाऱ्या वा झालेल्या नव्या नव्या शाखा, अवलंबनाचे विविध मार्ग व वाङ्मयाच्या बाबतीत विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष सहकारिता ही अंगे महत्त्वाची ठरतात. कथेच्या दृष्टीने पाहता एखाद्या लेखकाचा एखादा महत्त्वाचा गणला गेलेला संग्रहही असतो. किंवा कित्येकदा अनेक लेखकांच्या कथांचा संग्रहही असतो. ते शिकविताना पूर्वीची सारी अंगे अवधाने महत्त्वाची ठरतातच. उलट त्यांना प्रगल्भत्व प्राप्त झालेले असते. त्यांच्या जोडीला विषयनिष्ठ असे नवे साक्षेप, नव्या संकल्पना, नवे उपक्रम यांचा उपयोग करून घ्यावा लागतो.

त्यामुळे या अवस्थेत कथेच्या तंत्रवैशिष्ट्याबरोबर लेखनवैशिष्ट्यांचा विचार महत्त्व पावतो. त्या अनुषंगानेच कालाचा विचार संस्कारही महत्त्वाचा ठरतो. म्हणजे लेखक ज्या कालातला असेल त्या कालापर्यंत जावे लागते किंवा यावे लागते. पूर्वीचा काल असेल तर लेखक व तत्कालीन परिस्थितीची वैशिष्ट्ये, वाङ्मयविषयक संकेत महत्त्वाचे ठरतात, ते प्रारंभी थोड्याफार बारकाव्याने व इतर उदाहरणांसह उलगडून दाखवावे लागतात. आधुनिक, आजकालचा लेखक असेल तर त्याच्यापर्यंत येण्यास कथेने विविध दृष्टीने कोणती वाटचाल केली ते उकलून दाखवावे लागते. त्यासाठी थोड्या ऐतिहासिकतेचा व संक्रमणशील दृष्टीचा अवलंब करावा लागतो.

अशा रीतीने पदवी स्तरावर कथेसारखा विषय शिकविताना जी विविध व्यवधाने बाळगावी लागतात, त्यांत कालात्मक अवधान हे महत्त्वाचे. हे विद्यार्थी सावधचित्त असतात, त्यांची ही सावधचित्तता स्वविषयाच्या बाबतीत अधिक टोकदार करावी लागते. ती बोथट होणार नाही असे पाहावे लागते, त्याचप्रमाणे कथासंग्रह असला तरी प्रत्येक कथा शिकवावी लागते. ती शिकविताना मागे आलेली सर्व अंगोपांगे, व्यवधाने अशा निराळ्याच दृष्टिकोणातून मांडावी लागतात की, त्यांतून प्रगल्भता स्पष्ट व्हावी, वाढीला लागावी. ऐतिहासिक अनुबंधाबरोबर तंत्रात्मक अवधानही तेवढेच लक्षणीय असते, पण हलके हलके हेही लक्षात आणून द्यावे लागते की, तंत्र ही एक विवेचनपोषक संकल्पना

आहे. तिच्या किती आहारी जायचे हे लेखकाच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते. या अवस्थेत विद्यार्थी या विषयांवरील निरनिराळ्या पुस्तकांचे वाचन करतात. त्यांतून कथातंत्राची जाणीव संस्कारित होते. त्यांना ते अंग महत्त्वाचे वाटत असते. पण प्रत्येक बाबतीत लेखकाला सदैव यश येते असे नाही. तथापि यश आले नाही तरी कथा पडत नाही. यावरून तंत्रात्मकतेच्या मर्यादा विशद कराव्या लागतात. कथा म्हटल्यानंतर ' गोष्ट ' म्हणजे ' कथानक ' उभे राहते. पण आज पाहू लागले तर त्या ' कथा ' असतात पण ' कथानकशून्य ' असतात. अशा रीतीने संदर्भवशात निरनिराळे आधुनिक प्रवाह विविध उपक्रम यांचा परिचय करून द्यावा लागतो व तो अभ्यासाबाहेरच्या विविध उदाहरणांनी परिपुष्ट करावा लागतो. त्यामुळे कथासंग्रह एका लेखकाचा असो अगर अनेक लेखकांचे संकलन असो, कथेचे बहुपरिमाणयुक्त तंत्र परिचित करून देणे तसे अवघड जात नाही.

प्रगल्भ जाणिवांमुळे एक फरक जाणवला असेल की या अवस्थेत रसग्रहण, परीक्षण, गुणदोषविवेचन यांची जागा चिकित्सक मूल्यमापनाने घेतलेली असते. हा नुसता शब्दात्मक बदल नसतो तर संकेत जाणिवात्मक असतो. ' मूल्य ' प्रामुख्याने या ठिकाणी वाङ्मयमूल्य हेच अभिप्रेत असते. जीवनमूल्याचा विचार त्यांच्या अनुषंगाने संभवतो. हे मूल्यनिदान करताना विद्यार्थ्यांची मूल्यविषयक जाण ही अधिक सखोल, प्रगल्भ व समतोलपणाकडे झुकलेली असेल हे पाहणे अवश्य असते. अशा रीतीने या अवस्थेत कथेचे वेगळेच रूप अध्यापनासाठी पुढे ठेवावे लागते, तिच्या वाङ्मयीनत्वाला धक्का न लागता इतर विचार आणावे लागतात.

मूल्यमापनाला या अवस्थेत आणखी एक पैलू निर्माण झालेला असतो. म्हणजे मूल्यमापन हे केवळ तंत्रगामी न राहता व्यक्तिगामी होते. विशिष्ट कथालेखक, त्याची कथाकार या दृष्टीने दृग्गोचर होणारी वैशिष्ट्ये, त्या अनुषंगाने जनमानसात कथाकार म्हणून निर्माण झालेली त्याची प्रतिमा, तिच्या योग्यायोग्यतेची पाहणी इ. विषय या संबंधात चर्चाविषय संभवतात. याबाबतीत शेवटचा विषय म्हणजे त्याचे कथाविश्वात स्थान कोणते. म्हणजे त्याने कथेच्या विकसनाला कोणता हातभार लावला हे दाखविणे. हे करीत असता विविध प्रकारची सापेक्षी, ऐतिहासिक जाण ही तर महत्त्वाची असतेच. पण आणखी एक विचार या प्रश्नात गृहीत धरला असतो की, त्याने कथेच्या विकसनास

कोणता हातभार लावला हे दाखवून देणे. म्हणजे काळाबरोबर कथेचे विशिष्ट प्रदेश वा भाषा सीमित असे, ' विकसन ' होते, असे गृहीत धरलेले असते. या बाबतीत ' विकसन ' ही संकल्पना कला व्यवहारव्यापारात किती महत्त्वाची मानायची हा प्रश्न विद्यार्थ्यांची जाण प्रगल्भ होण्याच्या दृष्टीने चर्चिणे अवश्य ठरेल. अर्थात याबाबत कथा व वाङ्मयसमीक्षाविषयक पुस्तके वाचून अवलोकन, अभ्यास, चिंतनाची मदत घ्यावी लागते. या सर्व विवेचनावरून कथेचे अध्यापन पदवी अवस्थेत किती विविध पैलूयुक्त होते ते कळेल. कथाविकसन संकल्पना ही अभ्यासास नेमलेल्या संग्रहाच्या संदर्भात सीमित करावी. म्हणजे विद्यार्थ्यांचा घोटाळा होणार नाही. कथातंत्रविषयक विविध अंगोपांगांवर शक्य व अवश्य तेथे तुलनात्मक विवेचन करावयास हरकत नाही. पण ही तुलना वरवरची नसावी. जाणीवपूर्वक, समजून केलेली व सूक्ष्मलक्षी असावी. तिने कलाकृतींना न्याय मिळावाच पण विद्यार्थ्यांची वाङ्मयविषयक समजूत व जाण अधिक प्रगल्भ व्हावी. निदान ती विकासोन्मुख व्हावी.

या संबंधात आजच्या संदर्भाच्या दृष्टीने पाहता ग्रामीण व दलितकथा हा एक कथाविशेष म्हणून लक्षात घेता येईल. तंत्रदृष्ट्या ह्या कथा वेगळ्या असतात, असे नव्हे. कथानक वा संविधानक, जीवन व व्यक्तिचित्रण, विशिष्ट वातावरणाचे ठसठशीत संस्कारशील वर्णन इ. अंगे ही तशी कथेच्या एकंदर तंत्रात्मक प्रकृतीशी मिळतीजुळती असतात, असेच दाखवून देता येईल. त्या गोष्टी कमी जास्त महत्त्वाच्या वा परिणामकारक म्हणून स्पष्ट करून सांगता येतील. पण त्यांतील अनुभवविश्व हे कसे मूलतः वेगळे आहे हे विद्यार्थ्यांच्या मनावर ठसवावे.

कारण ग्रामीण वा दलितकथेचे महत्त्वाचे जर कोणते अंग (एक वा अनेकही) असेल! अंगे असतील तर ते/ती म्हणजे आतापर्यंत न आलेल्या वा अपवादभूत वा विरलत्वाने आलेल्या जीवनांगांचे दर्शन हे होय. हे वेगळेपण केवळ चूष, फॅशन किंवा रुचिपालटासाठी योजलेली क्लृप्ती या उद्देशाने आलेले नसते. त्यामागे असते ती जीवनाविषयीची एक वेगळ्या प्रकारची वा पातळीवरची सजगता (अवेअरनेस). हा अवेअरनेस समजून घेणे अवश्य असते. मराठी साहित्यात प्रतिबिंबित झालेल्या जीवनाची कक्षा त्यामुळे विस्तारलेली आहे. तेव्हा ही नवजाणीवयुक्तता अध्यापकाने प्रथम समजून घेणे

अवश्य असते व सारे विवेचन तिला मध्यवर्ती कल्पून करावे लागते, करणे अवश्य असते. कारण त्यायोगे पुढे असलेल्या विद्यार्थीवर्गाची जीवनविषयक जाण, त्याच्या आकलनकक्षेत आलेल्या नव्या नव्या जाणिवांची लवलव व त्या सर्वांमुळे त्याचे संवेदनाशील असे मन हे सुजाण व संस्कारित करावे लागते. त्यायोगे त्याचे भावजीवन सामाजिकतेच्या अंगाने संपन्न करावे लागते. या लेखकांचा एक वर्गच समाजाच्या वेगळ्या पातळ्यांतून पुढे येत आहे, ह्याची जाण शहरातील विद्यार्थ्यांना द्यावी लागते व ग्रामीण वा अर्धग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या ठायी आपल्या अवतीभोवतीचे जीवन हे साहित्य, वाङ्मय यात येऊ शकते, याचे त्याबरोबर येणाऱ्या आत्मप्रत्ययाचे समाधान त्याला द्यावे लागते, ते फुलवावे लागते. म्हणजे कथांच्या संदर्भात अध्यापनदृष्ट्या, हा एक नाव प्रवर्ग पुढे समर्थपणे त्यांच्या जाणिवांच्या कक्षेत साकार करावा लागतो. त्यामुळे हे अध्यापन केवळ तंत्राधिष्ठित ठेवून चालत नाही, तर विचार, जाणिवा, संवेदना, नवसजगता (अवेअरनेस) यांच्या नव्या पातळ्या त्यांना उलगडून दाखवून नवीन वाङ्मयीन व त्या अनुरोधाने प्रत्यक्ष स्वरूपाच्या अनुभवविश्वास उन्मुख असे त्याचे मन आणि पर्यायाने व्यक्तिमत्त्व बनवावे लागते. हे थोडेफार साक्षेपाने वा सोद्देश करावे लागते.

अशा रीतीने कथेच्या अध्यापनातील विविधता ही मन मोकळे व उघडे ठेवून आत्मसात करावी लागते. हे साक्षेपाने झाले तर, यातूनच पुढे वाङ्मयाच्या व्यापक अभ्यासास विद्यार्थी येणार आहेत वा उद्युक्त होणार आहेत, हे भान ठेवून आपले अध्यापनविषयक धोरण कथावाङ्मयाच्या बाबतीत विचारपूर्वक ठरवावे लागते. एक कर्मकांड म्हणून वा अलीकडचे एक फॅड म्हणून त्याच्याकडे पाहू नये, असे सुचवावेसे वाटते.

कथेच्या अध्यापनातील जवळजवळ शेवटला महत्त्वाचा प्रश्न म्हणजे विशिष्ट वाङ्मय वा वाङ्मयप्रकार या दृष्टीने अध्यापन हा होय. वाङ्मयबंध (रूढ शब्द वाङ्मयप्रकार) या दृष्टीने कथेची काही वैशिष्ट्ये आहेत. कथा हा लघुत्वप्रधान अभिबंध असल्याने त्याचा वाङ्मयबंध म्हणून अभ्यास कित्येक ठिकाणी पदवी अभ्यास पातळीवर केला जातो. पण पुष्कळ ठिकाणी (मराठीच्या बाबतीत, तो पदव्युत्तर पातळीवर असतो.) अर्थात वाङ्मयबंध या दृष्टीने हा फरक फारसा महत्त्वाचा नाही. कारण सामान्यतः चर्चेचे वा अभ्यास-अध्यापनाचे विषय तेच असतील. पुढे बसलेल्या विद्यार्थ्यांची बौद्धिक पातळी

लक्षात घेऊन अध्यापकाला कोणत्या विषयावर अधिक भर द्यायचा, किती खोलात जायचे ते ठरवावे लागेल. ते तसे सापेक्षतेने नियुक्त पुस्तकांवर अवलंबून असेल.

कोणतीही पातळी असो अभ्यासात मान्यवर कथाकारांचे काही संग्रह अध्यापनास असतील. एखादा संकीर्णपणे अनेक कथाकारांचा संग्रह असणे असंभवनीय नाही. मुख्यतः ऐतिहासिकदृष्ट्या विशिष्ट कालखंड, प्रवृत्ती इ. चे प्रतिनिधित्व करणारे कथाकार वा त्यांचे संग्रह असतील. सर्व नेमलेल्या पुस्तकांचा अभ्यास झाल्यानंतर कथेच्या विविधस्वरूपी प्रकृतीची तसेच तिच्या विकसनाची व समकालीन विकासावस्थेची कल्पना यावी हे उद्दिष्ट असेल. नेमलेली पुस्तके ही केवळ प्रातिनिधिक वा प्रतीकात्मक समजावी लागतील.

कथा हा वाङ्मयप्रकार म्हणून अभ्यासायचे म्हटल्यानंतर व विद्यार्थ्यांची प्रगल्भ जाण लक्षात घेतल्यानंतर आतापर्यंतच्याप्रमाणे प्रत्येक कथेचे खोलात जाऊन विश्लेषणपूर्वक विवेचन ही बाब या अवस्थेत विद्यार्थ्यांवर सोपवावी लागते. तेवढी प्रगल्भता गृहीत धरणे योग्य. त्यामुळे स्वाभाविकपणे पुस्तकांचा अभ्यास हा त्याचा लेखक, काल, प्रवृत्ती, कथेची प्रगतावस्था इ. अंगे विचारात घेऊन संग्रहातील कथांचे वर्गीकरण करून त्या दृष्टीने कथा अभ्यासाव्या लागतील. एखादी वा काही कथा ह्या दोन तीन अशा रीतीने कल्पिलेल्या प्रवर्गांत समाविष्ट होऊ शकतील, त्यात चूक नाही. नंतर कथाकार म्हणून विशिष्ट कथाकाराची अनेक परिमाणांनीयुक्त अशी वैशिष्ट्ये, ज्या कालखंडाचा तो प्रतिनिधी असेल त्याची कथावैशिष्ट्ये, समकालीन इतर कथाकारांच्या तुलनेत त्याचे सापेक्ष स्थान इ. विषय संभवतात. त्याची चर्चा इतर पुस्तकांच्या आधारे करावी लागेल. उच्चतर पातळीवरचा अभ्यास म्हटल्यानंतर हे स्वाभाविक होय.

कथेची अनेक वैशिष्ट्ये आहेत, त्यांपैकी पहिले व सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिची अनेक प्रकारची विविधता होय. त्या दृष्टीने तिची बरोबरी कोणताही वाङ्मयप्रकार करू शकेल असे वाटत नाही. वाङ्मय-समीक्षेतील सारे 'वाद' कथाप्रकाराशी संबद्ध आहेत. काही प्रमुख प्रमाणभूत म्हणून ठरवून नेमलेल्या पुस्तकांच्या अनुषंगाने त्यांचे स्वरूप ठरवून चर्चेत अधिक सोदाहरणता आणता येईल.

अशारीतीने नियुक्त पुस्तकांतील कथांचा अभ्यास विविध दृष्टींनी

केल्यानंतर कथा हा एक वाङ्मयबंध या दृष्टीने त्याच्या विकसनाची अनेक अंगे स्वतंत्र चर्चेच्या रूपाने विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देणे युक्त होईल. कारण वाङ्मयप्रकार म्हटल्यानंतर हे ओघानेच आले.

कथेचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे तिची विकसनशीलता. ही अनेक पातळ्यांवर व अनेक परिमाणे असणारी अशी आहे. त्याची स्थूल जाण छात्रांच्या मनावर ठसविल्यास त्यातून त्यांना पुढे संशोधनासाठी अनेक अभिशोधनप्रधान (एक्स्प्लोरेटिव्ह) क्षेत्रे उपलब्ध होतील. अभ्यासलेल्या व प्रसिद्ध कथांच्या उदाहरणांनी हे स्पष्ट करता येईल. उदाहरणांसाठी काही विकसनक्षेत्रे सूचित करणे अस्थानी होणार नाही.

अगदी पहिली गोष्ट म्हणजे कथेचे मूळ हे नैतिक कथांत आहे. म्हणजे नैतिकतेपासून उगम पावलेली कथा आज मानसशास्त्रीय संशोधनाने मनाच्या गुंतागुंतीच्या व्यवहारांचे जे ज्ञान झाले आहे, तेथपर्यंत विकसित झाली आहे. नीती ही मानसिक संकल्पना आहे, हे लक्षात घेता अनेक टप्पे त्या (मानस) शास्त्राच्या आधारे सुचतील व कथाही आढळतील. ही एक दिशा. दुसरी दिशा म्हणजे कथानक, घटना. कथेचा उगम हा घटनाप्रधानतेत आहे. पुढे लिखित स्वरूप प्राप्त झाल्यावर त्याचे ' कथानकात ' रूपांतर झाले व त्यावर आधारित एक तंत्रविकसन निर्माण झाले. हे तंत्रप्रमाण कित्येक अवस्थांत कालखंडात प्रमाण मानले जाई. पण आजची परिस्थिती पाहिली तर कथा ही कथानकशून्यतेकडे जोराने झेपावत आहे. मराठीतील ' नवकथा ' या संदर्भात लक्षणीय आहेत. कथानकविरहित होऊन त्या आपले " कथात्मपण " विसरू देत नाहीत. हेही जीवनविकासाबरोबर व त्याबरोबर तंत्रविषयक जाणिवांच्या विकसनाबरोबर घडत आले आहे. योग्य ते कालखंड अवस्था मानून हे विकसन एखाद्या सूत्राद्वारे उलगडून दाखवता येईल.

तिसरी दिशा म्हणजे एकसंधतेपासून तो अधिकाधिक गुंतागुंतीकडे ती जात आहे. मानवी मनाच्या सर्वच सुप्त प्रकट शक्ती, जाणिवा यांच्याशी संबंध असल्यामुळे भूतकथा, भयकथा, अद्‌भुतकथा ... इ. अतिमानवी, अनुभवांपासून तो मानवी अनुभवातली गुंतागुंत येथपर्यंतची प्रगती टप्प्याटप्प्यांनी लक्षणीय ठरेल. आज विज्ञानकथा जोराने विकसित होत आहे, हेही लक्षात घ्यावे. विविधतेबाबत वर म्हटल्याप्रमाणे कोणताही वाङ्मयप्रकार तिच्याशी बरोबरी करू शकेल असे वाटत नाही. नेमलेली पुस्तके व वृत्तपत्र

आदीतील कथालेखन यांच्या आधारे प्रमुख प्रकारांची व वैशिष्ट्यांची चर्चा करता येईल.

प्रत्यक्ष जीवनाशी घनिष्टपणे संबंध असल्याने समाजाच्या वा समूहाच्या ज्या व्यक्तिगत वा सामूहिक जाणिवा, भावभावना, संघर्ष श्रद्धा असतील त्यांच्याशी कथा निगडित असणे अपरिहार्य आहे. अशा प्रकारे जीवनाच्या एखाद्या अंगातील विशिष्ट घटकांचा विचार करून विशिष्ट सूत्र वा अभ्युपगम गृहीत धरून कथांच्या द्वारे त्याची मांडणी करता येईल. आज आपल्याकडे दलित जीवनपर व ग्रामीण कथांना महत्त्व आले आहे, त्यांचे या दृष्टीने संकलितपणे अवलोकन करून एखादे विकाससूत्र उलगडून दाखविता येईल. कार्हींनी ते केले आहे. तिकडे लक्ष वेधावे.

कथा या रचनाबंधाचे स्वरूपच असे आहे की, कितीही विस्ताराने लिहिले तरी त्याच्या अध्यापनाची काही अंगे मागे राहतातच. त्यासाठी एक खूणगाठ मनाशी बांधणे अवश्य आहे. तंत्र वा इतर वैशिष्ट्यांचा अवलंब हा तसा कमी-महत्त्वाचा नाही. पण एक गोष्ट लक्षात घ्यावी की प्रत्येक कथा ही तशी स्व-तंत्र असते. तिची ही स्व-तंत्रता तिच्या तात्त्विक व अन्य धारणाघटकांच्या आधारे समजून घ्यावी. विद्यार्थ्यांची आकलनशक्ती, अभ्यासस्तर, इ. अंगे विचारात घेऊन, त्यांच्या अनुषंगाने विद्यार्थीमनावर तिची वैशिष्ट्ये बिंबविण्याचा किंवा त्यांच्या मनोविश्वात आपणास जाणवलेली कथेची प्रतिमा सजग रीतीने साकार करण्याचा प्रयत्न करावा, या मागनिच ती त्यांच्या अनुभवविश्वात महत्त्वाचे स्थान मिळविणार असते.

वर कथा-अध्यापनास उपयुक्त असणाऱ्या काही तंत्रस्वरूप सूत्रांचा उल्लेख केला. पदव्युत्तर अवस्थेत वाङ्मयाविषयीची जी प्रगल्भ जाण उत्क्रांत होते तिच्या अनुषंगाने महत्त्वाचे असे एक सूत्र या ठिकाणी उद्धृत करणे योग्य होईल.

हे महत्त्वाचे सूत्र म्हणजे कार्यकारणाचे वाङ्मयीन कार्यकारणाचे सूत्र. हे तसे सर्वच उच्च स्तरांवरील अभ्यासात महत्त्वाचे असते. पण वाङ्मयाच्या क्षेत्रात त्याला विशिष्ट स्वरूप प्राप्त झालेले आहे. कथेच्या विविध-प्रकृती वैशिष्ट्याने ते विशेष महत्त्वाचे ठरते. कथेतील घटना, प्रसंग, व्यक्ति-वर्तणूक, विविध उल्लेख, हे तसे विविध संबंधांनी एकमेकांशी जोडलेले असतात, कोणतीही कथा त्याला अपवाद नसते. पण ही जोडणूक ज्या कार्यकारणांनी

झालेली असते तिचे स्वरूप बहुविध असते. ह्या बहुविधतेची कल्पना देणारी दोन तीन अंगे उल्लेखनीय ठरतील. इतर विषयांतल्याप्रमाणे हे कार्यकारण तर्काधारित नसते तर मनोज्ञ असते.

पहिले असे की, घटना, प्रसंग, इ. च्या उपयोजनेत एक प्रकारची साभिप्रायता असते. ही साभिप्रायता म्हणजे एक प्रकारची अनिवार्यता किंवा अपरिहार्यता. ती कलात्मकतेच्या पातळीवरून समजून घ्यावी व सांगावी लागते. त्यामुळेच ते घटनाप्रसंग, वर्तणूक इ. अर्थपूर्ण होतात. दुसरे म्हणजे एक प्रकारच्या सूचक वा औचित्यभावाने हे घटनाप्रसंग इ. एकमेकांशी जोडलेले असतात. अध्यापकाने ते औचित्य जाणून घेऊन विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून द्यावे. त्यायोगे त्यांची अभिरुची सघन होते.

या संबंधातले तिसरे अंग अतिशय सहृदयतेने व तेवढ्याच कल्पकतेने समजून घ्यावे व सांगावे लागते. ते अंग म्हणजे प्रतीकात्मकतेचे होय. साहित्य ही प्रतीकप्रधान आविष्करणरूप कला आहे. शब्द, शब्दसंहती, उदाहरणे, प्रसंग, घटना, व्यक्ती, वर्तणूक, विविध उल्लेख, ही सारी अंगे एक प्रकारे प्रतीकप्रधान असतात. ही प्रतीकात्मकता वा प्रतिमात्मता शोधून काढणे, जाणून घेणे, हे अध्यापकापुढे एक आव्हान असते. ते त्याने स्वीकारून आपल्या कुवतीप्रमाणे त्याला सामोरे जावे, व आपणांस जाणवलेले विद्यार्थ्यांस सांगावे. त्याने कलाकृतीला, तिच्या आकलनाला व आस्वादालाही वेगळीच आशय घनता, वेगळे परिमाण प्राप्त होईल. ही प्रतीकशोधनाची वृत्ती अभ्यासकाने वाढवावी. लेखकाच्या ठिकाणी ती अबोधपणे जागृत असते, हे लक्षात घ्यावे.

अशा रीतीने कथा हा वाङ्मयप्रकार या दृष्टीने अध्यापकाच्या सर्व प्रकारच्या अध्यापनशक्तींची कसोटी पाहणारा असा आहे. अगदी प्रारंभी म्हटले आहे की, कथा हा शिकविण्यास सर्वांत सोपा वाटणारा वाङ्मयप्रकार आहे. पण तो सोपेपणा केव्हाच कसा नष्ट झालेला आहे, ही किंवा यापेक्षा अन्य काही अंगे सुचतील अशी व अशी सदैव सुचत राहणार त्यांपैकी महत्त्वाची अशी अंगे निवडून त्यांच्या आधारे प्रगल्भ अवस्थेत विद्यार्थ्यांची या प्रकाराविषयीची सजगता अधिकाधिक जागृत ठेवणे एवढेच करता येईल. हे सारे अध्यापकसापेक्ष असले तरी सर्वसामान्य अध्यापकाला यातून बरेच दिशादर्शन उपलब्ध होईल.

□ □ □

४

तुकाराम : गुंडवाटा शुद्ध करी

भगिरथाने पवित्र गंगा स्वर्गातून आणून अनंतकाल झाला. भूतलावर अवतीर्ण झाल्यापासून ती लोकांना पवित्र पावन करीत, सर्वांभूती जीवन देत आली आहे. तुकोबांच्या अंतःकरणातून पाझरलेली, स्फुरलेली त्यांची अभंगगंगा गेली तीन शतके लोकांची अंतःकरणे पुनीत करून आदराचे स्थान पटकावून बसली आहे. संत असो वा सांसारिक असो, भाविक असो अथवा तत्त्वज्ञ असो किंवा समाजसुधारक असो त्यांना तुकोबारायांच्या या ज्ञानगंगेचे आकंठ पान करता येते.

जीवनाच्या या भाष्यकाराची अमृतवाणी आजसुद्धा मराठी मनातून घुमत राहिली आहे, चित्तातून घोळत राहिली आहे, आणि विश्वाच्या अंतापर्यंत त्यांची ही जीवनदायिनी भाववीणा तशीच निनादत राहील यात संदेह नाही. तुकोबांनी प्रज्वलित केलेला आपल्या अंतःस्फूर्तीचा नंदादीप उत्तरोत्तर अधिकाधिक तेजायमान होत राहिला आहे. म्हणून ' मरावे परी कीर्तिरूपे उरावे ' असे म्हणणे संत तुकारामांच्या अभंगवाणीविषयीच खरेखुरे ठरले आहे. परंतु थोर महाराष्ट्र सारस्वतकारांनी (कै. वि. ल. भावे) मात्र समर्थांच्या कार्यांच्या महतीचे समर्थन करताना लोककवी तुकोबांचा अधिक्षेप केला आहे. या सारस्वतकारांनी मराठी वाङ्मयाचे परिशीलन करताना " महाराष्ट्राने

रानावनात दगडांवर बसून टाळ बडवावे व नामामृत प्यावे हे तुकोबाचे ध्येय व सांगणे. '' असे म्हटलेले चटकन निदर्शनास येते.

या त्यांच्या उद्‌गारांतून तुकाराम महाराजांनी लोकांना भक्तीच्या मागे लावून त्यांना निष्क्रिय बनविले. सतत नामस्मरण करायला लावून ' ब्रह्मानंदी लागली टाळी ' अशा वृत्तीचे सर्वस्वी निवृत्तिमार्गी बनविले हेच त्यांना ध्वनित करावयाचे आहे, नाही ध्वनित केले आहे !

पण तुकाराम महाराज निवृत्तिमार्गी दिसले आणि असले तरी त्यांच्या आचारविचारांत आणि आकाशाएवढ्या अंतःकरणात लोकांना कर्तव्योन्मुख बनवून लोकोद्धार साधण्याची भावना होती, त्यांनी सामान्यजनांना भक्ती करायला सांगितली, पण उन्नतिगामी भक्ती करावयास सांगितली. या भक्तीला कर्मप्रधानतेची साथ होती. परंतु ती निष्क्रिय नव्हती. ' पिटू भक्तीचा डांगोरा । कळीकाळासी दरारा ' अशी कार्यप्रवण करणारी त्यांची भक्ती होती. याला निष्क्रियता कोण म्हणेल ! एवढेच काय पण भक्तीसाठी रानावनात दगडाधोंड्यावर बसून टाळ कुटायला त्यांनी सांगितले नाही, तर ' न लगे हा लौकिक सांडावा वेव्हार । घ्यावे वनांतर भस्म दंड ' असे त्यांनी आवर्जून कथन केले आहे, किंबहुना ' कुळधर्म ज्ञान साधन । कुळधर्मे निधान, हातां चडे ' अशा रीतीने जीवनाचे सार्थक चांगुलपणाने जेणे करून होईल असा नित्यक्रम करण्यासही त्यांनी स्पष्ट बजावले आहे.

तुकोबांनी जणू भविष्यातील ' लोक ' वाणीचा कानोसा घेऊनच आपल्या अभंगवाणीद्वारा दूरदर्शीपणाने आपली बाजू उघडपणे मांडली आहे-

कपट काही एक । नेणे भुलवायाचे लोक ।
नेणे फुंको कान । नाही एकांतीचे ज्ञान ।

तुकाराम महाराजांनी स्वतः संसाराची लटकती तलवार डोक्यावर असतानाच आत्मोद्धार करून घेतला आणि ' जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारे वेच करी ' अशी कर्तव्याची जाणीव करून देऊन उच्चपातळीवरील विचारसरणीची शिकवणूक लोकांना दिली, या पाठीमागे जनहिताची उत्कट तळमळ नाही, लोकांना कार्यान्वित करण्याचा हेतू नाही असे कोण म्हणेल ?

समाजाची उन्नती घडवून आणावयाची असेल, तर नैतिक धारणेवरच भौतिक उत्कर्षाची जडणघडण झाली पाहिजे. यासाठी समाजातील नैतिक मूल्यांची जोपासना झाली पाहिजे, उच्चतम जीवनमूल्ये लोकांच्या अंतरंगात

रुजली पाहिजेत. लोकमानस सुसंस्कृत झाले तरच त्या समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा भौतिक उत्कर्ष साधता येईल आणि तरच तो फलदायी ठरेल ! म्हणून तुकोबारायांनी केवळ भक्तीचा उपदेश करण्याचे ध्येय अंगी बाळगले नाही तर भक्तीबरोबरच नीतिबोध केला नी लोकशिक्षणाचा शुभारंभ केला.

जीवनकलहाच्या साधकावस्थेतून सिद्धावस्थेप्रत पोहोचल्यावर तुकाराम महाराजांनी आपल्या जीवनकार्याची निश्चिती केली. ' ब्रह्मरसे भरोनिया अंगे ' तुकारामाने ' करू संती जे केले ' असा निश्चय केला. आडरानी भरलेल्या जगाला सन्मार्गाला लावण्यासाठी ' आता उरलो उपकारापुरता ' ही भूमिका स्वीकारून ' उजळावया आलो वाटा ' अशी ग्वाही दिली आणि ते अहर्निश कार्यरत झाले.

तुकारामबोवांनी आत्मोद्धाराची साधना करताना मनुष्यस्वभावाचे बारकाईने निरीक्षणे केले. समाजात वावरताना समाजाचा सूक्ष्म अभ्यास केला. समाजाच्या अंगाप्रत्यंगाचा त्यांना सामाजिक जीवन जगताना प्रत्यय आला. समाजपुरुषाची नाडी त्यांनी आकळली. परंपरागत नीतिमूल्यांची धमनी जाणली. आणि ' रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग । अंतर्बाह्य जग आणि मन ' असे असताना सुद्धा जगकल्याणासाठी ते अविरत झटले. त्यांच्या आचारविचाराची हीच धारणा होती. हीच एकमेव प्रेरणा होती. तुकारामाचे साहित्य जरी विवेचक दृष्टीने परीक्षिले तरी सामाजिक अधिष्ठान असल्याचे निदर्शनास येते.

तुकयाचा अभंगगाथा जरी सहज चाळला तरी अशी कितीतरी टपोरी मोती हाती लागतील, की ज्यात सामाजिक मनाचे प्रकटन झाले आहे. अशी किती तरी हिरेमाणके गवसतील की ज्यांच्या प्रकाशशलाकेतून समाजाचे अंतःकरण प्रतिबिंबित झाले आहे. असे किती तरी तत्त्वज्ञानाचे परीस सापडतील की ज्यांच्या केवळ स्पर्शाने लोहाचे सुवर्ण बनेल. किती तरी प्रवाह आढळतील की ज्यात लोकव्यवहाराचे दिग्दर्शन ओतप्रोत भरून उरले आहे. कितीतरी निर्झरांचे दर्शन घडेल की, ज्यातून तुकारामाच्या विशाल अंतःकरणातील आकाशाला गवसणी घालणारी विचारसरणी पाझरते आहे. अशा तऱ्हेने तुकोबांच्या अभंगवाणीतून अनेकविधत्व झरते आहे. मात्र त्यांनी या बहुत्वातून जगकल्याणाचे एकत्व घडविले आहे नी गाठले आहे.

समाजाचे अवलोकन करीत असताना - " बुडता हे जन न देखवे

डोळा ' अशी त्यांची सहानुभूतिमय गती झाली. अशा भलत्याच वाटेला लागलेल्या संभ्रमित लोकांना पाहून ' येतो कळवळा म्हणवूनी ' त्यांनी ' दयेसाठी केला उपाधि पसारा ', ' आम्हा हे कौतुक जगा द्यावी नीत ' असे आपल्या अंतरंगातील भाव व्यक्त केले आहेत. ज्याप्रमाणे ' यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ' त्या वेळी खऱ्या धर्माचे रक्षण करण्यासाठी, नैतिक बलसंवर्धनासाठी परमेश्वर अवतार धारण करतो, त्याचप्रमाणे -

आम्ही वैकुंठवासी । आलो याची कारणांसी ।
धर्म रक्षावयासाठी । करणे आटी आम्हांसी ।
वाचा बोलों वेदनीती । करू संती केले ते ।

हे आपले परमेश्वर पुरस्कृत कार्य, त्यांनी विशद केले आहे. हे त्यांचे कार्य केवळ कालिक नसून-

' मागे बहुत जन्मी । हेचि करीत आलो आम्ही ' असा स्पष्ट पुरावा तुकोबांच्या अभंगातून मिळतो. केवळ टाळकुट्यांचाच आरोप तुकारामावर केलेल्या सारस्वतकारांची टीका यापुढे कितपत टिकाव धरू शकेल !

जगकल्याणासाठी उपदेशकाची व सुधारकाची भूमिका स्वीकारून धर्माभिमान, धर्मनीती, चित्तशुद्धी, सदाचार यांची माहिती लोकांना त्यांनी पटविली. स्वतःच्या आचारविचारांचा आदर्श बहुजन समाजासमोर ठेवून त्यांनी लोकमानस सुसंस्कृत व कार्यप्रवण केले. मानसिक उन्नती साधली. हे त्यांचे महान विधायक कार्य कोणता जाणकार नाकबूल करील ?

ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात, त्याचप्रमाणे समाज-कार्यालाही दोन बाजू असतात. समाजधुरीणांना व जातिवंत सुधारकांना दोन्ही भूमिकांतून कार्य पार पाडावयाचे असते. तुकारामांनीही विधायक भूमिका जितक्या यशस्वीरीतीने हाताळली तितक्याच तडफदारवृत्तीने विध्वंसक भूमिकाही पार पाडली. जसे ' परित्राणाय साधूनां ' परमेश्वर भूतलावर जन्म पावतो, तसेच ' विनाशायच दुष्कृताम् ' अवतरतो. तुकाराम महाराजांनी डोळसपणे तोच मार्ग अवलंबिला.

' धर्माचे पाळण । करणे पाखांड खंडन ' ही द्विविध भूमिका त्यांनी स्वीकरून ' दुर्जनाशी पंचानन । तुका रजरेणु संतांचा ' अशी न्यायनिष्ठुरता धारण केली.

' दया तिचे नाव भूतांचे पालन । आणिक निर्दाळण कंटकांचे ' या

उद्‌गारापाठीमागे कोणती प्रेरणा आहे ? निवृत्तीची की निष्क्रियतेची ?

जो जो, जे जे मागे ते ते देऊ ।
भले तरी देऊ गांडीची लंगोटी ।
नाठाळाचे काठी देऊ माथा ।

' मायबापाहूनी बहु मायावंत । करू घातपात शत्रूहुनि ' याप्रमाणे तुकोबांच्या अंतःकरणात भल्यांच्याविषयी नितांत आदर, सहृदयता होती, तर दुष्टांच्याविषयी कटुता भरली होती. ते जितके शांत तितकेच आक्रमक होते.

तिक्ष्ण उत्तरे । हाती घेऊनी बाण फिरे ।

या आत्मविश्वासपूर्ण तडफेने समाजातील विघातक रूढींवर नीतिमूल्यांवर निकराचा हल्ला चढवला. समाजात बांडगुळाप्रमाणे मूळ धरून राहिलेल्या दंभाचा स्फोट करून भोंदूपणा त्यांनी वेशीवर टांगला. तत्कालीन दांभिकपणाने सारा समाज बुरसटला होता. भोंदू लोकांच्या निंद्यकर्मांनी समाज त्रासला होता, या सर्वांची बिंगे चव्हाट्यावर आणून तुकोबांनी त्यांचा तीव्र निषेध केला.

टिळा टोपी, माळा देवाचे गबाळे । वागवी निराळे पोटांसाठी ।
गोसाव्याच्या रूपे हेरी परनारी । जयाच्या अंतरी काम लोभ ।
होऊनी संन्यासी भगवी लुगडी । वासना न सोडी विषयाची ।
द्विज चहाड झाले चोर । विकी स्नानसंध्या जप ।

अशी भोंदू संतांची पापे, कुकर्मे बाहेर काढायलाही त्यांनी कमी केले नाही.

लांबोनिया जटा नेसोनी कासोटा । अभिमान मोठा करिताती ।
सर्वांगी करिता विभूती लेपन । पाहती मिष्टान्न भक्षावया ।

या वाघाचे कातडे पांघरून लोकांना फसविणाऱ्या ढोंगी लोकांचा त्यांनी खरपूस समाचार घेतला आहे.

शाक्त गधडा जये देशी । तेथे राशी पापाच्या ।

याप्रमाणे त्यांनी शाक्त पंथियांचे तर वाभाडे काढले आहेत, तसेच ' कौडी कौडीसाठी फोडीतीती शीर । काढूनी रुधीर मलंग ती ' अशी

मलंगांच्यावर कडक टीका केली आहे,

' वेताळे फेताळे । जळो त्यांचे तोंड काळे ' यासारखे आत्यंतिक उद्वेगाने काढलेले उद्‌गार याच संतकवीच्या काव्यात आढळतात.

याचप्रमाणे कान फाडून मुद्रा घालणारे नाथपंथी, सर्वांगाला विभूती फासून पोटासाठी दारोदारी शंख वाजविणारे जंगम फकीर, पोटभरू कथेकरी या सर्वांची तुकाराम महाराजांनी प्रकर्षाने हजेरी घेतली आहे.

लोकांना फसवून नी लुबाडून पोट भरणाऱ्या संधिसाधू लोकांच्यावरच त्यांची मेहरनजर (?) नव्हती तर समाजाला सतावणाऱ्या दुर्जनाला पाहिले की, ते ' येथे पैजाराचे काम ' आहे असे जाणून ' दुर्जनासी पंचानन ' बनत.

दुर्जनाचा मान । सुखे करावा खंडन ।
लाता हाणोनिया वारी । गुंडवाट शुद्ध करी ।
होईल तैसे बळ । फजीत करावे ते खळ ।

अशा रीतीने मार्गात येऊन विघ्नसंतोष मानणाऱ्या दुष्टांना शासन मिळालेच पाहिजे असे ते बजावतात. दुसऱ्यांना विनाकारण त्रास देणाऱ्या परपीडकांचा त्यांना भयंकर संताप येतो.

माझे संतापले मन । परपीडा ऐकोन ।

दुसऱ्यांना त्रास देणारे दुष्ट हे ' परपीडक तो आम्हा दावेदार ' असे मानून त्यांच्यावर ते इतका निषेधाचा वर्षाव करतात की -

तुका म्हणे किती । करू दुष्टांची फजिती ?

हे एवढे क्षमाशील संतशिरोमणी तुकाराम महाराज परंतु दंभ व दुष्ट दिसल्याबरोबर त्यावर हिरीरीने तुटून पडतात. त्यांच्या जहालपणामुळे तिखट भाषा तोंडून सहजगत्या निघून जाते.

' मऊ मेणाहूनि आम्ही विष्णुदास ' असे म्हणणारे तुकाराम महाराज प्रसंगी असमंजस असे वाक्ताडन करतात. पण त्याची कधी त्यांनी खंत बाळगली नाही. हे सर्व एकाच भावनेच्या पोटी आहे. कारण ते आपला बाणा व्यक्त करतात.

' तुका म्हणे फांसे, वाघुरा, कुऱ्हाडी । प्रसंगी जो काढी पारधी तो.' हे त्यांचे धोरण, ही त्यांची मतप्रणाली औचित्यपूर्ण अशीच आहे. किंबहुना

ते म्हणतात, वेळ पडल्यास ' लासू ' फासू देऊ डाग '.

तुका म्हणे सांडा देखीचे दिमाख । मोडसीचे दुःख गांड फाडी ।
कथा करी वाटी वारी । थू थू त्याच्या तोंडावरी ।
तुका म्हणे लंड । त्यांचे हाणोनि फोडा तोंड ।
कन्यो गो करी कथेचा विकरा । चांडाळा तो खरा तया नावे ।

यासारखे निषेधात्मक बोलीतून साकार झालेले अस्सल आणि इरसाल नमुने जिव्हारी झोंबल्याशिवाय राहात नाहीत. अशी मर्मभेदक दाहकता तुकोबांच्या ठिकाणी तीव्रतेने वसत असलेल्या लोकोद्धाराच्या तळमळीतून ज्वलंत रूप घेऊन पैदा झाली आहे. याप्रमाणे तुकोबारायांनी आत्मोद्धाराबरोबरच बहुजनोद्धाराचे लोकोत्तर कर्म अंगिकारले आणि ते तडीस नेले.

हा परिवर्तनशील सामाजिक अधिष्ठान असलेला समाजोन्नतीचा उज्ज्वल ध्येयवाद ज्याने कळसास पोहोचविला त्याच्या माथी केवळ ' महाराष्ट्राने नामामृत प्यावे व टाळ बडवावे असे सांगणे हेच तुकोबांचे ध्येय ' असा शेरा निखालसपणे मारावा यासारखा तुकोबांचा अन्य दैवदुर्विलास तो कोणता ?

पण ज्या तुकयाचे अभंग अजूनही जनसागरात अभंग आहेत, नवोर्मीने तरंगत आहेत, सहस्रमुखांतून स्रवत आहेत, कृतींतून उतरत आहेत, सुभाषिताच्या सौंदर्याने नटत आहेत, जीवानुभूतींचे दर्शन घडवीत आहेत, जीवनदर्शनाबरोबरच उद्‌बोधन करीत आहेत, नवोन्मेषाने ज्यांची अभंगवाणी नटली आहे, फुली फुलून आली आहे, ज्यांचे ' सहज बोलणे हित उपदेश ' त्या महाराष्ट्राच्या अंतरंगात दडी मारून बसलेल्या द्रष्ट्या तुकोबारायांनी मात्र केव्हाच निस्पृहपणे सांगून टाकले आहे.

निंदी कोणी मारी । वंदी कोणी पूजा करी ।
मज हेही नाही तेही नाही । वेगळा दोहीपासुनी ॥

□ □ □

५

ग्रामीण साहित्य : अपेक्षा आणि उपेक्षा

लोकसंस्कृती, लोककला, लोकसाहित्य प्रस्तरातून जन्म घेतलेली वारणामाय, आणि निळ्या भव्य आभाळपटाला शिरावर पेलून, चराचरांसाठी उभा असलेला कणखर सह्यगिरी यावर प्रेमभाव ठेवणाऱ्या रसिक बंधु-भगिनींनो,

हे वारणामाईच्या आणि सह्यगिरीच्या आंब्याफणसांच्या हिरव्या निळ्या मुलखातील भरणारे पहिलेच संमेलन. या पहिलटपणाच्या संमेलनाचा अध्यक्ष मला केलंय. खरं तर हे फारच झालं. आपलं माणूस असलं म्हणून काय झालं. आपल्या माणसाची थट्टा करायची म्हणजे किती. अध्यक्षपदाइतकी ! अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षाच्या मोलाची डॉ. आनंद यादव यांच्यासारखी जाणती लेखक मंडळी इथं असताना माझी अध्यक्ष म्हणून निवड करावी, हे तर भाल्यालाच गवत फुटावे असं झालं.

हे लग्नाचेच दिवस. लग्नकार्य वेळेवारी उरकायचं असलं की, कुणाच्यातरी नावानं आधी जातक काढावं लागतं. ज्याच्या नावानं जातक काढलं जातं, तो मोकळा म्हणजे बिनकामाचा. म्हणजेच सहज हाती लागावा असा असावा लागतो. सहज हाती लाभणारं माणूस शेजारचंच असावं, अवसानातलं असावं, धरलं बकुटीला की मांडवात उभं करावं. सोंग

सजविल्यागत. पण एक आहे. लग्नाआधी वाजत गाजत येण्याचा पहिला मान मात्र जातकवाल्याचा असतो. एकदा वाजत गाजत आला, मुहूर्तमेढ रोवली की, उभ्या लग्नात मिरवण्याचे मानपान बाकीच्यांचे. पंगतीलासुद्धा या जातकवाल्याचं ध्यान कुणी करीत नाही. बिचारा आपला सगळ्यांचं नटणं मुरडणं कुठं तरी कोपऱ्यात बसून टकाटका बघत बसतो. इतरांना मांडव झळा चढत असतात. आणि हा आपला एकाच चिंतेत, - ' जातक आपल्या नावाचं, सारं शुभ मंगल होऊ दे म्हणजे झालं- ' करणारे करतात. पण ह्याचा जीव उगाच काळजीत.

असो. जातक तर माझ्याकडं आलंय. आपल्या सर्वांच्या दिलाशावर आणि संमेलनातील निरनिराळ्या सत्रांसाठी उपस्थित असलेल्या मातब्बर साहित्यिकांच्या भरवशावर ही न पेलणारी जबाबदारी स्वीकारीत आहे. वरच्या टांगत्या तलवारीकडं तुमचं लक्ष असू द्या म्हणजे झालं. मुहूर्तमेढ तर रोवून झालीय.

हा चरण गाव तर माझ्या जीवनातील मंगलपर्वासारखा. बालपणापासून माझ्या चिमुरड्या पावलांना गुलमुसागत असलेली इथली तांबडी माती चिकटलीय. ती माझ्या मनात आभाळीचा चंद्रच कोरून ठेवणारी ठरलेली आहे. इथल्या वाटा, पायवाटा, आडवाटा, डोंगरवाटा, मळवाटा आणि वळणावरच्या वाटा नी घुसवाटाही इतरांची नजरबंदी करून मलाच इशारे करणाऱ्या. इथलं हिवाळ्यातलं धुकं चकवा करून गेलंय तर उन्हाळी धुरकट आकाशी ढगांनी डोंबलं, करवंदाची नी आंब्याफणसांची रसाळ स्वप्नं उभी केलीत. इथल्या धुवांधार कोसळणाऱ्या पावसानं अथांग पसरलेल्या पाणलोटाचं रौद्रभव्य दर्शन घडवलंय. इथली उभं आभाळ भोवंडून टाकणारी वादळं, आकाश हादरणाऱ्या नी धरणी दुभंग करणाऱ्या आकाश वीजा, डोंगराला गिळून टाकणारे तडतडणारे वणवे, मस्तीतल्या पैलवानांचे किनारे हादरून टाकणारे बलिष्ठ मुंडे, गोड गुळचट वासानं घमघमून निघणारी नी ' बोला पुंडलिक वरदा हरी विठ्ठल ' या गजरात काहिली उतरणारी गुऱ्हाळं, गावा-गवंडावरीची भिरस्ती भुतं, इथल्या काळजाला हुरहूर लावणाऱ्या जत्रा, जत्रांतले गुलजार तमाशे आणि तमाशातल्या गौळणींच्या लाडिक रुसव्यांच्या ' तू ग ऐक नंदाचे नारी । काल दुपारी । यमुनेच्या तीरी । किती सोसावी याची मस्करी । गेंद कुस्करी । थट्टा याची भारी । घाली धिंगाणा । रोज

इळसारी । ' या गोड तक्रारींनी भारून गेलेलं जत्रेचं वातावरण.

' देवाचा देव बाई ठकडा । देव एका पायानं लंगडा ' अशा अभंगांनी रंगणारी भजनं, ' हा देह जाणार जाणार । त्याला काळ बा खाणार ' अशी सांगणारी कीर्तनं, खिल्लार खोंडांचे नी कोकणी वाणवळ्याचे उरूस या साऱ्यांची बदलती भिंगं नी त्यातलीही बिंगं माझ्या चांगली परिचयाची.

इथल्या माणसातला भाबडा जिव्हाळा आभाळालाही झुकायला लावणारा डोंगराएवढी दुःखं राईएवढ्या सुखात बुडवून चैत्रातही बहरणाऱ्या चाफ्यासारखी बहरणारी माणसं. माझ्या नात्यागोत्यातली. सहज फुंकर मारली तर तांबड्या मातीवरही सुंदर रांगोळ्यांची देखणी नक्षी फुलारत जावी अशी मातीची मशागत करणारा इथला शेतकरी - तो अडाणी असला तरी नुसत्या नजरेनंच चराचरावर नोंदलेल्या शतकांच्या इतिहासाच्या पानापानांचा अर्थ लावत जाणारा आणि वळणावळणावर नवी पेरणी करीत जाणारा एक भाष्यकार आहे.

इथला आपला एवढातेवढासा संसार सांभाळत राहणाऱ्या चंद्रमौळी कौलारू घरातल्या मानिनी-

' हे बाई थोरलं माझं घर । हंड्या ग्लास लोंबत्याती ' अशा मानणाऱ्या श्रीमंत मनाच्या.

इथल्या वाघिणी तर,

'उभ्या मी गल्ली गेले । माझ्या उभारीचं रंग
खाली बस पाप्या । छाती हुईल तुझी भंग.'

अशा मूल्ये जपणाऱ्या आणि कणखरपणे पाप्याला सांगणाऱ्या धारदार, लखलखत्या विजाचं.

या मातीतली नाती तर कशी -

'बाजाराच्या वाटं भाऊ भैनीला भेटला
वळवाचा पाऊस ढग अस्मानी फुटला'

अशी खळखळून, उचंबळून येणारी, अस्मानी ढग फुटल्यासारखी ममता आजच्या युगात अन्यत्र न मिळणारी, पण तो इथल्या मातीचा जीवनरंग आहे ! या साऱ्यांचं जगणं, मोहरणं जिथं घडतं तो हा मुलूख. ' मोहना बटाव ' च्या तमाशा वगात वर्णन केल्याप्रमाणे-

'बोरं बाभळी । चिंचा जांभळी आंब्याची बनं
पळस पांगोरा । न्यारा त्याचा वाण ।
कारी करवंदी, डुले तोरणी ।
नेर्ली, डोर्ली अळू गोंदणी । तुतू शेरणी ।
निकुंबी, गजगा चिल्लारी काटं लागती
फणस झाडावर झोकं घेती ।'

असे मनाला अंतराळी फणसासारखं झोकं घ्यायला लावणारं डोंगररान. जगबुडी कशी होते नी विलक्षण नवनिर्माण कसं घडतं याची किमया दाखविली. इथल्या अस्सल जीवंत झऱ्यानं बळ दिलं. बदलत्या निसर्गानं. जीवनाचे अर्थ बदलून घ्यायला शिकविलं. नवी जाण ध्यानात घ्यायला लावलं. नसानसात एक जागती सळसळ निर्माण केली.

माझ्या पहिल्या कथेचा जन्म या इथं-पलिकडं- विरळे गावात झाला. ती ' स्वराज्य ' साप्ताहिकात प्रसिद्ध झाली. इथल्या दर्शनानं कानात वारं शिरलं. पूर्वीची गाजरपारखी नजर आता अक्कलहुषारीनं न्याहाळू लागली. अनेक कथा, इथल्या फराऱ्यांच्या बदलत्या जीवनावर लिहिलेली ' गस्त ' ही कादंबरी, चांदोली धरणाने उद्ध्वस्त झालेल्या धरणग्रस्तांच्या जीवनावरची ' देवाची साक्ष ' ही कादंबरी. 'गावाकडची माती, चंद्रबनातल्या सावल्या-' हे ललित लेखसंग्रह आणि ' अंगाई ' चित्रपटाची निर्मिती हा इथल्या खणखणीत मातीचा वसा आहे. गगन कवेत घ्यायला झेपावणाऱ्या पाखराच्या इवलाश्या पंखात मूळ मातीची लाभलेली घरट्यातली ऊब महत्त्वाची असते. ती ज्याला मिळते तो शिवधनुष्य उचलावयाची इर्षा बाळगतो.

केव्हा कोण्या काळी कोण्या डोंगरवाटेने वाल्याचा वाल्मिकी केला, खोडाला पालवी फुटली. आणि इथल्या चरण वाटांनी माझ्यासारख्या चंद्रमौळी घरातल्या बावऱ्या पोराचा चंद्रकुमार केला.

बरे झाले. या सहित्य संमेलनाच्या निमित्ताने मनी साठलेलं ऋण व्यक्त करायला संधी मिळाली. आपण मला बोलतं केलं. बोलावंसही वाटलं, कारण एका ओवीत म्हटल्याप्रमाणे,

'अंतरीची गोष्ट सये हुरदी साठविली
बया मालनी वाचुनी कोण काढील तिची किल्ली !'

हे संमेलन ज्या भागात भरत आहे, त्यालाही एक इतिहास आहे. त्याचं एक खास करून व्यक्तिमत्त्व आहे. व्यक्तीच्या जीवनात संघर्षाचे ताण-तणाव असतात, ते जसे साहित्याचा विषय होऊ शकतात, तसेच एखाद्या प्रदेशाचे संघर्षमय, अनाकलनीय जीवन हेही साहित्याचा विषय ठरणारे असते. त्याचा शोध घेणे, त्याची ओळख करून घेणे प्रतिभावंतांचे अपरिहार्य काम ठरावे. या मुलखालाही नियती आणि राजसत्ता यांनी पुतनामावशीसारखी भयकारी रूपं दाखविली आहेत. त्यात भरडत स्वतःच्या जीवनाला उभारी देत आलेला, परिवर्तनाचे अनेक उंबरठे पाहिलेला हा डोंगर देश आहे. याचा बाणाच वेगळा आहे. सतत एका विलक्षण द्वंद्वात सापडलेले इथले जीवन आहे.

केव्हा कोण्या काळी दख्खनचा ज्वालामुखी धगधगला. अग्निरसानी प्रलय मांडला. तेव्हा अग्निरसाच्या ज्वाळा अंगावर झेलीत जन्माला आलेला हा वारणाखोरा. त्या अग्निरसाची रसरशीत भूषणे देहामनावर जडवून या अवतीभवतीच्या डोंगरमंडळात आयुष्य भोगणारा, स्वातंत्र्याची सूक्ते गाणारा हा वारणाखोरा, डोंगराच्या माथ्यावर स्वतःच्या कर्तृत्वाच्या पताका रोवणारा हा जंगली मुलूख. क्रांतीच्या रणशिंगाचेच शिरपेच ज्यांच्या शिरावर शोभतात ते इथले सह्यपुत्र. संघर्ष हा इथल्या मातीचा जीवनबिंदू. कधी भीषण निसर्गाशी झगडा, तर कधी नियतीच्या छळनाट्याशी झगडा. क्रांतीची, चलेजावची पडघम वाजण्याला इथेही चुकली नाही. छातीवर रोखलेल्या परसत्तेच्या संगिनी जेरबंद झाल्या त्या इथं. ' लेंगे स्वराज्य लेंगे ' म्हणत ' स्वराज्य मिळवायचं औंदा गं । म्हणून कारभारणी सोडलाय धंदा ' अशी गाणी गात इथल्या वाड्याहुड्यातला, झाडापेडातला डोंगरी माणूस पेटून उठला होता. ' वंगाळ काळ लई आला । कंगाल शेतकरी झाला ' अशा गीतांनी विळ्याकोयत्यांना धारी लावल्या होत्या. इथली जाळी नी जाळी क्रांतिकारकांची धगधगती गुहा बनली होती. म्हणूनच गोऱ्या सत्तेला धार्जिणे राहून स्वकीयांच्यावर अन्याय करणाऱ्यांची भरदिवसा नाकं कापली, चौक्या लुटल्या आणि दीडशे वर्षाची जुलमी राजवट खिळखिळी केली. म्हणूनच देशाच्या स्वातंत्र्याचा तिरंगी झेंडा दिल्लीच्या आधीच सतरा वर्षे या वारणाखोऱ्यात फडफडला. ब्रिटिश सत्तेच्या न मावळत्या सूर्याला तेव्हाच ग्रहण लागले. या पौरुषाच्या क्रांतिकार्यातही स्त्रियांचा वाटा फार मोठा होता. त्यांनी चोरून पाठविलेल्या शिदोऱ्यांवर तर क्रांती पोसत होती. ठिणगी पडत होती. ' चले जाव ' ची घोषणा घुमत होती.

इथल्या मातीच्या रोमारोमातून एका विजयंत्या क्रांतिपर्वाचा जन्म झाला होता. परसत्ता साता समुद्रापार गेली. स्वातंत्र्य मिळालं, आता राज्य आपलं आलं, स्वराज्य झालं. आपली अपुरी स्वप्नं पुरी करायची. इथलं युग आपणच घडवायाचं. स्वातंत्र्याच्या उत्सवात रमले असताच एक नवा संघर्ष सरकारी दप्तरात जन्माला आला. आणि इथल्या पहाडाचा, वाऱ्याचा नी तांबड्या मातीचा थरकाप उडाला. कमरेच्या कोयत्यानं वाघाच्या छातीवर वार करणाऱ्या बुलंद माणसांची काळजं थरारली.

इथं वारणंला धरण बांधून काळालाही थोपवून इथलं जीवन सुखी, समृद्ध करायचं होतं. पण खुजगाव की चांदोली या वादानं इथल्या डोंगरवाटांची स्वप्नं उद्ध्वस्त केली. पूर्वीचा लढा परसत्तेशी होता. आता हा लढा स्वराज्यात स्वसत्तेशी होता. चक्रावून टाकणारा होता. नवी झुंज सुरू झाली. पाण्याच्या सागरात नाहक बुडता बुडता ह्या एवढ्या मुलखातले संसार वाचले. एका वेगळ्या युद्धाचं रणांगण इथं जितं जागतं नांदत होतं. काळ वंगाळ आला होता. तप, दीडतप एका विलक्षण कोंडमाऱ्यानं सर्जनाचं चक्र थांबल होतं. एका अंधारयुगाचा भयानक वावर सर्वांची सुख शांती नष्ट करून टाकीत होता. यामुळे हा भाग पन्नास वर्षे मागे लोटला गेला.

आता कुठं या चक्राला गती आली आहे. नव्या परिवर्तनाचे नवे नवे हुंकार उमटायला लागलेत. चांदोली धरणामुळे मनं उभारीला आली आहेत. नवे पाणी, नवा प्रकाश, नवा पोत, आशा पोसतील. भौतिक वृद्धी होईल. पण मनामनाला तरारी येणं आवश्यक आहे. ती आता येऊ लागली आहे. पालट घडू लागला आहे. नवी पिढी डोळसपणे शिकते आहे. तिच्या भुका वाढू लागल्या आहेत. त्यातील एक भूक संस्काराची. नव्या जीवनदर्शनाची. जगाच्या मोलात स्वतःला तोलायची. म्हणूनच हे साहित्य संमेलन. सर्वांच्या भेटीचं अगत्य. रसिकांच्या, कलावंतांच्या, वाचकांच्या समधारणेचा सुंदर योग.

पूर्वी खेड्यापाड्यात, दूरवर पसरलेल्या राना-आडरानातील माणसापर्यंत पोचलेल्या अनेक लोककला मानवी जीवनावर संस्कार करीत. कलेच्या दर्शनातून लोकशिक्षण आपोआपच घडे. त्यातून घडणारे प्रबोधन हे देवालयाच्या अंतर्गाभाऱ्यातील शांत, मंदपणे तेवणाऱ्या नंदादीपाप्रमाणे घडे. सणासुदीच्या निमित्ताने, मंगल प्रसंगाच्या वेळी किंवा सुगीच्या हंगामात हे लोककलाकार आपल्या अंगभूत कलेच्या माध्यमातून लोकजीवनात पोचत.

वर्षावर्षांच्या या अतूट नात्यानं ही संस्काराची वाहती गंगा वाहातच राही. मग गावागावात अवतरणारे गुबूगुबू वाजत येणारे नंदीबैल असोत, नाहीतर संसारातल्या भांडणाचे चित्र रस्त्यावर मांडणारा माकडांचा खेळ असो. इथून ते डोंबारी, गारुडी, वासुदेव, मारुती, कडकलक्ष्मी, पोतराज, मनकवडी, कावडकापडी, बैरागी, गोसावी, फकीर, कोल्हाटीण, कोकंवाला, मुंबयवाला, बंगाली जादूवाला, बहुरूपी, दांगट, वाघ्यामुरळी, गोंधळी, कुडबुडे जोशी असे किती तरी गावजागराचे मानकरी होते. भेदिक लावण्या, भजनं आणि कीर्तनं, सुंदर वाद्ये यांची पवित्र परंपरा लोकमानस उदात्त बनवीत. सत्स्वरूप दाखवत. हा साराच लोकजागर आता थांबला आहे. फिरत्या यंत्रातील कळ नाहीशी व्हावी नी ते शेवटचे आचके देत थंडावत जावं तसं घडलंय. त्याला कारण ही आजकालची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती आहे. गेल्या तीस वर्षांत अनेक बदल घडले. परिवर्तनाच्या दिशा बदलत गेल्या. वैज्ञानिक युगाचा झपाटा अत्यंत वेगाचा झाला. औद्योगिक यंत्रतंत्राची गतिमानता खेड्याच्या आरपार पोचू लागलीय. शिक्षण आणि प्रचार माध्यमांनी यांत्रिक युगाचीच तुतारी फुंकलीय. जातिव्यवस्थेतून निर्माण झालेली सामाजिक घडी उसवत निघाली. त्यामुळेही सर्वांना सर्व क्षेत्रे खुली झाली. सर्व स्तरांतील मुलं शिकू लागली, अर्थावलंबी जीवन व्यवहार सुरू झाला. जुन्या परंपरा सांभाळीत बसण्याचे दिवस संपले. परावलंबी, परदास्याची कवचकुंडले फेकून देण्यात स्वत्वाची अस्मिता मानली जाऊ लागली. जो तो आपली वाट शोधू लागला.

पण एक गोष्ट दूर करीत असता त्याची पर्यायी व्यवस्था होणे गरजेचे असते. आजच्या ग्रामीण जीवनात कलाअंगांच्या दृष्टीने कोरडेपणा निर्माण झाला आहे. गोंधळात सापडलेल्या समाजाला योग्य संस्कार करणारी दुसरी व्यवस्था उरलेली नाही. ही निर्माण झालेली उणीव साहित्य संमेलनांनी भरून निघण्यासारखी आहे. भागाभागात छोटी छोटी साहित्य संमेलने भरली तर कलाविष्काराचा, कलादर्शनाचा, चिंतनशील मार्गदर्शनाचा फायदा होईल. त्या त्या परिसरातील समूह मनाला काही आकार गवसेल. चर्चा परिसंवादातून प्रबोधन घडेल. शाळांमधून घडत असलेल्या नव्या पिढीला मन भरून बरंचसं काही टिपता येईल.

नाही तरी साहित्य हे जीवनात निखळ आनंद देऊन जीवन उन्नत

करीत असते. सामाजिक उत्थापन घडवीत असते. जे जे सत्य, शिव, सुंदर यांचीच उपासना करायला सुचवीत असते. नवनिर्माणाची क्षमता वाढण्यास प्रेरक ठरत असते. समाजाला एका समान विचार- भाव पातळीवर आणण्याचं काम साहित्य नकळत का होईना करीत असते. प्रतिभावंतांना पडलेले एक सत्स्वप्न पुरं व्हावं अशी त्यांचीही धारणा असते. जे जे न्याय्य, त्याची प्रतिष्ठापना जनामनात व्हावी अशीच कांक्षा असते. ज्ञानेश्वरांनी ' जो जें वांछील तो तें लाहो ' असं उगाच नाही म्हटलं. कलेच्या नावाखाली प्रबोधनाचा सवतीमत्सर करणं कालौघात टिकणारही नाही. आजतरी ग्रामीण जीवनाचीच नव्हे तर संपूर्ण देशातील परिवर्तनाची गती कोणी रोखू शकणार नाही. या काळात समाजमनाला विचाराची दिशा देणे निकडीचे आहे. हे आज तरी फक्त साहित्यच करू शकेल. मनाची मशागत करण्याचे सामर्थ्य साहित्यातच आहे आणि हा अनादिकालापासूनचा वारसा आहे.

रामायण, महाभारत ग्रंथांची लोकमानसात रुजलेली शतकांची ताकद आजही आपण अनुभवत आहोत. नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, रामदासी इ. सांप्रदायांच्या साहित्याने महाराष्ट्र मनाची शुचिता परिपोषली आहे. शाहिरांच्या पोवाड्यांनी नसा नसा तापविल्या आहेत.

साहित्याने एकदम क्रांती होत नसेलही, पण तिच्यासंबंधीची जागृती प्रभावी साहित्याद्वारे होऊ शकते. ज्या ज्या अनिष्ट चालीरीतींनी मानवी जीवन अधःपतित झाले, सामाजिक रूप विकृत बनत गेले, त्या त्या कालबाह्य अनिष्ट अरिष्टांना साहित्याने लोकांसमोर मांडले. लोकजीवन निकोप राहण्यासाठी लोकमत दक्ष राहिले, अशी अनेक उदाहरणे आपल्याला पाहायला मिळतात. श्रेष्ठ साहित्य हे लोकजीवनाचे नी समाजमनाचे भान टाळू शकत नाही. सामाजिकतेचा संदर्भ दूर ठेवू शकत नाही. ते अपाततःच घडत असते. कारण कोणतीही साहित्यकृती तत्कालीन लोकजीवनातूनच जन्माला येत असते. कोणतेही लेकरू ' आई ' विसरू शकत नाही. तसेच साहित्यही लोकजीवनाची भूमी विसरू शकत नाही.

फ्रेंच राज्यक्रांतीचा उद्‌गाता रूसो याने आपल्या ' सामाजिक करार (Social Contract) ' या ग्रंथात ' मनुष्य हा जन्मतःच स्वतंत्र आहे. पण प्रत्येक ठिकाणी साखळीने बांधला जात आहे (Man is born free but everywhere he is in chains.) ' हे वाक्य तत्कालीन लोकजीवनाची नस पकडूनच लिहिले, आणि हा ग्रंथ वाचणारांच्या मनात वैचारिक ठिणगी पडली.

ह्या एका वाक्याने फ्रान्समध्ये राज्यक्रांती घडविली.

म्हणूनच कोणतेही साहित्य हे लोकसंचिताचेच रूप असते.

ख्यातनाम हिंदी लेखिका अमृता प्रीतम एका आपल्या लेखात म्हणाल्या आहेत, ' लेखक अपने समाज की चेतनताका नाम है । ' पुढे त्या म्हणतात,

' कला का कर्म जब चेतना बनता है, चिंतन बनता है, तो जिंदगी का चमत्कार हो जाता है । वह इस मिट्टी की आत्मा बन जाता है, वह अपने लोगोंकी, मनके सुखदुःख की आवाज बन जाता है ।

आवाज - जो इन्सान की इन्सानियत तक पहुंचे
आवाज - जो समाज के जमीर तक पहुंचे
आवाज - जो वक्त के कानून तक पहुंचे '

आज बदलत्या खेड्यांनी अनेक समस्या उभ्या केल्या आहेत. वृक्षतोडीनं दुष्काळाला घरात आणलं. अन्नपाण्याविना गावं उठू लागली. जिथे जिथे धरणं झाली तिथली गावंच्या गावं रानोमाळ झाली. त्यांच्या पुनर्वसनाचे प्रश्न जीवन-मरणाचे ठरले. नवा अस्थिर, भटका समाज तयार झाला. सोयरिकी होईनाशा झाल्या. लाखाच्या पोशिंद्यांना चव्हाट्यावरचं जिणं आलं. शिक्षणाने तर वेगळाच डाव मांडला. खेड्यातील मुलं शहरात शिकू लागली. तिथल्या शिकलेल्या मुलीशीच लग्न करू लागली. शहरातच राहू लागली. खेड्यावरचे अडाणी आई-बाप यांच्याशी असलेली नाती तुटली. घरं फुटली. मातीतल्या हातावरची स्वप्नं विरघळून गेली. शिक्षणातून आलेली बेकारी, दुबळेपणा, खोटी प्रतिष्ठा यांनी तर जीवन लुळंपांगळं केलंय. राजकारणाने चालविलेल्या खेड्यातील भयनाट्य नी सूडनाट्य यांनी नवे गट आणि तट पाडले. नव्या स्वरूपात भेदाभेद (हीही अस्पृश्यताच) पैदा झाले. नगरंही फुटली नी खेडीही अस्ताव्यस्त झाली. चालू गावकीच्या बाराबलुतेदारांचा आणखी नवा पेच खेड्यातल्या ममतापूर्ण जीवनाला गिरमीट लावीत बसलाय. शिक्षण, छोटे उद्योग, सुधारणा, विज्ञानप्रसार यांनी भर घातली असली तरी नवे ताणतणाव, नवे संघर्ष यांनी बरंचसं काही हरवून टाकलंय. काही सामाजिक कायद्यामुळं माणसातली पशुता आणि क्षुद्रता उघडी पडलेली दिसेल. आजच्या शैक्षणिक विना अनुदान तत्त्वांतील डोनेशनमुळं गोरगरिबांच्या शिक्षणाचे दरवाजे बंद झाले आहेत. पानिपतच्या युद्धात नवलाख बांगडी फुटली असं बखरी सांगतात- पण आजच्या शिक्षणानं किती लाख घरांचं पानिपत केलंय हे कोणा बखरकारानं सांगण्याची गरज नाही. या साऱ्याचा शोध संवेदनाशील,

चिंतनशील साहित्यिकांनी घेण्याचा आहे. इतक्या विलक्षण घटना आणि चमत्कारिक, विचित्र मानवी नमुने, भलभलत्या जीवंत व्यक्तिरेखा, त्यांच्यातील भावसंघर्ष हे नव्या लेखकांना आव्हान आहे. बाई, बाटली, पाटील ही पुराणातली वांगी झालीत. हा तोचतोचा परीघ फोडून जरा अंतर्मुख होऊन डोकवा, तिथं श्रीकृष्णाच्या तोंडातलं ब्रह्मांड दिसेल.

सामान्य माणूस भयचकित झालेला आहे. एक अशांत अस्थिरता आणि अस्वस्थता व कित्येक वेळा सर्व क्षेत्रातील असुरक्षितता जाणवू लागली आहे. अनेक समस्या उभ्या केल्या जात आहेत. आणि या सर्वांतून मानवी मनालाच भुलवून टाकणारे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. अशा अवस्थेतच नवी पिढी शिकते आहे. बाहेर पडते आहे. बेकार होते आहे. मृगजळामागं धावते आहे. आपल्या व्यथा, होणारा अन्याय बोलू लागली आहे. धिटावा वाढू लागला आहे. यातूनच नवखा लेखकवर्ग पुढे येतो आहे. त्यांना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. नाही तर थिटे, खुजे, सुमार, बरड, वरकड बाह्यांगावर बेतलेले, प्रसिद्धीसाठी हावरट बनलेले, बाजारू, ग्रामीण जीवनाचे विकृत चित्रण करणारे ढोबळ साहित्य जन्माला येण्याची शक्यता टाळता येत नाही.

बरंचसं ग्रामीण साहित्य म्हणून लिहिलेलं कृत्रिम असते. तोचतो पारंपरिक ग्रामीण रंगेल व रगेलपणा, तेथील फसवणुकीचे डावपेच केवळ हसवणुकीसाठी लिहिले जातात. ग्रामीणांचं विकृत चित्रण करणारे आपणच असतो. ग्रामीणांचं नाहक आणि फालतू चारित्र्यहनन केलेलं असतं. जणू खेड्यातील स्त्रीपुरुषांना बेरकीपणा आणि लैंगिक चाळ्याशिवाय दुसरं काही सुचतच नाही. सहकार, शिक्षण, राजकारण हा भाग तर ओंगळपणानंच भरलेला आहे असं ग्रामीणेतरांना वाटावं. केवळ खुसखुशीत रंजनासाठी असे बेतलेले किस्से म्हणजे साहित्य नव्हे हे उत्सुक तरुणपिढीने ध्यानात घेतले पाहिजे. पुस्त्या काढण्यापेक्षा आणि कित्ते गिरवण्यापेक्षा, 'हीणा' चीच 'वीण' करण्यापेक्षा ग्रामीण जीवनाच्या कातळातील ओलावा शोधावा, तिथल्या मनातली खळबळ, अंतःकरणातील धग टिपावी. त्यांच्या व्यथा वेदनांच्या जहरी खोलातील आच भोगून पाहावी. लिहिता येतं म्हणून लिहू नये. आणि जे लिहिलं ते 'अक्षर' मानू नये, कलेची म्हणून जी शक्ती सुप्त असते (तिला प्रतिभाही म्हणू) ती आपल्या मनःकोषात सहज उमलत यावी अशी आपली मानसिक अवस्था आपण निर्माण केली पाहिजे. मृगाचा पाऊस पडला की अंकुर हुंकारत येतात ते उगाच नाहीत, हे साधं इंगित अडाणी

शेतकऱ्यालाही माहिती असतं. म्हणूनच तो घाम गाळून उन्हाच्या वणव्यात शेतीची मशागत करण्यात रमलेला असतो. त्याची ती सर्वसाक्षी एकरूपता ही सर्जनाचीच असते. अडाणी शेतकऱ्याला भावलेलं हे गणिताचं एडताक आम्ही इतकी बुकं शिकलो तरी सुटत नाही. कळत नाही. त्या बुकात त्याचं उत्तर सापडतही नाही. ते तुकोबाला कळलं, चोखोबाला कळलं, जनाई, सोयराईलाही कळलं, म्हणूनच ' कण वाळूचे रगडिता तेलही गळे ' या पाझराचा झरा उमगतो.

जे अनुभवलं असेल, जगलो असेल, भोगलं असेल, अवतीभवतीच्या आखंडात जे डोळसपणे पाहायला मिळाले असेल, असे जे अस्सल, वास्तव, जीवंत अनुभव असतील त्यावर कलात्मक डूब देऊन आत्मविश्वासाने लेखणी हाती धरावी. काल्पनिकांच्या अवडंबराला आवर घालावा.

अंतरीच्या कळा सहज स्वभावे प्रगट व्हाव्या म्हणून, सकसपणा लाभावा यासाठी वाचनाची गरज आहे. व्यासंग झपाटून केला पाहिजे. जे जे हाती येईल ते नव्हे, पण जाणीवपूर्वक, चोखंदळपणे वाचले पाहिजे. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, कृषिशास्त्र इ. विषयांचाही मानवी जीवनाच्या संदर्भात अभ्यास केला पाहिजे. त्यावर चिंतन केले पाहिजे. व्यक्तिमत्त्वात रिचविले पाहिजे. पण आज आपल्याला या वाचनव्यासंगाचे त्यासाठी करावयाच्या कठोर परिश्रमाचे दुर्भिक्ष्यच जाणवते. दुर्दैवाने शाळांतील वाचनालयांना अखंड टाळेबंदी असते, तर महाविद्यालयातील ग्रंथालयातून विविध प्रकारची नाकेबंदी असते. खासगी वाचनालयातून तर चांगल्या पुस्तकांना बंदी असते. आणि आजच्या टी. व्ही., रेडिओ, व्हिडिओ जगात आपण पुस्तकांना शोभेच्या वस्तू म्हणून ठेवून देत असतो. विदग्धता या नावाची चीज कोषात राहिली तरी मिळविली, अशी वस्तुस्थिती उरलीय. ज्यांना लिहायचंय त्यांनी खूप व्यासंगाने आपले मन-बुद्धी खरपूस भाजून घेतली पाहिजे. (वि + दग्ध) कुंभाराच्या अव्यातलं मडकं आगीतून भाजून निघालं की, कसं खणखणीत बोलतं. तसे आपल्या जीवनडोहातील अनुभवही कसे सच्चे, जीवंत, रसरशीत असले पाहिजेत. मग त्यामध्ये बेंगरूळपणा, विरूपता उरत नाही. मातीचा पोत अस्सल असला की, भरल्या हंगामाची सोनसळ काय तोट्याची!

एक खंत मात्र जरूर बोलाविशी वाटते.

ग्रामीण, दलित साहित्य एका उमाळ्यानं आणि उफाड्यानं मराठी साहित्याचा चेहरामोहराच बदलून टाकीत आहे. उंबरठ्यातून दिंडी

दरवाजापर्यंत नी लोकलपासून ऑफिसपर्यंत येरझाऱ्या घालणाऱ्या साहित्याला मराठीत समीक्षकांची वानवा नाही. पण ग्रामीण साहित्याला, त्याचा म्हणून, त्या जीवनचित्रणाची नाड असलेला, त्या भाषेची आंतरशक्ती जाणणारे समीक्षक नाहीच म्हटले तरी चालेल. ही एक फार मोठी उणीव ग्रामीण साहित्याच्या वाटचालीच्या संदर्भात जाणवल्याशिवाय राहू शकत नाही. एखाद दुसरा समीक्षक दिसतो, तोही अंग चोरून, स्वतःला सुरक्षित ठेवून, नागरसाहित्याच्या समीक्षकांनी ज्याचं नाव घेतलं त्याच नावाभोवती लेखणी बाटवताना दिसतो. नव्या उमेदीच्या लेखकाच्या पाठीवरून हात फिरला, तर त्याच्या ठायी अदम्य उत्साह येतो. पण या नव्या लेखकाचा शोध घेण्याची वृत्तीही समीक्षकात नसते.


एक मात्र खरे की, दलित साहित्याला समीक्षक लाभले. आधी आतले आणि मग बाहेरचेही. ललित लेखकाबरोबरच त्याची समीक्षा करणारे समीक्षकही लाभणे गरजेचे आहे. समीक्षेने साहित्याचा विकास होण्यास मदत होते. सामाजिक अभिरुचीच्या वृद्धीच्या दृष्टीने ती अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. यापुढच्या काळात हे घडेल याची आशा बाळगण्यास काही हरकत नाही.

अलीकडं अनेक विद्यार्थी भेटतात, होतकरू लेखक भेटतात, हातात नांगरीचं रुमणं धरणाऱ्या जुन्या पिढीची नवी पिढी हातात लेखणी धरू लागलीय. निरनिराळ्या समाजसमूहातील मुलं तलवारीसारखी वाणी वापरू लागली आहेत. चांगलं घडतं आहे. नवे पीळ, नवे गुंते, नवे अनुभव साहित्यात येताहेत. मखरच बदलून निघालंय. शतकांच्या भिंतीत छिनलेल्या नजरा बेबंद होऊ लागल्यात. आणि त्याठायी विजा चमकताना दिसत आहेत. म्हणूनच माझा अधिकार नसताही, आपुलकीपोटी, थोडी वाट चालून आल्यावर मागून येणाऱ्याला सावध करावे या निर्मळ भावनेने हे बोललो. आपणही मला समजून घेत होता म्हणून हृदयीच्या गाठी उकलून दाखविल्या.

ज्यांच्यासंबंधी माझ्या मनात अपार आदर आहे, त्या कै. बाबूराव दादा चरणकर या क्रांतिकारकाच्या नावाने उभारलेल्या या साहित्य नगरात मला एवढा वेळ उभा राहता आलं, याचंच समाधान आहे. या क्रांतिकारकांची बलशाली स्वप्नं तुमच्या आमच्या उरात स्वाभिमानाचं तेज फुलत ठेवोत ही तीव्र इच्छा.

(अध्यक्षीय भाषण : पहिले वारणा साहित्य संमेलन, चरण)

□ □ □



६

तमाशा : अस्सल मराठी वाण

तमाशा म्हटले की कानावर हात ठेवून पैंजणबद्ध उजव्या पायाने ठसका मारून ' ऐका हो ऐका ' ची नर्तकीने मारलेली हाक लकेर घेऊन श्रोत्याच्या अधिऱ्या हृदयात घुसते आणि त्याला अस्वस्थ करून सोडते. त्या हाकेला देशी वाद्यांनी दिलेली साथ व पायांतील पैंजणांच्या मंजुळ नादाची खुलावट श्रोतृवर्गाला बेहोष व धुंद करून सोडते. आसमंतातील अवघे वातावरण मंत्रमुग्ध होऊन भारून गेलेले असते, त्यामुळे !

तमाशाचा फड म्हटला की त्या फडाकडे पंचक्रोशीतील आबालवृद्धांच्या झुंडीच्या झुंडी भेदभावाला तिलांजली देऊन लोटत असलेल्या आढळतात. तमाशापुढे त्यांना कशाचा पाड. त्यांची तहानभूक हरपते. रोजची पाठीमागची कर्मकटकट साफ विसरून ते ऐकत बसतात. त्यांची हृदयं उचंबळून आलेली दिसतात. तमाशातील नर्तकीच्या नाचाबरोबर जागच्या जागी ते ताल धरतात. गाण्यानं गुंगतात, लावणीनं रंगतात, सुरावटीनं झुलतात, सवालात खुलतात, वाद्याच्या साथीत डोलतात, सोंगाड्याच्या 'देशी वाणा' नं खळखळून हसतात आणि वगाबरोबर वाहतात.

अशा प्रकारे जनसमुदायाला रिझविणाऱ्या, त्यांच्या भावनांना आवाहन करणाऱ्या तमाशाकडे काही लोक बहिष्कारित दृष्टीने पाहतात. त्यांच्यावर

अश्लिलतेचा, अशिष्टतेचा आरोप केलेला आढळतो.

पण तमाशा हा सामान्य लोकांसाठी व त्यांच्याच जीवनाधिष्ठित असल्याने त्या कलेला या भूमिकेतून जावे लागले आहे याचा प्रत्यय येतो. रोजच्या जीवनक्रमात बहुजन समाज गुंतून पडलेला असतो. जीवनराहाटीच्या कालचक्रात तो पिसला जात असतो. दिवसभराच्या कामामुळे शिणलेल्या जिवाला, दमल्याभागल्या मनाला खेड्यासारख्या ठिकाणी करमणुकीचे साधन मिळणे दुर्मिळ ! त्याच त्याच कर्मकटकटीने त्यांचे मन विषण्ण बनलेले असते. अनेकविध नैराश्याने त्यांचे जीवन खच्चून भरलेले असते. जीवनवैफल्याने त्यांचा आशाभंग झालेला असतो. अशा वेळी माणसाचं मन कुढत असतं, पिचत असतं आणि अखेर त्याच्या जीवनबासरीतून बदसूर निघण्याचा दाट संभव असतो.

या स्थितीत लोकमानसाला व अंतःकरणाला उल्हसित करण्याचे, त्याच्या ठिकाणी जीवनोत्साहाचा आविष्कार करण्याचे रंजनात्मक साधन हवे असते. याच भूमिकेतून विषण्ण, निराश बनलेल्या, शिणलेल्या जीवाचे रंजन करण्यासाठी ' ऐका हो ऐका ' ची जीवनदायी मोहक हाक घुमली. ती मरगळलेल्या अंतःकरणाला जाग आणणारी संजीवक अशी ठरली. डफ-तुणतुणे पुढे सरसावले. नर्तकीच्या पायांतील पैंजण झणझणले. विजेच्या चापल्याने अंगाभोवती लकेरी घेत नेत्रकटाक्षाने श्रोतृवर्गाला दिलखुष करीत, डोळ्यांना लुभावणारे अंगविक्षेप करीत नर्तकी लोकसमूहापुढे आली. मोहक वाद्यांनी साथ दिली. आणि हसता हसता पुरेवाट करणाऱ्या सोंगाड्याच्या जोडगोळीने त्यात रंगत भरली आणि बहुढंगाने चित्ताचा ठाव घेणारा तमाशाचा फड लोकजीवनाच्या आविष्कारातून रंजन करण्यासाठी उभा राहिला.

रंजनासाठी आसुसलेल्या समाजाची पकड घेऊन नवचैतन्य व जीवनोत्साह निर्माण केले या तमाशाने !

तमाशातील लावण्या सामान्यातील सामान्य मनुष्यही अत्यंत आवडीने व आत्मीयतेने गुणगुणत असतो. ज्या गोष्टीविषयी आपलेपणा नसेल, जिव्हाळ्याचा, जीवाभावाचा संबंध नसेल ती गोष्ट इतक्या लोकप्रियतेपर्यंत कशी पोहोचू शकेल ? तमाशाचा वरील आद्यहेतू लक्षात घेतल्यावर या प्रकाराकडे टीकात्मक दृष्टीने पाहून त्याला हिणकस म्हणण्याचे प्रयोजनच उरत नाही, आणि आजकाल तमाशाला- अर्थात ज्याचा - ' लोकनाट्य ' असे

नामाभिधान करून गौरव सरकारने केला आहे- त्यातील अश्लिलता नष्ट करून चांगले रूप देण्याचे प्रयत्न होत आहेत, करीत आहेत व उत्तरोत्तर हा उपक्रम यशस्वी होत आहे.

आनंदनिर्मितीबरोबरच सांप्रतंच्या सामाजिक प्रश्नांवर व जीवनमूल्यांवर प्रकाश टाकून अज्ञ, अजाण खेडुतांनाच काय पण शिकल्यासवरल्या लोकांनासुद्धा राष्ट्रकाजाकडे उद्युक्त करण्याचे विलक्षण सामर्थ्य या हाकेत आहे.

पण तमाशाचा अशा कारणासाठी उपयोग करून घेताना त्याचा जो जीवनहेतू ' लोकरंजन ' तो कायम ठेवून त्यातूनच लोकोद्धार साधला पाहिजे. नाहीतर जर त्याचा आद्य हेतू कलेचा ओलावा नष्ट केला जाईल व त्याला उद्‌बोधनासाठी गंभीर रूप दिले जाईल तर मात्र तमाशाची प्राणसूत्रेच नष्ट केल्यासारखे होईल! म्हणून तमाशा जो हेतू घेऊन निर्माण झाला, ज्यासाठी त्याची वाढ व विकास झाला, त्याचसाठी तमाशा म्हणून जिवंत राहिला पाहिजे. त्याच्या रंजनकलेतच लोकशिक्षणाच्या विलक्षण सामर्थ्याचे खरे इंगित आहे.

आणि म्हणूनच तमाशा हा ज्यासाठी जन्म पावला तोच रंजकतेचा मूळ हेतू प्राधान्याने समोर ठेवून तदनुषंगिक जीवनाविष्कार व उद्‌बोधन करणे आजच्या तमाशाचे इतिकर्तव्य राहिले पाहिजे व 'तमाशा' म्हणूनच तो जिवंत राहिला पाहिजे !

सांप्रत तमाशासारख्या कलेद्वारा लोकरंजनाबरोबरच लोकशिक्षणाचा हेतू साधण्यासारखा आहे. पण काही टीकाकार 'कलेसाठीच कला' या प्रश्नावर जोर देऊन कला ही जीवनासाठी राबवू नये असे प्रतिपादन करतात. तमाशासुद्धा एक कलेचा प्रकार आहे. म्हणून केवळ कलेसाठीच त्याचा आविष्कार असावा काय? पण कलेची बंधने पाळून, कलात्मकता साधून जीवनानुभवाचा आविष्कार करायला कोणती हरकत आहे कलेला ?

यासाठी तमाशाचे मूल्यमापन करावयाचे झाल्यास त्याची पूर्वपीठिका नि पूर्वपरंपरा पाहूनच त्याची मूल्ये ठरवावयाला हवीत.

पूर्वकाली लोकगीते ही सामान्य लोकांतील लोकांनी व सामान्य लोकांसाठी लोकभाषेत रचलेली असत. आपलीच म्हणून गायली व ऐकली जात असत. कडू औषध द्यावयाचे व रिचवायचे असेल तर साखरेसारख्या गोड पदार्थातूनच ते द्यायला हवे. हा दृष्टिकोण अनेकांनी ठेवला असल्याचे दिसून येते.

तीच गीते बहुरूपी, गोंधळी, भराडी, भांड यांनी उचलली आणि सामान्य जनापावेतो प्रसृत केली. ती म्हणताना टोकली, एकतारी, डोर, संबळ, डफ ही अस्सल बहुजन समाजाची वाद्ये वापरून, अभिनयासह आपल्या खास वैशिष्ट्यांद्वारे विनोद निर्माण करून समोर बसलेल्या श्रोत्यांची ते करमणूक करीत. त्यातूनच अध्यात्मासारखे औषध आपोआप त्यांच्या गळी उतरे. यांसारख्या लोकगीतांनी लोकस्थितीचे दर्शन घडवून खेड्यापाड्यांतील खालच्या थरांतील लोकांपर्यंत लोकोद्धाराचे कार्य केले आहे. हीच पुढील प्रगत तमाशाकलेची पूर्वरूपे होत !

ज्या संबळ, ढोलकी, डफ या वाद्यांनी एका काळी अज्ञानात व कर्दमात पिचत पडलेल्या समाजाच्या कानी जयघोष करून त्याला जागृत केले, ज्या देशी वाद्यांनी तलवारीच्या खणखणाटाला आणि घोड्यांच्या टापांना साथ देऊन शिवरायाच्या आनंदवनभवनात वीरश्रीचे नवचैतन्य निर्माण केले, त्याच संबळ, ढोलकी, डफ या लोकवाद्यांनी मराठेशाहीच्या अर्थात पूर्व पेशवाईच्या उत्कर्षापकर्षाबरोबर शृंगारिक गीते तालात गाणाऱ्या नर्तिकेच्या पायांतील पैंजणांना व ' ऐका हो ऐका ' च्या हाकेला साथ दिली. पेशवाईत साम्राज्य उत्कर्षाला पोहोचल्यावर तर ऐषआरामी जीवन शिगेला पोहोचले आणि नाच-तमाशांच्या फडांना बहर आला. किंबहुना रामजोशी, अनंतफंदी यासारख्या व्युत्पन्न ब्राह्मणांपैकी कीर्तनकारांनी हातांतील चिपळ्या बाजूला सारून नायिकेच्या पैंजणाच्या झणत्काराला डफावर र्ल थापेची साथ देऊन तमाशाचा फड उभा केला !

याच वेळी लावणीबरोबर तमाशा जन्माला आला तो विशेषतः लोकरंजनाचा हेतू समोर ठेवूनच. त्यामुळे तो बालांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचे रंजन करून त्यांच्या जीवनवैफल्यामुळे निराश बनलेल्या मनाला सुखद विरंगुळा देऊन त्यांना जीवनाभिमुख बनवणारा चैतन्यदायी ठरला. तमाशाचा लोकरंजन हा आद्य हेतू असला तरी रंजनातूनच जीवनदर्शन व उद्‌बोधन या गोष्टी झालेल्या आपल्या निदर्शनास येतात. जात्याच कलाकार असलेल्या कलावंतांना आपल्या कलेच्या जोरावर जनसमुदायाला रिझवीत, त्यांना उत्साही करीत, नकळत त्यांच्याच जीवनसमस्यांवर प्रकाश टाकून सामान्यांच्या जीवनाला वळण लावण्याची हातोटी साधण्यासारखी आहे. सामान्य लोकांच्या जीवनातील वस्तुस्थितीवरच व मानवी भावनांना स्पर्श करून जाणाऱ्या वास्तवदर्शनावरच

तमाशाची जडणघडण होते. म्हणून तो लोकप्रिय झाला व लोककला म्हणून नाणावला !

तमाशाची लोकप्रियता पाहून आपल्या सरकारचे लक्ष तिकडे वेधले गेले आहे. आपला देश स्वतंत्र असला तरी जोपर्यंत खेड्यापाड्यांत विखुरलेली जनता प्रबुद्ध होत नाही तोपर्यंत सरकारी तत्त्वज्ञान कितीही व्यापक व प्रगतिशील असले तरी त्याचा प्रसार ठोकळमानाने कितपत होईल याची शंकाच आहे. म्हणून दूरवर झोपड्या-खोपटांत, शेता-माळावर, कडे-कपारी नवयुगाची-नव सुधारणेची पावले वळवली तरच आपला भारत प्रगतिपथावर येईल. तेव्हाच नवभारताची उभारणी होईल. या उभारणीसाठी प्रथम लोकजागृतीची आवश्यकता आहे. यासाठीच तमाशासारख्या कलेतून रंजनाद्वारे जीवनदर्शन घडविणारी प्रभावी शक्ती उपयुक्त आहे. विखुरल्या गेलेल्या समाजाला हल्ली आपल्या राष्ट्राच्या योजना समजावून सांगायच्या आहेत. अनेक नैतिक बलाच्या मूल्यांची जाणीव करून द्यायची आहे. या जाणिवेतूनच भारताचा नागरिक असलेल्या व्यक्तीच्या ठिकाणी राष्ट्राविषयी आपुलकी, आत्मीयता निर्माण करून लोकराज्याची व तदनुषंगिक येऊन पडणाऱ्या सहकार्याच्या कर्तव्याची जबाबदारी काय आहे ह्याची पूर्ण कल्पना करून द्यावयाची आहे. वरच्या थरापासून खालच्या थरापर्यंत नव विचारधारा निर्माण करून आपल्या नवराष्ट्र निर्मितीची नवी जाणीव करून द्यायची आहे. यासाठी सर्व लोकांपर्यंत जाऊन पोहोचणाऱ्या ' ऐका हो ऐका ' च्या हाकेची जरुरी आहे. ही हाक प्रत्येक माणसाच्या अंतःकरणाला आवाहन करून जागवणारी कलाकाराची हाक ठरणारी आहे.

तमाशा एक वास्तव अनुभव -

महाशिवरात्रीच्या या महोत्सवाबरोबरच गावोगावच्या जत्रांचं पेव फुटायचं. जत्रा म्हटली की तमाशाचं मोठ्ठं आकर्षण असायचं. वर्षभराच्या श्रमानं शिणलेल्या मनाला तेवढाच विरंगुळा वाटायचा. हुरूप यायचा. शेताभातात काम आटोपता आटोपता कानावर जत्रेच्या बातम्या यायच्या. वाखाचं पेंडकं आणता आणता मांगाचा पिरादा सांगायचा, ' यंदा फिफिऱ्याला बाबू कुपवाडकराचा तमाशा येणारै '. तर कोकरूडच्या बाजाराला जाता जाता ' मांगरुळला छोटेखान आणणार हायीत, ' असं चंदर बत्तासेवाला म्हणायचा. तर ' बिळासकर वेलावंडकराला कालच सुपारी देऊन आलं ' असं बापू

पोस्टमन फुसकी सोडायचा. त्याच्यावर ताण करीत नामू मास्तर बतावणी करायचा, ' भाऊ मांगाची नी छोटेखानची समोरासमोर खडाजंगी होणारै. '

' कुठं ? ' कुणी तरी उत्सुक होऊन विचारायचं.

' बोरुड्यावर. '

' कोण म्हणतं ? '

' राजा. '

' राजा ? कोण राजा ? '

' छोटंखानच्या तमाशातला. भजी खात होता हाटेलात. '

' कोण कोण ? '

' राजा आणि नारूआप्पाच्या फडातली नाची. काय नाची हाय म्हणता. नाची म्हंजे नाची. खुडून घ्यावी अशी. तर तिथं बोलणं चाललं होतं. अशानं असं. '

' कोशा पटका ठेवणार हायीत म्हणं मदी. '

' छ्या...छ्या. मग काय तोडीस तोड उडणार, '

' नारूआप्पाच्या फडात किती नाचे हायीत गा ? '

' तीन. दोन पोरी आणिक एक पोऱ्या नाच्या. '

' आन त्यो पोऱ्याच त्या नाचीसनी उरी हुता. काय नाचायचं तिची भणं. इज खेळायची पायात इज येड्यानू. '

' आगा ती टपोऱ्या डोळ्याची पोरगी नव्हती का ? ती झालीती तेच्यावर फिदा नि गेली दोघं पळून. '

' मंजी वाकुर्ड्याच्या तमाशासारखा फड फुटणार म्हणा. '

' छ्या. छ्या. नारूआप्पा किती खमक्या. वगाचा टिपीरा लावला म्हंजी ऐकत ऱ्हावं... तर त्यो वशी लाडीगावकराच्या तमाशातल्या पोरीच्या नादावर हायी म्हणं. परवाच सोंगाड्या गळ टाकून आलाय. फितवलीय तिला. गण्या ढोलचीवाल्याचं नि लाडीगावकराचं कांद्याच्या जत्रंवर मी तू झालं म्हणे. तर ती दोघंबी येणार हायीत नारूअप्पाच्या फडात. '

एखादं म्हातारं वाहून गेलेल्या उन्हाळ्या-पावसाळ्यांचा हवाला देत म्हणायचं, ' आताचं कसलं तमास्ये घिऊन बसलायासा खुळ्यानूं. आमच्या येळंला बघायला पायजे हुतंसा. नुसती आठवण झालं तरी काळजाची घुंगरू हुत्यात. '

' म्हणूनच नाची मागनं हिंडण्यात चार वरसं घालीवली म्हणा तुम्ही.'

' नशा म्हणायची त्येला. नशा बाबानू. कुठल्याबी गोष्टीची नशा चढायला पायजे माणसाला. आरं शंभर जलाम घासलंसा तरी त्या चार वरसांतल्या चार दिवसांचं नखबी कळायचं नाही तुम्हासनी. ती चार वरसं म्हंजी ... ' म्हातारा बघता बघता हरवून जायचा. त्याची रंध्रं रंध्रं ' छुम छुम छनन छुम छुम ' बनायची.

जत्रा म्हणजे हौसमौज. सर्वांचेच नटाथटायचे दिवस. गोरगरीब जत्रंसाठी किडूकमिडूक विकून पैसं साठवी. गाठीला गाठ मारून ठेवी. जत्रंला जगाबरोबर घालायला मिळावं म्हणून अंगडं टोपडं शिवून ठेवी. धडशात धडसे कापड टिकवून टिकवून वापरीत. सणासुदीलाच काढीत. आम्ही मुलं तर आठ दिवस अगोदरच तयारी करीत असू. जत्रंतच गुरुजी दिसलं तर कलिंगडाची लालेलाल फाक देऊन गुंडाळायचं कसं, घरातनं निसटायचं कसं याचे मनसुबे रचीत असू. घरात काही काम सांगितलं तर 'बिळाशीला जत्रंला लावून देणार असशील तर हे करीन, ' अस आईजवळ खुतून बसत असू. तिला पेचात टाकत असू. मग आई आंजारायची, गोंजारायची, ' माझ्या बाबाला जत्रंला लावून देईन, ' असं म्हणायची. मग डोंगरावरनंसुद्धा उडी मारायला आम्ही तयार असायचे.

जत्रंचा दिवस जवळ येईल तशी नदीवर गर्दी वाढायची. धुण्यासाठी रीघ लागायची. साऱ्या दरडानं ऐल पैल कापडं वाळत घातलेली दिसायची. पांढऱ्या टोप्यांना भगवा रंग द्यायचे. पैरणीला निळी चढवायचे. पटक्यांना नारंगी रंग फडफडत राहायचा. ठेवणीतली कापडं निघायची. म्हारंपोरं कुळवाड्यांनी दिलेल्या धडूत कापडाला धुवून अंगाला येतं का बघायची. आलं की आभाळच गवसल्यासारखं वाटायचं. केंजाळाचा पाला नि काळी माती घासून कापडं धुवायची. साबण कुठला मिळायला. मिळाला तर एवढासा तुकडा पुरवून पुरवून लावायचा.

गाठुड्यात बांधून जुन्या काळपट पेटीत कोंबून ठेवलेली लग्नातली कापडं उनात घातली जायची. ठेवणीचं जरीकाठी लुगडं निघायचं. दांडीला बांधलेल्या लग्नातल्या कोशा पटक्याला कसरीनं भोकं पाडलेली नाहीत ना ते पाहिलं जायचं. अन् म्हाताऱ्या बायकांच्या नथीतलं मोती झळकायचे. सुरकुतलेल्या चेहऱ्यावर लग्नकळसातलं पाणी चमकायचं. घोड्यावरची वरात

आठवायची. सनई-ताशा वाजता राहायचा. रंगारंगांचा फुलबाजा फुलायचा ! अन् मग देवळावर दीपमाळ उजळायची .... लक्ष दिव्यांची !

जत्रंचं सांगावं पाहुण्यापैसनी गेलेले असायचे. आढ्यावर कावळे ओरडायचे. जत्रंच्या आदल्या दिवशीच नवं चेहरं दिसायचं. गाव पाव्हण्यांनी भरून जायचा. नवीन लग्न झालेली सासुरवाशीण तृप्त मनानं पण सुखद संकोचानं आपल्या ' ह्यांच्या ' बरोबर यायची. पदराआडून ' ही ' नजर ' त्या ' नजरेत गुंतून जायची. इतरांच्या नजरा चुकवूनच हे घडायचं सारं. पण मांजराला वाटतं, आपणाला कोण बघतंय.

' मामाच्या जत्रंला जाऊ या ' म्हणणाऱ्या भाचे मंडळींचा उत्साही दंगा केव्हाच येऊन पोचलेला असतो. डोक्यावर गाठोडं, काखंत एखादं शेंबडं, बोटाशी एखादं चिमणं, पदराला धरून चाललेलं एखादं लंगडं. भांडणं तंडणं करीत डोळाभर पाणी भरीत ती मनगटानं नाळ पुशीत मागनं येणारी एक दोन असा सारा पोरवडा सांभाळीत गुरफटलेली एखादी संसारी बहीण भावाच्या दारात येऊन उभी राही. ' कसं उगवलं उंबराचं फूल ' म्हणून कौतुकानं भावजय तुकडा ओवाळून टाकते नि त्या शेंबड्या पोरांचं पटापट मुके घेत राहते. भावजईची आपुलकी बघून या माहेरवाशिणीचे डोळे कृतज्ञतेनं भरून येतात. भेटता भेटता भावजय म्हणते, ' सकाळीच आड्यावर कावळा वराडला. तवापासनं डोळं वाटंकडं लागल्यात. हे तर सारखे आतबाहेर करायचे. आताच गेलंत भाईर. '

गावातल्या घराघरात उभं राह्यलाही जागा उरत नाही. एवढी अनोळखी माणसांची जत्रा फुटलेली असते. मग आमचा उत्साह अधिकच उतू जायला लागतो. उगाचंच इकडून तिकडे फिरावंसं वाटतं. परगावच्या पोरांच्या समोर मिरवावंसं वाटतं. आपला दिमाख दाखवावासा वाटतो. उगीचच प्रत्येक घरात डोकावून डोकावून नवं चेहरं न्याहाळावसं वाटतं. देवळावर घेतलेली पिपाणी जोरजोरानं वाजवत फिरावंसं वाटतं. तेवढ्यात गावात उतरलेली जत्रा देवळावर केव्हा भरते कळतच नसतं.

सांज परतायला लागली की, रंगाचं गाडं निघतं. पूर्वीचं मोठं गाडं शेरणाटीनं नि केळ कोंब्याच्या पांढरट खांबांनी आणि भरदार पानांनी सजविलं जातं. रंगीबेरंगी पताका लावीत. गाड्यात भले थोरले हौद निरनिराळ्या रंगांनी भरलेले असत. पुढे पंधरा ते वीस बैलगाड्या जुंपलेल्या असत. रेशमी,

जरीकाठी चित्रं काढलेल्या झुला, चकचकणारी भिंगांची बाशिंगं, पितळी तकतकीत, अणकुचीदार वळ्यावळ्याच्या शेंब्या, गळ्यात रेशीमकाठी गोंडा, घुंगराचा खुळखुळणारा पट्टा, पायात चांदीचं तोडं, साखळ्या, भारलेल्या ताईताचा काळा दोरा नि शिंगांच्या शेंब्यात रोवलेले लिंबू यांनी सजलेल्या त्या बैलजोड्या डोळ्याचं पारणं फेडायच्या. प्रत्येक गल्लीचा एकेक गाडा असायचा. रंग खेळत हे गाडं गल्ली गल्ली मिरवत यायचे. साराच जल्लोष असायचा. गाड्यापुढं ढोलक्या ताशा वाजत असायचा. धनगरांचे ढोल ' धडाडम् धडड धडाडम् ' करीत रंग भरायचे. हलगी कडकडायची. लेझमांचा ताफा दुडका खेळ खेळत खुमारी निर्माण करायचा. अन् गाड्यांपुढं तमाशाचा नाच्या रंग भरत राहायचा. शिंग निनादत राहायचं. माणसं रंगायची. जत्रंत रंग भरत राहायचा. बत्त्यांच्या प्रकाशात गाडं देवळावर येत. देवाच्या दारात रंग खेळला जाई. अंगाच्या-धुपाच्यात नि गर्दीत घुसमटलेला गाभाऱ्यातला श्रीरंग या रंगपंचमीत केव्हाच सामील झालेला असायचा.

देवळाच्या दारातील दीपमाळेवर दिव्यांची आरास पेटायची. गाभाऱ्यात घंटांचा गजर चाललेला असायचा. भाविकांनी देवाला नवसाचा वेढा घातलेला असायचा. मानकऱ्यांनी देवाची पालखी, अब्दागीर सजवलेली असायची. तरण्याताठ्या, तगड्या पोरांनी सासनकाठी मढवून उभी केलेली असायची. मग सभीन्याची वेळ व्हायची.

देवाची पालखी चांदीच्या नंग्या तलवारीच्या पहाऱ्यात देवळाभोवती फिरायची. पालखीवर गुलाल-खोबरं उधळलं जायचं. कुणी नवसाची चांदीची फुलं उधळत असत. ती वेचण्यासाठी पोरं, मोठी माणसंही गडबड करीत. ढकलाढकली होई. पुढे धनगरांचा खेळ गजा ढोलाच्या तालात चाललेला असायचा. सभीन्यात हळुवार मनाची माणसं अवतीभवतीचा अंधार विसरून जायची आणि अंधारातूनच तमाशाच्या ओढीनं परगावची माणसं देवळावर जमायची. तमाशा उभा राहायला वेळ असला तर घडीभर देवदर्शन व्हायचं. फड कुठं उभा राहणार याचा अंदाज घेतला जायचा. मोक्यावरची जागा बसण्यासाठी हेरली जायची. कुणी झाडावर बसतं. कुणी पायऱ्यांवरची जागा पटकावतं. कुणी अवतीभवतीच्या गडगज्यावर बसतं. काही बेरकी माणसं बत्तीजवळचीच जागा धरतात. टारगट पोरं हवी तशी ' लाईन ' धरून बसतात. कुणाच्या काळजात नाची रुतत असते, तर पटकंवाल्यांच्या कुठल्या घोळक्यात

तोंडातल्या पानाबरोबर 'सोंगाड्या' चघळला जात असतो. नाचीच्या तोंडातल्या विड्याचा रंग नुकत्याच मिसरूड फुटलेल्या जवानमर्दांच्या ओठांच्या लालीला चढत असतो. कुठे मथुरेच्या बाजारच्या गोष्टी निघतात तर कुठे तमासगिरांना आणायला गेलेला तात्या पाटील पानानं चोची रंगवून नाचीच्या पुढं पुढं कसा करीत होता, त्याची चर्चा रंगलेली असे. मग उत्सुकता शिगेला पोचते. गलका वाढतो. शिट्यांचा गजर घुमतो, अन् तेव्हाच 'काड काड कडाड् कड' अशी हलगी कडाडते. गलका एकदम शांत होतो. आणि एकाच वेळी ढोलकीवाल्याची ढोलकीवर बोटं नाचू लागतात. तुणतुणं वेग घेतं. झांज रंग भरते. सुरांची पेटी आपल्या धावत्या सुरांनी साऱ्या वाद्यांच्या सुरमेळाला गती देते. हलगी तापत जाते. कडाडत जाते. तोड्यावर धावते तोडे होतात. साऱ्यांच्या बोटांत वीज नाचत राहते. खूश झालेले 'पब्लिक' शिट्या वाजवत राहतं. अवघं वातावरण तापतं. उत्साहानं पेटून जातं. शिट्यावर शिट्या होतात. गावकुसाची वर्षभराची होती नव्हती तेवढी मरगळ पार झडून जाते.

ढोलकी, तुणतुण्याची धुमाळी प्रेक्षकांची मनं जिंकून मंदावता मंदावता धिमा ठेका धरते. अन् त्याच वेळी 'छुन्नुक छुन्नुक छर्रर्र !' असा पायांतल्या चाळांचा आवाज कानी पडतो. बघ्यांना हवं ते येत असतं. फेटे काढतात. नीट सावरून बसतात. बघे मंडळी तर चवड्यावर येऊन पाहात राहतात. उत्सुकता अधिरी होते. तेव्हाच पदर पडावाच्या शिडासारखा उंच आभाळात धरत, पाठमोरं नाचत- नाचत बघ्यांचं कुण्या देशी हरवलेलं गुलजार पाखरू येत असतं. छुन्नुक छुन्नुक तालातलं. ढोलकीच्या वेधक ठेक्यातलं, तुणतणं झांजंच्या मोहक सुरातलं, पाठमोरं नशेल रूप कैकांच्या डोळ्यांचं पारणं फेडीत, तर कैकांना घायाळ करीत समोर येत असतं. वाद्यांची लय वाढते. चपळ होते. पदराच्या शिडात वारं शिरतं. नाचीच्या अंगात नृत्य संचारतं. नाची गिरकी घेऊन विजेसारखी लकलकते. घुंगराचे पाय जमिनीवर ठरत नसतात. धुरोळा उठतो. नाचता नाचता साऱ्यांच्याच अंगात न आवरणारी नाचाची खुमारी चढते. नाचीवर नजर ठरत नाही. अन् तेव्हाच हवेत पटके उडतात. शिट्यांचा वर्षाव घुमतो. बघ्यांची छंदी काळजं नाचीच्या पायाखाली केव्हा अंथरली गेलेली असतात ते त्यांचं त्यांनाच माहिती नसतं. हा तर बेहद्द खुशीचा नाजूक सौदा असतो. खूश झालेलं पब्लिक वेडं होऊन म्हणतं, "कैक नाच्या बघितल्या, पण ह्या नाचीचा तोडाच न्यारा." तरतरीत, ठसठशीत,

गोलाईदार, आटीव बांध्याची, नजरेच्या विजेनं काळजं पेटवीत जाणारी, कलदार, अबलख चालीची, इष्कबाज भुवयांची, डाळिंब फुटल्या ओठाची, बावनखणीची, मराठमोळी ही मोहना पण तरीही ' नार नखऱ्याची ', सगळ्यांच्या काळजांचं जणू हे लाखमोलाचं झुंबरच ठरते.

पानाचं विडं रंगत जातात. नकळत्या आम्हासारख्या पोरांची बारकुली मनंही पार नादावून जातात. उगीचच ऐटीत बसावंसं वाटतं. मग गणराजाची आळवणी सुरू होते. विशिष्ट ढंगात ' हे गणनाथा, वंदितो आता, यावे सभेला ! ' किंवा ' लवकर यावे सिद्ध गणेशा आतमधी कीर्तन वरून तमाशा ' असं गणरायाला बोलावणं व्हायचं. मग गोकुळच्या गवळणी मथुरेच्या बाजाराला निघतात. सोंगाड्या नेसत्या धोतराचा सोगा डोकीवरनं घेऊन म्हातारी गवळण ' मावशी ' व्हायचा. तुणतुण्या, सुरते, ढोलकीवाला धोतराचे सोगे डोकीवर घेऊन व आपापल्या वाद्याचेच माठ डोईवर घेऊन इतर गवळणी बनायचे. नाचीही राधा बनायची. मावशी साऱ्यांना मथुरेच्या बाजाराला बोलवायची.

थाट करोनी, माठ भरोनी, घ्या गं सगळ्या शिरी
अगे जाऊ चला मथुरेच्या बाजारी ।
सोळा हजाराचा मोहरा
त्यामधी राधा गौळण तरी
चंद्रावळ दुसरी-इंद्राची परी ।

कुणी काय, कुणी काय घेतलेलं विचारायची अन् आपल्या माठाला चीर गेलेली सांगायची. तिथंच गोल गोल फिरत गवळणी मथुरेला निघायच्या. दुरून पेंद्या बघायचा, किसनदेवाला बोलावीत म्हणायचा, ' धावा देवा, आल्या, गवळणी आल्या. ' मग कृष्ण, पेंद्या गवळणींना अडवतात. गवळणी मावशीला विचारतात, ' मावशे ह्यो कोण गं ? ' मावशी किसनदेवाला खालवर न्याहाळून बघते अन् आपल्याच गालावर बोटं मोडीत म्हणते, ' वळकलं गं वळकलं ' गवळणी विचारतात, ' कोण ? ' मावशी म्हणते, ' त्यो गं त्यो - आयला त्यो ... एवढं गं कसं तुमाला वळकंना, त्योगं खालच्या वरच्या गल्लीच्या बोळात असलेला कोळसंवाला. ' असं सारं मिष्किलपणे घडतं, मावशीवर सारी जत्रा जाम खूश होऊन हसत असते. किसनदेवाची गावठी भाषेत जेवढी फटफजिती करता येईल तेवढी केली जाते. किसनदेव मग आपली ओळख करून देतात,

नंद गोकुळी, छंद लागला, नाद गौळणीचा गे ।
आदी नारायण, विष्णू ओंकार मी अवतार त्याचा गे ।

ओळख पटवून दिली जाते. राधेकडे अस्सल दान मागितलं जातं. राधा देवाला विनवते, ' किस्ना थाम थाम, वेते (येते) म्हागारी जरा थाम. ' कित्येक वेळा यशोदेकडे गौळणी तक्रार आणतात. ही तक्रार तर तशी लाडिक नि हवीहवीशी असणारी असते, गोड तक्रार करतात.

तू ग ऐक नंदाचे नारी । काल दुपारी ।
यमुनेच्या तिरी ग जी जी ग जी ।
किती सोसावं याची मस्करी । गेंद कुस्करी ।
थट्टा याची भारी । घाली बाई धिंगाणा रोज इळसारी ।

गणाचं गांभीर्य गौळणीनं घालवलेलं असतं. मावशीनं तर आपल्या मार्मिक विनोदानं प्रेक्षकांच्या मनातल्या ' अशा तशा ' गोष्टी झाडून काढून चांगलं अंजन घातलेलं असतं. खळाळून हसून झालेलं असतं.

गण गौळणीत रात्र संपते. मध्यान्ह होते. अन् मग वगाला सुरुवात होते. माणसं सावरून बसतात. वग पौराणिक अगर ऐतिहासिक असतो. कुणी भरजरी झगझगीत कपडे घातलेला दयाळू राजा बनतं, कुणी गाल्या राखलेला, भरदार मिश्यांचा क्रूर प्रधान होतं. कुणी डोळ्यांत सुरमं घातलेला, गालावर काळा डाग लागलेला प्रधानाचा साथीदार बनतं. उलटी बंदूक घेतलेला सोंगाड्या पेंगणारा शिपाई होतो. नाची पैठणी नेसून घागऱ्यांचा कमरपट्टा, चमकदार नथ लेवून ' राणी ' सरकार झालेली असते. वगाचा मुखडा सुरू होतो,

कुण्या देशात अमुक एक शहर ।
तिथे राज्य करी चंद्रसेन नरवीर ।
हत्ती घोड्यांचं कोट लष्कर ।
सेना मोठी... पर प्रधान त्येचा कपटी-

खड्या सुरात वाद्यांच्या तालावर वगाची धाटणी सुरू होते. सुरते कानाला हात लावीत चढ्या सुरात म्हणत, ' आरं राघू रं तू ... आरं राया रं तू ... आगं नारी गं तू ... आग मैना गं तू ... जी जी जी ग जी । ' चढत्या रात्रीबरोबर वग चढत जायचा. उतरत्या अंधाराबरोबर वगातले भावरंग उलगडत जायचे. उगवतीला झुंझरूक होऊन तांबडं फुटलं तरी काही कळायचं

नाही. चांगलंच उजाडून फटफटीत झालं की झाडावरची माणसं आश्चर्यानं म्हणायची - ' आरं उजाडल्यालं कळलंच नाही. चांगलंच भगाटलंय की ! ' असे वग रंगायचे. मग तो चिलया बाळाचा असो, की राजा हरिश्चंद्राचा असो, मीठाराणीचा असो की जाई राणीचा असो, कपटी सेनापतीचा असो, की कारस्थानी प्रधानाचा असो, नाहीतर मोहना बटावचा असो. काजव्यानं सूर्य गिळावा तसं वगानं अवघी रात्र यक्षनगरी करून टाकलेली असायची. बघ्यांच्या वर्षभराच्या मिळमिळीत जीवनाला एक नवा झणझणीत खमंगपणा आलेला असायचा. या राजाराणीच्या रंगमहालात नि त्या यक्षनगरीतल्या नर्तकीच्या पायातल्या छुनछुनणाऱ्या घुंगरात संसाराची दुःखं पार विरून गेलेली असायची. सोनेरी स्वप्नांना जाग यायची. सोंगाड्याच्या अरबट चरबट विनोदांनी तोंडाची बाभळी निघून जायची. नर्तकीच्या शृंगारचेष्टांनी घरची ' शेज ' रोमांचित व्हायची. राणीनं राजाला, ' बई नाथ, स्वामी... ' असं हळुवारपणे म्हटलं की राजाच्या ठिकाणी आपणच दिसायचे. लावणीतला ' सख्या, सजणा, राया ' शब्द कानी पडला की उगाचच इकडचं तिकडचं आठवून गालाला गुलाबी रंग चढायचा.

मोहना-बटावचा वग वर्षानुवर्षे ऐकत राहावा असा. त्यातल्या मोहनाचं वर्णन

मोहना नारीचं स्वरूप अनिवार । तनू सुकुमार ।
आलाया भार । फिरविती हात छातीवर ।
भिवया दोन्ही, चंद्राची कोर । ...स्वरूपाची आवई गेली दूरवर ।
चोहो देशावर । ... घोर कैकाला

ऐकून समोरच्या गड्याच्या जवानीला हुरहूर लागे. बटावचं

दिल्ली शहराचा बटाव झुरा बावरा ।
हजारात हिरा लाखाचा मोहरा ।
रूपानं गोरा । वय पंचवीस कवळा चेहरा ।
मुखी पानाचा रंगला विडा ।

हे चाललेलं वर्णन हे जणू आपलंच असं ज्याला त्याला वाटे नि वगाबरोबरच दंग होऊन जात. नगरच्या रूपखणी मोहनाला भेटायला निघालेला दिल्लीचा बटाव मार्ग कापीत येतो. त्याला वाटेत भेटलेल्या जंगलाचं वर्णन

खड्या चालीत सांगितलं जातं, ' बोर बाभळी । चिंचा जांभळी, आंब्याची बनं । पळस पांगीरा न्यारा त्याचा वाण । कारी, करवंदी, चार हेळकण । मुरमुटी मिरी गोंदणी, तुतु शेरणी । निकुंबी गजगा चिल्लारी चेंबटी काटं लागती । फणस झाडावर झोकं घेती ' असं ते गच्च झाडीचं गर्द वन तेही आडिंग्य वन लागतं. मोहना बटावाची भेट होते. एकमेकाला पाहून दोघंही मूर्च्छित पडतात, तेव्हा फुलाई माळीण घाबरून म्हणते, ' म्हणे बाई, करू गत काई, फिरविती लिंबू तोंडावरनं. ' नंतर आपल्या साजणाला लाल बागेत थांबायला सांगून मोहना जेवणाची तयारी करते.

करंज्या कापण्या केल्या तिनं ।
खाशा पानवड्या । कुरवड्या, सालपापड्या ।
लोनवड्या, भाटवड्या केल्या झटपटीनं ।
घाऱ्या, पुऱ्या आणि तेल चुऱ्या गुळशी,
हिंदुशी, फुरफुरी, फुल शृंगारी करी हौसेनं ।

ऐकून श्रोत्यांना मोहनाचं सुग्रणपण लोभस वाटतं.

तसेच एखाद्या वगातला राजा शत्रू चाल करून यायला लागलाय हे कळल्यावर राणीला म्हणतो, ' रानी सर्कार, तुमचं टकुरं फिरलंय काय ? अवो तिकुडं वैरी रानडुकरागत मुसंडी मारत आला हाय, आनि मी घरकोंबड्यागत चुलीजवळ बसू. माझी वाट सोडा. रानी सर्कार ही काय वाट आडवायची येळ होय. तुमी खुशाल वाकाळ कांबरून झोपा. ह्यो मी निघालो. ' मग खड्या चालीवर हात कानावर ठेवून राजा, राणी, हवालदार, प्रधान, सुरते सारेच म्हणतात,

मग राजा निघाला तातडीनं । घोड्यावर स्वार होऊन ।
सांगितलं परधानाला सैन्य काढा बिगीनं ।
लागले रस्त्याला हा हा हा जी जी गं जी ।
आरं राघू रं तू ग मैना तू ।

तमासगिरांना वगाचा कैफ चढतो. दुपारच्या भर बाराला डोक्यावर सूर्य आला की जत्रा भरगच्च भरते. तमाशाभोवती गर्दीचं कडं पडतं. वगाला जोरदार गती येते. जत्रेला खुमारीचा रंग भरतो. झाडाझाडांच्या फांद्या माणसांनी फुलून जातात. सोंगाड्याच्या विनोदानं खळाळून हसणारी जत्रा

चिलया बाळाच्या मातेचा शोक पाहून डोळ्याला पाणी आणते, तर हरिश्चंद्र-तारामतीचा वनवास बघून काळीज विरघळून जातं. विरहानं व्याकूळ होऊन गेलेली सखी परमुलखात गेलेल्या साजणाला ज्या वेळी आळवून आळवून

सजणा का धरिला परदेश । शृंगाराचा साज उतरला ।
नुकतीच भरली शेज । सजणा का धरिला परदेश ।

त्या वेळी अवघी जत्रा गहिवरून जाते. टिपीला आलेला वग बघता बघता संपतो अन् भैरवीसाठी सारे तमासगीर उभे राहतात अन् भैरवी आळवतात तेव्हा तहानभूक हरपलेली जत्रा मनातल्या आत आत हुरहुरून जाते. तमासगिरांच्या कलेचं कौतुक डोळ्यांत साठवते. अनामिक ओढीनं तिथं तिथंच खिळून मुग्धशांत होते. रात्रीपासून दुपारपर्यंत एका वेगळ्या जगाच्या दर्शनानं तृप्त झालेल्या माणसांना मंतरलेल्या क्षणांचा विरह पेलत नसतो.

वगाच्या नशेत बुडालेला राजा, राणी प्रथम अंगावरचे साज, भरजरी राजवस्त्रं उतरताना अजूनही त्याच तंद्रीत असतात. आमच्यासारख्या मुलांची स्थिती तर काय विचारावी. हे तर पहाटे पडलेलं स्वप्नच वाटायचं. मधुर...सुंदर...ओढ लावणारं. अलवार पिसासारखं ... का कुणास ठाऊक, त्या नाजूक राणीनं आपल्या दूर गेलेल्या सख्याला आळवून आळवून डोळ्यांत पाणी आणून म्हटलेल्या भावगीताची ' सजणा का धरिला परदेश... ' ही ओळ मनात घोळत राहते. अन् मन व्याकूळ होऊन पाझरू लागतं...कुठला तरी तो लांबचा...दूर देश भावुक मनात हुरहूर पेटवून टाकतो.

जत्रा संपते. उलागते. वाटावाटांनी पांगते. गावभर उडालेला रंग आणि देवळावर उधळलेला गुलाल मागं टाकून तमासगीर...राजा, राणी, प्रधान, सोंगाड्या डोक्यावर पेट्या घेऊन निघतात, तेव्हा आमची मनं भारावून जातात. ती शिवेपार होतात...अस्पष्ट होत जातात. अंधुक अंधुक दिसू लागतात. त्यांचा तो ' दूर देश ' मग पापण्या ओलावून टाकतो. जाणाऱ्या त्यांच्या वाटेवरून नजर काढता काढवत नसते. कानात ओळ घुमत असते ' सजणा का धरिला परदेश.'

□ □ □

७

निमित्त : महाराष्ट्रातील पहिले डोंगरी साहित्य संमेलन

या डोंगरी मुलखावर ... वारणा खोऱ्यावर .... कलेवर आणि कलावंतांवर आत्मिक जिव्हाळ्याने उदंड प्रेम करणाऱ्या रसिक बंधुभगिनींनो, आपण वाचलेले, ऐकलेले आपले लेखक, कलावंत आपल्याला जवळून परिचित व्हावेत, आपल्या डोंगरी मुलखाची ओळख त्यांना व्हावी, आपुलकीचा स्नेहधागा निर्माण व्हावा यासाठी आपण या डोंगरी मुलखात हा रसिकांचा नी साहित्यिकांचा कौटुंबिक सोहळा आयोजित केला आहे. केवळ तात्त्विक चर्चेचा अंतर्भाव असणारे असे हे ' साहित्य संमेलन ' न मानता 'सहज बोलू सांगाती' असा निर्मळ सहवासाचा हा सोहळा आयोजित केला जात आहे, हे ऐकून मला सर्वांपेक्षा अधिक आनंद झाला होता. न बोलावताही मिरवत वरातीत सामील होऊ व जमलं तर एखादा तोटा उडवू अशी माझी मनोमन भावना होती. पण घरात न सांगताच गंमत म्हणून स्वयंवर पाहायला सहज जावं आणि अचानक आपल्याच गळ्यात वरमाला पडावी, तेव्हा जी अवस्था होईल तशी माझी झालीय. ' जग काय म्हणेल ' या भावनेने माझे मन खरे दडपून गेलेय. हे कसं निभावून न्यायचं म्हणून गांगरूनही गेलोय.

शेवटी काही झालं, तरी जो तो आपल्याच माणसावर जोखीम टाकतो.

हा न्याय माझ्याही वाट्याला यावा ? पण यापाठीमागील आपण दाखवलेला जिव्हाळा, आपल्याला माझ्याबद्दल वाटलेला भाबडा विश्वास यामुळे भारावून गेलोय. या मातीनं, या मुलखानं मला आपलं मानलं, या न पेलणाऱ्या सोहळ्याचा भार टाकला यातच मी धन्य झालो आहे. हे कार्य पार पाडायला मी सोडून आपण सर्व समर्थ आहात. या विश्वासावर हे अध्यक्षपद मी स्वीकारले आहे.

या प्रसंगी माझ्या या मातीशी असणाऱ्या नात्याची आणि या मुलखाची ओळख करून देणे हे माझे कर्तव्य समजतो. कारण असा हा मेळावा प्रथमच या भागात भरत आहे.

आम्ही या मातीच्या कुशीत खेळलो, नाचलो, हुंदडलो. डोंगरी रानवाऱ्यात रानशीळ घालताना बेधुंद झालो. वादळाबरोबर वादळ होऊन आकाशछतापर्यंत गिरगिरत राहिलो. भन्नाट वाऱ्याची संगत केली. धुवाँधार कोसळणारा आषाढ पाऊस अंगभर झेलला.

वळीव पावसाआधी आकाशभर उग्र भीषण लोंबत असलेल्या महाकाय काळ्याकुट्ट ढगांची कानटोपी घातली. तडतड पडणाऱ्या गारांचा वर्षाव मिटल्या झाकल्या पापण्यांवर झेलला. गावंगावं नि झाडझाडोरा आपल्या तांबड्या लाल गढुळल्या पाण्याच्या प्रचंड लोटांबरोबर वाहून नेणाऱ्या महामूर महापुराचा लोट खांद्यावरून वाहून नेला. महापुरातल्या ओंडक्यांवरून वाहणाऱ्या सापकिरड्यांना आणि इंगळ्या-विंचवांना बहरलेल्या प्राजक्ताच्या फुलासारखं अंगावर गोंदवून घेतलं, कड्याकड्यावरून कोसळणाऱ्या पाणलोटांना काळजावर झेललं. उभ्या कलत्या क्षितिजाच्या आडोशाला बसून फड्यानिवडुंगाची लालगर्द बोंडं कुशीसह चाखली नि लसलसलेल्या रंगल्या ओठांनी पोपटांच्या आकाशभिर्र थव्याला साद घातली. नाजूक बाळबोटातल्या लगोरीनं आभाळात कडकडणाऱ्या विजेला टिपली नी ती खाली कोसळली, तेव्हा माकडाच्या गळ्यात बांधून टाकली. सागवनातल्या वाघाच्या पाठीवर बसून अस्वलाचे केस मोजले. साळींदराच्या पंखांचे बाण करून मोराच्या पिसावर लक्ष इंद्रदिवे कोरले. वठलेल्या नजरेला न तोलणाऱ्या जुनाट आंब्यांच्या झाडाच्या ढोलीत बसून दिवाभिताच्या साक्षीनं रात्रीच्या किर्र काळोखावर स्मशानाचं महाकाव्य लिहिलं नि वडाच्या पारंब्या झुल्यावर बसून पिंपळावरच्या मुंज्याला वाचून दाखवलं. तेव्हा हर्षानं वेडी होऊन भूतदऱ्यातल्या ल्हावसटीनं गळामिठ्ठी घातली नी खुदकन् हसली. मशिदीतल्या

पारव्यानं घुटरघुऽम घातली. असे आमचे व माझे या मातीशी नाते. हा माझा मुलूख, सह्याद्रीच्या डोंगरकपारीतला. वारणेच्या तांबडमातीचा. हिरवी झाडी. निळं आभाळ. घाटदार आभाळाला दुशी देणाऱ्या उंच टेकड्या. त्यावरली शिवमंदिरांची उंच शिखरे. दगडधोंड्यांशी झोंबणाऱ्या अंजनकांचन करवंद जाळ्या, आंब्याजांभळांची गंधधारी माती. आणि त्या मातीतला कणखर, पीळदार बुलंद माणूस ! त्याचा हा मुलूख !! क्रांतिकारकांच्या जन्मवस्त्यांचा... देवळासमोरच्या दगडी गुंडांना अच्यात छातीशी लावणाऱ्या मस्तीतल्या पैलवानांचा नि तमाशातल्या नाचीची घुंगरं काळजावर झेलणाऱ्या दिलदारांचा हा देश ...

कोयत्यानं वाघाची मिशी उतरणारांचा ... आभाळातल्या चांदसूर्यांनाही पाव्हणेराचं आवातणं देणाऱ्या कष्टकऱ्यांचा ... मातीचे हुंकार ऐकण्यासाठी पाताळाशी झुंज घेऊन जीव पणाला लावणाऱ्या कलदार माणसांचा हा स्वदेश तरीही उसवत्या आयुष्याच्या धाग्यातही ऊब शोधणारांचा ऊरभरल्या स्वप्नांचा प्रदेश...

तांबडवाटांचा डोंगरी मुलूख.

उंच...उंच...खोल...खोल...

इथं अंधार वस्तीला येतो. गारवा मस्तीचा असतो. इंद्रधनुष्याच्या गोपाला इथला वादळवारा पीळ भरीत बसतो. एवढा सूर्य ! तर तोही उन्हाची तलकली झाली की, वारणामाईच्या थंड डोहात दिवसभर डुंबत बसतो. वारणामायच्या ओटीपोटी नी डोंगररांगांच्या कुशीत हा मुलूख देव घडवीत बसणाऱ्या पाथरवटासारखा काळालाच घडवीत बसलाय आणि जीवनाचं सुरेल गीत स्वतःच्याच हातांनी आपल्या श्वासाश्वासावर गोंदवून घेत राहिलाय. डोंगरकड्यांची, दऱ्याखोऱ्यांची झाडाझुडांच्या लळ्यांची ती ही मायमाती. हिनंच आमचं जीवन जोजवलं-वाढवलं-पोसलं. मानाचे तुरे आमच्या शिरपेचात खोवले.

इथल्या मातीची अपरंपार माया मिळते. तिच्या ममतेनं आकांक्षांना नवनिर्माणाचे धुमारे फुटतात. मग दिशा-दिशांवर जयपत्रांची तोरणं बांधायलातिचे सुपुत्र सिद्ध होतात. इथल्या क्रांतिकारकांनी- भूमिगतांनी दीडशे वर्षांच्या गोऱ्या राजसत्तेच्या बंदिस्त, कराल दरवाज्यावर हत्तीच्या बळानं धडका दिल्या.

पराक्रमाची शर्थ करणारे रणकौशल्य जगाला थक्क करून सोडते, ते मेजर जनरल एस्. पी. पी. थोरात यांच्या निष्णात तेजामुळे.

मराठी साहित्यात अजरामर ठरणारे आत्मचरित्र लिहिणारे आणि ज्यांच्या कारणे राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनहिताय वसतिगृहाची प्रतिष्ठापना केली ते रावबहादूर डॉ. पी. सी. पाटील हे या ऐल पैल थडीतलेच.

आपल्या देशातच नव्हे, तर परदेशातही मल्लविद्येची कीर्तिध्वजा फडकवणारे हिंद केसरी पै. गणपतराव आंदळकर हा या मातीचाच मानदंड. आजच्या विज्ञान युगात सर्व जगाला स्तिमित करून टाकणारा वारणा बालवाद्यवृंद हे या मातीचंच ' दान ' आहे.

इथल्या मातीत काळीज पेरून शेतकऱ्यांनी पिकवलेला गूळ ! त्याची चव तर ' अमृतातेही पैजा जिंकणारी !!'

इथे लोककला नांदल्या. लोकवाद्यांचा तालसूर घुमला. ओव्या, पोवाड्यांनी कर्त्या पुरुषांच्या गाथा गायल्या. थोर लोक साहित्यिक आण्णा भाऊ साठ्यांनी वारणाखोरा साहित्यात उभा केला.

आजच्या परिवर्तनाच्या काळातही सर्व क्षेत्रांमध्ये वारणेचं पाणी तरारून फुलताना दिसते आहे. साहित्य, चित्रपट या क्षेत्रातही आपल्या वेगळेपणाचा ठसा उमटत असताना दिसतो आहे.

काहींच्या जीवनातील अंधार, अंधार न राहावा आणि काहींच्या जीवनातील प्रकाश, प्रकाश न राहावा. त्या सर्वांचेच दीप्तिमान तेज व्हावे. साहित्य संमेलन म्हणजे ' प्रकाशाची पूजाच ' होय. साद आणि दाद यांचा सुंदर देखणा समन्वय. मना मनांचा सहज संवाद. व्यापातापाने मरगळलेल्या, संत्रस्त मनाला उत्साही उल्हासाची हवी असणारी शिदोरी इथेच लाभावी. बावरलेल्या नवोदितांच्या नवख्या वाटचालीला निःशंकपणा लाभावा, स्वतःभोवतीच एकाकीपणे गिरक्या घेता घेता येणारी भोवळ संपावी. गोंधळलेल्या मनाचा संभ्रम दशदिशापार व्हावा. मग आत्मविश्वासाने, दमदारपणे आपला नवा मार्ग आखत जावे. त्या मार्गावर त्याची समर्थ पावले उमटावी नी त्याच्या युगखुणा व्हाव्या. त्या गंधशिल्पित खुणांच्या आरसपानी दृष्टीत ' आकाशाला पालण ' घालणारे मानव्य गवसावे. मग सहज हुंकार यावा, ' काठोकाठ भरू द्या पेला ! फेस भराभर उसळू द्या ! '

याचसाठी हा साहित्य सोहळा. जुन्या नव्याचा, रसिकांचा सहज संवाद.

हा सहज संवाद दूरस्थ, दुरावरचा नसावा. तपे मागे पडली. दशकं उलटली, तरी सहजरीत्या या सहजसंवादाची पर्वणी वाट्याला न यावी असं घडू नये. आजचे जीवन फारच जटिल. व्यग्र व्यापातापाचे झाले आहे. घाईगर्दी ही सर्वांच्याच जीवनात पाय रोवून बसलेली आहे. नजर थिजून जाईल इतक्या वेगाने आजचे युग धावत आहे. आणि त्यात माणूस संभ्रमित झाला आहे. गोंधळून बावरून गेला आहे. त्याच्या आर्थिक स्थितीने त्याच्या जीवनाची, संसाराची उसवलेली वस्त्रे शिवली, टिपली, जोडली जात नाहीत, आणि मग मनात असूनही दूरवरच्या साहित्य संमेलनाच्या आनंद सोहळ्याला जाण्यापासून वंचित व्हावे लागते. म्हणूनच अशी विभागीय स्वरूपाची साहित्य संमेलने भरणे गरजेचे झाले आहे.

याशिवाय विशिष्ट प्रदेशाच्या, विशिष्ट स्वरूपाच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक अशा परंपरा असतात. त्यामुळेच त्या परिसरातील लोकजीवन बनत असते. तिथल्या लोकसंस्कृतीनेच तिथल्या जनसामान्यांचे जीवन घडते. प्रभावित होत असते. तिथला एकात्म जिव्हाळा साहित्याला प्रेरक ठरतो. तिथल्या लोकसंस्कृतीच्या दृष्टीने उपकारक ठरत असतो. त्याचप्रमाणे जे उपेक्षित असतील, नवोदित असतील, त्यांना अशा सोहळ्यातून सहजरीत्या सहभागी होता येते. त्यांना प्रथितयश साहित्यिकांच्या मार्गदर्शनाचा लाभ मिळतो. परस्परांच्या सहवासातून प्रेरणा लाभतात. आत्मविश्वास वाढतो. न्यूनगंड नाहीसा होतो. आपल्या जाणिवा नेणिवा पारखून घ्यायला संधी मिळते, नवे जागरण प्राप्त होते. त्या परिसरातील र सिक वाचकांना लेखकांचे, त्यांच्या विचारांचे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, त्यांच्या प्रेरणास्फूर्तीचे दर्शन घडते. वाचकांच्या अभिरुचीला उजाळा मिळतो. एक चैतन्य त्या त्या परिसरात प्राप्त होते. सहित्य लोकजीवनापर्यंत पोचण्यास मदत होते. रसिक मन भरून जाते. यासाठी विभागाविभागात जिव्हाळा, आत्मीयता ज्यामध्ये असेल अशा प्रकारची छोटी छोटी साहित्य संमेलने भरायला हवीत. शिवाय गावातील आणि गावकुसाबाहेरील रानामाळावरची फिरस्ती माणसे, झोपड्या-पालातील माणसे शिकू लागली आहेत. ढोंगी स्वार्थी जगाच्या आगीत होरपळलेली माणसे मुखर झाली आहेत. शतका-शतकांच्या वेदनांचे कढ लेखणीतून उतरू लागली आहेत. त्यांच्यासाठी-रसिकांसाठी हे डोंगरी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. ही घटना अतिशय बोलकी आहे. तशीच ती आनंदजनक व उत्साहवर्धकही आहे.

साहित्यक्षेत्राची क्षितिजे रुंदावत चालल्याचे ते द्योतक आहे.

आजवर साहित्याची गंगा मोठमोठ्या शहरांभोवती घोटाळत राहिली होती. अल्पशा प्रस्थापित वर्गाभोवती रुंजी घालीत होती. प्रस्थापितांच्या अंकित होती. प्रस्थापितांचा आसरा सोडून, कोंडी फोडून, महानगरांच्या कक्षा ओलांडून ती गंगा आताआताशी भारताचे प्रातिनिधिक स्वरूप असलेल्या ग्रामीण भागाकडे झपाट्याने वळण घेत झेपावत चालली आहे. ग्रामीण भागातील लहानसहान नगरांना ती स्पर्शून जात आहे. साहित्य सोनियाचा मळा पिकविण्यासाठी रानचा वारा प्यालेल्या, उन्हापावसात वावरलेल्या खेडुतांच्या अंतरी अंकुरलेल्या प्रतिभेच्या कोंभांचा आविष्कार करण्यासाठी तिने आपला जीवनौघ तिकडे वळविला आहे. मराठी साहित्याच्या दृष्टीने हा बदल ही एक महान क्रांतिकारक घटना होय. मराठी साहित्यसमृद्धीची ही सुमंगल प्रभात होय. साहित्य हा काळाचा व त्या काळातील लोकजीवनाच्या अंगोपांगांचा खराखुरा आलेख असतो, असे म्हटले जाते खरे, परंतु आजवर तरी आमजनतेच्या जीवनाचे वास्तव चित्रण साहित्यात फारसे कुठे झालेले नाही. ग्रामीण जीवनाची तर उपेक्षाच केली गेली. जे चित्र रंगविले गेले, ते अपुरे अधुरे होते. जेव्हा ग्रामीण विभागातील लोकच आपल्या पूर्वीच्या दैन्यदारिद्र्याचे आणि मानसिक गुलामगिरीचे अंतःकरण पिळवटून टाकणारे प्रसंग कथन करतील तद्वतच द्रुत गतीने झालेल्या ग्रामीण विभागाच्या कायापालटाचे कथन करतील तेव्हा वाङ्मयातील उणीव भरून निघेल, समतोल लाभेल, वाङ्मय समृद्ध होईल. मुख्यतः एकांगीपण नष्ट होईल. भरघोस सौष्ठव लाभेल.

वाङ्मयाचा आणि जनतेचा जवळिकीचा संबंध प्रस्थापित झाला पाहिजे. समाज व लेखक यांच्यात सुसंवाद हवा. हे साध्य होण्यासाठी वाङ्मयाच्या क्षेत्रात समाजाचा सहभाग असला पाहिजे. प्रयत्नपूर्वक तो घेतला पाहिजे. साहित्याविषयी आपुलकीची भावना जनतेत निर्माण केली पाहिजे. साहित्य जर जनताभिमुख झाले तर जनताही साहित्याभिमुख झाल्याशिवाय राहणार नाही. हे होणे प्रबोधन व जनजागरण यावर अवलंबून आहे. जनतेच्या-प्रमाणेच जनतेतून निर्माण होऊ पाहणाऱ्या साहित्यिकांचे प्रबोधन करणे ही तर काळाची गरज आहे. प्रातिनिधिक साहित्य निर्माण व्हावे व मराठी मायबोलीची सर्व दालने समृद्ध व्हावीत.

लोकजीवन आणि लोकसंस्कृती यांतील रंग आणि तरंग व विविध

छटा, व्यक्तिजीवन नी समाजजीवन यांतील आंतरविरोध, विसंगती, आजच्या जटिलतेतून निर्माण होणारे व भोवळून टाकणारे विलक्षण गुंते मर्मज्ञतेने उकलून अवघ्या समाजजीवनालाच दिशा देण्याचे व्रत साहित्याने स्वीकारले पाहिजे. केवळ कल्पनारंजनाचे अथवा केवळ भंजनाचे दिवस आता राहिले नाहीत. खऱ्याखोट्या, परखड वास्तवाचे भान सर्वच समाज-घटकांनी स्वीकारण्याची गरज आहे. दाहक वास्तवता, अशांतता, अस्थिरता, अस्वास्थ्य यांनी समाज-जीवनच पार दुभंगून चालले आहे. भ्रष्टाचार, अत्याचार, अनाचार, बेबंद स्वार्थ, बेफिकिरी आणि तितकीच किळसवाणी, लाजीरवाणी लाचारी यांनी तर माणुसकीच्या गळ्याला केव्हाच नख लावलेले आहे. या भयकारी संभ्रमित अवस्थेत सामान्य माणसं भयचकित झाली आहेत. हरवत निघालेल्या निष्ठा, अस्तंगत होत चाललेल्या श्रद्धा, आजच्या भौतिकाने दिशापार रेटलेली जीवनमूल्ये यांना काळीज देठानं पालाण घालण्याची गरज आहे हे सर्वांचेच सर्व समाजाचेच पहिले काम आहे. अंतिमतः समृद्ध, संपन्न, निरामय, शांत, ममतापूर्ण, करुणामय जीवनासाठी हे आवश्यक आहे. भंगलेली मानसिक एकात्मता, लोप पावलेली अंतःकरणाची उदारता ही काही आकाशफुले नव्हती. ती आपल्या अणुरेणूत, रंध्रारंध्रात रसरसून होती. त्यामागच्या पालटलेल्या स्थितिगतीचा शोध चिंतनशील, संवेदनशील मनाने तटस्थपणे घेण्याची आज आवश्यकता आहे. ' साहित्य हे समाजाचा आरसा आहे, ते समाजाचे प्रतिबिंब आहे ' असे म्हणून आज चालणार नाही. समाजाचे दर्शन घडवत असताच त्याच्या नव्या सर्जनाची सूचकताही त्यात असली पाहिजे. नव्या समाजनिर्मितीची समाजमनस्कता पत्करली पाहिजे. जे जे सर्जनशील निर्मिक असतात त्यांना हे आत्मभान असतेच. असायलाच हवे.

आज शिक्षण, विज्ञान, प्रसारमाध्यमे दूरवरच्या झोपडीपर्यंत पोचली आहेत. सर्व स्तर आता जागे झाले आहेत. आत्मवंचना सोडून आत्मशोध, आत्मजागरण, आत्मप्रत्यय या मार्गाने स्वयंकार बनू लागले आहेत. गावाआतले, गावकुसाबाहेरचे, फिरस्त्या माळावरचे असे तट आता कोसळू लागले आहेत. दलित, छलित, पीडित हे आपल्या अंगावरची युगायुगांची लक्तरे ओरबडून फेकून देऊ लागले आहेत, स्वतःचे स्वतःला घडवणारे पाथरवट बनू लागले आहेत. त्यांची पिढ्यापिढ्यांची दुःखं, त्यांच्या शतकांच्या वेदना, आज आ वासून उभ्या असलेल्या समस्या यातून ते नवाच सूर्य घडवू पाहात

आहेत. बदलत्या युगाचा कानोसा घेऊन त्याचेही निर्भरपणे स्वागत करायला हवे.

आज ग्रामीण जीवन झपाट्याने बदलते आहे. पूर्वीच्या पांढरीचे भेंडे ठिसूळ झाले आहेत. नवीन 'क्राँक्रिट'चे युग इथेपर्यंत पोचले आहे. पण त्यामुळेही नवेच प्रश्न उभे राहिले आहेत. प्लॅस्टिकच्या जमान्याने बलुतेदारी तडीपार केली आहे. एका उतरंडीचे आधार निसटू लागले आहेत. राजकारणाने प्रत्येक माणसाभोवती घराघरात सापळे उभे केले आहेत. नवा कामगार, स्त्रीमजूर वर्ग कारखान्यांनी निर्माण केला आहे. मातीला नवा आकार घडवू घातला आहे. या साऱ्यातून एक नवा संघर्ष, तणाव वाढू पाहतोय. एक भोवरलेलं वादळ आपल्याभोवती रिवरिवत आहे. नव्या पिढीतल्या लेखकांना हे संघर्ष झोंबले पाहिजेत. त्यांनी ते रिचवले पाहिजेत. जे जे वास्तव असेल त्याचे निर्भयपणे आपल्या साहित्यात चित्रण केले पाहिजे. ग्रामीण जीवन हे संघर्षमय, नाट्यमय, नवलपूर्ण असते. त्यात एक रंगदार नी रगदार जोष असतो. कातळातला पाझर फोडणाऱ्या व्यथावेदना असतात. सहजपणे उकल न होणाऱ्या समस्या असतात. पण ग्रामजीवनाचा हा उखाणा लेखकांनी सोडवायचा आहे. त्यासाठी डोळस निरीक्षण, अनुभव, चिंतन, वाचन, समरसता आणि त्यातून निर्माण होणारी समग्र धुंद भाववृत्ती यांचा समन्वय हवा, ग्रामीण जीवनाचा बाज ही साहित्याला नवी देणगी ठरायला हवी. भावलेले, भोगलेले अनुभव तेवढ्याच ताकदीने लिहायला हवेत. तरच जाणता लेखक, सकस साहित्य समाजाला मिळेल. रसिक मन टवटवीत, सुसंस्कृत, चैत्राच्या पालवीसारखे सळसळते राहील. जुन्या, नव्या पिढीने ही सुजाण सावधानता बाळगणे हितकारक ठरणारे आहे. त्यासाठी गावोगावच्या वाचनालयांची जोपासना आणि वाढ कशी होईल याची दक्षता घ्यायला हवी.

भिन्न थरांतील, भिन्न जीवनरहाटीचे, भिन्न प्रदेशातील, भिन्न भिन्न व्यवधानस्तरांतील लेखक लिहू लागले आहेत. निरनिराळ्या लोकसंस्कृतीची, लोकरिवाजांची, लोकमतांची अनुभवचित्रणे लोकभाषेत, बोलीभाषेत येत आहेत. त्यामुळे लोकभाषा ही भाषेला नवी नवी खुमारी देते. भाषा विविधांगांनी फुलून येते. हीही अभिवृद्धी विलोभनीय ठरणारी आहे. भिन्न भिन्न लोकप्रदेशातील वाचकांना हे अनुभव आपलेच वाटतात, त्यात स्वतःला शोधतात, स्वतःला जोखतात. स्वतःच्या वाटा शोधतात. पूर्वी आदिम

कालापासून लोककला लोकजागरण करीत आल्या. आता त्याला पर्याय म्हणूनही हे लोकसाहित्य जनसाहित्य म्हणून स्वीकारले जाईल. खेड्यापाड्यांत आपलेच साहित्य म्हणून वाचले जाईल. दलित, ग्रामीण, डोंगरी हे भेद काही काळापुरतेच राहतील ! पण अखेरी ते लोकसाहित्यच असेल. रामायण, महाभारत हे वेगवेगळ्या अर्थाने लोकसाहित्यच नाही का !

(३ मे १९८७, अध्यक्षीय भाषण, सागाव.)

□ □ □

आहेत. बदलत्या युगाचा कानोसा घेऊन त्याचेही निर्भरपणे स्वागत करायला हवे.

आज ग्रामीण जीवन झपाट्याने बदलते आहे. पूर्वीच्या पांढरीचे भेंडे ठिसूळ झाले आहेत. नवीन 'क्रॉक्रिट'चे युग इथेपर्यंत पोचले आहे. पण त्यामुळेही नवेच प्रश्न उभे राहिले आहेत. प्लॅस्टिकच्या जमान्याने बलुतेदारी तडीपार केली आहे. एका उतरंडीचे आधार निसटू लागले आहेत. राजकारणाने प्रत्येक माणसाभोवती घराघरात सापळे उभे केले आहेत. नवा कामगार, स्त्रीमजूर वर्ग कारखान्यांनी निर्माण केला आहे. मातीला नवा आकार घडवू घातला आहे. या साऱ्यातून एक नवा संघर्ष, तणाव वाढू पाहतोय. एक भोवरलेलं वादळ आपल्याभोवती रिवरिवत आहे. नव्या पिढीतल्या लेखकांना हे संघर्ष झोंबले पाहिजेत. त्यांनी ते रिचवले पाहिजेत. जे जे वास्तव असेल त्याचे निर्भयपणे आपल्या साहित्यात चित्रण केले पाहिजे. ग्रामीण जीवन हे संघर्षमय, नाट्यमय, नवलपूर्ण असते. त्यात एक रंगदार नी रगदार जोष असतो. कातळातला पाझर फोडणाऱ्या व्यथावेदना असतात. सहजपणे उकल न होणाऱ्या समस्या असतात. पण ग्रामजीवनाचा हा उखाणा लेखकांनी सोडवायचा आहे. त्यासाठी डोळस निरीक्षण, अनुभव, चिंतन, वाचन, समरसता आणि त्यातून निर्माण होणारी समग्र धुंद भाववृत्ती यांचा समन्वय हवा, ग्रामीण जीवनाचा बाज ही साहित्याला नवी देणगी ठरायला हवी. भावलेले, भोगलेले अनुभव तेवढ्याच ताकदीने लिहायला हवेत. तरच जाणता लेखक, सकस साहित्य समाजाला मिळेल. रसिक मन टवटवीत, सुसंस्कृत, चैत्राच्या पालवीसारखे सळसळते राहील. जुन्या, नव्या पिढीने ही सुजाण सावधानता बाळगणे हितकारक ठरणारे आहे. त्यासाठी गावोगावच्या वाचनालयांची जोपासना आणि वाढ कशी होईल याची दक्षता घ्यायला हवी.

भिन्न थरांतील, भिन्न जीवनरहाटीचे, भिन्न प्रदेशातील, भिन्न भिन्न व्यवधानस्तरांतील लेखक लिहू लागले आहेत. निरनिराळ्या लोकसंस्कृतीची, लोकरिवाजांची, लोकमतांची अनुभवचित्रणे लोकभाषेत, बोलीभाषेत येत आहेत. त्यामुळे लोकभाषा ही भाषेला नवी नवी खुमारी देते. भाषा विविधांगांनी फुलून येते. हीही अभिवृद्धी विलोभनीय ठरणारी आहे. भिन्न भिन्न लोकप्रदेशातील वाचकांना हे अनुभव आपलेच वाटतात, त्यात स्वतःला शोधतात, स्वतःला जोखतात. स्वतःच्या वाटा शोधतात. पूर्वी आदिम

कालापासून लोककला लोकजागरण करीत आल्या. आता त्याला पर्याय म्हणूनही हे लोकसाहित्य जनसाहित्य म्हणून स्वीकारले जाईल. खेड्यापाड्यांत आपलेच साहित्य म्हणून वाचले जाईल. दलित, ग्रामीण, डोंगरी हे भेद काही काळापुरतेच राहतील ! पण अखेरी ते लोकसाहित्यच असेल. रामायण, महाभारत हे वेगवेगळ्या अर्थाने लोकसाहित्यच नाही का !

(३ मे १९८७, अध्यक्षीय भाषण, सागाव.)

□ □ □

८

प्रेमपत्रे संशोधन

" क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव पडो मरणांचा " असे प्रेमासंबंधी उदात्त उद्‌गार प्रेमाचे शाहीर म्हणून गणले गेलेले कवी गोविंदाग्रज यांनी काढले आहेत. जगातील भाषानिर्मितीच्या विविध उपपत्ती मांडल्या गेल्या आहेत. त्यांपैकी 'प्रेमयुक्त गान ' ही एक उपपत्ती पाश्चात्त्य भाषाशास्त्रज्ञ जैस्परसन याने मांडली आहे. भाषेच्या उत्पत्तीला प्रेमभावना कारण आहे असे त्याचे मत. प्रेम करणे आणि दुसऱ्याकडून प्रेम करवून घेणे ही मानवाची स्वाभाविक वृत्ती आहे. प्रेमाच्या धुंदीत सामान्य माणूसही गाणी गुणगुणू लागतो. नाचू बागडू लागतो. तो काव्य जगतो. त्याच्या अंगावरून प्रेमभावनेचे मोरपीस अलवारपणे स्पर्शत राहते. तो मोहरून जातो. मनाला लक्ष लक्ष डोळे फुटतात. चंद्र चांदण्यांची, पानाफुलांची खुणावती भाषा त्याला समजते. अवघे चराचर हे त्याचेच रूप बनते. दिवसाला रात्र नसतेच. असतो फक्त प्रकाश. फक्त चैतन्य. साऱ्या जगातील सौंदर्य, सुरूपता, सुगंध आणि सुरसांची मैफल म्हणजे त्याचे जीवन बनते. प्रेमपरिसाची कांडी फिरते आणि लोखंडाचे सुरेख सुवर्ण बनते. प्रेमामुळे माणसाच्या ठायी विलक्षण सामर्थ्य प्राप्त होते. " प्रेमिक हा सर्व जगालाच प्रिय असतो " असे अमेरिकन लेखक इमर्सन म्हणतो. तर " जर कुठल्या तरी युक्तीने एखादे राष्ट्र किंवा सैन्य फक्त प्रेमिकांचे बनविले

तर, मानी प्रेमिकांचे सैन्य अगदी अल्पसंख्य असले तरी जगाला भारी होईल. " अशी प्लेटोने कल्पना मांडली आहे.

अशा या प्रेमधुंद अवस्थेत मंतरलेल्या प्रेमिकांनी आपला जो भाषाविष्कार केला असेल, परस्परांनी आपली भारलेली मनोगते प्रकट केली असतील, ती त्यांची सहज स्फुरणे आहेत. या सहज स्फुरणांचा देखणा विलास त्यांनी एकमेकांना लिहिलेल्या पत्रांतून आढळेल म्हणून त्यांचे संशोधन होणे जरूर आहे असे मला वाटले आणि प्रेमपत्रांच्या संग्रहाला नी संशोधनाला प्रारंभ केला. त्यासाठी पंधरा वर्षाच्या काळाचं एक चक्र बनवलं. अत्यंत कष्टाने, अनेक प्रकारचे धोके पत्करून जवळ जवळ तीन हजार प्रेमपत्रे मिळविली. हा एक छंदच मनाला जडला. हा छंद लागायला तसे कारणही घडले.

एका मित्राने आपली पत्रे विश्वासाने माझ्याकडे ठेवली. त्याच्या संमतीनेच वाचली. आवडली. त्या पत्रातील भावभावना, विचारसौंदर्य, स्वयंस्फूर्त भाषासौंदर्य, अंतःकरणाला चटका लावणारी जीवनानुभूती, असीम त्याग, समर्पण, आसक्ती, भावनांचा उद्रेक, वखवखलेली नग्न वासना या साऱ्यांचे रम्य नी चिंतन करायला लावणारे भीषण दर्शन घडले.

वाटले, अशी असंख्यांची असंख्य अज्ञात प्रेमपत्रे, नव्हे प्रणय पंढरीच्या वारकऱ्यांची स्फुरणे आपण मिळविली आणि एकत्रित करून प्रकाशित केली तर ... एक विचार चमकला. आणि अखंड पंधरा वर्षे तेच ध्यानीमनी भिनवून घेतले. फिरलो ... बोललो. बोलून घेतलं. प्रेमाचं पिसं लागलेल्या प्रेमिकांच्याबरोबर मीच वेडापिसा झालो.

त्यांच्याबरोबर तन्मय झालो. गप्पा रंगल्या. रात्र रात्र जागलो. काळोखाचं चांदणं झालं. साऱ्यांच्या एकेक कहाण्या ऐकता ऐकता मी मलाच विसरलो. ' प्रेमिक ' झालो. हसता हसताच डोळ्यांतून पाणी आलं. ऐकता ऐकताच डोळ्यांचे काठ ओलावले. आसवांनी आसवांची साथ केली. मोहोरलो. गदगदलो. फुललो. व्यथित झालो. कधी प्रेमरंगाने न्हाऊन निघालो, तर कधी नखशिखांत शहारून गेलो. आपण जगलेल्या, भोगलेल्या प्रेमासंबंधी बोलत असताना एकेका प्रेमिकाचे अवघी व्यथा व्यक्त करणारे थरथरलेले ते ओठ, ते अथांग डबडबलेले डोळे, मोगरा फुलावा तसे डवरून, मोहोरून जाणारे अंग, त्या प्रेमकालाशी एकरूप होऊन भारावून जाणे, सारे सारे आठवले की वाटते, या प्रेमकहाण्या ऐकता ऐकता ' वर्षाव पडो मरणांचा ' तरी तोही

भोग.

ही रसरशीत, अस्सल, जीवीच्या जीवांची, सहजस्फूर्त, उत्कट मनोगते वाचल्यानंतर साहित्यातील केवळ कल्पनेने नी सहानुभावाने रेखाटलेली प्रेमाची चित्रणे या प्रेमिकांच्या एकरसी भावापुढे फिकी वाटण्याची शक्यता असते. कृत्रिमतेला जवळ जाण्याची संभाव्यता अधिक. अस्सल आणि अभिजात साहित्य अंतरीच्या उमाळ्यातूनच जन्म पावत असते. ' स्वानुभूत वासाचे ' ते दान असते.

म्हणूनच प्रणय पंढरीच्या या खऱ्याखुऱ्या वारकऱ्यांची मुक्तांकने मिळविली पाहिजेत असं मला वाटलं. मी भारावून गेलो. संशोधनाला लागलो. मात्र हे संशोधन तसं सोपं नव्हतं. जगावेगळं होतं. लोकविलक्षण वाटणारं होतं. इतर सर्व क्षेत्रांतील संशोधनापेक्षा असे हे संशोधन थोडे कटकटीचे, उपहासाला कारण ठरणारे होते. शिवाय जे शोधायचे तेच माणूस जीवाच्या कराराने गुप्त ठेवायचा प्रयत्न करीत असतो. त्याचेही बरोबरच आहे. ते प्रेमपत्र जणू त्यानेच आपल्या जीवनाच्या पायाखाली पुरलेला सुरुंग ठरण्याची अधिक शक्यता असते. तोच जीवनाच्या नाशाला कारणीभूत ठरणारा सुरुंग दुसऱ्याच्या हातात द्यायला सहजासहजी तयार होणे अशक्य. म्हणून माणूस आपली लक्ष्मणरेषा आखून टाकतो. आणि ती रेषा ओलांडून जाण्याचे दिव्य संशोधकाला करावे लागते. शकुंतलेने दुष्यंताला पाठविलेले कमलपत्रावरील पत्र, रुक्मिणीने श्रीकृष्णाला पाठविलेले पत्र यांचा आपण भक्तिभावाने, मनमुराद रसास्वाद घेतो. पण आपल्यातीलच कुणाची पत्रे मिळाली, तर ती चवीने वाचून वेशीवर टांगतो. असे समाजमन असल्याने सर्वसामान्यपणे पत्रे म्हणजे स्वतःच्या सुखदुःखाचे जीवंत साक्षीदार, पण त्यांनाच अग्निदिव्य करावे लागते.

त्यामुळे ही पत्रे मिळविताना, हे नवखे सुख झेलताना खूप सोसावेही लागले. भोग भोगावे लागले. जवळचे मित्र लांब गेले. संबंध तोडू लागले. माझ्याकडे संशयी नजरा लागल्या. मी भयंकर वादू लागलो. ओळखीचे ओळख विसरू लागले. बऱ्याचशा ओळखी दृढ झाल्या. कुणाला वाटलं, मी फसवीन, पत्रे घेऊन पेचात आणीन, कोंडीत धरून हवे ते मिळवीन. एकदा कुणी काळोख्या रात्री दारात पिस्तुल घेऊन उभे राहिले. माझ्यावर पिस्तुल रोखून म्हणाले, " मला माझी पत्रं हवीत, " मी घाबरलो नाही. विश्वासाने बोललो.

पिस्तुलातून गोळी सुटली नाही. त्यांच्याकडूनच नंतर खूप पत्रे मिळविली. कुणी म्हणाले, " हे मूर्खपणाचे लक्षण आहे. " कुणी बोललं, " एवढ्या चांगल्या माणसाला वेड लागले, वाया गेला बिचारा. "

पण वेड तर खरेच. म्हणून तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून जवळ जवळ ३००० पत्रे मी मिळविली. ज्या पत्रांना अंधारच माहिती ... अग्नीत जळून अस्तित्वशून्य बनणे, ... ज्यांच्या नशिबी राख होणंच लिहिलेलं ... त्यांना प्रकाश दिसला. एक पत्र मिळण्याची, प्रेमिकाकडून मागे उरण्याची मारामार अशी ३००० पत्रे उपलब्ध झाली.

अवघ्या महाराष्ट्रातील जाणत्या नेणत्या प्रेमयात्रिकांची ही अस्सल, वास्तव सत्य प्रेमपत्रे.

गेल्या पंधरा वर्षांचा काळ कसा गेला कळलेच नाही. प्रेमिकांच्या या ' मुक्तांगणात ' मीही एक धुंदी जगलो. नवे जाणवले. मदिर वातावरणातील हे क्षण स्वप्नवतच वाटले. नित्य नवा प्रत्यय ... नवे आकलन, विलक्षण झपाटून टाकणारे हे.

ही प्रेमपत्रे अस्सल आहेत, समाजाच्या सर्व थरांतील, सर्व पेशांतील ती पत्रे आहेत. त्यांत डॉक्टर आहे, वकील आहे. शिक्षक आहे, कामगार आहे, पुढारी आहे, विद्यार्थी आहे, गरीब-श्रीमंत, उच्चनीच सारे आहेत. केवळ विचार प्रकटीकरणासाठी ही पत्रे लिहिली गेली नाहीत, हे उघड दिसते. परंतु जीवनाच्या प्रत्येक अंगाचा अत्यंत डोळसपणे, सखोलपणे केलेला विचार, या पत्रांतून ठायी ठायी विखुरला आहे. जीवन म्हणजे काय, यापासून आस्तिक-नास्तिक, स्त्री-पुरुष, लहान- थोर, स्वार्थ-परमार्थ, आशा-निराशा, सुख-दुःख साऱ्या साऱ्यासंबंधीच्या कल्पना, अतिशय सुंदर, साध्या, परंतु परिणामकारक शैलीत मांडताना व्यक्ती कोणत्या परिस्थितीतून जात होती याची परिपूर्ण कल्पना येते.

या पत्रातून पहिल्या प्रेमाची नवखी थरथर जाणवते, तसेच फुलाफुलाला चुंबत फिरणाऱ्या भृंगराजाची रसिली रसिकताही दिसून येते. सुखाने ओथंबलेले शब्द अमृतात न्हाऊन निघालेले दिसतात, तर दुःखाने, निराशेने अवहेलना उदासीनतेचा वडवानल पेटवतात.

शरीरसुखाच्या उबदार दुलईत लपेटलेले जीव आपली तृप्ती बिनदिक्कत सांगून जातात, तर त्याच सुखापोटी जन्म पावू पाहणाऱ्या, दुःखाने कुणाचा

जीव कासावीस होत असतो. कुणी नको असलेला अंकुर जाळण्याचा उपद्व्याप करत असते, तर कुणी त्या अंकुराच्या जोपासनेच्या बदल्यात वाटेल तो त्याग करायला, सजा भोगायला तयार असल्याचे जाणवते. अशा या विविधांगी, अनेकरंगी, अनेकढंगी प्रेमपत्रांतून व्यक्त होणारे विचार मोठे चिंतनीय आहेत.

प्रेम म्हणजे काय व ते कसे असते हे सांगताना एक पत्रलेखक म्हणतो, " प्रत्येक सहृदय कलावंत जगात प्रेम शोधतो. त्या शोधातूनच जगात सुंदरता निर्माण होते. प्रेम शरीरात नसते. जगावर प्रेम करणे ही फार विशाल कल्पना आहे. ते प्रेम अभिलाषेच्या कोषात नसते. असे प्रेम ज्ञानेश्वर करू शकतात, कालिदास करू शकतो, अजिंठा उभा करणारा शिल्पकार करू शकतो. स्वर्गीय प्रेमाच्या प्राप्तीहून त्याचा शोधच सुंदर असतो. केवळ लोकप्रियता म्हणजे प्रेम नव्हे. "

तर कोणी खऱ्या प्रेमिकाची व्याख्या करताना सांगून जाते, " खरा प्रेमी उपभोगी नसतो. तो त्यागातून भोगतो. खरा प्रेमी जगाला देत जातो. त्याला काही देण्याएवढे जगाचे हात मोठे नसतात. "

परमेश्वरावरील श्रद्धा, निष्ठाही या पत्रातून जागोजागी दिसून येते. विज्ञानयुगातील ही प्रेमयुगुले परमेश्वरी सामर्थ्याला मानणारी, त्यावर विश्वास ठेवणारी आहेत. पाप-पुण्याच्या कल्पनेचा, भल्या- वाईटाचा विचार करण्याची क्षमता त्यांच्यात पुरेपूर आहे. त्यांना भूतकालाबद्दल चिंता नाही. वर्तमानासंबंधीही ते निश्चिंत आहेत. मात्र भविष्याबद्दल उत्सुकता, हुरहूर, निराशा त्यांना फार बोचत असावी असे जाणवते. वाईट कृत्य केलं की, परमेश्वर शिक्षा करतो अशी श्रद्धा कोणी व्यक्त करते, तर कोणी शेवटी सर्व परमेश्वराहाती देऊन निश्चिंत होते.

कर्तव्य, आशा, भेदाभेद, मोह, मत्सर, भोग, श्रद्धा, सौंदर्य इत्यादी अनेक बाबींचा विचारही तितकाच बहारदारपणे व्यक्त झालेला आढळून येतो.

प्रियकराने आपल्या प्रेमाला स्वार्थी म्हटलेले ऐकताच एक प्रेयसी नागिणीसारखी खवळून उठून फुत्कारते, " चितेवर उभी राहिलेली सतीसुद्धा स्वार्थीच असते. कारण मृत्यूनंतरसुद्धा पतीला सोडण्याची तिची इच्छा नसते. " ' स्वार्थ नसतो कुणाला, ' सांगण्यासाठी किती सुंदर नि सत्य कल्पना स्पष्ट केल्यात त्यांनी ! आपण भोगी नाही, शरीरसुखाचे लालचावलेले नाही, मोह आपल्याला स्पर्शसुद्धा करू शकत नाही असे भासवत कोण सांगतं, " तुमचं

प्रेम ही माझ्या आत्म्याची हाक आहे. भूक आहे. ती मी टाळू शकत नाही. " अशी आपल्या प्रेमाशी एकनिष्ठ असलेली प्रेमिका अश्वत्थाम्यासारखी आपल्या ओल्या जखमेसाठी जगतेय.

एका पत्रलेखकाने मराठीतील एका ज्येष्ठ लेखकाला पत्र पाठवून सवाल टाकलेला आहे, " साहित्य वाचलं, विश्वास ठेवला, मूल्ये शोधली, त्यांची जीवनात प्रचिती येईल काय हे तपासून घेतलं. स्वप्नं चंदेरी धरतीवर न उतरणारी वाटली सारी. ज्यानं वेडं केलं ते साहित्यात कुठे आहे ? "

या पत्रलेखकात सर्व थरांतील लोक आहेत, हे वर सांगितलेच आहे. प्रेमिकेची भूमिका पार पाडणाऱ्यांतसुद्धा अशाच सर्व थरांतील स्त्रिया, युवती आहेत. शिक्षिका आहे, विद्यार्थिनी आहे, गुराख्याची पोर आहे. अडाणी गृहदेवता आहे, विवाहित महिला आहे, घरच्यांच्या संरक्षणात भावी वराची वाट पाहणारी उपवर कन्याही आहे. अशा या विविध जाती, भाषा, संस्कार लाभलेल्या पत्रकर्त्यांची पत्रे ही सारी. परंतु सिद्धहस्त साहित्यिकाच्या लेखणीला लज्जित करणारी त्यांची भाषा, त्यांच्या कल्पनांचा स्वैर विलास, अंतःकरण हेलावणारी त्यांची दुर्दैवाची गाथा, भावनाविवश झाल्याने भोगाव्या लागणाऱ्या यातना, जिवाचा कोंडमारा करणारी परिस्थिती, त्यातून सुटका होताच झालेला वर्णनातीत आनंद, विरह, प्रेमभंगाचे चटके, उपेक्षेचे दुःख, विश्वासघाताचा जीवघेणा घाला, विवाहोत्तर प्रेमाची नवलाई, खुमारी, मीलनासाठी तडफडणाऱ्या जीवांचा आकांत, इत्यादी विविध भावभावनांचे संमेलन, त्यांची निसर्ग वर्णने, त्यांची सुख-दुःखांची देवाण-घेवाण, राग-लोभ, प्रेम-तिरस्कार, प्रेमसाफल्य- प्रेमवैफल्य या साऱ्या साऱ्यांत एक चैतन्य आहे. जीवीचा जिव्हाळा आहे, अमृताची गोडी आहे.

पत्रे मिळविण्यासाठी महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा इ. प्रदेशांतील आंतरभागातील दूरवर ठिकाणी जावे लागले. दिल्ली, गुजराथ, मध्यप्रांत, आग्रा इत्यादी ठिकाणांहूनही हस्ते परहस्ते पत्रे मिळाली. ज्या ज्या वेळी अशा प्रेमिकांना मी भेटलो, त्या त्या वेळी प्रेमिकांनी आपल्याला मिळालेल्या भेटीदाखल वस्तू भावविवश होऊन दाखविल्या. अजूनही पूर्वप्रेमाच्या स्मृतीसाठी जपून ठेवलेल्या असंख्य वस्तू त्यांची प्रेमनिष्ठा सांगतात. कुणी प्रेयसीने दिलेला अंगारा सांभाळतो आहे. कपाळी माखतो आहे. कुणी भारलेले गंडे, दोरे, ताईत. कुणी कुणाला दिलेली चंदनी लेखणी, कुणी कुणाला अर्पण केलेले

कुंकू, चिमण्या पाखरांची चोचीत चोच घातलेली चित्रे, कुणी सिनेमाचे तिकीट, तर कुणी प्रेयसीच्या हातचे रेल्वे तिकीट, तर कुणी वस्त्राचा एवढासा तुकडा, तर एका प्रेयसीने दिलेल्या आपल्या हिरव्याकंच बांगड्या, कुणी मुरलीधराची मूर्ती, तर कुणी गवळण राधेची मूर्ती जपतो आहे. प्रेमिकांचा स्वर्ग ज्या वस्तूत सामावलाय अशा वस्तू पाहायला मिळाल्या. त्या दाखवत असताना त्या त्या व्यक्तीची ती ती स्मृती जागी होऊन आलेले हुंदके, त्या हुंदक्यांना विसरणेच कठीण.

या पत्रांच्या अभ्यासावरून प्रेमिकांची वैयक्तिक भावावस्था, भावुक विचारप्रणाली, कुटुंबातील झालेले संस्कार, समाजाने दिलेली वागणूक, सामाजिक आचार-विचारांची पकड घेणारी छाप, धार्मिक, आर्थिक स्थित्यंतराचा होणारा परिणाम, जीवनात निर्माण होणारी अस्थिरता, कारुण्य, दौर्बल्य, वैफल्य यांचा पडलेला प्रभाव निदर्शनास येतो. तरीही मानवी जीवनाला व्यापून टाकणारा सामाजिक जीवनाच्या चिंतनाला प्रवृत्त करणारा हा एक विभाग उपेक्षित राहू नये हीच मनिषा.


एक पत्र

" जेव्हा काही कवचकुंडले तुमच्या अंगावर नसतील, तुम्ही रिते असाल, सुंदर, तरुण, श्रीमंत नसाल, कोणालाही तुम्ही काही देऊ शकत नसाल, त्या क्षणी जे तुमचे असतील तेवढेच तुम्हाला जगानं दिलेलं प्रेम असं समजा. पूर्वीच्या कथा ऐकल्या असतील, देव भक्तांची परीक्षा घ्यायला यायचा, तेव्हा अंबारीतून झुलत यायचा नाही. तो दीनदुबळ्या याचकाच्या रूपात यायचा. तुम्हीही तुमच्या प्रेमाविषयीची कसोटी घ्या आणि मग तुम्हाला सत्य प्रेम समजेल. तुम्ही लिहिलंय, मी जगावर प्रेम करतो. हेही खोटं आहे. फार तर असं म्हणा की, मी जगात प्रेम शोधतो. प्रत्येक सहृदय, प्रत्येक कलावंत त्याच शोधात असतो. आणि त्या शोधातूनच जगात सुंदरता निर्माण होते. पण खरं सांगू, तुमचा शोध चुकीच्या मार्गानं चालला आहे. प्रेम कधीही शरीरात नसतं. जर तसं असतं, तर तुमचं मन केव्हाच शांत झालं असतं. तिच्या मागून हिचा मोह तुम्हाला कधीच झाला नसता. जगावर प्रेम करणं ही एक फार विशाल कल्पना आहे. ते प्रेम अभिलाषेच्या कोषात नसतं. असं प्रेम ज्ञानेश्वर करू शकतात, कालिदास करू शकतो, अजिंठा उभा करणारा शिल्पकार करू शकतो. तुम्हीसुद्धा कराल. त्या स्वर्गीय प्रेमाच्या प्राप्तीहून त्याचा

शोधच सुंदर असतो. कदाचित असं खरं प्रेम या मातीच्या जगात नसेलही. "

" या नावाची एक इंग्लिश कविता आहे. खरं प्रेम स्वर्गापासून पाताळापर्यंत दुथडी भरून वाहतंय, पण या पृथ्वीवर मात्र मोहाचं गढूळ धुकं आहे. म्हणून ते प्रेम पृथ्वीवर गवसत नाही, दिसत नाही, पृथ्वीवर जे आपण प्रेम म्हणून ओळखतो ते प्रेम नसतं. दयेच्या पृष्ठभागावर पडलेलं विश्वात्मक प्रेमाचं प्रतिबिंब असतं. आभास असतो आणि त्या प्रतिबिंबाच्या मोहानं माणसं दयेच्या डोहात उडी घेतात. हे सामान्य माणसाचं झालं, पण तुमच्यासारख्या कलावंतानं खऱ्या प्रेमाच्या विश्वात्म प्रेमाच्या शोधात असावं. प्रेम जितकं लहान होईल, स्वतःत जितकं गुरफटेल, तितक्या कलाकृतीही लहान, कमी उंचीच्या होतात. दिवसाचे दूत आल्यावर आपोआप गळणाऱ्या चांदण्यांच्या हातासारख्या त्या लोकांच्या मनातून गळून जातात. कारण त्या मोहातून जन्माला येतात, सत्यातून नाही, प्रेमातून नाही. खरा प्रेमिक हा भोगयोगी नसतो, तो त्यागातून भोगतो. गौतम बुद्धासारखा अलिप्त राहून दयाघन डोळ्यांनी मायेच्या हातांनी जगाच्या कमलदलावरचा दुःखाचा रक्ताळता दवबिंदू टिपून घेतो. उभं जग त्याच्या हृदयाच्या स्पंदनाच्या झोक्यात क्षणभर का होईना विसावून झोपतं. खरं प्रेम असं असतं. ते दयेच्या डोहात - मोहाच्या वणव्यात उडी घेत नाही. ते स्वतःच दयेचा डोह होतं. मोहाचा जाळ आषाढमेघ होऊन शांत करतं. जगाचा खरा प्रेमी तेच जगाला देत जातो. त्याला काही देण्याएवढे जगाचे हात मोठे नसतात. तुम्ही असेच व्हा. तुमची बुद्धी, तुमची शक्ती, तुमची कला खऱ्या प्रेमाच्या शोधात राहील. माझे हात तुमच्या गळ्यात असतील. कारण ते चांदण्यांचे नाहीत. रक्ताचे आहेत. मी तुमच्या पावलावरून येणारी सीता होईन, क्षितिजापार वाट पाहणारी यशोधरा होईन, किंवा तुम्ही ज्या उन्हात दगडाचे अपार शिल्प कोरत असाल, तिथे तुम्हाला जेवण घेऊन तिष्ठत राहणारी तुमची प्रिया होईन. "

□ □ □



९

काही अक्षर प्रेमपत्रे

रोजनिशी ! होय, माझीच रोजनिशी ! फार फार वर्षांपूर्वीच्या दैनंदिनीतील दोन चार पानं... साधे चिटोरेच...सापडले... आणि त्यांनी साऱ्या भूतकाळाचा अथांग सागर आणून माझ्या पायाशी रिता करायला सुरुवात केली. बाटलीत बंद करून जमिनीत गाडून टाकलेला राक्षसच पुढ्यात उभा ठाकला. माणसाचं आयुष्य शंभर वर्षांचं असतं, त्यात किती तरी वेळा ऋतुचक्राचे फेरे गरगरून जातात पण त्या प्रत्येक ऋतूची धुंदी, मस्ती, उन्माद, सौंदर्य जाणवणारा काल मात्र ठराविकच असतो, नजरेत नवलाई उतरते, शरीराचा कण नी कण सजग होऊन उठतो. रक्ताचा थेंब नी थेंब उसळ्या घेत असतो. साऱ्या जीवनातील प्रेम, मांगल्य, सौख्य यांचे आकंठ पान करून माणूस तृप्त होतो. याच ठराविक कालात... नंतर उरतो केवळ व्यवहार... केवळ संवय... ज्यांनी आज मला गुलाम केलंय...

... आज मला दैनंदिनीची दोन पाने न मिळता जणू माझं यौवनच मला परत मिळालंय. सारी दुनिया अनोखी - भासणारी संभ्रमावस्था त्यालेलं... यौवनाच्या उंबरठ्यावरचे माप थरथरत्या पावलाने लोटू पाहणारे काव्य ... अंतरंगात अनामिक हुरहूर दाटून सारं शरीर पिसासारखं हलकं फुलकं झालेलं... पराभव अपयश ठाऊक नसलेलं सतत आकाशीच्या चंद्र चांदण्यांशी

हितगुज करण्यात रंगणारं... शाळेतील अकरा वर्षाच्या बाल्यावस्थेचा वनवास संपून महाविद्यालयीन जीवनात सम्राज्ञीच्या तोऱ्यात मिरवणारे यौवन ! आणि... आणि पाय घसरून साऱ्या जीवनाचाच तोल ढासळण्याची कठोर सजा फर्मावणारंही यौवनच !

मी कॉलेजच्या प्रांगणात पाऊल टाकलं. आणि चारी दिशांनी सुवर्णाची आभा झळाळून उठली. जणू दिवसाला रात्र नव्हतीच. जीवनात दुःख, निराशा नव्हतीच, होता फक्त प्रकाश, फक्त चैतन्य, फक्त प्रेम.. फक्त प्रेमच...

...गप्पा ऐन रंगात आल्या. तेवढ्यात शिपायाने मला सांगितले की, सरांनी बोलावलंय, फक्त सरांनी एवढं सांगितल्यावर मी ओळखलं की, कोणत्या सरांनी बोलावलेलं असावं... चटकन स्टाफरूममध्ये गेले. सर काही तरी लिहीत होते. मी आत आल्याचे त्यांच्या लक्षातच आले नाही. चेहऱ्यावरचं लाडकं हास्य, काळ्या कुरळ्या केसांचा गोड फुगा, मोठ्या झोकात हालवीत, सारं लक्ष लिहिण्यात केंद्रित करून, काहीतरी लिखाण चाललं होतं खरंच, विलक्षण धुंद होती ऐट ती ? एखादी चंचल तरुणी पाघळली असती. लगेच मी तरी तशीच पाहात उभी राहिले. ' नजर लागेल ना ! ' मनात विचार चमकून गेला. ' भलताच स्मार्ट आहे हं ! ' मनाने कबुली दिली. ' काय जालीम नजर आहे ग बाई,' डोळ्यांनी इशारा दिला. 'का बोलावलंत?' असं विचारण्याचं भानच राहिलं नाही. दुसरा कोणी असता तर बोलावलं आणि बसला आपलं काम करीत, म्हणून ताडकन काहीतरी बोलले असते. पण...पण...

इथंच खरा सुनिश्चय झाला मनाचा. बस्स ! प्राण गेला तरी हरकत नाही, पण प्रेम करायचं तर यांच्यावरच. दिव्य प्रेमाची वेल इथेच खरीखुरी फुलेल. यांच्याच हृदयात आपण वेल लावूया.

यासाठी खूप खूप सहन करावं लागेल. आई-वडिलांचा कायमचा रोष, आजोबांचा राग, भावंडांचा विरह, समाजाचा द्वेष, हेटाळणी, निंदा, तुच्छता सारं-सारं सहन करेन. पण यांच्यावरच प्रेम करायचं, यांनाच जीवन अर्पण करायचं. यांनाच कुंकवाचा धनी मानायचं बस्स !

पण ? ...

पण त्यांना आवडेल का हे ? त्यांचा विश्वास बसेल का माझ्यावर? न बसेना ...

ओंजळीत घेतलेली फुलं, ताजी टवटवीत व दवबिंदूंनी नुकतीच न्हाऊन

निघालेली असली म्हणजे झालं ! मनात नसताना अर्पण केलेल्या माणिकमोत्याऐवजी या साध्या फुलांची किंमत श्रेष्ठ असते. अशाच फुलांनी मी त्यांची पूजा बांधेन.

कोणत्याही फलाची अपेक्षा न करता !
आणि म्हणून म्हणेन -
मी तुझ्या माझ्यात होते
विश्व सारे विसरून जा
आज सीमा त्या जगाची
तूच ओलांडून जा ! !

प्रेमाच्या नव्या रंगांनी रंगून रंगून गेले. नाचले. बागडले. स्वप्नांची जरतारी मुलायम पंखं फुटली. भारून गेले मी. मन तेजाने फुलून गेले. मी काव्य जगले. काव्यच झाले.

भय्या,

कालच पुन्हा मालवणात आलेय. बरोबर गेल्या चार दिवसांतील खूपच क्षणांच्या स्मृती पुन्हा पुन्हा मोहरतात. हळवा, नाजूक, भावूक असा रिमझिम पाऊस स्मृतीच्या टवटवी अधिकच खुलवतोय.

आमच्याकडे वांझोट्या निशिगंधाला कोवळा कोंब फुटलाय. आशा पुन्हा पालवू लागलीय, कधी कधी आयुष्यात अर्थच वाटेनासा होतो, तर कधी आयुष्याच्या क्षणाक्षणांतून मोहर दरवळू लागल्याचा भास होतो नव्हे प्रत्यय येतो.

... अजून खूप खूप लिहावसं वाटतंय पण न लिहिताही तुला सारं समजलंही असेल.

नाव नसलेली कविता
अजून ओल्या क्षितीज काठी
एक अनामिका व्यथा तरळते
ठिबठिबणाऱ्या थेंबा ओठी
विकल स्वरांचे गाने झरते...
न कळे केव्हा कधी हरवले

स्वप्न शिंपल्यामधील मोती
आठवणीचे कितीक वळसे
क्षणाक्षणांशी ओले होती...
ही कविता तुला खूप सांगून जाईल.

" देव अजब गारुडी " म्हणतात. पण प्रेमही अजब गारुडी आहे. एक महान गुरू आहे. हातात छडी न घेता, वर्षानुवर्षे घशाची सालडी सोलटून निघेतो न ओरडता हा गुरू ज्ञान देत असतो. याची एक नजर.. एक मदहौशी दृष्टिक्षेप शिष्यावर पडायचा अवकाश ... अज्ञेयात डोकावण्याचे अलौकिक सामर्थ्य शिष्याला लाभते.. चराचरांशी हितगुज करण्याची शब्दातीत भाषा त्याला साध्य होते. अणुरेणूशी त्याची जवळीक जडते. आपुलकीचे बंध निर्माण होतात.. दोन बाहूंत सागर कवटाळू.. की मीच सागर बनू.. या निसर्गाच्या रंगात मीच रंगून जाऊ... काय जादू होते समजतच नाही...नुसती ओढ...ओढ...

भय्या,

सतत बारा तास प्रवास करून मन शिणलं होतं. शब्दही जड झाले होते. अशा वेळी दादांकडून तुझं पत्र हाती आलं. अगदी वेळेवर. अधाशासारखं वाचून काढलं. तू भेटल्यासारखं वाटलं. तुझ्या कल्पनेप्रमाणे तुझं पत्र व इतर पत्रे मला आजच्यातच हाती आली- आम्ही म्हणजे... म्हणजे मी व मीना गोवा दर्शन घेऊन आलो. संधी आली, फायदा घेतला. पाच-सहा दिवस तहानभूक विसरून नजर निसर्गाची शराब पीत होती. वखवख शांतवीत होती. प्रयत्न करीत होती. उंच उंच नारळीवर, नारळीच्या मुग्ध मधुर, स्नेहल झावळ्यांवर पापण्या थरारत होत्या. लाल लाल माती मनाला चाटून जात होती. तर मऊशार रेतीशी लडिवाळ क्रीडा करणारा सागर - सागराच्या एकामागून एक एक येणाऱ्या लाटा-हृदयतारा छेडीत होत्या. शब्द मूक बनले होते. स्पर्श बधीर झाला होता. भावना नाजुक बनल्या होत्या. जगाचा विसर पडला होता. अफाट समुद्र, त्यावर पसरलेली हिरवी माया पाहून मन मोहून गेलं होतं. क्षणाक्षणाला बदलत्या रंगानं दर्शन देणारा सागर, कधी अतीव शांत, नाजुक, नखरेल वळणं घेत होता, तर कधी लाटांतून सिंहगर्जना होत होती. क्षितिजाशी आकाश अन् सागर यांचं जणू अतूट मीलन झालं होतं. सागरात मन गुंतलंय. सागरात

हरवलंय. सागर- विरहाची एक अनामिक हुरहूर लागलीय. अन् तुझीही... तुझीही.... तुझ्या शराबी ओठांची... कळगूट बीच, डोनापोला पॉईंटवर गेल्यावर तर मीच मला हरवून बसले. वाटलं ... वाटलं, एक छोटीशी नाव सजवावी. अन् वाहवत, वाहवत एकटेच सागरात प्रवासाला निघावं. जगाशी असलेला संबंध तोडून सागराशी अनंत अखंड नातं जोडावं. सागराच्या लाटा कुरवाळाव्यात. सागरावर प्रेम करावं अन् सागरमय व्हावं.

सागराला घट्ट घट्ट मिठी मारावी कधीच न सुटण्यासारखी ...बंध निखळून पाडणारी. त्या दिवशीसारखी.

भय्या, खूप खूप लिहावंस वाटतंय पण लिहिताच येत नाही. पेन हातात, पत्र पुढ्यात. पण मन मात्र तुमच्यात घुटमळतंय. मनाभोवती कुठलीतरी अनामिक पूर्वरंगा फिरतेय. काय होतंय उमजत नाही. समजत नाही, याचं उत्तर कुठे सापडेल सांगू ? तिथे... मनकवड्या चांदण्यात.

तुझीच,

' इथली ? अं हं ... तिथली '.

आता समजलं मला काव्याचं वेड कसं जडतं ते. त्याच्या सहवासाचं मोरपीस अंगावरून फिरलं. नी माझ्या मनाला लाख लाख डोळे फुटले. त्याचं काव्य मी जाणलं. अनुभवलं. त्याचं काव्य मी जगले... मीच काव्य झाले... माझ्या काव्यानं त्यालाच भारून टाकलं... थरारून सोडलं....आशा-निराशेचा ऊन - पावसाचा खेळ त्याच्याशी मनानं मांडला ... जाणवतंय पण उमगत नाही ... मनाला ओढ आहे, पण शरीरात त्राण नाही ... चंद्र - चांदण्यांची, झाडा-पानांची खुणावती भाषा त्याला समजते. पण तो प्रतिसाद देऊ शकत नाही. मनात दाटल्या निराशेचा अंधार निपटण्याचा प्रयत्न करतोय तो ... सोबतीला माझी कविता.

रात्रीचे अकरा वाजून गेलेत, बाहेर नवमीचे धुंद चांदणं शीळ घालतंय. पानापानांतून वारा हुंकारतोय. पानवलेलं बाभळीचं झाड आशेचा स्वर झेलतंय. सारीजण मला बोलावतायत, चारी भिंती खायला उठल्यायत. पण कल्पनेचं पाखरू कल्पनेतच भरकटतंय, काहीतरी गूढ गूढ जाणवतं, पण उमगत नाही. बाहेर जाता येत नाही. खूप खूप दूर जावंसं वाटतं, पण... मोहर मोहरण्यापूर्वीच नकळत गळून पडतो. परवा औदुंबरला जाऊन आलो. सारं शांत शांत हवं

हवंसं वाटणारं. तिथंच अजूनही मन घुटमळतंय. तुझी कविता वाचली. काही काही ओळींत मन शहारत राहतं. कवितेचा शेवट काळीज थरारून सोडतो. तुझी कविता अनुभवली ... तुला हवी तशी ... ! ... मीच तुझी कविता होऊन...

याला साक्ष त्या ' औदुंबराची ' ... ' कृष्ण ' काळ्या निळसर जळाची. आणि अखेरीस माझ्यातल्या ' तुझी. '

तुझी
' कविता '

नजरेच्या इतक्या संगिनी रोखल्या असतानाही मी जिवाचा धडा करून त्याला निरोप दिला ... संकेतस्थळी भेटण्यासाठी जीव आसुसला होता. कुणी दुसरी तर ..... छे ! छे ! ... मन आनंदी, तृप्त असेल तर दगडधोंड्याची वाटही फुलांच्या पायघड्या घालाव्यात तशी मृदू मुलायम भासते ... पण मन सांशक, बेचैन असेल तर फुलेही काट्यासारखी खुपतात ... निसर्गाचं वेडावणारं सौंदर्य दृष्टीसमोर नको होतं. मन आक्रंदत असतं. - मी तुझीच आहे... फक्त तुझीच ... तू प्रतारणा केलीस तरी मी तुझी म्हणूनच जगेन ... तुझी म्हणूनच मरेन ....

सप्रेम नमस्ते !

आठवडाभर पत्राची वाट पाहात वेड्यासारखी बसले होते. खूप निराश झाले हो मी. खरं म्हणजे रागही खूप आला होता मला तुमचा. पण का कोण जाणे, मनाला विश्वास होता, की तुम्ही जरूर पत्र पाठवाल.

माझ्या हृदयाला मरेपर्यंत तुमचीच आठवण कायम राहील. कधीच ती संपू शकणार नाही. माहीत आहे मला तुम्ही परकीचे आहात, माझे नाही. पण अगदी खरं सांगत आहे मी, मी परक्याची नाही. मी सतत तुमच्या आठवणीत जगत राहीन. आणि तुमच्या आठवणीतच मरेन मी. तुम्ही म्हणता " लक्ष्मी, तू मला खूप दिलंस. प्रेम करताना हृदयाची ओंजळ रिकामी केलीस. मी कोण - कुठला-कुठे आलो. तरीसुद्धा तू मला तुझाच मानलंस. लक्ष्मी, मी तुझ्यापासून दूर नाही. कोणतीही शक्ती तुझ्यापासून मला दूर करू शकणार नाही. " खरंच का तुम्ही मला तुमच्यापासून दूर करणार ?

माहीत आहे हे पत्र कुठून लिहीत आहे मी ? एका जंगलात, एका वृक्षाखाली बसून. समोर माझ्या शेरड्या चरून बसल्या आहेत. या जंगलात मी, लीला, आमच्या दोघीशिवाय कोणच नाही. खूप सुंदर वातावरण आहे. गार वारा सुटला आहे. खूप खूप बरं वाटतंय. लीला गाणं गुणगुणत आहे- ' ये दिल तुम बिन कही लगता नहीं हम क्या करें ! ' आणि मी पत्र लिहिण्यात गढून गेले आहे. पण मन उदास आहे. कोणाच्यातरी आठवणीत धुंद झालं आहे .... '

समोरच्या आंब्याच्या झाडावर खूप कोकिळा मधुर स्वरात गात बसल्या आहेत. पण त्यात देखील करमणूक होत नाही. या सुंदर वातावरणात फक्त तुमचीच कमतरता भासत आहे. मन कुठंच लागत नाही, सगळं काही गढूळ गढूळ आहे. तन माझ्याजवळ आहे, पण मन माझ्याजवळ नाही. देव जाणे कुठपर्यंत ते भटकतच राहणार. कधीतरी त्याची शांती, तृप्ती होणार की नाही ! खूप खूप आठवण येते तुमची. आणि जीव तळमळतो !

पत्रं लिहिण्यास उशीर करत जाऊ नका. सर्व काही पत्रावरच आधारीत आहे माझं. राहून राहून सारखं असं वाटतंय, तुमच्या येण्याआधी मृत्यू तर येणार नाही ना मला ? जर आला तर तुमच्या चरणावर डोकं ठेवीत असता, किंवा तुमच्या मिठीत असताना येवो. खरंच खूप सुखाने, समाधानाने, मृत्युमुखी पडेन मी. राग मानू नका तुम्ही, पण मन चिंती ते वैरी चिंतत नाही. क्षमा करा. खूप....खूप आठवण येते तुमची. कसं सांगू !

केवळ तुमचीच
लक्ष्मी

या प्रेमाच्या राज्यात मेघ, हंस, कबूतर, चंद्र वगैरे अनेक दूत झाले. हे सारे ' चल ' दूत. पण मी वेडीने स्थानबद्ध सुरूच्या झाडांनाच दूत करून टाकले. माझं प्रेम स्वार्थी म्हटलं त्यानं ... मी मानलं ते .... स्वार्थ नसतो कुणला....तो म्हणाला, ' मोह आवर, प्रगतीची आगेकूच चालू ठेव. ' .... पण मी तर मोह जिंकलाच आहे... त्या मोहालाच मी ' आत्म्याची हाक म्हटलं, आत्म्याची भूक म्हटलं. '... आणि भूक माणूस कशी टाळणार ? आहे ना बिनतोड युक्तिवाद ? ... खरं तर भूक मनाबरोबर शरीराची होती... मिठीत संपून जाण्याची...पण....पण..

प्रिय,

एक माणूस कशात गुंतलंय, का आमच्यावर रागावलंय ? आमच्या पत्राचं उत्तरसुद्धा दिलं नाही. इथं असतात तर राग काढता तरी आला असता. पण तिथे बसून रुसल्यावर काय करायचं. मला वाटतं की मला पंख असायला हवे होते म्हणजे मी केव्हाही तुमच्याकडे आले असते, आणि कमलकुंजाच्या सर्वांत उंच जागी बसून गाणं म्हटलं असतं.... पण आता काहीच करता येत नाही. मी रोज सुरूंच्या झाडांना विचारते,

' तुम्ही खूप उंच आहात ... तुम्हाला नाशिक दिसते का ? तिथं माझं माणूस आहे...ते आता काय करतंय, कसं आहे ते मला सांगाल का ? ' ती बिचारी मला हसत असतील. कदाचित हसत नसतील...कारण त्यांनाही माणसासारख्या भावना असतात. मला वाटतं, आपणच दोन झाडं व्हायला पाहिजे होतं. आणि आपल्या फांद्या एकमेकांत गुंतायला हव्या होत्या.

पत्र कोणाला दाखवू नका...अगदी खरं खरं एक लिहिते ... खूप रात्र झाली आहे, मी एकटीच आहे. उगाचच वाटतंय जिन्यात दबती पावलं वाजावीत, दरवाज्यावर टक टक व्हावं आणि...आणि तुम्ही यावं. आणि तुमचे कुरळे, कुरळे केस अगदी घट्ट छातीशी धरावे. कधीच सोडू नये. म्हणाल, किती निर्लज्ज आहे काय वाटेल ते लिहिते ! पण खरं सांगा. तुम्हालाही असंच वाटतं ना ? माझी ओढच अनावर आहे... तुम्ही त्या दिवशी म्हणाला होतात, की " आपण असं मोहात गुंतत गेलो तर आपली प्रगती कशी होणार ? " मी मोहात कधीच गुंतले नाही. मी मोह जिंकत आले...तपस्विनी राहिले. पण तुमचं प्रेम हा मला पडलेला मोह नाही. ती माझ्या आत्म्याची हाक आहे. भूक आहे. मी ती टाळू शकत नाही. मी तुमच्यासाठी कोणताही त्याग करेन. पण तुमचा त्याग करणं मला अशक्य आहे. तुम्ही तुटून गेलात तर मी राहणार नाही. तुम्ही म्हणत आलात, " माझं प्रेम स्वार्थी आहे !" असेल कदाचित, चितेवर उभी राहिलेली सतीसुद्धा स्वार्थीच असते. कारण मृत्यूनंतर सुद्धा पतीला सोडण्याची तिची इच्छा नसते. माझ्या मनात नेहमीच असं येत राहतं की देवानं आपल्याला एकमेकांसाठीच निर्माण केले आहे. नाहीतर जीवनातली अनेक वळणं घेत एकमेकांपाशी कसे येऊन पोचलो असतो ? विनायक हे पार्वतीचं एक नाव आहे. कदाचित तिच्यासारखी मला तपश्चर्या करावी लागेल. पण तू माझाच आहेस आणि राहशील पण फार फार भीती वाटते. तुमच्या

त्या परिसरात कृष्णा-कोयना दुभंगतात. तरीही मी श्रद्धाशील आहे.

म्हणाल, या खुळीनं पत्रात माझ्याबद्दल काही विचारायचं सोडून स्वतःचंच लळित काय चालवलंय ? सॉरी ! पण मला खूप बरं वाटतंय ... मोकळं झाल्यासारखं ? वाटतंय, मला तुम्ही कधी भेटाल ? वाटतंय, की तुम्हाला बघून वर्षे लोटलीत. मन फार उदास झालं, तेव्हा एक कथा लिहिली. हा पलायनवाद खरंच फार चांगला ठरला. गोष्ट लिहिताना मीच राधिका झाले. अन् तिचा कृष्ण अर्थात तुम्हालाच व्हावं लागले. ही माझ्या मनातली भातुकली तुम्हाला आवडेल कदाचित.....मला तसल्या भानगडी अगदी जमत नाहीत.

तुमचीच,
राधिका

' त्याचं पत्र वाचलं - आणि वाईट वाटलं. माझा ' सपनोंका राजा ' तोच होता. त्याच्याशिवाय मला जगताही आले नसते. भारतीय स्त्री एकदाच एखाद्यावर जीव जडवून टाकते. तिथंच सर्वस्व पाहते .... पण त्यानं माझ्याविषयी संशय घेतला.....कुणा कुणाचं म्हणून त्यानं नाव घ्यावं. दारात कावळा ओरडला, की त्याच्या पत्राच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहणारी मी. त्याच्या त्या पत्राने भांबावून गेले. चक्रावले .....काया थरथरली .....

प्रिय शाम,

तुझं पत्र आलं का त्या दिवशी कावळा सकाळपासूनच खिडकीवर येऊन सारखा ओरडत होता. मी त्याला म्हटलं, 'शामचं पत्र येणार असेल तर उडून जा ' (मोठ्याने नाही हं, हळूच म्हणाले) आणि असं म्हटल्याबरोबर खरंच कावळा उडून गेला. दुपारीच तुझं पत्र मिळालं. तू मात्र माझं पत्र नसल्यामुळे माझ्यावर कल्पनाही करता येणार नाही एवढा रागावला असशील ना ? आणखीनही रागावलास तरी मला ते आवडेल. पण त्या रागामुळे तुला त्रास होऊ नये असं मात्र वाटतं. ए, या पत्रात एक गोष्ट सांगू का ? मी आमच्या घरात अजूनपर्यंत, आपले मुळीच संबंध नाहीत असंच सांगितलंय. तू सुद्धा असंच घरी सांग हं - शेवटपर्यंत मात्र असंच सांगू नकोस म्हणजे झालं ! रागावला नाही ना ? थांब, मला सुद्धा थोडं रागवायचं आहे. संशय तू मुंबईस जाण्यापूर्वी पाठवलेलं पत्र मी अजून ठेवलं आहे. वाचून फार वाईट

वाटलं. तुला वाटलं असेल मला वाचून काहीच वाटणार नाही. पण ' तुझा ' " सपनोंका राजा " मी नसावा, तो तुझा " सपनोंका राजा " अनिल तरी असेल किंवा परब, अभ्यंकर असेल हे वाचून खरंच वाईट वाटलं. अनिलच्या बाबतीत म्हणशील, तर मी तरी अजूनपर्यंत त्याच्याशी तू म्हणतोस त्या " राजा-राणी " या नात्याने वागलेली नाही. आणि त्याच्याही मनात तसं काही नाही, असं मला वाटतं. गेल्या वर्षीचा प्रसंग लक्षात आहे म्हणा पण होते माणसाच्या हातून एखादी चूक. पण तो मात्र आपल्याविरुद्ध मुळीच नाही. नाहीतर विलासिनीच्या आधी त्यानेच सर्व आईला सांगून टाकलं असतं. मी तुला भेटायला येते, तेव्हा तोच आईला खोटंच सांगतो. म्हणून काही तो माझा सपनोंका राजा नाही. दुसरा परब, त्याच्याशी तर मी अजूनपर्यंत एकदाही बोललेली नाही. विचार त्यालाही, खोटं वाटत असल्यास, सध्या तो इकडं आलाय, घाबरू नकोस. मी काही त्याच्याशी बोलायला वगैरे जाणार नाही. नाहीतर तुझं तिकडं लक्ष लागायचं नाही. तिसरा राहिला अभ्यंकर, त्याचा काही प्रश्नच नाही. कारण तू हल्लीच त्याला भेटून आला आहेस. त्यामुळे काही सांगण्याची गरजच नाही. आणखी कोणी आहेत का ? असल्यास अगदी जरूर कळव हं. पण पत्रातून तरी तुझं माझ्याबद्दल काय मत आहे ते कळलं, म्हणजे तुझ्यावर प्रेम करते ते शोसाठी आणि प्रत्येक वेळी तुला भेटायला येते ती कदाचित माझ्या घरी वेळ जात नसेल म्हणून येते, असंच ना ?

तुझ्या बोलण्याचाही अर्थ नेहमी असाच असतो की मला मात्र तुझ्याबद्दल काहीच वाटत नाही. तर मग आता तुला पत्र पाठवणे सुद्धा योग्य नाही, बरोबर ना ? तुझाही विचार काय तो कळव. पण माझ्यावर उगाच संशय घेऊ नकोस. तुझ्याशिवाय कोणावरही अजूनपर्यंत मी प्रेम केले नाही, आणि यापुढे करताही येणार नाही.

ए, तुला जरी काहीही वाटत असलं ना, तरी माझा 'सपनोंका राजा' तूच आहेस.

तुझीच
शालिनी

प्रिय...
विविध भारतीवर आताच ' मान जाइये ' मधील ' ले चलो ' ....

हे गाणं लागलं आहे. सिनेमा पाहात असताना तू ह्या गाण्याची एक ओळ म्हणाला होतास त्यामुळेच हे गाणं चांगलं लक्षात राहिलंय. बाकीचं ' मान जाइये ', ' तन्हाई ' मधील आता काहीच आठवत नाही. तुझ्याबरोबर पाहिलेल्या प्रत्येक पिक्चरचं असंच होतं. गाणीसुद्धा लक्षात राहात नाहीत. कशी राहतील..नाही का !

ए, तुला एक सांगायचंच राहिलं. मी तुला मागील पत्रात लिहिलं होतं ना, की नको ती शंका ' नवीनच शंका ' निर्माण झाली आहे. ती शंका खोटीच ठरली. ए, खरंच रे मी कित्ती घाबरले होते ? ' चुकले ' असं म्हणून मी देवाची क्षमाही मागितली. एकटीनेच नाही हं. माझ्याबरोबर माझी एक मैत्रीणही होती. तिची सुद्धा हल्ली माझ्यासारखीच अवस्था झाली होती, कारण ती सुट्टीत एक दिवस तिच्या प्रियकराबरोबर जुहूला गेली होती. तेव्हापासून ती सुद्धा घाबरत होती. परंतु आपल्या हातूनही ' सावधगिरीत ' काहीच चूक झालेली नसल्यामुळे आपल्याला क्षमा करण्याचा त्रास देवाला घ्यावाच लागला नाही, खरं की नाही ? ए, पण ह्या वेळी तुला सर्दी झालेली नसणार. कारण मलाच हल्ली बरेच दिवस सर्दी झाली नाही. तरीही तुला झाली असल्यास कळव हं. त्यामुळं पुढच्या वेळेस आपल्या वागण्यात बदल करता येईल. पत्र पाठव.

तुझीच,
' पार्वती '

आवळा देऊन कोहळा काढायचं कसबही असतं वाटतं या प्रेमी जगतात. तो सिनेमाला गेला.... मला न घेता गेला हे जर .... पण किती चिडवून घेतलं त्याला....त्याची झालेली फजिती ऐकवून त्याला सतत डिवचण्यात किती आनंद वाटत होता....आसुरी आनंदच म्हणायचा तो....कडवट औषध पाजत मधाचे बोटही चाटवत राहायचे...स्वतःला चुकवल्याचे वैषम्य अशा तऱ्हेने व्यक्त करायचे... पण म्हणून त्या व्याबद्दलची चिंता, काळजी, आपुलकी, स्नेह कुठेही उणा होत नाहीत...त्यांचा जागता पहारा असतोच...

संशयी
विनोदी
प्रिय... ? very very sweet kiss
स. न. वि. वि. a new sweet kiss

मी काल पाठवलेले पत्र मिळाले ना ? की नाही ? हे पत्र मी मुद्दाम तुम्हाला लिहिलं आहे ! माझ्यापासून जरी लपवण्याचा प्रयत्न केलात तरी मला समजलं....बरं का ? मला लागलीच टेलिफोन आला ! काल म्हणे तुम्ही सिनेमाला गेला होता ? मग कसा काय होता सिनेमा, आवडला की नाही ? मला मात्र तुमच्याकडे बघून हसूच येतं. असं वाटतं खूप हसावं. तुम्ही चिडेपर्यंत. (का...? का....?) काय म्हणता ? मला काय माहिती नाही ! तुमची काल फजिती झाली ! हो ना ? खरं ना ? नाही. नाही काय म्हणताय ? चांगलाच पचका, वडा झाला. ग्रेट वडा झाला. दहिवडा ऊर्फ फजिती झाली. सिनेमाला गेलात आणि मध्येच लाईट गेली की नाही ? हे खरं की नाही ? अं ! मला फसवून, चकवून जाताय काय एकटे एकटे सिनेमाला ! म्हणून ' पचका ' झाला ! असं वाटतंय खूप खूप चिडवावं तुम्हाला. नुसतं पत्रातूनच तुम्हाला चिडवण्याचं समाधान झालेलं नाही ! आता दुकानात बसलेले (केव्हाही !) दिसलात ना की येऊन मीच चिडवते की नाही बघाच ! चिडवून चिडवून बेजार करणार आहे ! बघाच कसे टॉन्ट मारते ते. अर्धा सिनेमा सोडून यावं लागलं ना ! लाईट गेले म्हणून ! (सिनेमाच्या टॉकीजमध्ये बसताना काय वाटलं, मुंबईच्या चौपाटीवर बसतोय !) की सिनेमा पाहायला बॉक्समध्ये बसलोय ? ... तुम्ही अप्पलपोटे आहात. मला सोडून गेलात काय ? बरं झालं, चांगलीच फजिती झाली ती ! मुख्य मजेचा प्रश्न राहिलाच की, पण ते सांगा सिनेमाला ऐटीत गेलात, पण बसायला काय नेलं होतंत ? सतरंजी, पोतं का वाकळ ? अं ! रागवताय काय असं ! अहो, पण मी काय करू.... तुमचा वडा झाला तर मला सांगून गेला होता का ? का मी जा म्हटलं होतं. (मांजर डोळे झाकून दूध पीत असतं. त्याला वाटतं, आपल्याला कोणी बघत नाही ! पण धक्का लागून सगळं दूध सांडल्यावर जो वडा फजिती होती, ती त्याची त्यालाच माहीत) मला काल ... सांगितलं तुम्ही गेलात ते ? काल रात्री मी वाचत बसले होते. काही केल्या झोपच येईना. काय हो, तुमचा निश्चय ढळला वाटतं ! तुम्हीच म्हणाला होता ना ' रजा ' तुझ्यासाठी मी

सिनेमा बघणार नाही ! मग मला सोडून कसा बघितलात ? अं ! तुम्हाला ' मराठी सिनेमा ' आवडतात ! अजून ' पाळी ' झालेली नाही हं । लवकर औषध घेतलं पाहिजे ! मला वाटतंय तुम्ही सिनेमाचं निमित करून मी सिनेमाला जाते काय हे पाहायला गेला होता. हो ना ? तुम्ही माझ्यावर लक्ष ठेवा किंवा ठेवू नका .... माझं कर्तव्य मी करणार ! तुमचा शब्द मोडून मला तुमच्या इच्छेविरुद्ध जायचं नाही. एकदा नाही म्हणजे नाही ! माझ्या तावडीतून तुमची अजून सुटका झालेली नाही. अजून तुम्हाला चिडवायचं आहे ! फार रागावला असाल ? त्याबद्दल एक ' स्वीट किस '

तुमचीच

' स्वर्गीय सहवास-अमृताची गोडी-तुझीच आवड-वेड्या जीवा ' अप्राप्य ते स्वर्गीय असतं, अनुपमेय असतं....जोवर अग्नीचं भय असतं तोवर माणूस दूर असतो. पण एकदा का त्या ज्वाळांचे आकर्षण निर्माण झाले की त्या लपेटीत जीव गेला तरी पर्वा उरत नाही....साऱ्या जगातील सौंदर्य, सुरूपता, सुगंध, सुरसांची तिथेच मैफील रंगते....आणि वाटतं असंच घडावं....पुन्हा.....आणखी.....पुन्हा.

' चटावला जीव-भंगला आचार
सुख ते अपार-ओढी जीवा '

प्रिय..... यांना मंदाचा सप्रेम नमस्कार वि. वि.

आपण गेल्यापासून मला आपली एकसारखी आठवण होते. चंद्र आकाशात दिसावा आणि लगेच थोड्या वेळाने ढगाआड अदृश्य व्हावा, त्याप्रमाणे तुम्ही मला भेटलात- आणि माझ्यापासून दूर झालात. त्यामुळे मला फार वाईट वाटते. देवाने एका रात्रीत आपली ओळख करून दिली. हीच ओळख जन्मभर असावी अशी मी देवाजवळ प्रार्थना करते. त्या रात्री आपण माझ्यावर एखादी जादूची विद्या केल्याप्रमाणे माझे अंतःकरण हिरावून घेतलंत. त्या रात्री माझ्या ओठांना झालेला तुमच्या ओठांचा स्पर्श मला अजूनही आठवतो-एखाद्या गुलाबाच्या पाकळ्यांचा कोमल स्पर्श माझ्या ओठांना होत आहे असा भास होत होता आणि दुसऱ्या दिवशी तुम्ही माझ्या स्वप्नात येऊन मला आपल्या प्रेमात छळून गेलात. आपण एकमेकांच्या सहवासात साऱ्या

जगाला विसरलो होतो. आपल्या दोघांचा सहवास घडवून आणणारा काळा शेला पांघरून आलेली ती सुंदर रात्र अजून मला एकसारखी सतावीत आहे. एखाद्या फुलाच्या माळेचा विळखा माझ्या शरीराभोवती पडावा त्याप्रमाणे आपण आपल्या बाहुपाशाचा विळखा माझ्या शरीराभोवती घातला होता. तोच कोमल ओठांचा व बाहुपाशाचा स्पर्श अजून मला हवाहवासा वाटतो. आपले हे प्रेम, आपली ती पहिल्या रात्रीची पहिलीच छोटीशी मुलाखत आयुष्यभर टिकावी अशी मी ईश्वराजवळ प्रार्थना करते. माझ्या हृदयात मी आपली सुंदर अशी मूर्ती ठेवून तिची पूजा करीत बसेन. आपण आपला एक छोटासा सुंदर असा फोटो काढून न विसरता लवकर पाठवून द्या हीच मी आपणाजवळ विनंती करते. आपण मला जोपर्यंत फोटो पाठवून देणार नाही तोपर्यंत मी जेवणाला स्पर्श देखील करणार नाही. आपल्या प्रेमात आपण मला वेडी करून ठेवली आहे. आपल्या आठवणीने मी एकसारखी रडत बसले आहे. तरी आपण मला लवकर, मेहरबानी करून आपला फोटो पाठवून द्या म्हणजे त्या फोटोकडे पाहून मी सर्व काही विसरेन. असो, लिहिलं तेवढं थोडंच वाटतं. आपण आपल्या खुशालीचे पत्र लवकर पाठवा. मी आपल्या पत्राची व फोटोची अगदी आतुरतेने वाट पाहात आहे. असो.

आपली
नशा

दोन मनांचे मीलन घडविण्याचा खटाटोपणा नजरेकडून घडतो. मनाचे मीलन होताच शरीराला मीलनाची ओढ लागते... पण शरीरच असमर्थ ठरले तर ... कमकुवत ठरले तर...मन तृप्त असूनही शरीर अतृप्त असेल तर तर युद्ध जुंपते...मनाविरुद्ध शरीर...माझ्याच मनाला माझ्याच शरीराचे वैर पत्करावे लागते ...आणि शेवट विरह भंग....असंतोष...

' प्रिय..... '

तुमचे पत्र मिळाले ! माझी प्रकृती बरी आहे. आता काळजी करू नका हं ! तुमच्याकडून आल्यावर दोन दिवस फार त्रास झाला म्हणून कुठेच बाहेर दिसले नाही. त्या दिवशी तुमची काहीच चूक नव्हती. तुमच्यासाठी एवढासुद्धा त्रास सहन होऊ नये... याबद्दल माझ्या मनाला लागून राहिले आहे.

मला त्रास होतोय हे तुम्हाला मला दाखवायचे नव्हते... पण जास्तच त्रास झाला....! मी आयुष्यात केव्हाही विसरणार नाही, की मी तुम्हाला निराश केले; तुमची इच्छा अपुरी राहिली ! खूप रागावला असाल माझ्यावर ! तुमच्या भावना मी जाणल्या पण ...तुम्हाला दिलेलं दुःख मी केव्हाही विसरणार नाही. ते आठवले की सारखं रडू येते ! त्या दिवशी मला होत असलेल्या वेदना मी विसरून गेले. पण तुम्हाला दिलेले दुःख... तुमची अपुरी इच्छा. माझ्या हातून साधे तुमचे समाधान करता आले नाही. किती मोठी मी तुमची अपराधी आहे ! या सर्व वेदना मी केव्हाही विसरणार नाही. बरे तुमच्याजवळ क्षमा माफी तरी कोणत्या तोंडाने मागू ? लाज वाटते तुम्हाला तोंड दाखवायची. छातीत थोडं दुखतंय. का ? ते आल्यावर सांगेन ! आता तसा मला कोणताच त्रास होत नाही. त्या दिवशी अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण होईलच. मन घट्ट आहे. पण शरीर दगा देते त्याला मी काय करू ? रागावू नये. मला गिळता तसे रागालाही गिळा.

आपलीच

' सुजाता '

प्रिय.....

सोबतचे पत्र लिहून दोन दिवस झाले. परंतु ते प्रत्यक्ष देता आलं नाही. शेवटी पोस्टाने पाठवत आहे. माझ्या भावी पतींना आपल्या दोघांचा काहीतरी संबंध आहे असं कळलेलं आहे. तो तुम्हाला विचारणार आहे. तेव्हा तुम्ही सांगा, त्या मुलीचे मला नावसुद्धा माहीत नाही. माझा तिचा काही संबंध नाही. कधी तरी गॅलरीत दिसते. या पलीकडे काही नाही. तो उद्या गावाला जाणार आहे. तेव्हा मी तुम्हाला भेटून सर्व काही सांगेन. माझ्या आयुष्याचा प्रश्न आहे. तुम्हीच मला वाचवू शकता. त्याच्या कानावर काय वाटेल ते गेलेलं आहे. तेव्हा माझ्यासाठी एवढं करा. नाहीतर माझ्या आयुष्याचं नुकसान होईल. ' माझा तिचा काही संबंध नाही. लोक काय वाटेल ते उठवतील. तुम्ही विश्वास ठेवू नका. त्या मुलीची नजर त्यातली नाही. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा ' असं सांगा. तुम्हाला भेटून तो सर्व काही विचारणार आहे.

' प्लीज तुमच्या पंच्छी ' बद्दल हे केलंच पाहिजे.

तुमची सदाचीच,

.....

मातृत्व महन्मंगल असतं. आजवर त्याची महती कितीजणांनी वर्णन केलीय ते सांगताही येणार नाही....पण मी...ते मातृत्व लाभत असून...त्याचा नाश करू धजले. या...या हातांनी त्याच्या जिवाचा नाश मांडला...मला माझं बाळ हवंय. वाटेल त्या मोबदल्यात हवंय ...पण जगानं अनीतीला नीतीचा मुकुट चढवून सम्राज्ञी बनवलंय ... मग माझ्या नीतीला कोण विचारणार...मला अहेर मिळेल अपशब्दांचा...निंदेचा...कुटाळकीचा....म्हणूनच मी खून करू ? पोटच्या लेकराचा खून !

...आज मी करू नये ते केले ! नको ते औषध घेतले. पोटातल्या जिवाचं मरण चिंतलं. पण काही होणार नाही. असं वाटतं, देवानं त्याला सांभाळावे. माझं त्याच्यावर खूप प्रेम आहे. मी त्याला हे जग दाखविण्यासाठी कोणतंही दिव्य करीन. मला माहीत आहे की, तुमच्या सुखाच्या रस्त्यात ते काट्यासारखं आहे. पण तरीही माझा स्वाभिमान दूर ठेवून केवळ त्याच्यासाठीच तुझ्याजवळ ही अखेरची भीक मागत आहे- ' त्याला जन्म देण्याचा, जन्म देण्याचा अधिकार मला द्या ! ' गेल्या सबंध वर्षात माझ्याकडून एकतरी सुखाचा थेंब तुम्हाला मिळाला असेल. जरी त्याची किंमत म्हणून तुम्ही एवढं केलंत तरी मी जन्मोजन्मी तुमच्या ऋणात राहीन.

तुम्ही त्याच्या जीवावर उठू नका हे अखेरचे मागणे. यापुढे मी तुम्हाला कधी काही मागणार नाही. माझा बाळ मला हवा आहे. आगीच्या वर्षावात मी त्याच्यासाठी चालेन. त्याचं सुख माझ्या जिवावर झेलेन. त्याच्यासाठी- माझ्यासाठी मी भीक मागत आहे, ' त्याला माझ्या ओटीत टाका, '

उत्तराची वाट पाहात आहे.

आपली (की बाळाची)
' उषा '

नीरस ., बेचैन जीवन...मधाळ आठवणी तोंडी लावून माणूस कंठत असतो. बालपणीची मनोराज्ये....कल्पनांचे इमले केव्हाच मातीमोल झालेले असतात.....कल्पनेतील बागुलबुवा वाडा सोडून पळालेला असतो....राज्यं उरतात व्यवहाराची....इमले असतात आश्रयासाठी....कल्पनाच परागंदा होते. उरतो शुष्क व्यवहार.... पाण्यासारखं समांतर होऊन द्यावा तसा आकार घेऊन जगणं इतकंच उरतं हातात. नवं घर....नवी माणसं...सारंच नवं....पण तेच

आपलं म्हणून सांभाळायचं...त्यातच रंगायचं....अन् भंगायचंही त्यातच....

प्रिय,

पोस्टकार्डावर तू स्वहस्तानं रेखलेले आणि तुझ्या स्नेहस्पर्शानि मोहरलेलं भेटकार्ड मिळालं नि मन दरवळून गेलं. धुक्यात लपेटलेले जुन्या स्मृतीचे सूर अचानक वर आले. फार फार दिवसांपूर्वी अगदी लहान असताना मी एक दोन वर्षे तुझ्या तासगावमध्ये काढली आहेत. पुसट आठवते, ती नारळीची बाग, गणपतीचे देऊळ, लहानसा ओढा...श्री यांच्या घरात आम्ही राहात असू, हातगाडीवरून. मास्तरांच्या बाळशाळेत जायचं...उषा, कुंदा, मंगल या माझ्या मैत्रिणी, अन् तू एक. तिथे पडकी भिंत होती. आणि तिला खिंडार पडलेलं. आम्हा मुलांना त्या खिंडारातून जायची परवानगी नसे, कारण भिंतीपलीकडे बागुलबुवा राहात असे. मी मनातच कित्येकदा बागुलबुवाच्या वाड्यात जायची. दगडी खांबाच्या ओळी असलेल्या वाड्यात मिशाळ बागूल घोरत असायचा. आणि पिंजऱ्यातली राजकन्या रडायची, मी आता मोठेपणी कधीच तासगावला यायची नाही. कारण मी खरंच भिंतीपलीकडे जाईन. आणि माझ्या बिचाऱ्या बालमित्राचा तो वाडा विरघळून जाईल, नाही ? असो. काय लिहीत सुटले !

आता गतस्मृती कशाला उजळायच्या ? दोघेही नव्या जीवनात नव्या माणसात मिसळून गेलो. नवी जन्मालाही घातली. आता ही इच्छा का ? अन् ते शक्य तरी आहे का ? जास्त न लिहिणे हेच बरे-

पण तरीही तुझी ती ओळ आठवते. एकदा तू स्वतःच गुणगुणला होतास. विहिरीकाठच्या माडाखाली म्हणाला होतास-

उभ्या जन्माची कहाणी
माड ऐकुनिया थिजे
स्वप्नमूर्ती स्मरूनिया
काठ पापण्यांचा भिजे.

त्या ओल्या पापण्यांच्या काठाची शपथ तुला ! ते तेवढंच जपायचं आता.

तुझीच,
' युगान्तिका '

□ □ □

१०

साहित्यशास्त्राची माहिती नसणारा थोर साहित्यिक याच मार्गानं गेला !

अण्णाभाऊ गेले ? कोण म्हणतं असं ? नाही .... नाही.... सांगणाऱ्याचे शब्द .... ते मुके का झाले नाहीत ? वर्तमानपत्रातील ती दुष्ट अक्षरं उठविणारे खिळे अण्णाभाऊंच्या नावाच्या आगीनं वितळून का गेले नाहीत ? अण्णाभाऊ तुमचं तापलेलं रक्त. त्या रक्तात हे सारं नाहीसं कसं झालं नाही .... पेटलेल्या अंतःकरणात असे शब्द .... अशी अक्षरं .... नाश का पावली नाहीत? तुम्हीच पेटून गेलात. अण्णाभाऊ जीवनभर तुम्हाला समाजाची आच लागली म्हणूनच पेटून उठला तुम्ही. अंतःकरणावर उठलेल्या निळ्या डागानं तुमचं रक्त लाल लाल झालं. धमन्या उसळून उठल्या. सारं शरीर बेहोष झालं. तंद्री लागली तुम्हाला. अण्णाभाऊ त्या तंद्रीत तुम्ही आयुष्यभर जगला. निळं रक्त लाल झालं. आणि त्याचीच शाई झाली. लाल .... रक्ताची शाई. अण्णाभाऊ तुम्ही शाई वापरलीच नाही कधी. निळी शाई वापरायला तुम्हाला संधी कुठं मिळाली ? एवढं स्वास्थ्य लाभलं नाही. म्हणूनच पेटत्या अंतःकरणाचा हुंकार बाहेर पडला. तो प्रथमक्षणीच रक्ताच्या शाईनं रेखला गेला. जेव्हा जेव्हा ऊर पेटला होता, तेव्हा तेव्हा रक्तधार लागली. त्या

रक्तधारेतनं अनेक माणसांना तुम्ही जीवंत केलं. त्यांना तुम्ही वाचा दिली. बोलायला शक्ती दिली. दबलेली मनं भडाभड बोलू लागली. उरातली सलं उघडी करू लागली. हाडाची माणसं. पण माणुसकीला मुकलेली. पिचून गेलेल्या मनाची पीळदार माणसं जेव्हा महाराष्ट्रापुढे अंतःकरणातून सांगू लागली. तेव्हा त्यांचं दुःख महाराष्ट्राला कळलं. त्यांची तळमळ कदरदार महाराष्ट्राला समजली. अन्, अण्णाभाऊ तुमची तडफड, तुमच्या भावनांच्या पाठीमागं लपलेलं, तुमचं ज्वलंत जीवन, महाराष्ट्राला वेडंपिसं करून गेलं. अण्णाभाऊ मराठी मातीतल्या माणसांना तुम्ही जिंकलंच, पण इतर भाषिकांच्या अंतःकरणावरही तुम्ही मात केली.

पण अण्णाभाऊ हे सारं करताना तुम्हाला खूप सोसावं लागलं, भयंकर जीवनाशी तुम्हाला झुंज खेळावी लागली. दारिद्र्याच्या खाईत उभं राहून आकाशाला हात घालावा लागला. वाट्याला उपेक्षितांची तडफड. महाराष्ट्राला गद्गदून हलविण्यासाठी अहोरात्र रक्त अटवावं लागलं. निष्ठुर नियतीनं तुमच्याशी क्रूर खेळ मांडला. पण प्रतिभाशाली सामर्थ्याच्या जोरावर तसल्याही क्रूर खेळाशी हसत दोन हात खेळलात. शंकरासारखं विष पिऊन टाकलंत. बचनागाचं विष पचवून टाकलंत आणि हे सारं सोशिकपणानं सोसून दबल्या, पिचल्या, उपेक्षित अंतःकरणातील भावभावनांची खळबळ अक्षराअक्षरांतून ओतली. ती अंतःकरणं बोलकी केली. अनेक व्यक्तिचित्रांचे ठसे महाराष्ट्राच्या अंतर्मनावर कोरून टाकले. तुम्ही कोरलेली ही जीवंत माणसं महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील झोपड्याझोपड्यांतून गेली. मराठी पाहुणचारानं ती भारावलीही. ओळखीच्या खुणगाठी पटल्या. मनामनांची उकल झाली. मराठी माती हलली, दऱ्याखोऱ्यांचे आवाज गर्जून उठले. नद्यानाल्यांच्या पाण्यांना धार आली. कधी काळ्या कपारी पाझरल्या. डोंगरमाळ रखरखीत उन्हाने करपले, पण मानवतेवर विश्वास ठेवणारा माणूस, मानवतेसाठी आक्रोश करणारे भोळेभाबडे जीव, ह्यांचे घडविलेले जीवंत दर्शन अण्णाभाऊ तुम्हीच घडवावे! त्यासाठीच तुमचा जन्म इथे !!

कारण हे तुम्ही जगला आहात. उघड्या डोळ्यांनी हे पाहिलं आहे. तुम्ही जे अनुभवलं तेच मांडलं आहे. तेच साहित्यात उभं केलं आहे. कल्पनेच्या भराऱ्यांचे पंख तुमच्या लेखणीने कधीच स्पर्शिले नाहीत. कल्पनेला पंख फुटता फुटताच तुमची झेप वास्तवाकडे गेली. प्रत्यक्षातलं...अंतःकरण पिळवटून

टाकणारं जीवन सोडून कल्पनेच्या मखमलीवर तुम्ही कधीच विसावला नाही, विसावा हा तुम्हाला माहीतच नाही. महाराष्ट्रातल्या डोंगरकपारी पालथ्या घालताना तुम्हाला कशाचं भानही उरलं नाही. तुम्ही डोंगरकपारीतून हिंडताना अनेकदा ठेचकाळला, बोटं रक्ताळली. करवंदीच्या काट्यानं अंगातून रक्त भळभळलं. अंधाऱ्या रात्री रात्रभैर झाला. पोटातल्या आगीनं पेटून निघाला. लांब दरीत.... अंधाराच्या पोटात....कुठंतरी झोपडीत ...मिणमिणणाऱ्या दिव्याच्या आगीत पोटातली आग थोडी गारवली. सोबत्यांच्या वेदना पाहून तुम्ही स्वतःच्या असह्य वेदना विसरून गेला. वारणामाईच्या पदराखाली वैयक्तिक जीवनाचे सुस्कारे मन घट्ट करून पिऊन टाकले. सह्यगिरीच्या अंगाखांद्यावर ...काट्याकुट्यांतून वावरताना जे दिसलं, ते तुमच्या अंतःकरणाने टिपलं. अनेकांचे अश्रू अंतःकरणाच्या महाकुपीत तुम्ही गोळा केले. पाशवीवृत्तीचा नायनाट करण्यासाठी फकिरा, सावळ्या, कृष्णा इत्यादींच्या कुऱ्हाडी परजून ठेवल्या. स्वसंरक्षणासाठी आणि मांगल्याच्या पूजेसाठी स्वतःच्या जीवाची तमा न बाळगता प्रत्यक्ष मृत्यूशी झुंज घ्यायला कंबर कसणाऱ्या वारणेच्या कन्या तुम्ही उभ्या केल्या.

अण्णाभाऊ तुम्ही वारणेचं पाणी प्याला. तेच पाणी तुमच्या लेखणीतून उतरवलंत. वारणाकाठच्या मातीत आपलं जीवन घडवलंत. त्याच मातीच्या कणाकणातली मंत्रशक्ती तिच्याशी इमान राखून चित्रित केलीत. झोपड्यांतील माणसं पाहून तुम्ही द्रवून गेला. तुमचं अंतःकरण खवळून उठलं. धगधगणाऱ्या जीवनातील अगतिक माणसं जशीच्या तशी उभी केली. त्यांच्याशी तुम्ही बिलकूल प्रतारणा केली नाही. अन् ती तुमच्या इमानदार मनाला मानवणारीही नव्हती. त्यांची झळाळलेली अंतःकरणं कसलाच आडपडदा न ठेवता महाराष्ट्रापुढे उभी केली. साऱ्या जातिजमातीशी तुम्ही मिसळून गेला. त्यांची सुख-दुःखं जाणून घेतली....त्यांच्याशी समरस झाला....त्यांच्या कष्टानं तुम्ही दुःखीकष्टी झाला. त्यांच्या घामानं तुम्ही स्वतः डबडबून गेला....त्यांचे उपासतापास तुम्ही केले...झोपडपट्टीतलं जीवन तुम्ही स्वतः जगला...सारं सारं सहानुभूतीनं न्याहाळलं. त्यांची पारख केली. सहृदयतेनं त्यांची हृदये जिंकली. तीच रेखली. त्यांचंच चित्रण घडवलं.

या माणसांना अखेरपर्यंत तुम्ही सोडलं नाही. झोपडीत तुमचा जन्म झाला. फाटक्या रकट्यावर वळवळत असतानाच तुम्ही जगाला हेरून ठेवलं.

अंधारात तुम्ही लहानाचे मोठे झाला. पडक्या झोपडीच्या मोडक्या तडक्यानं तुमची पावलं ओळखली. अन् त्यानं तुम्हाला वाट करून दिली. तुम्ही बाहेर पळाला ते झोपडपट्टीतली दुःखं वेशीवर टांगण्यासाठी. झोपडीनं गिळून टाकलेल्या माणसांच्या व्यथा सांगण्यासाठी. शाळेचं दर्शन भाग्यात नसतानाही तुम्हाला लिहावं लागलं. अंतःकरण गुदमरून गेलं. तुम्हाला हे सारं व्यक्त करणंच भाग होतं. त्याशिवाय राहवलं नसतं. मनीची तळमळ मिटली नसती. असं सारं तनमन गद्‌गदून गेलं. तेव्हाच प्रतिभा जागी झाली. स्फूर्तीचा पेला फेसाळला. हातांना स्फुरण चढलं. निर्जीव लेखणी जीवंत रेखाचित्रं रेखाटू लागली. अण्णाभाऊ एक पददलित, पण तोच दलितांचा राजा झाला. एक अडाणी .... उनाड .... पोटाची आग विझवण्यासाठी चौमुलूख पायपीट करणारा सामान्य ... अतिसामान्य. पण तोच असामान्य झाला. प्रतिभावंत ठरला. महाराष्ट्राचा शाहीर बनला. अण्णाभाऊ म्हणजे एक स्वप्न. पण तेच तुम्ही स्वतः साकार करून दाखविलं. अन् मराठी रसिकांनी तुम्हाला मानवंदना करून थोर कलावंत मानलं. महाराष्ट्र सरकारनेही तुमच्या कार्याचा गौरव केला, मानधन देऊन तुमचा मान राखला. तुमच्यासारख्या थोर साहित्यिकानं सागर किनारी .... दूर .... एकांतात .... एखाद्या टुमदार आकाराच्या .... शोभेल अशा नावाच्या " पर्णकुटी " त राहावयास हवे होते. माणसाच्यापासून दूर कुठं तरी .... पण तुम्ही अशा पर्णकुटीत (सरकारने देऊ केलेल्याही) राहिला नाहीच. तर उलट चिरानगरसारख्या झोपडपट्टीत राहिला. माणसांच्या खूप गर्दीत, पोरांच्या, चिलटांच्या बेसुमार गर्दीत राहणं तुम्हाला परवडलं. तुम्ही ते मनापासून पसंत केलं.

गेल्या मार्चची गोष्ट आठवते अण्णाभाऊ तुम्हाला ? तुमचं मुंबईचं ठिकाण पाहिलं नव्हतं मी. तुमच्या नावाचा व साहित्याचा वकुब साऱ्या महाराष्ट्राला माहीत आहे. तुमची राहण्याची शान काही वेगळी असेल असे मला वाटले. त्या आशेने चिरानगरकडे आलो. अन् तुमच्याजवळ पोचल्यावर साऱ्या आशांना सुरुंग लागला. तुमची झोपडपट्टी .... तुमची जुनाट झोपडी पाहून माझ्या अंगावर काटा मारला. तुटलेली बाज, ओलकंबणारी वलणी, कोळिष्टकांनी भरलेले कोनाडे, सोबत करणारा गॉर्कीचा पुतळा, तिथली ओंगळवाणी वस्ती... तिथंच व्यग्र चेहऱ्याने बसलेल्या तुम्हाला पाहून मी भारावून गेलो. का कुणास ठाऊक मी उदास बनलो. अशा थोर माणसानं असं

जीवन का जगावं, कशासाठी हे सोसावं .... माझ्या अंतःकरणाला जखम झाली. मी न राहवून तुम्हाला विचारलं,

" अण्णाभाऊ तुम्ही इथं .... या बकाल वस्तीत का राहता ? "

" का राहता ? " तुम्ही डोळे माझ्यावर रोखून परत मलाच विचारलं.

" हो. का रहावं तुम्ही ? "

" हेच सारे विचारतात. सरकारच्या समाजकल्याण खात्यानं मला राहायला सुंदर जागा दिली. "

तुम्ही इथंच थांबला.

" मग तिथं का राहात नाही ? "

" माझी माणसं इथं आहेत. "

" कुठं ? "

" या झोपडपट्टीत. इथं राहणारी सारी माणसं माझी आहेत. या माणसांना सोडून गेलो तर माझी प्रतिभा माझ्याजवळ राहणार नाही. मी इथं माणसं पाहतो. तिथं खरं जीवंत जीवन आहे. हे साडून गेलो तर मीच जीवंत राहणार नाही. मीच जीवंत राहणार नाही. "

" असं कसं म्हणता अण्णाभाऊ ? "

" तसंच आहे. "

" तसंच आहे. आजच पाहा, आज मला अत्यानंद झाला आहे. हा सोन्याचा दिवस आहे. "

" म्हणजे ? " - मी.

" तुम्ही आला इथं, माझ्या वारणा खोऱ्यातले तुम्ही, मला माझा वारणा खोरा भेटल्याचा आनंद झाला आहे. वारणामाईनं माझ्या पाठीमागं तुमच्यासारखा लेखक दिला आहे. खूप लिहा, वारणाकाठची अनंत रेखाचित्रं महाराष्ट्रातील जनतेसमोर जीवंत उभी करा. "

अण्णाभाऊ तुम्ही खुषीत आला होता. पण ही खुषी मला वेगळीच वाटली. काहीतरी निर्वाणीचं बोलावं तसं तुम्ही बोलत होता. भारावून बोलत होता. मला बसवून घेतलंत. का कोणास ठाऊक पण तुम्ही अंतर्मुख झाला. कंठ सद्‌गदित झाला तुमचा. पापण्याही ओलावल्या. स्वर कापरा बनला. महाराष्ट्राला आव्हान करणारे अण्णाभाऊ हेच का ? हातातल्या हलगीच्या कडकडाटानं महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आवाज उठविणारे ते शाहीर हेच

का ? फकिरा, मंगला, सावळ्या, सत्या इत्यादींना रंगवणारा, वारणेचा वाघ हाच का ? असा मला अचंबा वाटला. अण्णाभाऊ तुम्ही चिंब झालेली नजर एकाग्र केली. ओठ थरथरले तुमचे. तुम्ही बोलू लागला. अवघा जीवनपट साक्षात उभा केला तुम्ही ....

ती खोपटं ... त्यातली किड्यासारखी माणसं. शाळेचा पहिलाच दिवस, विद्येच्या मंदिरात प्रवेशबंदी. उन्हातच उघड्यावर महारामांगांच्या पोरांच्या रांगेत तुम्ही उभे .... उन्हाची कडक तिरीप, सर्वांगातून थरथरून जाणारी भोवळ, जमिनीवर कोसळणं ... आणि तोच शाळेचा ठरलेला पहिला अन् अखेरचा दिवस. भयंकर दुष्काळ .... तडफडणारे जीव ... रानमाळावरची भटकंती ... तिथंच फकिराची सोबत, बरबाद्या वंझारी, माकडीचा माळ, मुंबईतली बकाल वस्ती, गिरणी कामगारांची दुःखं ... त्यासाठी केलेला तीव्र लढा... गिरणी मजूर म्हणून अनुभवलेलं जीवन ... कधी सुस्कारे ... कधी सात्त्विक संताप .... कधी अन्यायाची चीड ... कधी सत्याची चाड .... शाहिरीचा आवेश .... साहित्यिकाचा अभिनिवेश .... !

अण्णाभाऊ तुम्ही बोलत होता. एक सारखे .... तंद्रीत न्हाऊन निघून मी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होतो. अंतरीच्या खुणा तुम्ही पटवीत होता. तुमचं ते भारलेपण ... अजूनही आठवतंय .... पण अण्णाभाऊ हे का बोललात ? तुम्हाला माझ्याजवळ सांगायचंच होतं का ? सारं सारं सांगून टाकलंत. तुमची ती तंद्री संपली, तुम्ही आवेशानं उठला, मला उराशी कवटाळलंत आणि म्हणालात,

" चंद्रकुमार, हे तुम्हाला एकदा सांगायचं होतं. अंतःकरण मोकळं करायचं होतं. ती संधी आज लाभली, आज लाभली. " मला गद्गदा हालवलंत, तुम्हीही गद्गदला. माझे डोळे ओलावले. मी स्वतःला विसरून गेलो होतो. तुम्ही मला तुमची जीवनयात्रा घडवीत होता आणि आता इथली जीवनयात्रा तुम्ही संपविली. अण्णाभाऊ आम्हाला अर्ध्या वाटेवर सोडून गेला. अजून पल्ला गाठायचा होता. तुमची करंगळी धरून सारं सारं पाहून घ्यायचं होतं. उभारीनं पुढं जायचं होतं. अन् गेलात ते असे न सांगता. न कळवता. युगाच्या पाऊल-खुणा दाखवून. तुम्ही पोटतिडकीनं खवळून उठणारी झुंजार माणसं निर्माण केली. बेभान होणारी. मग तुमच्यावर क्रूर फास टाकणाऱ्या यमाच्या आडवी तुमची माणसं का जाऊ शकली नाहीत. त्यांच्यावर फकिरानं

कुराड का उचलली नाही .... मंगलानं बंदूक का रोखली नाही. आबीनं धोंडा का उचलला नाही ? सत्याची कुमक का धावून आली नाही ? अलगूज का वाजला नाही ? भानामती का झाली नाही ? ही माणसं पेटून का उठली नाहीत ? वारणेचा वाघ झेपावला का नाही ? तुमची म्हणणारी माणसं अशी थंडगार का झाली ? का झाली ? ...

असं तुमच्यावर अपार प्रेम करणारी मित्रमंडळी प्रेम विसरली काय? फरसबंद शाहीर अमर शेखचा यमाच्या हृदयाचा थरकाप उडवणारा गगनभेदी आवाज का उठला नाही ? ज्यांच्यासाठी लढ्याची रणगर्जना केली, ती माणसं कुठं दडली ?

हे नाही घडले, अण्णाभाऊ हे नाही घडलं, का नाही घडलं, तुम्हीच न सांगता सवरता गेला, गुपचूप गेला, इथल्या गोतावळ्याचा निरोप न घेताच गेला. एका महान यात्रेला भेटायला तुम्हाला जायचं होतं का ? तो महान यात्री पुढं गेला, अन् तुम्ही त्यांच्या मागोव्याने वाटचाल केली. त्या आचार्यांच्या भेटीसाठी इथली यात्रा घाईघाईने आवरली तुम्ही. त्या साहित्य पंढरीच्या वारकऱ्यांची भगवी पताका नजरेच्या टापूत ठेवीत. बिगीबिगी गेला तुम्ही. आचार्यांना (अऱ्यांना) गाठण्याची एवढी घाई .... एवढी घाई ... !

बिगीबिगी गेला, इतकं बिगीबिगी गेला की तुम्हाला तुमच्या वारणा खोऱ्याची आठवणही राहिली नाही. तुमच्या जाण्यानं वारणा खोरा हळहळून गेला. काटेरी करवंद जाळ्यांनी अश्रू ढाळले, सह्यगिरी पाझरला. त्याची कूस तुम्ही उजवली. पण तीच रिकामी झालेली कूस पाहून सह्याद्री दुःखाने वेडा झाला. इथली माणसं, इथली माती थरथरली, वारा ठायीठायी अडखळला, रात्रीनं रात्रभर तुम्हाला रापलं, पण कुठल्याच झोपडीत तुम्ही गवसला नाही. तिची व्यथा नाही कळायची तुम्हाला, वारणामाईला अश्रूंचा पूर लोटला, अण्णाभाऊ कित्येक दिवसांची तिची इच्छा पुरी न करताच चालते झालात, रानपाखरासारखी तुमची ती वाट पाहात होती. इथली माती, तुमच्या पावलांच्या स्पर्शासाठी आसुसली होती. सह्यगिरी लेकराची वाट कित्येक वर्षे पाहतो आहे. डोळे थकले आहेत वाट पाहून. वारणाकाठचा ऊर हुंदक्यांनी भरून आला आहे. बेचाळीसचे रक्त थंडावलं आहे.

तुम्ही एकदा यावं, इथल्या भूमीला परत एकदा पाय लागावेत, म्हणूनच आम्ही छोटसं साहित्य संमेलन बेळगावला आयोजित केलं होतं. तुम्हाला पत्र

पाठविलं होतं. पण तुम्ही फकिराच्या चित्रणात गुंतला होता, त्यासाठी सातारा भागात तुम्ही हिंडत होता ... तुम्हाला पत्र वेळेवर मिळालं नव्हतं,-परत मुंबईला गेलात ? आमचं पत्र पाहून तुम्ही अत्यंत कष्टी झाला. वेळ निघून गेली होती. तुमच्या मनाला चटका लागला. चिरानगर तुम्हाला खायला उठलं. तुम्हाला राहावलं नाही. तुम्ही लिहिलं .... परोपरीच्या विनयानं ...

" चंद्रकुमार क्षमा करा. माझ्या मुलखातल्या माणसांनी मारलेली ही हाक. त्या हाकेला मला साथ करता आली नाही. आता परत केव्हाही केवळ इशारा करा. इथून लोटांगण घालीत तुमच्यापर्यंत येईन. नाही आलो तर ... "
आता कुठले यायला तुम्ही. गेलात, कुंपणापलीकडे गेलात आणि अण्णाभाऊ पत्रातलं वाक्यच कायमचं अपुरं ठेवलंत तुम्ही. न्यायासाठी झगडणारा, झुंजार वीर इथं न्याय देताना लीन झाला. नाठाळाच्या डोकीत काठी हाणताना कठोर वज्रासारखे होणारे अण्णाभाऊ. तुम्हीच इथे मेणाहूनही मऊ झाला. पण वारणामाईची आस पुरी झाली नाही. ही आता व्हायचीही नाही. ती पावलं आता या भूमीला नाही लागायची.

तुमच्या पावलांनी अनंताच्या घरची वाट धरली. ती आता न परतणाऱ्या वाटेने गेली आहेत. येणारी पावलं ही जाणारीच असतात. पण तुमच्यासारख्या सामान्यातून असामान्य निर्माण करणाऱ्या कलावंताच्या पाऊलखुणा मागं उरतात. तेवढ्याच फक्त जपायच्या आहेत. आता फाटल्या अंतःकरणाला आवर घालायचा आहे.

अण्णाभाऊ तुम्ही स्वातंत्र्याची सूक्तं गाइली. त्याचबरोबर उपेक्षितांच्या अंतरंगातील कारुण्य शब्दरूप केलं, अन् शेवटी तुम्हालाच स्वातंत्र्याच्या कालात उपेक्षिताचं मरण पत्करावं लागलं. उपेक्षित ठरलात, एकाकी .... एकटे आलात, एकटे राहिलात. अखेर एकटेपणातच हरवून गेलात ....

अण्णाभाऊ तुम्ही मुळाक्षरं गिरवली नाहीत. पण इथल्या धुळीत तुमच्या उमटलेल्या पावलापावलांतून आवाज उठेल, -

" साहित्यशास्त्राची माहिती नसणारा थोर साहित्यिक गेला. याच मार्गानं गेला. असाच गेला. .... "

□ □ □

११

चंद्र-चांदण्याच्या साक्षी

(आत्मचरित्रातील थोरांचे बालपण)

बालपण एक विलक्षण चैतन्य. बाळपणाची मूठ चांदण्यांची असते. ओठ अमृताचे असतात. अवघ्या विश्वाचं लेणं इवल्याश्या देखण्या मूर्तीत नटलेलं असतं.

चैतन्याच्या लोभसपणाला इथं तीट लावलेली असते. चैत्रपालवीची मुलायमता नसानसांतून हुंकारत असते. लिंबोणीच्या झाडामागं लपणारा चंदामामा पापण्यांच्या पलखात दडून बसतो. मामाचा चिरेबंदी वाडा अद्‌भुत खाण उघडतो. ' ये ग ये ग सरी ' म्हणत बालपण कोसळणाऱ्या पावसात हुंदाडत असतं. खोट्या पैशाच्या दौलतीवर पावसाला भुलवतं, वळचणीत लपून बसलेल्या चिमणीला हेरून आपल्या मायेच्या पंखात घेतं. अंगणात मनाचा मोर थुईथुई नाचतो. मनाचा पिसारा ऐलपैल डोंगराएवढा उभारला जातो. मावळत्या सूर्याची सोनेरी किरणं अंगभर झेलीत त्या नानारंगी ढगाढगांच्यात मिसळून जातं. निळ्या क्षितिजावर उभं राहून घरंगळलेला सूर्याचा चेंडू बावरलेल्या नजरेनं शोधीत असतं. स्वप्नपऱ्यांच्या नगरीतले रत्नपाचूंचे डोंगर मोहवीत असतात. खुणावत असतात. रोजच जत्रा भरत असावी. तिथं नदीच्या

तटी असं वाटत राहतं. पंख फुटतात. सिंदबादच्या सफरी सुरू होतात. सोनेरी केसांची परी भेटते. अबलख वारूवर स्वार झालेला, मोत्याची माळ घातलेला राजकुमार दौडत दौडत मनामनात शिरतो.

आकाशातल्या चंद्रावर लपून बसलेल्या सशाला ' ससा रे ससा ' म्हणून हुलकावलं जातं, सोन्याच्या झाडाला चांदीची पानं फुटतात. लेझमाचा डाव मांडता मांडता दिवटी फुरफुरते. मनात आरपार शिरलेला राजकुमार रेशीमपंखी फुलपाखरांच्या मागे धावता धावता कविता आठवतो, 'हात लाविता पंख फाटतील । दोरा बांधता पायही तुटतील । घरी कशी मग सांगा जातील.'

एक करुणा दाटत येते नी मग बालजीवाची घालमेल होते. अवघे बालपण म्हणत असते.

' गाणे आमचे झुळझुळ वारा
गाणे आमचे लुक लुक तारा '

मनाची पाकळी पाकळी उमलते. रसरशीत बनते. पायात निबरपणा येतो. सूर्याला मुठीत कवळण्यासाठी उड्डाण घेणाऱ्या हनुमंताची झेप काळजात भिडते. अढळपदासाठी उत्तरेच्या रोखानं निघालेला जिद्दीचा ध्रुवबाळ भूल पाडीत असतो.

स्वप्नातलं दान देऊन भोग भोगणाऱ्या राजा हरिश्चंद्राचा भुकेला रोहिदास अंतःकरणातल्या एका कोपऱ्यात जागा शोधीत असतो. श्रावण-बाळाची कावड खांद्यावर पेलीत असतो. एका डोळ्यात एकलव्य उभा असतो, तर रोहिडेश्वराला अभिषेक घालणारं छोट्या शिवबाच्या करंगळीतलं रक्त दुसऱ्या डोळ्यात साकारत असतं.

आकाशाला पालाण घालणारी शिवशक्ती नसानसांतून कल्पकल्पांचा हुंकार देत असते. या शिवशक्तीच्या मंत्रजागरणाने झपाटून गेलेली मनंच मग क्षितिजाक्षितिजांवर तोरणं बांधीत असतात. थोर होतात. बालपणाच्या संस्कारानं जीवनाच्या शिल्पाला एक आकार येत जातो. एक दिशा लाभत जाते. सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत ही माणसं ' नव निर्माण ' घडवीत असतात. निशाण उभारीत असतात. त्या निशाणावर भिस्त नी विश्वास ठेवून जनसामान्य निर्वेधपणे जीवनप्रवास करीत असतात. त्यांच्या टप्प्याटप्प्यावर आधार मिळत असतो.

अशा काही थोरांच्या जीवनातील बालपण कसे होते ही पाहण्याची

जिज्ञासा मनाला लागून राहते. एक जितेजाणते कुतूहल जागे होते. मोठ्यांच्या ज्ञात्यांच्या बालपणाच्या दर्शनातून आपल्यालाही एक ' वाटाड्या ' गवसतो. संभ्रमावस्थेत धीर येतो. जोमाने वाटचाल करायला निःशंकपणा प्राप्त होतो. जगड्व्याला च्या दर्शनाने निर्माण होणारी भयभितता नष्ट होते आणि निर्भयता मनाला खंबीर शक्ती देते.

निसर्गाच्या रंगगंधाचा, नादारूपांचा संस्कार व्यक्तित्वावर फार मोठ्या प्रमाणात होत असतो. निसर्गाच्या उदारतेचं दान ज्याच्या पदरात पडते त्याच्या आयुष्याचे सोने होते. निसर्गाच्या सहवासात जो रमतो त्याच्याशी निसर्ग एक अतूट नाते निर्माण करतो. मग त्याची मातीत उमटलेली पावलं आकाशीची झुंबरं ठरतात. निसर्ग एवढा उदात्त की, आपल्या पानाफुलांची आरास या कीर्तिवंतांच्या स्वागतासाठी आणि कौतुकासाठी उभी करतो. भारताच्या मातीला ललामभूत ठरणारे रवींद्रनाथ टागोर या निसर्गाचंच देणं होय.

सिनेसंगीतात आपले युग निर्माण करणारे सी. रामचंद्र हेही एक प्रमाण मानावे लागेल. त्यांनी आपल्या ' सरगम ' या आत्मचरित्रात लिहिले आहे की, ते लहानपणी संगीतद्वेष्टे होते. कुणाचे गाणे सुरू झाले की, यांचे रडे सुरू व्हायचे. जगाची मुले अंगाई गीताने झोपी जातात. पण हे अंगाई गीताने चाळवत उठत. तेच म्हणतात, ' मी उठून भोकाड पसरी. ' पण असे असलेले सी. रामचंद्र संगीतक्षेत्रात किमया करतात. ही किमया कशाने घडली ह्यासंबंधी ते लिहितात, ' बालपण ज्या डोंगरगडावर गेले, त्या डोंगरगडावर निसर्गाची मात्र पूर्ण कृपा होती. चहू बाजूला हिरव्या डोंगरांनी वेढलेले ते गाव जणू निसर्गाच्या ओंजळीतच वसलेले होते. रानांतून भरारणाऱ्या तिथल्या वाऱ्याच्या स्वरात खचितच संगीताचा गोडवा असेल, असंख्य निनावी पाखरांनी अगणित रागिणी त्या गावातील झाडावर बसून छेडल्या असतील. कानावर कुरळी झुलपे वागवणाऱ्या माझ्या शैशवाला कदाचित तेच नैसर्गिक बाळकडू मिळाले असेल, डोक्यावर जंगली लाकडाचे भारे घेऊन सांजवेळी डोंगरकपारीतून निघालेल्या गोंडिणीची गाणी ऐकण्यासाठी मी खेळ सोडून गप्प उभा राहू लागलो. ' हे झाले सी. रामचंद्रांचे तर आनंदीबाई शिर्के आपल्या ' सांजवात ' या आत्मचरित्रात मनमोकळेपणे म्हणतात –

' मार्गशीर्ष पौर्णिमेला वाड्यात थाटाचा दत्त जन्मोत्सव होई, कथाकीर्तने होत. त्याला जाण्यास हरकत नसे. परंतु शिमग्यात आठ दिवस

वाड्यातील चौकात तमाशा होत असे. तो पाहण्यास मात्र सक्त मनाई असे. मला वाटतं, एखादा तमाशा बाहेरून येत असावा. बाकीच्या दिवसांत कोकणी भाडेकरूच तमाशाचा थाट उडवून देत असावेत. सक्त मनाई असताही डफ तुणतुण्याचा व घुंगरांचा आवाज कानी आला की, आम्हाला जाग येई आणि अंधारात धडपडत दाराच्या किंवा खिडकीच्या फटीतून पाहण्यासाठी धावत असू. पण काय, तिथे आमचे दादासाहेब आपले हजर असत. ते विचारीत, काय पाहिजे, आम्ही म्हणत असू, पाणी प्यायला उठलो आहोत. पण तेवढ्यात नजर बाहेर फिरून येई, लुगडे नेसून पुरुषाने घेतलेले ते स्त्रीचे सोंग पाहून गंमत वाटे, पण कोण पाहू देतो. मालकीणबाई मात्र चिकाच्या पडद्यातून पाहात असत, त्यांचा हेवा वाटे. ' अशा प्रकारे अस्सल, जीवंत आणि लोकजीवनाशी एकरूप झालेल्या लोककलांचे किती आकर्षण बालमनाला असते याचा प्रत्यय येतो. याचा परिणाम किती खोलवर होतो ते दिनकर द. पाटील यांच्या ' मास्टर विनायक : दिग्दर्शकांचा दिग्दर्शक ' या पुस्तकातील पुढील आत्मनिवेदनावरून दिसते. ते लिहितात –

' आम्ही म्हणायचे मराठे ..... पण घरात पाहाल तर तात्या ' ज्ञानेश्वरी ' सांगायचे. तातूकाका कथाकीर्तन करायचे. दोघेही पंढरीच्या विठोबाचे निष्ठावंत वारकरी, दर एकादशीला रात्री काकांच्या माडीवर जो टाळमृदुंगाचा गजर सुरू व्हायचा तो चांगला सकाळी सूर्योदयापर्यन्त चालायचा ...

या वातावरणातच मी लहानाचा मोठा झालो. गौळण, भारूड ऐकत जे झोपायचे ते समोरच्या घरातील जात्यावरच्या ओव्या ऐकून उठायचे. '

दिनकर द. पाटील यांनी बालपणी जे लोकजीवन पाहिले, अनुभवले, जगले त्यातूनच महाराष्ट्राला एक जाणता दिग्दर्शक लाभला आणि सिद्धहस्त संवादलेखक मिळाला. निसर्ग म्हणजे सत्य, शिव, सुंदर यांची मूर्तिमंतता. निसर्ग हाच मानवी जीवनाचा घडविता. तोच खरा मानवी जीवनाचा भाष्यकार होय. लोकजीवन, लोककला, निसर्ग यांचा संस्कार हा सर्जनशील असतो. तो कणाकणात जिवंतपणा खेळवीत असतो पण नुसता संस्कार होऊन चालत नाही. त्यातून जिद्द निर्माण झाली पाहिजे. एक जोष आणि जोम तरारला पाहिजे. व्यक्तित्व उत्फुल्ल बनायला हवं. माणसाला कोणत्याही गोष्टीचं वेड लागावं लागतं, ते याच अवस्थेत. जो झपाटून जातो, ज्याच्या देहामनावर

बेहोषी निर्माण होते, आणि भरारीचा एक गिर्देबाज कैफ चढतो. त्याच्या जीवनात डोकीवर शिरपेच चढतो. मानाचं पीस झुलत असतं. मात्र केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे ' झपूर्झा ' अशी स्थिती लाभली पाहिजे. असेच मानाचं पीस मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक श्री. ना. पेंडसे यांच्या जीवनात त्यांच्या वाङ्मयातील कलाकृतीमुळे लाभले, ते या अशाच झपाटून जाण्याने. वैफल्याच्या भोवऱ्यातूनही त्यांनी झेप घेऊन एक उंची गाठली ते श्री. ना. पेंडसे ' लेखक आणि माणूस' या पुस्तकात म्हणतात, ' .... स्वप्नाळूपणातून निर्माण होणारे वैफल्य आणि ह्या वैफल्यातून मनाला पडणारे वेडेवाकडे कंगोरे ह्यांचा धनी व्हावे लागते. येथून पुढची अनेक वर्षे ह्या वैफल्याने शिरूचे आयुष्य काळवंडून गेले. एखादा अडाणी माणूस कशाने तरी झपाटून जावा तशी शिरूची अवस्था होऊन बसली. आपण भावासारखे देदीप्यमान यश मिळवायचे, भावासारखे इंग्लंडला जायचे आणि परत आल्यावर आप्त-मित्रांचे मानाचे मुजरे घ्यायचे, एवढेच तो पाहात होता. अनेक वर्षे पाहात राहिला. परिस्थितीने पाठीवर ओढलेले कोरडे असह्य होऊ लागले. तेव्हाच ह्या स्वप्नरंजनातून बाहेर पडला. नंतर अनेक वर्षांनी पुन्हा एका स्वप्नाने झपाटला गेला, पण त्या स्वप्नाची जात इतकी अस्सल होती की, त्याने शिरूला अकल्पनीय अशा एका उंचीवर नेले. पण त्या अगोदर आयुष्याच्या पुलाखालून खूपच पाणी वाहून जायचे होते. '

मराठी काव्यातील युगप्रवर्तक कवी केशवसुत म्हणतात त्याप्रमाणे जीवनाचा ' झपूर्झा ' व्हावा लागतो. कादंबरीकार श्री. ना. पेंडसे म्हणतात त्याप्रमाणे झपाटून जावं लागतं, तसेच कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्याप्रमाणे एक ' जिप्सी ' बनावं लागतं. तेव्हाच जीवनाला हवी ती अर्थपूर्णता खेचून आणता येते. त्यांच्यातला कलावंत खऱ्या अर्थाने ' जिप्सी ' बनला तेव्हाच ' जिप्सी ' सारखी श्रेष्ठ दर्जाची कविता जन्माला आली. ते ' जिप्सी ' या कवितेच्या ' जन्मा ' संबंधी लिहितात - ' शेपटीच्या झुबक्याने खार होती खुणावीत कसे आवरावे मन गेलो पळून तिथून. '

पुढे शाळेतून कॉलेजात गेलो तेव्हा ही वेदना छळीत होती. सूर शोधीत होतो, पण सापडत नव्हता. मी झपाटून गेलो होतो. मला तो सूर शोधायचा आहे. ही एकच जाणीव मन मारून टाकीत होती. घर, कॉलेज सारे सोडून मी वेड्यासारखा ' जिप्सी ' होऊन देश पाहण्यासाठी बाहेर पडलो. सर्वांनी

माझी गणना मूर्खात केली होती, पण माझा नाइलाज होता. एक अटळ जिप्सी मला खेचून नेत होता.

वाटासवे त्या पळालो सारं काही झुगारून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून.

बाळपण हे चांगल्या स्थितिगतीचे सर्वांच्याच वाट्याला येते असे नाही. अनेक वेळा नियतीचा चकव्याचा खेळ चालतो. विरोधी, विसंगत असे वाट्याला येते. आयुष्य वाचायला शिकण्याअगोदर रानभर होणं नशिबी येतं. अत्यंत दुर्घट दुर्धर असं पदरी बांधलं जातं. पण अशाही फाटलेल्या आकाशाखाली उभी असलेली बाळपावलं आकाशाला थोपवून धरण्याचा कणखरपणा उभारल्या हातात देत असतात. मनातील नितांत निष्ठांनी काळोखाच्या पटावर सोनेरी अक्षरांत आपलं नाव नोंदवतात. याचीही चित्रं अनेक आत्मचरित्रांतून सापडतात.

महाराष्ट्राची शानदार शिवतीर्थ असलेल्या दुर्गम गडकोट किल्ल्यावरील काळ्या दगडावरील रेषा वाचण्यासाठी झपाटून गेलेला माय मराठीचा एक उपासक म्हणजे प्रसिद्ध साहित्यिक गो. नी. दांडेकर. युगकर्त्या शिवछत्रपतींच्या अचल सामर्थ्याने ज्या महाराष्ट्राच्या मातीचा कण न कण मंत्रून गेला, त्या मातीचा परम भक्त झालेल्या या भाविकाचे बालजीवन मोठे विलक्षण होते. आपल्या ' स्मरणगाथा ' या आत्मचरित्रात ते लिहितात -

' लहानपणी अगदी जरत्कारू होतो. हातापायांच्या काड्या. छातीतल्या फासळ्या दुरूनही सहज मोजता येत असत. मातीवर अगदी लहानपणापासून प्रेम. माती मोठ्या आवडीने खात असे, नाना उपाय करूनही जेव्हा मी या माझ्या व्रतापासून ढळेना तेव्हा शेवटी आईने एक उपाय शोधून काढला. दोन्ही हातांवर तिनं कापडी पिशव्या चढवाव्यात. अन् मनगटांवर चढलेली त्यांची तोंडं बंदांनी पक्की करून टाकली.

अगोदरच मी रडका. त्यात हा तोबरा बंद झाला. मग तर सकाळपासून जो चांगला लख्ख सूर धरत असे, तो थेट रात्र पडेपर्यंत. आई जेव्हा गुरगुट्या भात भरवीत असे, तेवढ्या वेळापुरता सूर बंद. पण घास गिळला, की पुन्हा सा सुरू. दिवसभर हा असा व्यायाम घेऊन असल्यामुळे रात्री मात्र मी चांगला झोपत असे. रडून मी आईला कधीच जागवलं नाही. ' लहानपणी पिंड पोसण्यासाठी काही हक्काच्या मायेच्या गोष्टी लाभत असतात.

पण दुर्दैवाने त्या हक्काच्या गोष्टींपासून कित्येकांना वंचित व्हावे लागते. तरीही ती माणसे आत्मविश्वासाने, आत्मबलाने आणि आत्मनिर्धाराने जीवनात उभी राहतात. जी निर्भर माया आपल्याला मिळालेली नसते, त्या मायेनं ती स्वतःच भारून जातात. त्या मायेची सावली इतरांच्या जीवनावर धरतात.

समाजाचे ऋण फेडण्यासाठी एका कळवळ्याने कार्य करणारे एकोणिसाव्या शताकातील दादोबा पांडुरंग यांना बालपणी त्यांच्या जन्मदात्या आईचाच पान्हा आटला. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे.

' मी जन्मलो तेव्हाच माझ्या आईचे दूध उडाले. ते पुनः दुसरे मूल होईपर्यंत आलेच नाही. यामुळे माझ्या आईस सासवानणंदांकडून फारच जाच सोसावे लागले. मी दुधासाठी टॅहांटॅहां रडावे, तेव्हा आमच्या आतेने व आजीने म्हणावे, हे देवा तू चिडीमुंगी यांस चारा देतोस, आणि या तान्ह्या बाळाचा चारा कसा नेलास ? मग तेथे आसपास घाटी लोकांची काही झोपडी असत, तेथे एक ऐली नावाची बाई होती. तिला दूध होते. तिने मोठ्या मिनतेने येऊन तेथे मला पाजावे. त्या बाईचे आमच्या आईने व आजीने मोठे आर्जव करावे, तिला वस्त्रे चिरगुटे द्यावी. अशा त्या कुळवाडणी बाईच्या आर्जवाने मला माझ्या आईने वाढविले '.

ज्यांच्या ' स्मृतिचित्रे ' या आत्मचरित्राचे लेणे मराठी साहित्याला लाभले त्या लक्ष्मीबाई टिळकांनाही त्यांच्या आत्याबाईंच्या घरी लहानाचे मोठे व्हावे लागले. त्यांच्या वडिलांचे म्हणजे नानांचे सोवळे फार होते. त्या सोवळ्यामुळे घरात भयंकर जाच सहन करावा लागला होता. दुःख जणू त्यांच्या पाचवीला पुजले होते. त्या दुःखानेच जणू त्यांना मराठी सारस्वतात अमर केले.

पुढील आयुष्यात आपल्या कर्तृत्वाचा ठसा कालपटावर उमटविणाऱ्या यशस्वी मान्यवरांच्या जीवनातील काही प्रसंग पाहणे मोठे गंमतीदार वाटावे. नंतरच्या जीवनाला विशोभित ठरणारे काही प्रसंग कित्येकांच्या आयुष्यात घडलेले असतात. ज्यांनी मराठी मनावर लेखणीचा आणि वाणीचा प्रभाव गाजविला असा एक जादूगार म्हणजे ना. सी. फडके. शाळेत असताना वक्तृत्वाच्या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला होता. त्या वेळी घडलेला प्रसंग.

' शाळेतर्फे वक्तृत्वाची स्पर्धा झाली तिच्यात मी बोललो. तेव्हा भाषण संपविताना मी म्हटलं, ' इतकं बोलून मी आपल्याला रजा देतो. ' माझं ते वाक्य ऐकून मास्तर मंडळी खो खो करून हसू लागली. मला कळेना माझ्या

बोलण्यात कोणता विनोद घडला होता. मास्तरांनी मला सांगितले, ' अरे भाषण संपविताना तुम्हाला रजा देतो असं म्हणत नसतात, मी रजा घेतो असं म्हणतात.' भाषणाचा शेवट करणारं माझं वाक्य ठार चुकीचं होतं हे समजल्यावर बक्षिसाची आशा मी सोडूनच दिली. पण पहिले बक्षीस माझ्या नावानं जाहीर झालं तेव्हा मला फार आनंद झाला. '

बालपणी शाळेत चुकणारा, भडक माथ्याचा असलेला, दुसऱ्याच्या मांडीत टाक खुपसणारा अशा स्वभावाचा विद्यार्थी पुढे देशाचा फार मोठा दृढनिश्चयी अर्थतज्ज्ञ होतो हे सी. डी. देशमुख यांच्या ' माझा जीवनप्रवाह ' या पुस्तकात वाचल्यावर सर्व सामान्यांचाही आत्मविश्वास बळावावा. त्यांनीच म्हटले आहे,

' मी चार वर्षांचा होतो तेव्हा महाडच्या प्राथमिक शाळेत माझ्या शिक्षणाचा प्रारंभ झाला. शाळेच्या इमारतीच्या बाजूला पुष्कळ पायऱ्या होत्या आणि दोन्ही बाजूंना जुईच्या वेली बहरलेल्या असत. शाळेच्या भिंती चांगल्या पक्क्या दगडांच्या होत्या. माझ्याकडून काहीही चूक झाली की साखळकर गुरुजी माझे डोके त्या भिंतीवर हळूच आपटीत असत. मीही त्या वेळी थोडा भडक माथ्याचा होतो. एकदा शिक्षक नकाशावरील काहीतरी दाखवीत असताना माझ्या पाठीमागे बसलेल्या मुलाच्या मांडीत हातातल्या टाकाचे टोक मी खुपसले होते. याचे कारण असे की, मागून कोणीतरी माझी टोपी उडविली होती. पण दुर्दैवाने ज्याच्या मांडीत टाक खुपसला होता त्याच्याऐवजी दुसऱ्याच कोणी तरी माझी टोपी उडविली होती. '

अशा प्रकारे ज्यांनी यशाची शिखरे दुर्दम्य आशावादाने गाठली, त्यांच्या आत्मचरित्रातील ' बालपण ' पाहिले की, मानवी जीवनातील अकल्पितांनी, घटितांनी मन विस्मित होते. निर्घृण आणि कठोर वास्तवाने जीवन खचून पिचवून टाकण्याचा प्रयत्न केला तरी आपल्या निर्धारी आत्मबलाने त्यावरही मात करता येते असा आशावाद बळावल्याशिवाय राहू शकत नाही. आदिम अंतर्वेदनांच्या कळाछळांनी बावरून, गांगरून न जाता नवी उमेदी, तरतरी आणि चैतन्य चिरंतनासाठी धमन्यांतून वाहते ठेवण्याचे मंत्रसामर्थ्य निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणूनच आत्मचरित्रांतील बालपणाचे चित्रण म्हणजे भावी पिढ्यांच्यासाठी मंत्रोच्चारच होत.

□ □ □

१२

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील दिवाळी अंक

समाज हा कालबद्ध असा कधीच नसतो. त्यानेच निर्माण केलेल्या भिंती त्याच्याभोवती उभ्या असल्या तरी त्यांची कालबाह्यता जाणून त्या उद्ध्वस्त करण्यासाठी सुरुंगही तोच लावत असतो. गतिमानता ही त्याच्या जीवंतपणाचे लक्षण आहे. काळाच्या कुंपणांनाही तोच चूड लावण्यासाठी उत्सुक असतो. युगांची बाशिंगं तो स्वतःच्या डोईला बांधून मिरवीत असला तरी युगांनाही तोच घडवत असतो. अनेक सावल्या त्याच्या अवतीभोवती भिरभिरत राहिल्या तरी सूर्याला जन्माला घालण्याचं श्रेयच त्याच्या पोटी नांदत असतं. आणि आपलं नांदणं सुखाचं व्हावं यासाठी मांगल्याची सूक्तं तोच रचत असतो. तेच त्याचं सत्यरूप असतं.

निसर्गाच्या विलक्षण आणि अनपेक्षित घटितांनी त्याच्या जीवनात भोवरे निर्माण होतात. वादळं रोरावत येतात. अनादिकालापासून पाचवीला पुजलेल्या महासाथी, जीवघेणी अवर्षणं, भयंकर दुष्काळ, अंतर्गत यादव्या, दुष्ट आक्रमणं, प्रांतीय, जातीय, धर्मीय युद्ध, महायुद्ध इ. अनेक गोष्टींचे दडपण समाजमनावर असते. अलीकडे तर वाढत्या महागाईने नी अस्थिर, बेचैन

बनविणाऱ्या गोष्टींमुळे चिंतेचे मोहळ लटकते आहे. अनेक प्रकारच्या पराण्या मानवी जीवाला लागल्या तरी मानवाच्या समाजाच्या मनातील आदिम अशी मिणमिणती पणती ही आनंदाचीच असते. ज्ञानेश्वरांनी ' दुरितांचे तिमिर जाओ ' असे म्हटले त्याचे अंतिम रूप हेच आहे.

कोणत्याही संस्कृतीतील आदिरूप हे उत्सवांचेच आहे. आनंद शोधणं, आनंद निर्माण करणं, आनंद देणं आणि घेणं हे तिचे स्वरूप आहे.

मानवही राईएवढ्या सुखानंदासाठी पर्वतप्राय संघर्ष झेलण्याची दुर्दम्य शक्ती एवढ्याशा कुडीमध्ये निर्माण करण्यात दंग असतो. जगातील प्रदेशानुसार आणि संस्कृतीनिहाय उत्सव, सणवार हेच दाखवून देतात. आपल्या आयुष्यातील सारे दुःखभोग मानव विसरतो. नाचतो गातो. बेहोषीनं रंगून जातो. काळानं केलेल्या प्रहाराने अंगभर उमटलेल्या खुपणाऱ्या जखमांतून लक्ष इंद्रनिळ झगमगतात. नव्या जगण्यासाठी रंध्रंरंध्रं ताजीतवानी होतात.

दिवाळी अंकाचा देखणा महाराष्ट्र : दिवाळीचा दीपोत्सव हा आपल्या संस्कृतीचे वरदानच आहे. कला- उत्सवांचा वेडा महाराष्ट्र या दीपोत्सवासाठी नटलाथटला नाही तर नवलच. ' अणुरेणू या थोकडा ' असा मनाचा गाभारा 'आकाशाएवढा ' होऊन जातो. ' इकडे तिकडे चोहीकडे ' आनंदी आनंद निर्माण व्हावा यासाठी अनेक सुंदरशी माध्यमं शोधत राहतो. कलासक्त नी रसिक महाराष्ट्राने 'अमृतातेही पैजा जिंकू ' म्हणत दिवाळी अंकाची पालखी मिरवत आणली. मराठी मनाला अलिबाबाची गुहा सापडली. इतर कोणत्याही भाषेपेक्षा हे महाराष्ट्राचे खास करून विलोभनीय असे वैशिष्ट्य आहे. दगडाधोंड्यांचा महाराष्ट्र न राहता ' दिवाळी अंकांचा देखणा महाराष्ट्र ' असे बिरुद त्याच्या छातीवर रुळू लागले.

मोहक रूपांनी आणि ऐटबाज दिमाखांनी अनेक दिवाळी अंक मराठी मनाला रिझविण्यासाठी ऐन उत्सवात रंग भरतात. पण दोन तपांपूर्वी निघणारे दिवाळी अंक मुंबई-पुण्याहून प्रसिद्ध होत. सर्व परिक्षेत्रांना स्पर्श करतील एवढा व्यापक आवाका त्या काळात नव्हता. या मध्यवर्ती केंद्रापासून दूर असलेल्या प्रदेशातील लोकरंग, तसेच विशाल जीवनातील सर्वस्पर्शी वेध त्यातून येणं कठीण होतं. त्या काळात दक्षिण महाराष्ट्र, बेळगाव, कारवारपर्यंतच्या मुलखाशी एकरूप झालेल्या पुढारीने दिवाळी अंक प्रसिद्ध करून ही उणीव

भरून काढली. पुढारीचे संपादक ग. गो. जाधव तथा आबाजी यांनी स्वीकारलेले लोकरंजन आणि लोकप्रबोधन हे ध्येय त्या काळातील दिवाळी अंकातून प्रत्ययाला आल्याशिवाय राहात नाही. नामवंत साहित्यिकांबरोबर माझ्या मुलखातील नवोदित लेखकांनाही स्थान मिळाले पाहिजे, थोरांच्या प्रभावळीत बसताना नव्या लेखकांनाही सकस जाणिवांची प्रेरणाही मिळाली पाहिजे ही त्यांची आंतरिक इच्छा होती. असे अनेक स्फुलिंग त्यांनी दक्षिण महाराष्ट्रात चेतविले. अनेक लेखक पुढे आणले. आबाजी अशा लेखकांना स्मरणपूर्वक निरोप पाठवत. लिहायला सांगत. त्यांचे साहित्य स्वतः वाचत आणि त्या लेखकांशी साहित्यातील दर्जेदारपणाबद्दल चर्चा करीत. दिवाळी अंकात त्याला आग्रहपूर्वक स्थान मिळे. आज त्यातील अनेक साहित्यिक महाराष्ट्र सारस्वताच्या नक्षत्र मंडळात चमकताना दिसतात.

दिवाळी अंक – पूर्वरंग : प्राथमिक काळातील दिवाळी अंक आताच्या 'सोनेरी' पुरवणीच्या आकाराचे असत. जिल्हापत्राचा हा दिवाळी अंक असला तरी दर्जा, सौष्ठव गुणवत्तापूर्ण असले पाहिजें हे कटाक्षाने पाळले जात होते. त्या वेळी प्रसिद्ध कवी श्रीरंग समडोळीकर पुढारीत होते. आबाजी त्यांच्याकडे दिवाळी अंकाचे काम सोपवीत. तेही अत्यंत कुशलतेने अंक सजवीत. वैचारिक लेख, कथा, कविता यांनी अंक नटलेले असत. भाऊसाहेब खांडेकर, माधवराव बागल, अण्णाभाऊ साठे, डॉ. सरोजिनी बाबर, म. भा. भोसले, सुधांशु, यशवंत, राजकवी भोसले, ग. दि. माडगूळकर अशा प्रथितयश लेखकांच्या ठळक नावाबरोबरच सूर्यकांत खांडेकर, निकुम्ब, रमेश मंत्री, रणजित देसाई, आनंद यादव, शकर पाटील आणि बाबा कदम, चंद्रकुमार नलगे, जयसिंग शिंदे, शंकर खंडू पाटील, चंद्रकांत शेट्ये, महादेव मोरे इ. साहित्यिकांच्या लेखनाच्या पूर्वखुणाही दिसतात. या सर्वांच्या साहित्यातून त्या त्या पर्वकाळातील सामाजिक स्थितिगतीचे, अवस्थांतराचे भान चित्रित झालेले दिसते. सन १९६० ते ७० पर्यंतचा कालखंड पाहिला तरी त्या काळातील दुष्काळ, महापूर, भारतीयांची शेजारी राष्ट्रांशी झालेली युद्धे, भूकंप तसेच ग्रामीण जीवनातील लक्ष्यवेध यांची चित्रं, कथा, कवितांतून रेखाटलेली दिसत. सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, जीवनातील चढउतार, संघर्ष यांचा आलेखच पाहायला मिळतो. नाही तरी साहित्य हे त्या त्या कालातील मानवी जीवनाचे प्रतिबिंब असते.

अंकात लेखकांचे फोटो : काही काही दिवाळी अंकातून त्या त्या लेखकांचे फोटोही छापलेले आहेत. हे एक वेगळेपण त्या काळात जपले होते. ज्या लेखकाचे साहित्य आपण वाचतो आहोत, त्या लेखकाशी फोटोतून का होईना वाचकाला जवळीक साधता येते. त्या लेखनाशी वाचक अधिक समरस होऊन वाचतो अशी त्यामागे धारणा होती. कथेतील वा कवितेतील भावार्थाला अधिक उठाव मिळावा म्हणून रेखाचित्रंही देण्यात येऊ लागली. अंक अधिकाधिक मोहक दिसू लागले. स्वरूप उत्तम बनू लागले.

संपादकीय दृष्टी : मोठ्या आकाराच्या पानांची परंपरा १९७० पर्यंत होती. त्या परंपरेतील १९७० हे अखेरचे वर्ष. या एवढ्या काळात दिवाळी अंकांनी दिलेले साहित्य हे आबाजींच्या समाजप्रवण धारणेची उत्तम साक्ष आहे. आबाजींचे सामाजिक जाणिवेने भारलेले व्यक्तिमत्त्व, साहित्य निवडीतील चोखंदळपणा, नवीन पिढीला लेखनप्रवृत्त करण्याची आंतरिक तळमळ, दूरदर्शीपणा, संस्कारक्षम मनःप्रवृत्ती, सांस्कृतिक उत्थानाबद्दलची मनस्वी कळकळ, उपेक्षितांबद्दलचा उत्कट जिव्हाळा हे सारे अंकांच्या पानापानातून व्यक्त होत असल्याचे जाणवल्याशिवाय राहू शकत नाही. या दिवाळी अंकांनी काळावर उत्तम प्रकारचा ठसा उमटविला आहे हे नमूद करणे उचित ठरेल. मुंबई-पुण्याच्या दिवाळी अंकांतून तेच ते नामवंत लेखक असायचे पण पश्चिम, दक्षिण महाराष्ट्र, बेळगाव, काहीसे कोकण एवढ्या परिसरातील नव्या लेखकांना दिलासा मिळाला तो पुढारीच्या या व्यासपीठाचा. नवे लेखक, नव्या प्रदेशातील नव्या ऊर्मी यांना प्रकाश लाभला तो या अंकांचा. इथल्या पाळण्यात पाय दिसलेले किती तरी लेखक पुण्यामुंबईच्या हवेल्यांतून विसावलेले आहेत.

१९७१ पर्यंत महाराष्ट्रात, महाराष्ट्रातील राजकारणात, महाराष्ट्रातील ग्रामीण पातळीवर अनेक बदल होत आले होते. महाराष्ट्रातील डोंगरजाळी, डोंगरी कडीकपार नव्या वाऱ्याने तरतरीत होऊ लागली होती. शिक्षण, शिक्षणातून विज्ञान, त्यातून नवनव्या सुधारणा सर्वदूर पोचल्या होत्या. ग्रामीण भाग जागा झाला होता. गावकुसाबाहेरच्या चळवळी शतकांच्या बंदिवासातून मुक्त होण्यासाठी जोर धरू लागल्या होत्या. सर्वक्षेत्रातील परिवर्तन उंबरठ्यावर बाहू उभारून उभं होतं. मराठी साहित्यातही ग्रामीण साहित्य, दलित साहित्य असे वाङ्मयीन प्रवाह सुरू झाले होते. पुढारी आपल्यापरीने या परिवर्तनाला गती देत होता.

नावीन्यपूर्ण स्वरूप : मनोहर बदल : पुढे आबाजींचे चिरंजीव प्रतापसिंह हे वृत्तपत्राचा अभ्यासक्रम परदेशात पूर्ण करून परतले. त्यांचा वृत्तपत्रविश्वातील प्रवेश पुढारीच्या विकास टप्प्याला मोलाचा ठरत गेला. दिवाळी अंक मासिक आकारात सुरू झाला. या पहिल्या अंकाच्या मांडणीत शंकर खंडू पाटील यांचा सहभाग होता. श्री. प्रतापसिंहांच्या मार्गदर्शनाखाली पुढारी दिवाळी अंक नावीन्याने नव्या कल्पनांनी रसिकांची मनं जिंकू लागले. या अंकाच्या मांडणीमध्ये प्रा. एस. एस. भोसले, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. भैरव ऊर्फ दुष्यंत कुंभार यांचाही सहभाग लाभला आहे.

अंकाच्या बाह्य स्वरूपामध्ये, सजावटीमध्ये झालेले मनोहारी बदल लक्षणीय आहेत. तसेच अंतर्गत स्वरूपातही कालमानाप्रमाणे अंतर पडत गेलेले दिसते. अलीकडचे पुढारी दिवाळी अंक पाहिले तर हाताला न पेलेल अशा वजनाचे, भरपूर मजकुराचे विविध लेखनप्रकारांनी नटलेले, माफक किंमतीत वाचकांची कदर बाळगणारे असे आहेत.

दिवाळी अंकातून कादंबरी : दिवाळी अंकातून वाचकाला आनंद देणारे, कसदार नि प्रदीर्घ लेखन देण्यास पुढारीने सुरुवात केली. त्यामध्ये सातत्य टिकवले. जीवनाचे वेधक दर्शन घडविणारी एखादी कादंबरी दर दिवाळी अंकात दिली जाते. कधी शृंगारिक, कधी ऐतिहासिक, कधी ग्रामीण, कधी अस्वस्थ करून सोडणाऱ्या अस्पर्शीय जीवनावरची अशा विविध विषय रूपांच्या कादंबऱ्या येऊन गेलेल्या आहेत. कादंबरी हे खास आकर्षण या अंकाचे असते. आतापर्यंत उद्धव शेळके, ज्योत्स्ना देवधर, महादेव मोरे, देवदत्त पाटील, नयनतारा देसाई, रवींद्र शोभणे, नयना आचार्य, शैलजा राजे, शकुंतला गोगटे, चंद्रप्रभा जोगळेकर, इ. सारख्या प्रथितयश लेखक-लेखिकांच्या कादंबऱ्या सादर केलेल्या आहेत. यातील कादंबऱ्यांची ' मोहात बुडाली दुनिया ' , ' रक्तध्रुव ', ' मॅडम ' , ' ध्यास ' ' नाते मातीचे ' , ' जायबंदी ' , ही नावे आठवली तरी त्यातील विषयांचे वैचित्र्य ध्यानी येईल. याचप्रमाणे सौ. इंद्रायणी सावकार (चटोरीका चंदासे प्यार), श्रीकांत सीनकर (जेव्हा मृत्यू वाट चुकतो) यांच्या प्रदीर्घ कथा चटका लावून जातात. व्यंकटेश माडगूळकरांचा तमाशातील झगड्यावरचा (रेखाचित्रासहितचा) लेख, मधुकर केचे यांचा ' साखरे ' या वादळी व्यक्तिचित्रणाचा लेख, प्राचार्य गजमल माळी यांचा राजर्षी शाहूसंबंधीचा मननीय लेख अशा लेखांनी अंकाची उंचीही वाढविलेली आहे.

प्रथितयश लेखकांबरोबर नवोदितांना स्थान : पुढारी दिवाळी अंकातील लेखकांची संख्या पाहिली तरी अचंबा वाटतो. अन्य दिवाळी अंक पाहिले तर चार-पाच नामवंत लेखक, पाच-सहा प्रख्यात कवी आणि नवोदितांचा जाणीवपूर्वक अभाव, काही परिसंवाद, काही चर्चा एवढ्यावर सजतात. पण पुढारीचा कोणत्याही सालाचा दिवाळी अंक पाहिला तर त्यात प्रथम श्रेणीचे तीस-पस्तीस लेखकांची आवर्जून हजेरी आणि सहा-सात नवोदितांची उपस्थिती असते. चाळीस एक कवींच्या कविता असतात.

अंतरंग : विविध कथा प्रकारांचे दर्शन, दर्जेदार साहित्य, पाहिला तर तो कथा विशेषांक असतो. कविता खास अंकही होऊ शकतो. कथा वाङ्मयातील विविध प्रकारांची व प्रवाहांची दर्शने इथे एकत्रितपणे घडतात. भावकथा, ग्रामीण, दलित, ऐतिहासिक, शृंगारिक, विनोदी आणि अलीकडील भूतकथा, भयकथा, गुन्हेगारकथा, रहस्यकथा, विज्ञानकथा या साऱ्या कथा वाङ्मयातील विविध उपप्रवाहांचे संमेलन नित्य असते. या अंकातील सहज नावे पाहिली तरी त्याचे प्रत्यंतर आल्याशिवाय राहणार नाही. सर्वश्री गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, श्री. ज. जोशी, विजया राजाध्यक्ष, प्रल्हाद वडेर, सदाशिव आठवले, गोवईकर इ. च्या भावकथा, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, कऱ्हाडे, बंधुमाधव, केशव मेश्राम, आनंद यादव, रा. रं. बोराडे, द. का. हसमनीस, मधु मंगेश कर्णिक, द. ता. भोसले, शंकर खंडू पाटील, चंद्रकुमार नलगे, रंगराव बापू पाटील, माधव कोंडविलकर इ. च्या दलित ग्रामीण कथा, बाळ गाडगीळ, रमेश मंत्री, चंद्रकांत महामिने, सुभाष भेंडे, वसंत सबनीस, वि. आ. बुवा, इ. च्या विनोदी कथा, उद्धव शेळके, महादेव मोरे यांच्याबरोबरच ऐतिहासिक कथा लिहिणारे शिवाजीराव सावंत, अनंत तिबिले, शैलजा राजे यांच्या ओजस्वी लेखणीचा प्रभाव दिसून येतो. व. कृ जोशी, बाबा कदम, यशवंत रांजणकर, कमलाकर धारप, नारायण धारप, श्रीकांत सिनकर, निरंजन घाटे यांनी मराठी साहित्यात आणलेला वेगळा प्रवाह या अंकातही रुजू झालेला दिसतो. याशिवाय सरोजिनी बाबर, योगिनी जोगळेकर, ज्योत्स्ना देवधर, शैलजा राजे, चंद्रप्रभा जोगळेकर, मंदाकिनी गोगटे, इंद्रायणी सावकार, नयनतारा देसाई, नयना आचार्य, जान्हवी संत, शैलजा काळे, प्रभा पेठे, संजीवनी खेर, सखा कलाल यांच्या स्त्रीजीवनातील समस्यांवर प्रकाश टाकणाऱ्या कथावाङ्मयाने अंकाच्या वैशिष्ट्यात भरच पडलेली आहे.

ही काही ठळक नावे. याशिवाय अशी किती तरी नावे आहेत की सर्वांचा उल्लेख जागेअभावी करणे शक्य नाही. मात्र एवढे खरे की या सर्व कथालेखकांच्या दर्जेदार कथांनी जीवनाचे विविधांगी दर्शन घडविले आहे. एक अंक वाचला तरी वरील सर्व कथाप्रकारांतून घडलेले मानवी मनाचे सामाजिक जीवनाचे विलक्षण अन् चक्रावून टाकणारे दर्शन वाचकाला अंतर्मुख करते. अघटित वाटणारे पण अनपेक्षितपणे वाट्याला येणारे विक्षिप्त विचित्र नियतीचे चंचल खेळ विराटाचा एखादा पापुद्रा दाखवितात. वाचकांची मती गुंग करून टाकतात.

कवितांचा फुलोरा : हाती लाभलेल्या अंकांवर नजर टाकली तर कवितांचा बहर आहे असे सहज जाणवते. लावणी वाङ्मयापासून ते आजच्या गझल, वात्रटिका, कणिका, चिंतनिकापर्यंतचा प्रवास कसा घडत गेला याचाही शोध घेता येतो. निर्घृण काळाचे झालेले समाजपुरुषावरील क्रूर प्रहार, मानवी मनातील तरंग, लोकजीवनातील स्पंदन आणि अंतःकरणाला कातर लावणारे असंख्य क्षण यांचे दाहक आणि गहिरे रंग या काव्याच्या पटावर उमटलेले दिसतात. प्रेमाच्या नाजूक भावनेपासून ते समाजाला चूडाग्नी लावायला उठणाऱ्या हातातील धमन्यांचा त्वेष, अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार त्या वेळचा बांगला देशातील हत्याकांडापासून ते या इथे घडलेल्या दुष्कांडापर्यंतची चित्रणं, कवितांचा विषय झालेला आहे. कवितांच्या या विकासगतीच्या दिंडीत राजकवी यशवंत, कुसुमाग्रज, केशव मेश्राम, नारायण सुर्वे, ढसाळ, दया पवार, मनोहर, वसंत बापट, पाडगावकर, करंदीकर, मुक्तिबोध, शंकर वैद्य, वसंत सावंत, कांत, म. वि. कुलकर्णी, लक्ष्मीकांत तांबोळी, संजीव, सुधांशु, सुरेश भट, निकुम्ब, शरणकुमार लिंबाळे, फ. मु. शिंदे, बापूराव जगताप, भोईटे, महाळुंगकर, शहाजिंदे, खेबूडकर, प्रसन्नकुमार पाटील, कल्याण इनामदार, मुजावर, कृष्णा गुरव, श्रीकांत नरुले, राम, गोसावी तसेच शांता शेळके, इंदिरा संत, शिरीष पै, अनुराधा पोतदार, पद्मा गोळे, संजीवनी मराठे, सरिता पत्की, अनुराधा पाटील, वंदना विटणकर, वासंती इनामदार, मंदा कदम, शैला सायनाकर इत्यादी कवि-कवयित्रींनी सहभाग घेतलेला दिसतो.

रंजक बालविभाग : स्त्रीमनाचा शोध घेणाऱ्या कथाकथितांबरोबरच बालमनाला रंजविणाऱ्या बालसाहित्याचा विभागही या दिवाळी अंकांचे वेगळे आकर्षण आहे. दिवाळीच्या सुटीतील दिवाळीचा आनंद लहान बालकांना

उपभोगता यावा, त्यांची करमणूक व्हावी, त्याचबरोबर बालमनावर सुसंस्कार व्हावे, त्यांच्या मनात आशा- आकांक्षा फुलवाव्या, मनोहर विश्वाचे आकर्षण निर्माण व्हावे आणि त्यांच्या चिमुकल्या पंखांना एक वेगळे बळ प्राप्त व्हावे यासाठी या बालविभागाची एकूण सजावट झालेली दिसते. अद्‌भुत, कल्पनारम्य असे हे वाङ्मय भासले तरी त्यांच्या बालमनाला भरारणारे अंकुर फुटावे अशीच त्यामागची धारणा असलेली दिसून येते. सत्य, पराक्रमशीलता, न्याय, निष्पापता यांचे संस्कार करणे, सद्‌गुणांची उद्‌भावना करणे हाच हेतू असतो. दैववादी भ्रामक कल्पना न रुजतील याची दक्षता घेणारे साहित्य येथे निवडलेले दिसते. व्यंगचित्रे, चित्रमाला, कथा, बालगीते, कादंबरिका, एकांकिका, ऐतिहासिक पौराणिक कथा, मुलांच्या पराक्रम कथा, कोडी यांचा यामध्ये समावेश आहे.

मराठीमध्ये बालवाङ्मय लिहिणारे जे नामवंत लेखक आहेत त्यांनी हा बालवाङ्मय विभाग सतत ताजा टवटवीत ठेवलेला दिसतो. भा. रा. भागवत, राजा मंगळवेढेकर, महावीर जोंधळे, पंढरीनाथ रेगे, रा. वा. शेवडे, श्याम कुरळे, दिलीप नलगे, कोठारी तसेच आशा भाजेकर, लीला पाटील, वंदना विटणकर, लीला शिंदे, चित्रकार खलील खान इ. बालवाङ्मयक्षेत्रातील नामवंत लेखक, लेखिका, चित्रकार यांचा या विभागात सहभाग आहे.

व्यंगचित्रे, वात्रटिका : सामाजिक व्यंगावर प्रकाश टाकणाऱ्या वात्रटिका फ. मु. शिंदे, वि. म. बोते, पी. रघुवीर, दिनकर जगदाळे यांच्या नावे जमा आहेत. खुसखुशीत चुरचुरीत असलेल्या या वात्रटिका मिष्किलपणाने वाचकांच्या मनाची पकड घेतात. वात्रटिकांबरोबरच समाजाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्याचे काम व्यंगचित्रकार खलील खान, हरिश्चंद्र लचके, द. अ. बंडमंत्री, प्रभाकर झळके, प्रकाश वनगे इ. नी आपल्या मार्मिक व्यंगचित्राद्वारे समाजाच्या अतिरेकीपणावर टीकाभाष्य केले आहे. रंजन आणि उपरोधात्मक टीका यांचा बहारीचा-संयोग जुळलेला दिसतो. त्या त्या वर्षातील राजकारण, समाजकारण, शिक्षण,-व्यापार या क्षेत्रात अतिटोकाची भूमिका घेतलेली असेल तर त्यातील फोलपणा, वैयर्थ अचूक चित्रांकनातून स्पष्ट केलेले आहे. यामुळेही या अंकांची मौलिकता वाढलेली आहे.

सजावट : अंकातील सजावट चित्रकार मन्सूर शेख, संजय अणेकर, शिराज मुजावर यांनी अत्यंत रेखीवपणाने केली आहे. कथेतील मथितार्थ

सर्वंकषपणे जीवंत उभा करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कुंचल्यात असल्याचे जाणवते. अंक रंगीबेरंगी चित्तवेधक चित्रांच्या छपाईने अधिकच उठावदार बनलेले आहेत. एक सुंदर पुष्पगुच्छ हाती घेतल्याचे समाधान वाचकाला व्हावे. हस्तरेषातज्ज्ञ डी. एन. जाधव यांचे वार्षिक राशिभविष्य अंकात लाभल्याशिवाय अंक निघत नसावा असे वाटते. हेही एक आकर्षण .

देखणी मुखपृष्ठे : अंकांची मुखपृष्ठेही देखणी ठेवण्यात संपादकांनी सावधगिरी बाळगलेली आहे. त्या त्या कालात लोकमनाची विलक्षण पकड घेणाऱ्या चित्रपट अभिनेत्री असतील त्यांच्या सुंदर चित्रांची मुखपृष्ठे हे खास आकर्षण ठेवलेले असते. राधिका, संजीवनी बीडकर, पद्मिनी कोल्हापुरे, श्रीदेवी, मंदाकिनी, मीनाक्षी शेषाद्री ही काही वानगीदाखल उदाहरणे होत.

अंकाचे आदीपासून अंतापर्यंतचे ठेवलेले वैविध्यपूर्ण लोभस रूप आणि दर्जेदार साहित्याने सुशोभित झालेले अंतरंग या सर्वांतून संपादकांच्या चोखंदळ दृष्टीचा झालेला स्पर्श अंकाचं सोनं करून टाकतो आणि प्रसिद्ध झाल्याबरोबर हातोहात खपणारा अंक म्हणजे ' पुढारी दिवाळी अंक ' ही परंपरा अखंड चालत राहते.

REFBK-0026510

प्रा. चंद्रकुमार नलगे यांचे प्रकाशित साहित्य

कथासंग्रह

अंगाई
पंढरीची वाट
सरकारी माणूस
गुरु साक्षात् परब्रह्म
रानकरवंदं
हुरडा
अशा अवेळी
सर्जा
आक्रांत
अशीच एक वाट
जलम

कादंबरी

गस्त
अगीनफूल
शहाळी
देवाची साक्ष
काफिला

ललित लेखसंग्रह

गावाकडची माती
चंद्रबनातल्या सावल्या
मंतरकैफ

संपादन

मंथन
कहाणी तुझी माझी

काव्यसंग्रह

दिंडी

बालवाङ्मय

नंदादीप
खदखदे खदाखदा खदखदा

एकांकिका

गळफास

दीर्घकथा

इथे नांदती रामाची लेकरे
घुंगरांच्या तालावर

समीक्षा लेखसंग्रह

मराठी साहित्याचे उदयरंग

संपादन
(प्रा. पानतावणे यांचेसह)

लोकरंग
दलितकथा
दलित आत्मकथन
स्त्री आत्मकथन

चरित्र

स्वामी रामानंद



" प्रा. चंद्रकुमार नलगे हे एक शांत, धीरगंभीर व्यक्तिमत्व, आत्ममग्न, भावतंद्रीत स्थिरावलेले शांत अंतःकरण, कविप्रवृत्तीशी सतत संवाद करणारी अंतःप्रेरणा आणि सात्विक विचारांचा साक्षेपी अविष्कार करण्याची तळमळ यासारख्या मनोपिंडाचा हा साहित्यिक– "

" समर्थ लेखक, जबाबदार संपादक, साहित्यिक, वैचारिक चळवळीचा परिपक्व नेता, अस्खलित वाणीचा व्याख्याता, प्रज्ञावंत विद्यार्थी. शिक्षण संस्था संस्थापक, साने गुरूजी-प्रमाणे आवडता अध्यापक, एक बहरलेला चाफा म्हणजे नलगे सर. "

" नलग्यांजवळ जीवनाला सामोरे जाण्याची, अनुभवाचे रसरशीत रूप न्याहाळण्याची ताकद आहे. चांगल्याला जपणारी, शिवाला संवर्धणारी, सद्‌भिरुचीची जोपासना करणारी, समाजाची ऋणे आणि शल्ये यांची सुजाण जाणीव राखणारी, अशी ही समाजाभिमुख मनोवृत्ति आहे. "

" चंद्रकुमार नलगे...एक हळव्या मनाचा दिलदार माणूस. गरिबीची जाणीव ठेवून ध्येयपूर्तीसाठी धडपडणारं व्यक्तिमत्व... काही तरी नवीन करण्याची जिद्द आणि इर्षा असलेला कलावंत...गोर–गरिबांसाठी तळमळणारे उदार अंतःकरण... हळुवार भावनांची जपणूक करणारं कवीमन... अवतीभवतीच्या वातावरणात रस घेऊन त्यांचं जिवंत चित्रण करणारा कथाकार...आणि अनभिज्ञ असलेल्या क्षेत्रातही नव्याच्या उत्साहाने धाडस करणारा प्रयोगशील कलावंत..."

" गेली तीस वर्षे स्वतःचं व्यक्तिमत्व घडवत, सामाजिक परिवर्तनामध्ये झोकून देणारं जिद्दी व्यक्तिमत्व...निःपक्षपाती, वैचारिक, कृतिशील ठाम बैठक. "

" ग्रामीण मनाची हळुवार स्पंदने टिपणारा हा लेखक असून अभिजात ग्रामीण ललित गद्याचा प्रारंभ त्यांनी केला आहे. "